७८६८
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. २१४३

# निबंध
# डुंदके

प्र. के. अत्रे

REFBK-0017306

# हुंदके

मृत्युलेख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ७१०५१ दि: १/२/६४
क्रमांक ... नों: दि: ३१/५/६९

प्रल्हाद केशव अत्रे

२७०३

संकलक

व. ब. आगाशे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७३०६
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0017306

प्रकाशन क्रमांक
३८२

ग. पां. परचुरे प्रकाशन-मन्दिर, मुंबअी ४

मूल्य पंधरा रुपये

सर्वाधिकार सुरक्षित

प्रकाशक : विष्णु गजानन परचुरे, ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगावकर चाळ क्रमांक २, गिरगाव, मुंबई ४

आवृत्ती पहिली : ९-११-१९६९ मुखपृष्ठ सजावट : मोहन वाघ

मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, ‘शिव-पार्वती’
४६१/४ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ३०

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............... विः ...............
क्रमांक ............... नों: दि: ...............

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | ‘ कमळा ’ काव्याचा कलावंत गेला ! | १ |
| २ | स्टॅलिन आणि बुद्ध यांचा उपासक | ८ |
| ३ | कै. एकनाथ यादव निफाडकर | १४ |
| ४ | दत्तू बांदेकर | २४ |
| ५ | कारुण्याचा विनोदी शाहीर | २७ |
| ६ | पुरुषोत्तम मंगेश लाड | ३४ |
| ७ | विनोद – चिंतामणी | ३७ |
| ८ | ‘ कोश ’कार कर्वे | ४२ |
| ९ | ‘ नाना गेले ’ | ४६ |
| १० | मामा गेले हो ! | ५२ |
| ११ | प्रा. रामचंद्र कृष्ण लागू | ५८ |
| १२ | कै. नानासाहेब चाफेकर | ६३ |
| १३ | शेजवलकर | ६८ |
| १४ | पुरुषोत्तम रामचंद्र लेले | ७२ |
| १५ | भीमराव खंडेराव कोरान्ने | ७७ |
| १६ | मायदेव | ८२ |
| १७ | मंगेशराव कुळकर्णी | ८७ |
| १८ | कै. दामूअण्णा पोतदार | ९२ |
| १९ | महाराष्ट्राचा लाडका विनोदी नट नागेश जोशी | ९७ |
| २० | नटश्रेष्ठ दामूअण्णा जोशी | १०० |
| २१ | अरेरे, बाबूराव गेले ! | १०४ |
| २२ | गुणीदास गेले ! | १०९ |
| २३ | बालमनोवृत्तीचा मास्टर विनायक | ११४ |
| २४ | दुष्ट लोकांनी काकांना मारले हो ! | १२१ |

| | | |
|---|---|---|
| २५ | महाराष्ट्राचा ' ज्ञानप्रकाश ' गेला ! | १३९ |
| २६ | बाबूराव गोखले | १४९ |
| २७ | न्यायमूर्ती तेंडोलकर | १५३ |
| २८ | न्यायमूर्ती बावडेकर | १५६ |
| २९ | कै. प्रिं. एम्. टी. व्यास | १६० |
| ३० | वृत्तपत्रांचे इतिहासकर्ते | १६३ |
| ३१ | प्रा. ना. ग. नारळकर | १६७ |
| ३२ | मरहूम महमदअल्ली जिना | १७२ |
| ३३ | राज्य न करणारा इंग्लंडचा राजा | १७९ |
| ३४ | देशभक्त जयकर | १८६ |
| ३५ | केशवराव जेधे | १८९ |
| ३६ | उपेक्षित देशभक्ताचे निधन ! | १९३ |
| ३७ | देशभक्त भोपटकर | १९६ |
| ३८ | भाऊसाहेब हिरे | १९९ |
| ३९ | पंत गेले | २०३ |
| ४० | अरेरे ! बर्वे गेले ! | २०७ |
| ४१ | खासदार मोरे ह्यांना श्रद्धांजली | २१२ |
| ४२ | कै. पुरुषोत्तम त्रिकमदास | २१६ |
| ४३ | मा. सा. कन्नमवार | २२० |
| ४४ | भारताचा विनोदसम्राट | २२५ |
| ४५ | अर्धशतकाचा माझा मित्र गेला ! | २३३ |
| ४६ | ज्योतिषाचार्य वसंत लाडोबा म्हापणकर | २४० |
| ४७ | माझा ' बाबू ' गेला ! | २४५ |


卐

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १६३०६
शाखा (स्थळ प्रत)
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नों' दि: ....................

१

# ‘ कमळा ’ काव्याचा कलावंत गेला !

‘ बी ’ या अद्भुतरम्य नावाने गेली तीस-बत्तीस वर्षे मराठी कवितेच्या रसिकांना सुपरिचित असलेले महाराष्ट्राचे एक अत्यंत प्रतिभाशाली कवी श्री. नारायण मुरलीधर गुप्ते हे शुक्रवार दि. २९ ऑगस्ट रोजी दिवंगत झाले, हे कळविण्यास आम्हांला अत्यंत दुःख होत आहे. रे. टिळक, तांबे, चंद्रशेखर, लेंभे, गोविंदाग्रज, रेंदाळकर, नागेश आणि बालकवी ठोंबरे यांच्या काळातील ‘ बी ’ हे एक नामांकित कवी होते. आजच्या काळातही नव्या दमाचे आणि उज्ज्वल प्रतिभेचे अनेक नवनवीन तरुण कवी उदयाला आलेले असले, तरी ‘ बी ’ कवींच्या तोलाचा आणि दर्जाचा त्यांमध्ये एकही कवी आढळणार नाही, हे अगदी सत्य आहे. ‘ बी ’ कवींच्या निधनाने मराठी कवितेचे फारच मोठे नुकसान झालेले आहे यात मुळीच शंका नाही.

‘ बी ’ कवींना प्रत्यक्ष ओळखणारी अशी माणसे महाराष्ट्रात फारच थोडी निघतील. सार्वजनिक जीवनामध्ये त्यांनी कधीही भाग घेतला नाही. स्वतःच्या काव्याला किंवा नावाला चारचौघांत प्रसिद्धी मिळावी अशी त्यांनी कधीही आयुष्यात हाव धरली नाही. त्यांचा सारा जन्म लहानसहान गावात सरकारी नोकरी करण्यात गेला. कोणत्याही कवीच्या मेळाव्यात किंवा साहित्य-संमेलनात त्यांनी कधी भाग घेतलेला नाही. आपल्या मधुर गुंजारवाने त्यांनी महाराष्ट्राला जेव्हा वेडे केले तेव्हादेखील आपल्या नावनिशीचा किंवा ठावठिकाणाचा त्यांनी कोणाला पत्ता लागू दिला नाही. आजही ‘ बी ’ कवींना जे ओळखतात त्यांना

त्यांचे संपूर्ण नाव काय आहे हेदेखील सांगता येणार नाही. आपले लौकिक अस्तित्व जगापासून इतक्या कटाक्षाने लपवून ठेवणारा 'बी 'एवढा महान कवी महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत दुसरा कोणीही होऊन गेला नाही. गोविंदग्रजांना भेटण्यासाठी एकदा ते आपण होऊन मुद्दाम पुण्याला आले होते, एवढीच त्यांच्या प्रकटीकरणाची एक गोष्ट मला माहीत आहे. मरणसमयी त्यांचे वय शहात्तर वर्षांचे होते. गेली सात-आठ वर्षे ते मध्यप्रांतात छिंदवाडा येथे आपल्या जावयाच्या घरी राहात असत. आयुष्याच्या अखेरीस अखेरीस ते अतिशय थकलेले होते. त्यांना डोळ्यांनी नीट दिसत नव्हते. तथापि अशा अवस्थेतही त्यांची काव्यप्रतिभा त्यांना सोडून गेली नव्हती. दगडी पाटीवर मोठ्या मोठ्या अक्षरामध्ये आपल्या लहान नातवांकडून ते आपल्या कविता लिहवून घेत. अगदी गेल्या मे महिन्यापर्यंत त्यांचे हे काव्यलेखन चालू होते. त्यांनी अलीकडे लिहिलेल्या काही कविता 'युगवाणी' मासिकात प्रसिद्ध झालेल्या पुष्कळांनी वाचल्याही असतील.

मराठी काव्याच्या प्रांगणात 'बी' कवींनी 'वेडगाणे' ही कविता लिहून पदार्पण केले, त्याची आठवण अजूनही माझ्या मनात जागी आहे. 'बी' हे इंग्रजी नाव धारण करून मराठीमध्ये कविता करणारा हा कवी कोण आहे याबद्दल रसिकांना जेवढे आश्चर्य आणि कौतुक वाटले, त्यापेक्षाही त्याने लिहिलेली ही पहिलीच हृदयंगम कविता वाचून त्यांची अंतःकरणे अधिक हर्षित झाली. क्षितिजावर उगवल्यावरोवरच एखाद्या तेजाळ ताऱ्याने आपल्या किरणांनी लोकांची मने आकर्षून घ्यावीत, तसे 'बी' कवींनी आपल्या पहिल्याच गुंजनाने रसिकांचे आणि समकालीन कवींचे मन आपल्याकडे एकदम वेधून घेतले. रे टिळकां-सारखा कविश्रेष्ठ तर 'बी' कवींवर इतका खूष होऊन गेला की त्याने 'बी' कवींना उद्देशून एक अतिशय सुंदर कविता लिहिली. 'बी' कवींच्या बहुतेक सर्व कविता त्या वेळच्या मासिक 'मनोरंजन 'मध्ये प्रसिद्ध झाल्या. संख्येच्या मानाने आणि इतर कवींच्या तुलनेने त्यांच्या कविता अतिशय थोड्या आहेत. ते फारच थोडे लिहीत. पण जे लिहीत त्यातील शब्द न् शब्द आणि अक्षर न् अक्षर बावनकशी सोने असे. 'बी' कवी जेव्हा कविता प्रसिद्ध करू लागले तेव्हा तो काळ मराठी कवितेच्या ऐन बहराचा काळ होता. गोविंदाग्रज, ठोंबरे, रेंदाळकर, तांबे आणि नागेश यांच्या एकाहीपेक्षा एक सुंदर कविता त्या वेळी प्रसिद्ध होऊ लागल्या होत्या. गोविंदाग्रजांच्या आणि बालकवी ठोंबऱ्यांच्या कवितांनी तर

रसिकांना वेडच लावले होते. अशा विकट चढाओढीच्या कालामध्ये एखाद्या नव्या कवीने प्रकट होऊन वाचकांच्या मनावर आपली स्वतंत्र छाप बसविणे हे अतिशय कठीण होते. पण ते अवघड काम 'बी' कवींनी सहज लीलेने करून दाखविले. तसे 'बी' कवी आपल्या समकालीनांपेक्षा त्या वेळी वयाने काही लहान नव्हते. गडकऱ्यांपेक्षा तेरा-चौदा वर्षांनी ते मोठे होते. त्यांचा व्यासंग आणि चिंतन दुसऱ्या कोणत्याही कवीपेक्षा कमी नव्हते. मराठी भाषेवर तर 'बी' कवींचे विलक्षण प्रभुत्व होते. 'बी' कवींइतकी सोपी, सुंदर आणि सोज्वळ मराठी भाषा त्यांच्या पिढीतल्या तुल्यबल समकालीनांनादेखील साधली नाही. गडकऱ्यांच्या लिखाणातला कृत्रिम नटवेपणा 'बी' कवींच्या काव्यात आढळून येत नाही. चंद्रशेखर आणि लेंभे यांची संस्कृतप्रचुरता 'बी' कवींमध्ये सापडणार नाही. 'बी' कवींची कविता अस्सल मराठी ढंगाची आणि वळणाची होती. तांबे आणि बालकवी यांचे काव्य सोपे आणि सुबोध होते हे खरे, पण 'बी' कवींच्या कवितेचा अभिजात डौल त्यांच्या काव्यात दिसून येत नाही. 'बी' कवींच्या शैलीला परंपरा आहे, घराणे आहे. जुन्या मराठी संतकवींच्या अभंग-वाङ्मयाचा आणि जातिवंत शाहीरांच्या लावण्या-पोवाड्यांचा मार्मिक अभ्यास करून 'बी' कवींनी आपली शब्दसंपदा कमावलेली होती. त्यांच्या कवितेमधली कोणतीही एखादी ओळ जरी घेतली तरी तिच्यात असामान्य कलावंताची सहजता आणि प्रभुत्व आढळून आल्यावाचून राहात नाही.

मराठी काव्यामध्ये 'बी' कवींचे स्थान त्यांच्या अवघ्या दोनच कवितांनी अढळ केलेले आहे. या दोन कविता म्हणजे 'चाफा' आणि 'कमळा'. 'चाफा बोलेना, चाफा चालेना, चाफा खंत करी, काही केल्या फुलेना' या अविस्मरणीय ओळींनी सुरू झालेली 'बी' कवींची कविता 'चाफा' ही म्हणजे मराठी काव्याचे अमर भूषण आहे. 'बीं'च्या कमळेला तर मराठी कवितेमध्ये दुसरी तोडच नाही. ज्यांना 'बी' कवींच्या प्रतिभेचे सामर्थ्य समजावून घ्यावयाचे असेल, त्यांनी त्यांची ही एकच कविता वाचावी आणि वाचून तोंडपाठ करावी. मी स्वतः गेली तीस वर्षे 'बी' कवींची ही 'कमळा' कविता स्वतःशी गुणगुणतो आहे, तरीदेखील माझ्या मनावरची तिची मोहिनी अजून एवढीशीसुद्धा कमी झालेली नाही. 'कमळा' काव्य हा कवीच्या प्रतिभेचा एक महान चमत्कार आहे. अशा कविता प्रत्येक वाङ्मयामध्ये फारच थोड्या जन्माला येतात. जे कवी या अद्‌भुत कविता लिहितात, त्यांना पुन्हा तशा कविता क्वचितच लिहिता येतात.

प्रतिभेच्या एका विशिष्ट समाधीच्या अवस्थेमध्येच अशा कवितांचा जन्म होतो. ' बी ' कवी हे स्वभावतः चिन्तनपर कवी होते. त्यांची बहुतेक कविता ही तात्त्विक आहे. काव्यामध्ये अगदी भावनापूर्ण गोष्ट सांगणे हा त्यांच्या प्रतिभेचा सहज-स्वभाव नव्हे. असे असता ' कमळा 'सारखी करुण रसाने ओथंबलेली कथात्मक कविता इतक्या उत्कृष्ट तऱ्हेने त्यांना कशी लिहिता आली याचे मला राहून राहून आश्चर्य वाटते. साखरेचा कण न् कण जसा गोड असतो किंवा अमृताचा थेंब न् थेंब जसा मधुर असतो तशी ' कमळा ' काव्यातील ओळ न् ओळ, शब्द न् शब्द आणि अक्षर न् अक्षर अवीट माधुर्याने रसरसलेले आहे. त्या काव्याची रचना इतकी घोसदार आणि चिरेबंदी आहे की, त्यामधले एक अक्षर इकडचे तिकडे फिरवता येणार नाही. थोरातांच्या ' पाक ' कुळात जन्माला आलेली कमळा संभाजीची ' राख ' होण्यापेक्षा मृत्यूच्या गळ्यात माळ घालणे कसे पत्करते हे एका बाणेदार मराठी मुलीचे तेजस्वी चित्र ' बी ' कवींनी आपल्या ओजस्वी लेखणीने या कवितेत रंगविलेले आहे. ही कविता ज्या वेळी प्रसिद्ध झाली त्या वेळीं तिच्या तेजाने साऱ्या महाराष्ट्राचे डोळे अक्षरशः दिपले आणि अद्यापिही ही कविता जो कोणी वाचील तो तिच्या प्रभावाने स्तिमित झाल्यावाचून राहणार नाही. एकेका मराठी कवीची एकेकच अमर प्रातिनिधिक कविता निवडावयाचे ठरविल्यास, गोविंदाग्रजांचा ' राजहंस ' किंवा बालकवींची ' फुलराणी ' यांच्याबरोबरच ' बी ' कवींच्या ' कमळे 'चाही अवश्य अंतर्भाव करावा लागेल.

' बी ' कवींची सर्वच कविता सोज्वळ असली तरी ती सोपी नाही. त्यांचे काव्य रुक्ष किंवा क्लिष्ट असे कोठेही नाही. तथापि ते कळावयास कुठे कुठे अवघड आहे यात मुळीच शंका नाही. याचे कारण ' बी ' हे तत्त्वज्ञानी कवी होते. त्यांचा योगविद्येचा आणि अध्यात्माचा अभ्यास फार मोठा होता. तसे त्यांचे सर्वच आयुष्य ईश्वरचिंतनात आणि योगाभ्यासात गेले. साधुपुरुषांचा त्यांच्या घराण्या-वर आशीर्वादच होता असे म्हटले तरी चालेल. त्यांचे धाकटे बंधू जन्मापासून दोन्ही पायांनी पूर्णपणे पांगळे असूनही योगविद्येत त्यांनी अलौकिक सामर्थ्य प्राप्त करून घेतले होते. श्रीगजाननमहाराज म्हणून ते पुष्कळच प्रसिद्ध होते. गेल्याच वर्षी नाशिक येथे ते ब्रह्मीभूत झाले. गजाननमहाराजांना योगाभ्यासाची पुष्कळशी स्फूर्ती ' बी ' कवींकडून मिळाली. यावरून त्या क्षेत्रात ' बी ' कवींनी केवढे अंतःसामर्थ्य प्राप्त करून ठेवलेले असावे याची थोडीशी कल्पना येते.

यामुळेच अध्यात्मविद्येतली पुष्कळशी रूपके आणि भाषासंकेत त्यांच्या कवितेमध्ये आढळून येतात. तथापि इतके असूनही 'बी' यांच्या विचारात कोठेही जुनाटपणा किंवा प्रतिगामिता आढळून येत नाही. 'बी' हे वृत्तीने उत्क्रांतिवादी होते. समाजविघातक रूढींचा आणि संस्थांचा नायनाट होऊन जनता सामर्थ्यवान व्हायला पाहिजे असे त्यांना मनापासून वाटत होते. या दृष्टीने पाहता विचाराचे हे आधुनिकत्व रे. टिळक यांच्याखेरीज त्या वेळच्या इतर कोणाही कवीत आढळून येत नाही. जुन्या पिढीत जन्माला आलेला मनुष्य विचाराने आणि वृत्तीने इतका ताजा आणि आधुनिक कसा याचे आम्हाला पुष्कळ वेळा नवल वाटते. इतकी वर्षे झाली तरी 'बी' कवींच्या काव्याचा उजळा आणि लकाकी आहे तशीच अजून कायम आहे. 'बी' कवींच्या काव्याचे हे वैशिष्ट्य फारच थोड्या आधुनिक मराठी कवींमध्ये आढळून येईल. खरोखर मराठी काव्यसृष्टीत 'बी' कवींचे स्थान अगदी अढळ आणि अमर आहे.

व्यक्तिशः माझा आणि 'बी' कवींचा आयुष्यात संबंध येणे हा एक मी अद्भुत योगायोगच समजतो. दहा वर्षांपूर्वी 'फुलांची ओंजळ' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचे जेव्हा त्यांच्या मित्रांनी ठरवले तेव्हा त्या संग्रहाला प्रस्तावना लिहिण्यासाठी म्हणून माझे नाव त्यांना का सुचले हे मला ठाऊक नाही. 'बी' सारख्या महान कविश्रेष्ठाच्या कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचा आपल्याला अधिकार आहे असे मला चुकूनही कधी वाटले नाही. मला त्यांच्या काव्याविषयी किती आदर वाटत होता हे शब्दांनी वर्णन करता येणार नाही. माझे गुरू जे गडकरी ते 'बी' कवींना जवळजवळ गुरूप्रमाणे मानीत. या हिशोबाने 'बी' कवी मला परात्परगुरूच्याच ठिकाणी होते. त्यांच्या काव्याला प्रस्तावना लिहिणे म्हणजे मंदिराच्या पवित्र पायरीला पाय लावण्याएवढेच पातक आहे अशी माझी प्रामाणिक समजूत होती. या भावनेने एकसारखा सहा महिनेपर्यंत मी प्रकाशकांना नकार देत होतो. पण माझ्या नकाराच्या हल्ल्यामुळे त्यांच्या आग्रहाचे दडपण वाढत गेले. ते मला म्हणाले, "तुमची प्रस्तावना मिळेपर्यंत आम्ही हे पुस्तक प्रसिद्धच करणार नाही." एवढे त्यांनी म्हटल्यानंतर मग या पवित्र जबाबदारीचा पत्कर न घेणे हा शुद्ध उन्मत्तपणा होता.

प्रस्तावना लिहिण्याचे काम तर मी स्वीकारले, पण ते माझ्या हातून कसे पुरे होणार याची मात्र मला फार चिंता पडली. 'बी' कवींची कविता मी वाचली होती. मला ती अतिशय आवडत होती. पण तिच्यातली सर्वच स्थळे

मला कळत होती असे मात्र मुळीच नव्हते. ‘ बी ’ कवींच्या काव्याचे हे एक अजब वैशिष्ट्य आहे. ते कळत नसले तरी आपल्याला वेड लावते. सृष्टीमधल्या पुष्कळशा सौंदर्याचे रहस्य समजले नाही तरी ते जसे मनाला मोहित करते तसे ‘ बी ’ कवींच्या काव्याचे आहे. ‘ चाफा ’ ही त्यांची एकच कविता घ्या. या कवितेचा सर्व अर्थ लक्षात आला नसतानाही महाराष्ट्र तिजवर बेहद्द खूष झाला होता. पण प्रस्तावनाकाराचे कार्य हे केवळ रसग्रहणाचे कार्य नव्हे. कोणत्या काव्यामध्ये काय गोडी आहे आणि ती कशी उत्पन्न झाली याचे कलात्मक आणि रसपूर्ण विश्लेषण जर त्याला करता आले तरच तो खरा प्रस्तावनाकार ठरतो. या दृष्टीने जवळ जवळ दोन महिने ‘ बी ’ कवींशी माझा पत्रव्यवहार चालू होता. दर पत्रात मी त्यांच्या काव्याबद्दल अनेक प्रश्न आणि शंका विचाराव्यात आणि त्याला पानेच्या पाने विस्तृत उत्तरे ‘ बी ’ कवींनी मला द्यावीत. अशा रीतीने स्वतः ‘ बी ’ कवींकडूनच मी त्यांची सारी कविता समजावून घेतली. त्यांची कविता आता आपल्याला समजली असे ज्या क्षणी मला वाटले त्या क्षणापासून मी प्रस्तावना लिहिण्याचे काम सुरू केले. एवढी मोठी प्रदीर्घ प्रस्तावना मी आयुष्यात दुसऱ्या कुठल्याही पुस्तकाला लिहिलेली नाही. ही माझी प्रस्तावना फारच चांगली वठली असे लोक म्हणतात. हे जर खरे असेल, तर त्याचे श्रेय ‘ बी ’ कवींना आणि त्यांच्या महान काव्यालाच द्यायला हवे. स्फूर्तीचा विषय अलौकिक असला म्हणजे सामान्य माणसाच्या हातूनही कधी कधी असामान्य गोष्टी घडतात.

यानंतर दोन वर्षांनी म्हणजे एकोणचाळीस साली, मी जेव्हा नागपूर येथे गेलो तेव्हा ‘ बी ’ कवींची आणि माझी आयुष्यात पहिल्याने भेट झाली. माझे मित्र कविवर्य ‘ अनिल ’ यांना घेऊन मी त्यांच्या दर्शनास गेलो. त्या वेळी ते पुष्कळच वृद्ध दिसत होते; पण थकलेले नव्हते. जवळ जवळ तास दोन तास मी त्यांच्या संगतीत होतो. आम्ही सर्वांनी एका फोटोग्राफरकडे जाऊन एकत्र फोटोही पण काढवून घेतला. ‘ बी ’ कवी माझ्याशी पुष्कळच बोलले. तथापि त्यांचा स्वभाव फारसा बोलका असावा असे मात्र मला वाटले नाही. केवळ मुद्द्यापुरतेच ते बोलत. मात्र ते जे बोलत ते अतिशयच चिंतनीय असे. त्यानंतर ‘ बी ’ कवींचा आणि माझा प्रत्यक्ष असा संबंध जरी पुढे आला नाही तरी ‘ बी ’ कवींच्या काव्यसंग्रहाला मी लिहिलेल्या प्रस्तावनेमुळेच त्यांचे धाकटे बंधू श्रीगजानन-महाराज यांचा आणि माझा विलक्षण ऋणानुबंध जडला. गजाननमहाराज हे

फारच थोर अधिकाराचे योगी पुरुष होते. पण केवळ त्यांच्या थोरल्या भावाच्या काव्याला मी प्रस्तावना लिहिली म्हणून खूष होऊन ते थोरल्या भावाप्रमाणेच मला ‘दादा’ म्हणून हाक मारू लागले. एकदा तर ‘या दादासाहेब’ असे म्हणून त्यांनी माझ्या पायांवर डोके ठेवण्याचा जेव्हा प्रयत्न केला तेव्हा लाजेने मला मेल्याहून मेल्यासारखे झाले. ‘बी’ कवी आणि श्रीगजाननमहाराज या दोघा अलौकिक बुद्धिमत्तेच्या बंधूंनी माझ्या जीवनात गेली दोनतीन वर्षे एक निराळेच प्रेमस्थान निर्माण करून ठेवले होते आणि एका वर्षाच्या आतच या दोघां भावांचे पाठोपाठ अवसान व्हावे यामुळे व्यक्तिशः मला किती दुःख होत आहे हे शब्दांनी सांगणे कठीण आहे. ‘बी’ कवींच्या एकाहीपेक्षा एक सरस कविता मासिक ‘मनोरंजना’त प्रसिद्ध होत होत्या तेव्हा त्यांजवर ज्या हर्षाने आणि उन्मादाने आम्ही तरुण वाचक तुटून पडत होतो, त्याचे स्मरण अद्यापि माझ्या हृदयात ताजे आहे. त्या दिव्य आनंदाची पुन्हा आठवण करून महाराष्ट्राच्या या प्रतिभाशाली, कलावंत आणि तत्त्वज्ञानी कवीला आम्ही शेवटचे वंदन करतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ दि: ........

## २

## स्टॅलिन आणि बुद्ध यांचा उपासक

दोन वर्षांपूर्वी मुंबईच्या परिसरात एक भयंकर वादळ झाले होते. त्या वादळाने मुंबईच्या आजूबाजूच्या भागातील शेकडो वर्षांच्या वयाचे प्रचंड पुराणवृक्ष अगदी मुळासकट उखडून जमिनीवर आडवे पडले. पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर असा एक महान वटवृक्ष उन्मळून पडलेला त्या वेळी आम्ही डोळ्यांनी पाहिला. त्याच्या मुळांचा, पारंब्यांचा आणि शाखापल्लवांचा विस्तार केवढा अवाढव्य होता ह्याचे यथार्थ वर्णन शब्दांनी करून देता येण्यासारखे नव्हते. त्याचे वय किती असावे ह्याची कल्पनादेखील कोणाला करता आली नसती. भूतकाळातील दोनतीन शतके तरी त्याने आपल्या डोळ्यांनी निश्चित पाहिलेली असावीत, हे मात्र कोणीही सहज सांगितले असते. जमिनीवर वैभवाने उभा असताना तर तो वृक्षराज एखाद्या डोंगराप्रमाणे भव्य दिसत असलाच पाहिजे. पण धरणीतलावर त्याचा देह आडवा पडला असतानादेखील रामायण-महाभारतकालातला एखादा महाकाय राक्षसच रणांगणावर जखमी होऊन पडला आहे की काय असे वाटत होते. अशा त्या लोकोत्तर महावृक्षाला अकस्मात वादळामुळे हे असे मरण यावे ह्याचा अचंबा रस्त्यावरून जाणारे-येणारे लोक पुन्हा पुन्हा थांबून थांबून करीत होते. त्या गोष्टीला आता दोन वर्षे होऊन गेली, आणि आश्चर्याची गोष्ट ही की, ह्या वृक्षराजाला मरण पावून दोन वर्षे झाली तरी अद्यापि तो जिवंतच आहे. जेव्हा जेव्हा आम्ही मोटारीने मुंबईहून पुण्याला जातो, तेव्हा तेव्हा त्या जागी मोटार उभी करून आम्ही

तोच चमत्कार अगदी डोळे भरून पाहून घेतो. त्या वृक्षाचा मुळासकट उखडलेला बुंधा एखाद्या वारुळासारखा सपशेल जमिनीबाहेर आलेला आहे तरी त्याच्या पारंब्या, शाखा आणि त्या शाखांवरचा पल्लवसंभार पूर्वी होता तसा अद्याप हिरवागार आणि टवटवीत आहे आणि त्याच्या पानापानामधून पाखरे अजून पूर्वीप्रमाणेच आनंदाने खेळत आहेत, अन् उडत आहेत. महापुरुष हेदेखील ह्या महावृक्षाप्रमाणेच असतात. त्यांचे व्यक्तिमत्त्व अमर असते. मरणानंतरही त्यांच्या शाखा, पारंब्या अन् पाने ह्यांतला जीवनरस शतकानुशतके आटू शकत नाही.

ह्या शतकातील एक महान नाटककार, विचारवंत आणि लेखक जॉर्ज बर्नार्ड शॉ हा दीड महिन्यापूर्वी बागेत काम करीत असताना पाय घसरून पडण्याचे निमित्त होऊन एक नोव्हेंबर रोजी वयाच्या चौऱ्याण्णवाव्या वर्षी अकस्मात मरण पावला. ज्याच्या व्यक्तिमत्त्वाची मुळे गेल्या सबंध शतकातील जगाच्या जीवनात पसरलेली आहेत, ज्याच्या वाङ्मयात्मक देहावर नाना विषयांच्या पारंब्या लोंबत आहेत, ज्याच्या विविध विचारांच्या शाखा आणि सुभाषितांचा पल्लवसंभार जगातल्या साऱ्या भाषांतून पसरलेला आहे आणि ज्यामधून लक्षावधी वृद्ध आणि तरुण पुरुष वर्षानुवर्ष हर्षाने विहार करीत आहेत, त्या चौऱ्याण्णव वर्षांच्या विराट पुरुषाचा जीवनवृक्ष इतक्या आकस्मिकपणे कोसळून धरणीवर पडेल अशी कोणाचीही कल्पना नव्हती. बर्नार्ड शॉचे हे मरण बघून आम्हाला दोन वर्षांपूर्वी वादळाने पुण्या-मुंबईच्या रस्त्यावर उन्मळून पडलेल्या त्या महावृक्षाची आठवण होते.

बर्नार्ड शॉसारख्या युगपुरुषाच्या जीवनात मरणाला अत्यंत गौण स्थान आहे. ती एक आज ना उद्या पण कधी तरी होणारी अपरिहार्य शारीरिक घटना आहे. बर्नार्ड शॉला आपले शरीर शंभर वर्षे टिकविण्याची इच्छा होती. त्यात फक्त पाचसहा वर्षांचीच चूक झाली. एवढ्या मोठ्या हिशोबात एवढी लहानशी चूक झाली तर ती क्षम्य आहे. तिजबद्दल वाईट वाटून घेण्याचे काही कारण नाही. मद्य, मास किंवा तंबाखू ह्यांना स्पर्श न करता आपल्या तेजःपुंज बुद्धीसह चौऱ्याण्णव वर्षे शॉने जसे आपले शरीर सुंदर व निरोगी राखून, जगातील शरीरशास्त्रामधला एक अद्भुत चमत्कार करून दाखविला, त्याप्रमाणे वृत्तपत्रे, कथा, नाट्य, टीका, समाजवाद आणि तत्त्वज्ञान ह्या विविध विषयांमध्ये प्रचंड आणि अमर वाङ्मय निर्माण करून शॉने आपल्या बुद्धीचे लोकोत्तर चमत्कार करून जगाचे डोळे दिपविले.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक चमत्कार अंतर्धान पावला पण त्याच्या प्रतिभेचे बाकीचे सारे चमत्कार अद्याप आपल्या डोळ्यांसमोर शाबूतच आहेत. मानवतेच्या चिरंतन भांडारात ते केव्हाच समाविष्ट होऊन बसले आहेत. शॉचे शारीरिक अस्तित्व संपले. त्याजवर काळाने पडदा टाकला. पण त्याचे वाङ्मय आणि विचार अमर आहेत. इंद्रायणीत बुडविलेले तुकारामाचे अभंग जसे वर तरंगू लागले, त्याप्रमाणे कालसागराच्या पृष्ठभागावर शॉचे तेजस्वी ग्रंथ कितीही शतके लोटली तरी तरंगतच राहतील. त्या दृष्टीने त्या महापुरुषाचा मृत्युलेख कधीही लिहिता येत नाही. शॉचे शरीर पळवून नेऊन काळाने आपली स्वतःची थट्टा करून घेतली आहे. शॉच्या चिरंतन अस्तित्वापैकी काळाला घेऊन जाता येण्यासारखा तेवढाच सोपा भाग होता.

चौऱ्याण्णव वर्षांच्या जीवनात शॉला एक दिवसदेखील कधी जीर्णत्व प्राप्त झाले नाही. काही काही वृक्ष जसे सदा हिरवे असतात आणि काही काही वेली जशा सदाफुली असतात त्याप्रमाणे शॉची बुद्धिमत्ता ही सदैव हिरवी आणि सदैव फुललेली होती. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि वाङ्मयाचे आकर्षण एक दिवसही कधी कमी झाले नाही. इंग्लंडमधील एका परगण्यातल्या एका लहानशा खेडेगावात मुक्काम करून बसलेला हा माणूस काय करतो ह्याकडे गेली पन्नास वर्षे जगाचे सतत लक्ष होते. एक क्षणही जगाला शॉचा काही विसर पडला नाही. आजपर्यंत जगात जे जे लेखक आणि विचारवंत होऊन गेले, त्यांपेक्षा शॉला काही तरी निराळे सांगायचे होते आणि निराळे लिहून ठेवायचे होते. नावीन्य आणि मौलिकता ही शॉच्या प्रतिभेची दोन मनोहर वैशिष्ट्ये होती. एखाद्या देशाच्या नाण्यावर जशा त्या देशाच्या राजाच्या चित्राचा किंवा राजाच्या नावाचा शिक्का असतो, त्याप्रमाणे शॉच्या लेखणीतून निघालेल्या प्रत्येक शब्दावर शॉच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा शिक्का असे. प्रतिभेचे एवढे विविध पैलू असलेला लेखक किंवा विचारवंत जगामध्ये आजपर्यंत क्वचितच होऊन गेला असेल.

व्यासाने जसे सर्व जग आपल्या वाङ्मयात उच्छिष्ट केलेले आहे, तसे शॉने आपल्या साहित्याने मानवतेचे सारे जीवन व्यापून टाकले आहे. मानवतेचे कल्याण व्हावे, जगातली युद्धे आणि कलह नष्ट व्हावा, जगात समता प्रस्थापित व्हावी, जीवनातील मूर्खपणा आणि ढोंगे नष्ट व्हावीत आणि शेवटी पुरुषाचा पुरुषोत्तम व्हावा ह्या गोष्टीची शॉला अहर्निश तळमळ लागून राहिली होती.

जगात आजपर्यंत अनेक मूर्तिभंजक होऊन गेले असतील. पण शॉ हा सर्वांत मोठा मूर्तिभंजक होऊन गेला. खोट्या देवांची आजि चुकीच्या मूल्यांची पूजा करण्यात गुंतलेल्या मानवतेच्या पाठीवर शॉने निर्दयतेने कोरडे मारलेले आहेत. दंभाचा आणि ढोंगाचा शॉ हा महान शत्रू होता. ढोंगी जगाची फजिती वरून त्याचा मूर्खपणा उघडकीस आणावयाचा आणि आपण खूप पोटभर हसून जगालाही पुन्हा हसावयाला लावायचे ह्याचा शॉला फार नाद असे. त्या बाबतीत तो एखाद्या खोडकर पोरासारखा होता. उगाच ऐटीने आणि दिमाखाने जाणाऱ्या माणसाच्या पायात पाय घालून त्याला खोडकर मुले जशी खाली पाडतात आणि त्याची गंमत करतात, त्याप्रमाणे पोकळ आणि निरर्थक सामाजिक चालीरीतींची प्रतिष्ठा माजविणाऱ्या समाजाच्या पायात पाय घालून शॉने त्याला किती वेळा तरी तोंडघशी पाडलेले असेल. शॉची लेखणी व वाणी ही तलवारी-सारखी होती. वक्रोक्ती आणि विरोधाभास ह्या त्या तलवारीच्या दोन धारा होत्या. शॉचे सर्व वाङ्मय शेकडो वक्रोक्तिपूर्ण आणि मनोहर सुभाषितांनी विखुरलेले आहे.

शॉ जसा महान लेखक होता, तसा तो विलक्षण प्रभावी वक्ता होता. आपल्या तीक्ष्ण कोटिक्रमाने आणि भेदक वक्रोक्तींनी तो प्रतिपक्षाची अशी काही भंबेरी उडवी की श्रोते तोंडे वासून त्याच्याकडे पाहातच राहात. कोणत्याही प्रश्नाला तो सरळ म्हणून कधीही उत्तर देत नसे. त्याच्या त्या तिरप्या उत्तरातच त्याचे सारे शहाणपण भरलेले असे. त्याला नुसता एखादा शब्द विचारावयाचा अवकाश की त्याच्या तोंडून ज्ञानाचा, विचाराचा आणि विनोदाचा तेजस्वी धबधबा वाहू लागे, आणि त्या पुरात त्याचे श्रोते अक्षरशः वाहून जात. सतरा वर्षांपूर्वी तो एकदा मुंबईत आला होता. हिंदुस्थानात त्याला तीनच दिवस राहावयाचे होते. कोणी तरी त्याला विचारले की, "तुम्ही हिंदुस्थान पाहणार आहात का?" त्यावर शॉने त्याला ताडकन् उत्तर दिले की, "मी आगगाडीच्या तक्तपोशी पाहावयाला काही या देशात आलो नाही."

कसलाही पक्षपात किंवा पंक्तिप्रपंच न करता शॉ आपल्या टीकेचा चाबूक चालवीत असे. इंग्रजांविषयी तो म्हणे, "इंग्रज लोक प्रत्येक गोष्टीला तत्त्वाचे अधिष्ठान देतात. एखाद्या घरावर त्यांनी दरवडा घातला तरी तो काही तरी तत्त्वासाठी घातला असेच ते म्हणतील." कोणी त्याला विचारले की, "तू इंग्रजांच्या विरुद्ध एवढा का?" शॉ म्हणाला, "मी इंग्रजविरोधी नाही, मी



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
क्रमांक........................ दि: ....................
........................ नों: दि: ....................

ढोंगविरोधी आहे. "

"भारताच्या स्वातंत्र्याचा झगडा चालू असता हिंदुस्थानातील लोक हे स्वातंत्र्याला नालायक आहेत असे इंग्रज का म्हणतात" असे एका हिंदी माणसाने शॉला विचारले. तेव्हा शॉने उत्तर दिले, "तसे बोलत राहायचे ही इंग्रजांची नेहमीचीच सवय आहे. त्यांना डी व्हॅलेरा किंवा मायकेल कॉलिन्स-सारखा एखादा खमक्या भेटला म्हणजे मग ते ताळ्यावर येतात."

मनुष्यजातीचा मूर्खपणा हा शॉच्या टीकेचा सर्वांत आवडता विषय होता. त्याने एका ठिकाणी म्हटले आहे, "माणसे अशी मूर्ख आहेत की, त्यांना कोणी गुलाबाचे फूल दिले तर ते टाकून देऊन ते कोबीचे फूल हातात घेऊन हुंगत बसतील." गांधींचा खून झाल्यानंतर 'अतिचांगुलपणाचा हा परिणाम आहे' असे शॉने जे उद्गार काढले ते गांधींचा मोठेपणा अंगात नसता गांधीवाद अति-रेकाला नेऊ पाहणाऱ्या गांधींच्या अनुयायांनी लक्षात ठेवावेत.

शॉने पन्नास नाटके लिहिली आहेत. आणि त्या नाटकांना विद्वत्तापूर्ण अशा प्रदीर्घ प्रस्तावना जोडलेल्या आहेत. शॉ हा कलावंत होता की प्रचारक होता ह्याबद्दल टीकाकारांच्या मनात नेहमीच गोंधळ उडून जाई. कोणी त्याला विचारले की, "तुमच्या ह्या नाटकांना प्रस्तावना कशाला?" शॉ म्हणाला, "मग? मी काही नुसता नाटककार नाही. मी सुधारक आहे. मी जन्माला आलो त्या वेळीं जग मला जसे आढळले त्यापेक्षा ते मला अधिक सुधारून जावयाचे आहे. मी नाटके लिहिता लिहिता प्रचार करतो आणि प्रचार करता करता नाटके लिहितो." शॉने आपल्या समकालीन समाजव्यवस्थेवर आणि चळवळींवर वेळोवेळा इतकी विदारक टीका केली आहे कीं, शॉच्या जागी दुसरा कोणी असता तर त्याला आपल्या देशातून हद्दपार व्हावे लागले असते. शॉचे कोणाशी कधी पटले नाही, पण त्याच्या विरोधकांनाही त्याचा युक्तिवाद आणि म्हणण्याचा आशय चिंत-नीयच वाटे. स्त्रियांच्या मतदानाला शॉने विरोध केला. तो म्हणाला, "बायकांना मतदानाचा हक्क दिल्याने पार्लमेंटात बायका निवडून यावयाच्या ऐवजी पुरुषच जास्त निवडून येतील." शॉचे हे म्हणणे त्या वेळी चमत्कारिक वाटले, पण मागाहून त्याच्या म्हणण्यातले सत्य सर्वांच्या प्रत्ययाला आले. अमुक एका प्रश्नावर शॉचे काय मत आहे हे जाणण्याची जगाला नेहमी उत्सुकता लागून राही.

शॉ हा एक महान द्रष्टा होता. समाजसत्तावादाचा पुरस्कार किती वर्षांपासून तरी त्याने आपल्या वाङ्मयात केलेला आहे. स्टॅलिन हा आजच्या युगातील

सर्वात शहाणा पुरुष आहे असे त्याचे मत होते. तो ज्या खोलीत निधन पावला तेथे फक्त दोनच महापुरुषांची चित्रे होती. एक स्टॅलिनचे आणि दुसरे बुद्धाचे. स्टॅलिन आणि बुद्ध ह्यांच्या तत्त्वज्ञानाचा समन्वय केल्यावाचून जगात चिरंतन शांतता आणि सौख्य नांदणार नाही असेच विचार अंतकाली त्याच्या मनात तरंगत होते काय? इंग्लंड-अमेरिकेतील लोकांना शॉच्या निधनाबद्दल जसे वाईट वाटले, त्याप्रमाणे सोव्हिएट रशियामध्येही शॉच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त करण्यात आले. आजच्या जगातील दोन भिन्न आणि विरोधी विचारसरणी ज्याच्या चरणावर आदराने मान वाकवून त्याला वंदन करतात तो जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्या शतकातला एक अद्वितीय पुरुष होऊन गेला, हे काय आम्ही सांगावयाला पाहिजे? शॉ हा मानवतेचा एक महान मित्र होता आणि शॉचे वाङ्मय हे मानवतेचे एक महान विश्वविद्यालय आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

## ३

# कै. एकनाथ यादव निफाडकर

अनेक वर्षांपूर्वी महाराष्ट्रामधे कवी, लेखक आणि संपादक म्हणून परिचित असलेले आणि अलीकडे कित्येक वर्षे साहित्यिकांच्या अनुकंपेचा विषय झालेले एक विचित्र गृहस्थ श्री. एकनाथ यादव निफाडकर हे गेल्या आठवड्यात पुणे येथे मरण पावल्याचे वृत्त वाचून मला एका दृष्टीने थोडेसे बरेच वाटले की सुटला बिचारा एकदाचा या जीवनाच्या जंजाळातून! जगात मी अनेकांचे दारिद्य आणि दैन्य पाहिले असेल. पण निफाडकरांच्या दैन्याला आणि दारिद्याला काही मर्यादाच नव्हती. त्यांनी आपल्या शरीराची, आयुष्याची आणि संसाराची अशी काही दशा दशा करून घेतली होती की सांगता सोय नाही. गेली बारा-तेरा वर्षे ते अक्षरशः एखाद्या पिशाच्चाप्रमाणे वावरत असत. ते कुठे राहतात, घरात राहतात का रस्त्यावर राहतात, काय करतात, काय खातात, कसे जगतात, कुठे फिरतात याची कोणालाही फारशी माहिती सांगता आली नसती. मधून मधून ते मरण पावल्याच्याही बातम्या उठत. कुणी तरी सांगे, “ तुम्हांला कळले का, निफाडकर म्हणे परवा वारले! ” आणि त्यानंतर चार-आठ दिवसांनीच दुसरा कोणी तरी येऊन सागे की, “ अहो, ते वारले नाहीत. ते जिवंत आहेत. कालच मी त्यांना एका ठिकाणी पाहिले. ” आणि मग ऐकणारी मंडळी “ कमाल आहे त्या गृहस्थाची! ” असे आश्चर्याचे उद्गार काढीत. त्यांच्या जगण्याबद्दल आनंद वाटणारेही कोणी जगात नव्हते, आणि मरणाबद्दल दुःख वाटेल असेही कोणी राहिले नव्हते. इतकी ह्या गृहस्थाच्या आयुष्याची परवड

झालेली होती. वर्षातून कधीतरी ते माझ्याकडे यावयाचे किंवा वाटेतून कुठेतरी चाललेले मला ते दिसावयाचे. पण पाहिल्याबरोबर एकदम मी त्यांना ओळखले असे क्वचितच होई. साधारण एकदोन मिनिटांनंतर माझ्या ध्यानात येई की, हे निफाडकर असावेत. प्रत्येक वेळेला त्यांचा चेहरा आणि आकृती काही तरी चमत्कारिकच दिसत असे. मूळचाच त्यांचा काळा रंग आणि अंगकाठी उंच अन् हाडकुळी. तो त्यांचा काळा रंग दारिद्र्याने आणि उपासमारीने इतका ठिक्कर आणि कळाहीन झाला होता की, पुण्याच्या मेडिकल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना फाडण्यासाठी एक प्रेत आणून ठेवलेले मागे मी एकदा पाहिलेले होते, त्याची मला निफाडकरांना पाहून नेहमी आठवण होई. कमरेला एक फाटके आखूड पंचावजा धोतर, अंगात बिनगुंड्यांचा सदरा, डोक्याला एक चुरमुडलेली मळकट टोपी आणि पायांत काही नाही असा निफाडकरांचा अवतार असे. त्यांच्या अंगाला न् कपड्यांना कित्येक वर्षांत तरी पाणी लागले होते की नाही अशी पुष्कळ वेळा शंका वाटे. त्यांना पाहून माझ्या मनात नक्की कोणती भावना निर्माण होत असे हे वर्णन करून सांगणे कठीण आहे. थोडासा त्यांचा राग येई, चीड येई, थोडासा तिरस्कारही वाटे आणि मागून त्याचे दयेत रूपांतर होई. " का हा माणूस असे करतो आहे ? " असा प्रश्न आधी माझ्या मनात उभा राही. आणि " मग त्यांनी तरी आता काय करावे ? " असे माझे मनच मागाहून त्याला आपोआप उत्तर देई.

गेल्या सबंध वर्षात ते माझ्या दृष्टीला पडले नाहीत. दोन तीन वेळा त्यांची पत्रे मात्र आली कुठल्या तरी इस्पितळामधून. इंग्रजीमधे कापऱ्या आणि तिरप्या अक्षरात अगदी गिचमीड लिहिलेली अशी ती असत. ती वाचता येणे कंटाळवाणे असले तरी त्यांतला आशय मात्र चटकन् कळून येत असे. प्रत्येक पत्रात औषधासाठी किंवा इंजेक्शनसाठी दहावीस रुपये मागितलेले असत. गेल्या बारा-तेरा वर्षांत निरनिराळ्या लेखकापाशी पैशाची याचना करण्यापलीकडे निफाडकरांनी दुसरा काहीच उद्योग केला नाही. आज असा महाराष्ट्रामध्ये एकही बारीकसारीक साहित्यिक नसेल की, ज्याच्यापासून निफाडकरांनी निदान एक आणेली तरी उसनवार घेतलेली नसेल. साहित्यिकांखेरीज इतरांकडून पैशाची भीक मागायची नाही असाच जणू काही त्यांनी निश्चय केलेला होता असे वाटते. प्रत्येक गावातल्या कवींची आणि लेखकांची नावे आणि त्यांचे पत्ते ह्यांची त्यांनी आपल्या मनात एक जंत्रीच करून ठेवलेली होती. कोणापाशी किती रक्कम

मागायची याचे त्यांनी स्वतःशी एक कोष्टकच तयार करून ठेवलेले होते. एखाद्या बालकवीपासून दोन आणे तर लघुकथाकारापासून आठ-बारा आणे, तर कादंबरीकार आणि नाटककारापासून दहा-पंधरा रुपये असे त्यांचे भीक मागण्याचे भाव अगदी ठरून गेले होते. प्रकाशकाकडून लेखकांना सामान्यतः जो मोबदला मिळतो तो लक्षात घेऊनच निफाडकरांनी आपल्या उसनवारीची मर्यादा आखली होती.

सदतीस-अडतीस साली मी पुण्यास सारस्वत कॉलनीत राहात होतो. त्या वेळी माझी नाटके चोहीकडे मोठ्या जोरात चाललेली होती. एके दिवशी सकाळी आपल्या आठ-दहा वर्षांच्या लहान मुलाला घेऊन निफाडकर अचानक माझ्या बिऱ्हाडी आले. फारसा प्रस्ताव न करता आपण सध्या अतिशय अडचणीत आहोत असे त्यांनी मला सांगितले. निफाडकरांचे ते स्वरूप मला त्या वेळी अपरिचित असल्याने मनात कसलाही आडपडदा न ठेवता मी थोड्याशा सहानुभूतीने त्यांना विचारले, " मग मी काय करावे तुमच्यासाठी असे तुमचे म्हणणे आहे ? " निफाडकर म्हणाले, " मी सध्या लक्ष्मी रोडवर गेस्ट हाऊसमध्ये राहतो आहे. माझा एका महिन्याचा जेवणाचा खर्च तुम्ही दिलात तर मी तुमचा आभारी होईन." मला निफाडकरांबद्दल वाईट वाटले. मी त्यांना 'गेस्ट हाऊस'च्या मालकाच्या नावाचा तीस रुपयांचा एक चेक दिला. तो घेतल्यानंतर काही साहित्यविषयक प्रश्नांवर त्यांनी माझ्याशी बराच वेळ चर्चा केली आणि नंतर ते निघून गेले. थोड्या दिवसांनी ' महाराष्ट्र शारदा मंदिरा 'च्या काही सभासदांबरोबर मी सहज बोलत असताना निफाडकरांनी त्यांपैकी प्रत्येकाकडून माझ्याप्रमाणेच थोडी ना थोडी तरी हातउचल केल्याचे मला आढळून आले आणि मग मात्र आम्हा सर्वांनाच त्यांच्या त्या वर्तनाचा राग आला. पुढे काही दिवसांनी त्यांनी आपल्या बायकोला आणि मुलाला माझ्याकडे चिट्ठी देऊन आणखी काही रकमेची मागणी करावयास पाठवून दिले, पण मी सरळ नकार दिला. तथापि त्यांची बायको सकाळपासून संध्याकाळपर्यंत माझ्या घरासमोर उन्हात अगदी सत्याग्रहच करून बसलेली पाहून मला तिची दया आली, आणि शेवटी थोडीशी रक्कम तिच्या हातावर ठेवून मी तिची बोळवण केली. त्यानंतर पाच-सहा वर्षे मात्र निफाडकरांनी मला कसलीही तकलीफ दिली नाही. एवढेच नव्हे तर ते माझ्या वाटेला फिरकलेसुद्धा नाहीत. तथापि, साहित्यसृष्टीत त्यांनी काढलेल्या उसनवारीच्या मोहिमेच्या बातम्या मधून मधून मात्र कानांवर येत होत्या. मध्यंतरी त्यांची बायकोही मरण पावल्याचे मला कळले.

पुढे मुंबईस माझा छापखाना निघाल्यानंतर एके दिवशी स्वारी त्या ठिकाणी अचानकपणे प्रगट झाली. त्यांना पाहताच माझ्या अंगावर सरसरून काटा उठला. मनात मी म्हटले, " आली पुन्हा ही बिलामत ! " माझ्या चेहऱ्यावरून माझ्या मनातले विचार निफाडकरांनी ताबडतोब ओळखल्यासारखे दिसले. किंचित हसल्यासारखे करून ते म्हणाले, " आता आयुष्यात आमचा तुम्हांला हा शेवटचा त्रास आहे ! आमचे जावई रंगूनला आहेत. तिकडेच जाऊन कायमचा तडफडतो म्हणजे झाले. उगाच इकडच्या लोकांना ही निष्कारण कटकट तरी नको. " " मग म्हणणे काय आहे तुमचे ? " मी विचारले. " काही नाही; रंगूनपर्यंत जायचे भाडे तुम्ही द्याल तर उपकार होतील. पन्नासएक रुपये लागतील ! " ते म्हणाले. मी थोडासा विचार करून म्हणालो, " पन्नास काही नाही. पण तीस रुपये मी तुम्हांला देतो " " तरी काही हरकत नाही " निफाडकर चटकन् म्हणाले, " बाकीचे वीस रुपये मी दुसरीकडून कुठून तरी घेईन म्हणजे झाले. " माझ्या कारकुनाकडून मी त्यांना पैसे घ्यावयास सांगितले. ते घेतल्यानंतर बराच वेळ माझ्या टेबलावर माश्या मारीत बसले. " रंगूनला गेल्यावर त्या ठिकाणी एक ' मराठी वाङ्मय मंडळ ' स्थापन करण्याचा माझा विचार आहे. " मधेच ते बोलले, " एखादे वेळी आम्ही तुम्हांला व्याख्यान द्यावयाला बोलावू तिकडे, तुम्ही नाही म्हणता कामा नये. आम्ही तुमचा सेकंड क्लासचा जाण्यायेण्याचा खर्च देऊ. तसे आम्ही तुम्हांला काही फुकट बोलावणार नाही ! " धन्य आहे या माणसाची अशा विचाराने मी क्षणमात्र निफाडकरांच्या चेहऱ्याकडे कौतुकाने पाहिले. म्हणजे रंगूनला जायला स्वतः याच्याजवळ कपर्दिका नाही आणि हा माणूस ब्रह्मदेशात जाण्यायेण्याचा सेकंड क्लासचा खर्च देऊन वर मला बोलावतो आहे ! जाण्यापूर्वी मला नमस्कार करीत निफाडकर म्हणाले, " बरे आहे, मग येतो मी. आता काही तुमची आमची भेट होणार नाही. रंगूनला गेल्यावर तुमचे हे पैसे ताबडतोब पाठवून देतो. " तेव्हा मी जरा चिडून म्हणालो, " का आता आमच्या जखमेवर मीठ चोळता आहात ? पैसे नेता आहात ते नेता आहात आणि परत करण्याच्या गोष्टी कशाला करताहात ? कर्ज म्हणून मी तुम्हाला हे पैसे दिले नाहीत. देणगी म्हणून दिले आहेत बरे ! हे परत करण्याची मुळीच यातायात करू नका, जा ! " तेव्हा काही न बोलता ते मुकाट्याने निघून गेले. मागाहून इतके कठोरपणे त्यांना बोलल्याबद्दल मला वाईट वाटले. पुढे दोनचार महिने झाले तरी स्वारी मुंबईच्या रस्त्यामधून



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.............................. दि: ......................
...... ............... नों दि:

भटकताना कुठे तरी कोणाला दिसत असे. रंगूनला जाण्यासाठी बहुतेक साऱ्या मुंबईकर साहित्यिकांकडून त्यांनी भाड्याचे पैसे गोळा केल्याचेही पण समजले. आणखी एका महिन्याने असे दुपारच्या सुमाराला पुन्हा हे गृहस्थ माझ्या छापखान्यामधे येऊन माझ्यासमोर उभे राहिले. मी चकित होऊन त्यांना विचारले, "काहो, तुम्ही रंगूनला जाणार होता त्याचे काय झाले ?" तेव्हा खुर्चीवर बसता बसता अगदी संथपणे ते उत्तरले, "ब्रह्मदेशाची राजकीय परिस्थिती अतिशय बिघडली असे जावयांचे पत्र आले, तेव्हा मी तिकडे जाण्याचा माझा बेत स्थगित केला!" "वा छान केलेत" मी हसत हसत म्हणालो, "मग तुमच्या राहण्याने आता या देशाची आर्थिक परिस्थिती मात्र आणखीनच जास्त बिघडेल असा तर्क करायला काही हरकत नाही!" माझ्या विनोदातली मख्खी त्यांच्या ध्यानात आली तरी ते हसले नाहीत. आपल्या हाताच्या पंजाची पाच बोटे माझ्या समोर उडवीत ते गंभीरपणे म्हणाले, "फार काही तुम्हांला त्रास देत नाही. पण एवढे द्या म्हणजे जातो. मग पुन्हा कधी कधी येणार नाही!" मी त्यांच्याकडे रोखल्या नजरेने पाहात म्हणालो, "निफाडकर, यापुढे पैसे मागण्यासाठी तुम्ही माझ्याकडे येत जाऊ नका. माझी मर्यादा आता संपली." तरी जवळजवळ तासभर ते तसेच माझ्यासमोर बसून राहिले. पण मी त्यांच्याशी एक अक्षरदेखील बोललो नाही. जाण्यापूर्वी एक बोट दाखवीत त्यांनी पुन्हा विचारले, "निदान एक तरी ?" मी म्हणालो, "आज एकदेखील नाही ? पाहिजेतर एक चहाचा कप देतो." तेव्हा आता काही आपली इथे डाळ शिजायची नाही हे त्यांच्या पुरते लक्षात आले आणि मान खाली घालून ते निघून गेले. मग पुन्हा ते माझ्याकडे आले नाहीत.

त्यानंतर काही दिवसांनी सानेगुरुजींनी त्यांना बरीच मोठी रक्कम देऊन टाकल्याचे ऐकून मी अगदी हतबद्ध झालो. गुरुजींच्या एका मित्रानेच ती हकीगत मला सांगितली. निफाडकर रोज त्यांना आपली सर्व कथा सांगत असायचे. त्यामुळे गुरुजींचे अंतःकरण साहजिकच द्रवले. एकदा असाच एका प्रकाशकाकडून त्यांना पाच-सातशे रुपयांचा चेक आला होता. तो तसाचे तसाच त्यांनी निफाडकरांना देऊन टाकला. आणि देताना ते म्हणाले, "सध्या तुम्हांला याच्यापेक्षा अधिक मदत मला करता येत नाही याबद्दल मला वाईट वाटते!" गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी खर्च होणारे गुरुजींचे मौल्यवान पैसे अशा तऱ्हेने मधल्यामधे निफाडकरांनी उपटून घ्यावेत याचे मला फार वाईट वाटले. निफाड-

करांच्या लुब्रेपणाबरोबर गुरुजींच्या भोळसरपणाचाही मला राग आला. कारण निफाडकरांच्या दारिद्र्याला अंत नव्हता. कितीही पैसे त्यांना मिळाले तरी त्यांची गरज भागण्यासारखी नव्हती. गुरुजींकडून मिळालेल्या एवढ्या पैशाचे काय त्यांनी केले परमेश्वराला माहीत. त्यानंतर पाच-सात महिन्यांनी सोपानदेव चौधरी एक दिवस अतिशय वाईट चेहरा करून मला सांगू लागले, " आज मी एक अतिशय हृदयद्रावक दृश्य पाहिले ! " मी विचारले, " काय पाहिलेत ! " सोपानदेव आवंढा गिळत म्हणाले, " ठाकूरद्वारच्या रस्त्यावर एका कोपऱ्यावर समोर एक फडके आंथरून निफाडकर भीक मागत बसलेले मी आज पाहिले. माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसेना. मी तेथे बाजूला बराच वेळ उभा राहिलो. निफाडकरांच्या बाजूला एक मुलगा बसलेला होता. ते डोळ्याला चष्मा लावून कसले तरी पुस्तक वाचीत बसले होते. त्यांच्या समोरच्या फडक्यावर एकदोन आणेल्या पडल्या होत्या ! " सोपानदेवांच्या तोंडचे ते वर्णन ऐकून मलाही अतिशय वाईट वाटले. निफाडकरांचा मला पुष्कळ वेळा राग येत असे तरी पण त्यांनी भर रस्त्यावर बसून उघडपणे भीक मागावी ही गोष्ट मला रुचणारी नव्हती. मात्र ते इतक्या थराला जाऊन पोहोचतील अशी मला मुळींच कल्पना नव्हती. " मग पुढे काय केलेत तुम्ही ? " मी सोपानदेवांना विचारले. " काय करणार मी ? " ते म्हणाले. " त्यांच्या समोरच्या त्या फडक्यावर दोन आण्यांचे नाणे हलकेच ठेवून आणि त्यांना नमस्कार करून मी तसाच मागल्या मागे परतलो. त्यांनी मला काही ओळखले नाही ! " सोपानदेवांनी सांगितलेला हा प्रसंग आठवला म्हणजे माझे डोके अद्यापिही बधिर होते, आणि काही सुचेनासे होते, निफाडकरांच्या दुर्दैवी आयुष्याच्या करुण कहाणीचे हे अगदी शिखरच होते, असे म्हणावयाला हरकत नाही. कोणत्याही व्यसनाच्या आधीन न होता केवळ आपल्या विक्षिप्त आणि हेकेखोर स्वभावामुळे निफाडकरांनी ' एकच प्याला '-मधील सुधाकराप्रमाणे आपल्या आयुष्याचे अशा रीतीने अगदी वाटोळे करून घेतले. त्यांना व्यसनच जर कशाचे असेल तर ते वाङ्मयाचे—लेखनाचे ! पण त्यामध्ये तरी त्यांनी काही यश किंवा सिद्धी मिळवून दाखविली म्हणता की काय ? तर तेही नाही. त्यांच्या बुद्धीची आणि स्वभावाची बैठकच अशी काही चमत्कारिक होती की सांगता सोय नाही. त्यामुळे त्यांच्या वाङ्मयाचाही विचका झाला आणि आयुष्याचाही निकाल लागला. एक गोष्ट देखील त्यांना हयातीत कधी साधली नाही.



बराडा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम...................... दि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: ..................

आयुष्याच्या अखेरीस ठाकुरद्वारच्या रस्त्यावर फडके आंथरून भीक मागणारा हा माणूस एका श्रीमंत बापाच्या पोटी जन्माला आलेला होता हे आज कोणाला सांगितले तर खरेदेखील वाटणार नाही. त्यांचे वडील यादवराव निफाडकर हे एक नामांकित वकील होते. त्यांनी वकिलीवर गडगंज संपत्ती मिळविली. पुण्याच्या डेक्कन कॉलेजात त्यांनी आपल्या या चिरंजिवांना शिकावयाला ठेवले होते. डेक्कन कॉलेजात असताना उत्कृष्ट क्रिकेट खेळणारा खेळाडू म्हणून एकनाथपंतांचा लौकिक होता. अगदी आरंभाला एकदा बॅट हातात घेऊन आपण खेळायला गेलो म्हणजे शेवटी आऊट न होताना परत येत असू असे त्यांनी मला एकदा सांगितल्याचे आठवते. वडील वारल्याने त्यांनी मधेच शिक्षण सोडले आणि ते ' घरचे ' पाहू लागले. तेव्हापासून त्यांच्या अधोगतीला सुरुवात झाली. वडील त्यांना एक लाख रुपयांची इस्टेट ठेवून गेले होते असे म्हणतात. या एवढ्या संपत्तीच्या पंधरावीस वर्षांच्या आत त्यांनी अक्षरशः कवड्या रेवड्या करून टाकल्या. आपण कोणी तरी शेले, बायरन् किंवा कीट्स ह्यांच्या तोडीचे कवी आहोत, दिसावयालाही पण त्यांच्याप्रमाणे मोठे सुंदर आहोत आणि समाजातील सर्व नैतिक संकेत मोडायचा आणि वाटेल तसे स्वैर वर्तन करावयाचा आपल्याला जन्मजात परमेश्वराने जणू काही परवानाच देऊन ठेवलेला आहे असा निफाडकरांच्या डोक्यात तरुणपणापासून एक भ्रम भरलेला होता. पुढेपुढे शेक्सपिअर, डॅन्टे, कालिदास किंवा भवभूती हे महाकवी निफाडकरांना अगदी खिजगणतीत वाटू लागले आणि काही वर्षांनी तर आपण कोणी तरी एक अलौकिक महापुरुष ह्या हिंदुस्थानात जन्माला आलेले आहोत आणि आपण बोलू ते उपनिषद आणि लिहू तो वेद अशी स्वर्गीय प्रतिभा आपल्या अंगी वास करते आहे असा त्यांना साक्षात्कार झाला. यूरोपमधल्या मध्ययुगीन सरदारांच्या प्रेमाच्या आणि पराक्रमाच्या कादंबऱ्या वाचून डॉन क्विक्झोटची जी स्थिती झाली तीच मराठी, इंग्रजी आणि संस्कृत काव्ये वाचून निफाडकरांची अवस्था झाली. आणि त्यामुळे त्यांच्या चालण्याचे बोलण्याचे, लिहिण्याचे, अन् वाचण्याचे ते जिथे जातील तिथे हसू होऊ लागले. आणि सगळ्यात आश्चर्याची गोष्ट ही की, लोक आपल्याला हसताहेत आणि आपली थट्टा करताहेत ही गोष्ट कधी त्यांच्या गावीही नसे. त्यांचे कोणाशीही पटत नसे किंवा कुठेही फार वेळ जमत नसे. कोणताही उद्योग हाती घेतला की तो त्यांनी काही दिवसांनी सोडणे भागच पडे. धुळ्याला एका शाळेत ते मास्तर होते. तेथे शिक्षकाच्या खोलीत एकदा ते

बसले असताना एका गोऱ्यागोमट्या तरुण शिक्षकाचा त्यांनी सर्वांच्या देखत मुका घेतला. त्या तरुण शिक्षकाने ह्यांच्या दोन-तीन कानशिलात भडकावल्या. शेवटी त्या शाळेतील नोकरी सोडणे त्यांना भागच पडले.

त्यानंतर त्यांनी 'लोकमान्य' नावाचे एक मासिक काढले. निफाडकरांच्या विक्षिप्त लेखनशैलीचे हास्यास्पद नमुने ह्या मासिकाच्या अंकात वाटेल तितके वाचायला मिळू शकतील. त्यांचे प्रत्येक लिखाण आत्मस्तुतीने काठोकाठ भरलेले असे. त्यामुळे धुळ्यातल्या वाचकांनी 'लोकमान्य' मासिकाला थट्टेने 'अहंमन्य' मासिक असे नाव देऊन ठेवलेले होते. बालकवी ठोमरे ह्यांच्याशी निफाडकरांची मैत्री होती. त्याचा फायदा घेऊन निफाडकरांनी 'बालकवींची कविता' प्रसिद्ध केली आणि त्यांच्या कवितेत आपल्याला वाटतील तसे अनेक फेरबदल करून टाकले. 'बालकवी इथे चुकला आहे, त्याने येथे असे असे लिहावयाला पाहिजे होते!' अशा तळटीपा जागोजाग त्या पुस्तकामध्ये निफाडकरांनी देऊन बालकवींच्या सुंदर काव्याचे अगदी मातेरे करून टाकले आहे. आगगाडीच्या अपघातात बालकवी निधन पावल्यानंतर एकदा निफाडकर मला पुण्यात भेटले, आणि या हृदयद्रावक प्रसंगाचे वर्णन करून त्यांनी मला कडकडून मिठी मारली आणि खांद्यावर डोके ठेवून ते एवढ्या मोठ्याने ओक्साबोक्शी रडू लागले की, त्यांच्या या मिठीमधून सुटका करून घेता घेता माझी अगदी त्रेधा उडाली. इतक्या भयंकर पेचप्रसंगात मी आयुष्यात कधीही सापडलो नसेन. धुळे येथे असताना 'चिमणी' नावाच्या एका सुंदरीच्या प्रेमपाशात निफाडकर सापडले आणि त्यामुळे गावामध्ये खूपच धुमाकूळ उडाली. 'चिमणीवर प्रेम करणारा कावळा' असे त्यांच्याकडे बोटे दाखवून पोरेसोरे त्यांची टर उडवू लागले. तेव्हा धुळ्याहून आपला मुक्काम हलवून ते नाशिक येथे येऊन स्थायिक झाले. नाशिकच्या कवींचा 'गोदाकाठी गुंजारव' हा जो काव्यसंग्रह अनेक वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला आहे त्यात निफाडकरांच्या अनेक विक्षिप्त कविता वाचावयास मिळतील. त्यांची एक भयंकर कविता अद्यापिही माझ्या स्मरणात आहे. आपल्या प्रेयसीच्या कडेवरील मुलाला उद्देशून ते म्हणतात,

पूर्वी तुझ्या मातेचा
    जो स्तनप्रांत माझा
दिला तुला करूनी
    साठा त्यात अमृताचा



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

मधुर दुग्धपाना करि गे
त्यातुनी सदैव
समाधान दावाया
त्यावरी कर फिरवी

शृंगार आणि वात्सल्य या दोन रसांचे हे त्यांनी बनविलेले भयाण मिश्रण रसिकांच्या अंगावर अक्षरशः काटा उभा करणारे आहे. ‘ सोनपत–पानपत ’ नावाच्या एका खंडकाव्यात ( ज्याला आम्ही त्या वेळी ‘ सोनखत–पानपत ’ म्हणत असू ) त्यांनी “ अबदाली तो विजारीमध्ये फराफरा हगला ! ” असे अत्यंत वास्तववादी वर्णन करून मर्ढेकरांच्यावर त्यांच्याआधी कित्येक वर्षे मात करून ठेवली आहे. ‘ महात्मा गांधी—साधु की सैतान ’ ही त्यांची कादंबरी आणि वेश्याव्यवसायावर ‘ यामा ’ प्रमाणेच लिहिलेली ‘ नागा ’ ही त्यांची दीर्घकथा पुष्कळ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली आहे. अर्थात ही पुस्तके सामान्य वाचकांनी वाचण्याची सोयच नाही हे सांगावयाला नकोच. नाशिकला असताना त्यांनी ‘ वाङ्मय ’ आणि ‘ नाटक ’ अशी दोन मासिके सुरू केली होती. ती काही दिवस चालून बंद पडली. बऱ्याच वर्षांपूर्वी त्यांनी ‘ मौज ’ मध्ये दोन लेख लिहिल्याचे मला आठवते आहे. एका लेखात “ आपण डॉन जुऑनप्रमाणे स्त्रियांची अंतःकरण जिंकणारे आहोत, वर्णाने जर थोडासा उजळ असतो तर या देशात आपण कहर करून सोडला असता ! ” असे त्यांनी लिहिलेले होते, तर दुसऱ्या लेखात हिंदुस्थानातील बुवा, बैरागी आणि महाराज ह्यांचे एक संमेलन बोलावण्याची योजना त्यांनी मांडलेली होती. ज्यात काहीतरी विक्षिप्तपणा किंवा विचित्रपणा भरलेला नाही असे एक अक्षर निफाडकरांनी कधी लिहिलेले नाही किंवा कृत्य त्यांनी आयुष्यात कधी केले नाही. तथापि, एवढे असूनही एक गोष्ट त्यांच्या बाजूने कबूल करावयाला हवी. ती ही की निफाडकर अंतःकरणाने खरोखरच वाईट नव्हते. ते एखाद्या लहान मुलाप्रमाणे नादी होते. लहरी होते. हट्टी होते. पण मनाने निष्पाप होते आणि वृत्तीने मित्रेही पण होते. हट्टी मूल चांगली चांगली खेळणी मिळाली असताही ती जशी फोडून तोडून त्याच्या ठिकऱ्या करून टाकते, त्याप्रमाणे आयुष्यात अनेक चांगल्या चांगल्या देणग्या मिळाल्या असताही निफाडकरांनी आपल्या छांदिष्टपणाने त्यांचा नाश करून टाकला आणि आपल्या आयुष्याची धुळधाण करून घेतली. जातिवंत कवींनी आणि कलावंतांनी आपल्या काव्यापायी आणि कलेपायी अशी आपत्ती जाणून-

बुजून आपल्यावर ओढून घेतल्याची अनेक उदाहरणे सांगता येतील. पण आपण एक महान कवी किंवा कलावंत आहोत अशा नुसत्या भ्रामक कल्पनेने एका सामान्य प्रतिभेच्या लेखकाने आपल्या आयुष्याचा कसा नाश करून घेतला ह्याचे निफाडकरासारखे हृदयद्रावक उदाहरण मात्र क्वचितच आढळून येईल. निफाडकरांनी लिहिलेले एकही गद्य वा पद्य अक्षर मराठी वाङ्मयात त्यांच्यामागे उरणार नाही. तथापि महाकवी होण्यासाठी त्यांनी आपल्या जीवनाचा जो होम केला त्या योगाने संतुष्ट होऊन महाकवी होण्याची त्यांची अतृप्त राहिलेली महत्त्वाकांक्षा पुढल्या जन्मी तरी परमेश्वराने पूर्ण करावी अशी त्याच्या चरणी या दुर्दैवी जीवाच्या वतीने आम्ही नम्र प्रार्थना करीत आहोत!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५७०५९ वि: निबंध
क्रमांक २१७३ नों: दि: ३१/१२/७७

४

## दत्तू बांदेकर

गेली वीस वर्षे 'साप्ताहिक नवयुग'च्या संपादनकार्यात ज्यांनी माझ्याशी बरोबरीने सतत सहकार्य केले आणि महाराष्ट्रात राजकीय विनोदाचे अक्षरशः 'नवयुग' निर्माण करून त्या साप्ताहिकाला बहुजनसमाजात अलौकिक लोकप्रियता प्राप्त करून दिली, ते मराठी वाङ्मयातील असामान्य प्रतिभेचे विनोदी पत्रकार दत्तू बांदेकर हे काल रोजी साडेपाच वाजता नायर इस्पितळात मरण पावले, हे महाराष्ट्राला जाहीर करताना माझे अंतःकरण शतधा विदीर्ण होत आहे. काल सकाळी दहा वाजता त्यांच्या मेंदूत एकाएकी रक्तस्राव सुरू झाला आणि त्यामुळे त्याची शुद्ध गेली. तशाच गंभीर स्थितीत त्यांना इस्पितळात आणले. पण शेवटच्या क्षणापर्यंत ते पुन्हा शुद्धीवर आले नाहीत. मृत्युसमयी त्यांचे वय पंचावन्न वर्षांचे होते. प्रकृतीने ते अत्यंत किरकोळ असत. पण उभ्या आयुष्यात त्यांना आजारी पडलेले मी कधी पाहिले नाही. राहणारे ते कारवारचे. मातृभाषा कोकणी. शिक्षण कानडीतून झालेले. मराठी भाषेशी तसा काही संबंध नसताना, गेली पंचवीस वर्षे त्यांनी मराठी भाषेत जे मौलिक आणि अपूर्व विनोदी वाङ्मय निर्माण केले, त्याला खरोखरच तुलना काही. मराठी साहित्यात श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी जी वाङ्मयीन विनोदाची परंपरा पन्नास वर्षांपूर्वी निर्माण केली आणि जी गडकरी, चिं. वि. जोशी, कॅप्टन लिमये, पु. ल. देशपांडे ह्यांनी मोठ्या यशस्वितेने पुढे चालविली, तिच्याहून आमूलाग्र वेगळ्या आणि आगळ्या विनोदाची मुहूर्तमेढ दत्तू

बांदेकरांनी मराठी वाङ्मयात रोवून आपल्या खेळकर आणि खोडकर विनोदाने वर्षानुवर्षे आणि आठवडेच्या आठवडे महाराष्ट्राला हसवून हसवून गडबडा लोळावयाला लावले. काणेकर-रांगणेकरांच्या 'चित्रा' साप्ताहिकात त्यांनी आपल्या विनोदी लेखनाला प्रारंभ केला. आपल्या अलौकिक प्रतिभेतून त्यांनी 'सख्या हरि' नावाचा एक अजब नमुना निर्माण केला. चाळीत राहणारा, मळकट कपडे अंगात घालणारा, नळावर बायकांशी चावटपणा करणारा, चौपाटीवर भेळ खाऊन शीळ फुंकणारा आणि मुंबईच्या साऱ्या गमतींचा वात्रटपणाने नि मिकिलपणे आस्वाद घेणारा दत्तू बांदेकरांचा 'सख्या हरि' म्हणजे, त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण विनोदाचा एक अविस्मरणीय नमुना होय. त्यांच्या ह्या 'सख्या हरि'ने एक वेळ महाराष्ट्रातील बहुजनसमाजाला वेड लावले होते. पुढे पुस्तकरूपाने जेव्हा 'सख्या हरि' प्रसिद्ध झाला, तेव्हा त्याला 'प्रस्तावना' लिहिण्याचे काम त्यांनी माझ्याकडे सोपविले. तेव्हा-पासून बांदेकरांच्या विनोदावर मी अक्षरशः आषक होऊन गेलो. मध्यंतरी अनेक वृत्तपत्रांत त्यांनी नोकरी केली. पुढे १९३९ साली जेव्हा मी साप्ताहिक 'नवयुग' काढले, तेव्हा मोठ्या अगत्याने आणि आग्रहाने मी त्यांना माझ्याकडे बोलावून घेतले. स्वभावाने ते लहरी असत. म्हणून एखाद्या लहान मुलासारखे त्यांना सांभाळावे लागे. पण त्याची योग्यता मी ओळखून असल्याने त्यांना शेवटपर्यंत माझ्यापासून मी जाऊ दिले नाही. अखेर काल मृत्यूने त्यांना माझ्यापासून ओढून नेले, म्हणूनच माझा नाइलाज झाला. कालच्या 'नवयुगा'तला 'केरळ पोटनिवडणुकीची तयारी' हा शेवटचा विनोदी लेख लिहून 'नवयुग' प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनी आपली लेखणी खाली ठेवली आणि देह सोडला. गेल्या वीस वर्षांत 'नवयुगा'तल्या पहिल्या पानावर त्यांनी आपल्या विनोदी प्रतिभेचे जे एकापेक्षाही एक अद्‌भुत चमत्कार दाखविलेले आहेत, त्याच्या नुसत्या स्मरणाने बुद्धी दिपून गेल्यावाचून राहणार नाही. त्यांचे सर्व आयुष्य वृत्तपत्रीय सृष्टीत गेल्यामुळे लोकमताची नाडी ते अचूकपणे ओळखत असत. राजकारणाचे सूक्ष्म धागेदोरे आणि त्यातील अंतर्गत विरोध आणि विसंगती ह्यांचे आकलन अत्यंत मार्मिकपणे ते करीत. म्हणून त्यांचा विनोद हा सर्वसामान्य वाचकाच्या मनाची ताबडतोब पकड घेई. रोजच्या रोज डोळ्यांना दिसणाऱ्या दैनंदिन जीवनातल्या बारीकसारीक गोष्टींमधून ते असा काही बहारदार विनोद निर्माण करीत की तो वाचून ज्याला हसू कोसळणार



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...................... दि: ....................

नाही असा माणूसच विरळा. ते विद्वानांचे विनोदपंडित नव्हते, ते जनतेचे विनोदकार ( People's Humourist ) होते. सर्वसामान्य गरीब माणसाबद्दल आणि ओढगस्तीने जीवन जगणाऱ्या कष्टाळू कंगालाबद्दल त्यांना विलक्षण जिव्हाळा वाटे. हा जिव्हाळा त्यांच्या प्रत्येक विनोदी लेखनातून पाझरताना दिसतो. त्यामुळे त्यांच्या उपहासात कटुतचा लवलेशही आढळून येणार नाही. हे त्यांच्या विनोदाच्या लोकप्रियतेचे सर्वांत मोठे सामर्थ्य होते. नसत्या काळज्या करून खंगून मरण्यापेक्षा हसून खेळून आला तो दिवस मौजेने आणि मिळेल त्या चैनीने साजरा करावा, हे त्यांच्या विनोदाचे तत्त्वज्ञान होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात तर त्यांच्या विनोदी प्रतिभेला विलक्षण बहर आला होता. संयुक्त महाराष्ट्राला विरोध करणाऱ्या काँग्रेस पुढाऱ्यांची गेल्या चार वर्षांत अनेक विडंबन काव्ये आणि उपहासगर्भ नाटके लिहून त्यांनी अशी काही भंवेरी उडवली आहे म्हणता ! 'पांडोबा पांडोबा भागलास का ?' हे काव्य त्यांचेच. साऱ्या 'गणपतीच्या आरत्या' त्यांनीच रचलेल्या. गेल्या एक एप्रिलला 'मराठात' 'धुलाई लामा' नि 'शिलाईलामा' हा जो विडंबनात्मक अग्रलेख प्रसिद्ध झाला आहे तो त्यांच्याच विनोदी लेखणीतून उतरलेला. गेल्या पंचवीस वर्षांत त्यांनी लिहिलेले सर्व विनोदी वाङ्मय जर एकत्रित केले तर ते तीन हजार पाने तरी भरेल. असा अलौकिक नि जिवंत प्रतिभेचा आणि महाराष्ट्रातील बहुजनसमाजाला पोट धरधरून हसवणारा लेखक पुन्हा लौकर निर्माण होणे अशक्य आहे. त्यांच्या अकाल मृत्यूने व्यक्तिशः आमचे नि 'नवयुग' संस्थेचे तर किती नुकसान झाले आहे, ह्याची आमच्याखेरीज इतरांना कल्पना होणे अशक्य आहे. पण त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची नि वृत्तपत्रीय वाङ्मयाची जी अपरंपार हानी झाली आहे, तिची यथार्थ कल्पना वाचकांना करून देणे आमच्या आटोक्याबाहेरचे आहे. आणि त्या मनःस्थितीत ह्या क्षणी आम्ही नाहीत पण एवढे मात्र खरे की, महाराष्ट्र 'दत्तू बांदेकरांना' कधीही विसरू शकणार नाही !

५

# कारुण्याचा विनोदी शाहीर !

' साप्ताहिक नवयुग 'मधील माझे वीस वर्षांचे सहकारी दत्तू बांदेकर, गेल्या रविवारी आम्हांला आणि महाराष्ट्रातील आपल्या हजारो वाचकांना अकस्मात सोडून गेले. उभ्या आयुष्यात त्यांनी कधी कोणाला उपसर्ग दिला नाही. आपले ऐहिक अस्तित्वसुद्धा कोणाला जाणवू दिले नाही. आणि शेवटी ह्या जगातून जातानासुद्धा ते कोणाला न विचारता वाऱ्याच्या झुळकीसारखे असे सळकन् निघून गेले, की ह्याचा पत्ताही त्यांनी कोणाला लागून दिला नाही. आता ते गेल्यानंतर त्यांच्या अनुपस्थितीच्या यातना इतक्या असह्य होत आहेत आणि त्यांच्या अलौकिक गुणांच्या अनंत आठवणींनी अंतःकरण इतके व्याकुळ होत आहे की, शब्दांनी ह्या सर्व व्यथा व्यक्तही करता येत नाहीत. गडकऱ्यांनंतर आणि साने गुरुजींनंतर असा लेखणीचा वेडा माणूस मी आयुष्यात पाहिला नाही. त्यांचे जीवन म्हणजे लेखन. त्यांचे श्वसन म्हणजे लेखन. लेखनाखेरीज त्यांनी आयुष्यात दुसरे काही केले नाही. जीवनातल्या कोणत्याही गोष्टीचा त्यांना मोह नव्हता. अंगभर कपडा कधी त्यांनी घातला नाही. पोटभर शांतपणे कधी ते जेवले नाहीत. अंथरुणावर निवांतपणे कधी क्षणभर झोपले नाही. पैशाची आणि लौकिक कीर्तीची तर जन्मात कधी त्यांनी परवा केली नाही. ग्रंथाच्या आणि विद्वानांच्या वाऱ्याला ते कधी उभे राहिले नाहीत. उत्सव आणि समारंभ असला की ते त्यापासून दोन मैल दूर. आत्मस्तुतीचा एक शब्द त्यांनी आपल्या मुखातून फारसा कधी काढला नाही, त्याप्रमाणे खुशामतीचा एक शब्द कधी

कोणाकडून त्यांनी ऐकून घेतला नाही. दिवसभर ते लिहावयाचे नि रात्रभर रस्त्यातून भटकावयाचे गरिबांचे जीवन पाहात. मुंबईमधे समुद्रकाठी आणि मलबार टेकडीवर श्रीमंतांच्या राजप्रासादाच्या गगनचुंबी रांगा उभ्या असल्या, तरी दुःखाचे आणि दारिद्र्याचे डोंगरच्या डोंगर ह्या शहरात रस्त्यारस्त्यावर आणि चाळीचाळीत जिकडे तिकडे पसरलेले आहेत. पदमार्गावर हजारो निराश्रित उघडेनागडे पडलेले आहेत. चाळीचाळीच्या अंधाऱ्या आणि गलिच्छ खुराड्या- तून माणसासारखी माणसे कुत्र्यामांजराचे बकाली जीवन जगत आहेत. वाड्या- वाड्यातल्या छप्पर घरांच्या आडोशाला अंधारत जुगारी आणि हातभट्टीवाल्या मवाल्यांचे अड्डे बसलेले आहेत, 'पिला हाऊस 'च्या दोन्ही बगलेला लोखंडी गजाच्या पिंजऱ्यात पोटाची आग विझविण्यासाठी स्वतःच्या देहाची दुकाने मांडून बसलेल्या बायकांचा बाजार भरलेला आहे. हॉटेलातले 'रेडिओ' सिनेमाची गाणी कर्कश स्वराने किंचाळताहेत. तमाशाच्या थिएटरात डफाच्या कडकडाटात आणि पैंजणांच्या थयथयाटीत लावण्यांचे तारस्वर उमटताहेत. संपत्तीच्या आणि सत्तेच्या अलोट ओझ्याखाली समाजाच्या तळाशी दडपून गेलेल्या लक्षावधी कंगालांची नि व्यसनी लोकांची जी भयानक नरकपुरी ह्या मुंबई शहरात निर्माण झालेली आहे, तिच्यातल्या दुर्दैवी आणि दुःखी जीवनाच्या अवलोकनाचा बांदेकरांना निदिध्यास लागून राहिला होता. पण मानवतेची ही अनन्वित दुःखे बघून त्यांचे हृदय दुःखाने कितीही थिजून गेले असले तरी त्यांनी आपल्या तोंडावरचे 'हसू' मात्र कधीही मावळून दिले नाही. पण हे त्यांचे हास्य अश्रू- पेक्षाही अत्यंत हृदयविदारक होते. म्हणून रडणाऱ्या माणसांना हसवील आणि हसणाऱ्या माणसांना रडवील असे विनोदाचे विलक्षण जालीम रसायन ते मराठी साहित्यात निर्माण करू शकले.

बांदेकरांची प्रतिमा हे खरोखरच देवाचे देणे होते. तिच्या घडणीशी माणसांचा काही संबंध नव्हता. मराठी भाषा तर ते शिकलेसुद्धा नाहीत. कोणत्या विषयाचा कधी त्यांनी अभ्यास केला नाही. डोळ्यांनी जे पाहिले आणि कानांनी जे ऐकले तेवढ्यावरच त्यांची प्रतिभा पोसली आणि वाणी विकसली. लेखनासाठी स्फूर्तीचा झटका केव्हा येईल ह्याची त्यांनी कधी वाट पाहिली नाही. लेखनासाठी लागणाऱ्या सरंजामाची कधी त्यांनी मिजास बाळगली नाही, आणि लेखणीतून एकदा लिखाण बाहेर पडले की फावल्या वेळी त्याला कुरवाळीत बसण्याचा मोहसुद्धा त्यांना कधी झाला नाही. लेखन

हा आपला व्यवसाय आहे किंवा आपण वृत्तीने लेखक आहोत, ही जाणीव कधीही त्यांनी बाळगली नाही. जीवनाचे मर्म दुसऱ्याला सांगण्याचे लेखनावाचून दुसरे साधन नाही म्हणूनच ते लेखन करीत. ते लेखन कसे करीत हे त्यांच्या स्वतःच्या मासलेवाईक विनोदी शब्दांतच सांगितलेले बरे. "इतर कोणताही व्यवसाय करण्याची मला अक्कल नसल्यामुळेच मी लेखन करीत असतो. जगातील कोणताही धंदा करण्याची पात्रता अंगी नसल्यामुळे मी लेखणीला शरण गेलो, हे कबूल करण्यास मला बिलकूल लाज वाटत नाही. लेखनाइतका बेजबाबदार, कमी श्रमाचा, माफक बुद्धीचा धंदा दुसरा कोणताही नसेल. मूर्खपणाचे काही लिहिले तर ते 'विनोदी' या सदराखाली जाते. अर्थ न कळण्यासारखे काही लिहिले तर ते 'गंभीर' या सदराखाली मोडते. एकंदर लेखणी कशीही चालविली तरी कालांतराने ती चालविणारा माणूस थोर लेखक या कीर्तीला जाऊन पोहोचतो. लेखन हा बिनभांडवलाचा धंदा आहे. चार पैशांचा कागद, शाई आणि लेखणी एवढे सामान असले की पुरे. मी लेखन कसे करतो हे सांगण्याची काय जरुरी? एखादे गाढव का ओरडते हे कळल्यावर ते कसे ओरडते हे जाणून घेण्यात शहाणपणा काय? मी विनोदी लेखक आहे असा काही जण माझ्यावर आरोप करतात. पण मला ते खरे वाटत नाही. माझ्या लेखनाने मला कधी आनंद झाला नाही. लेख लिहून झाल्यानंतर प्लेगच्या उंदराप्रमाणे मी ते निरनिराळ्या वृत्तपत्रकचेरीत फेकून देतो. पुन्हा त्यांची चौकशी करीत नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे मला स्वतःचे लिखाण बिलकूल आवडत नाही. शहाण्या माणसांना स्वतःच्या बायकोप्रमाणे स्वतःचे लेखही आवडत नसावेत. घरच्या चहाने मला स्फूर्ती येत नाही. मुंबईत विश्रांतिगृहे नसती तर माझ्या हातून एकही लेख निर्माण झाला नसता. लिहिताना काड्याची पेटी मी जवळ बाळगतो. विडी ओढण्यास आणि नको असलेले लिखाण जाळण्यास तिची मला मदत होते." स्वतःच्या लेखनाची प्रौढी बाळगणाऱ्या धंदेवाईक साहित्यशौंडांचा इतका प्रखर उपहास क्वचित कोणी केला असेल. पण तो करीत असताना लेखनसृष्टीतील त्यांच्या उपेक्षित आणि खडतर जीवनाचे जे ओझरते दर्शन त्यामध्ये होते ते हृदय पिळवटून टाकणारे आहे. बांदेकरांच्या विनोदाचे हेच मुळी वैशिष्ट्य आहे. हास्य आणि अश्रू ह्यांचा बेमालूम सांधा सर्वत्र त्यांच्या लेखनामधून आढळून येईल. उत्कृष्ट विनोदाची हीच खरी कसोटी आहे. विनोदाचा उगम दुःखातून होतो ही

उपपत्ती आता सर्वमान्य आहे. स्वर्गात आनंद आहे. पृथ्वीवर दुःख आहे. त्या दुःखाचा विनोद हा एकच विरंगुळा आहे. पण ह्या वृत्तीने फारच थोडे लेखक विनोदनिर्मिती करीत असतात. त्यामुळे विनोदाला बहुशः शाब्दिक कसरतीचे कृत्रिम स्वरूप येते. वाङ्मयीन विनोद हा तर अतिशयोक्तीवाचून मुळी निर्माणच होऊ शकत नाही. पण जगात दुःखाची आणि संकटाची इतकी 'अतिशयोक्ती' झालेली आहे की त्यांचे 'ऊनोक्ती'ने वर्णन केल्यानेच त्यांचे जास्त हसू होते हे रहस्य बांदेकरांनी बरोबर ओळखले होते. उघड उपहासाने, प्रखर उपरोधाने किंवा प्रकट अतिशयोक्तीने बांदेकरांनी एक अक्षरही कधी लिहिले नाही. विषमतेने आणि अन्यायाने पदोपदी हैराण झालेल्या मानवी जीवनाचे वर्णन ते इतक्या भिडस्तपणाने आणि भेदरटपणाने करतात की, एकाच वेळी आपल्या डोळ्यांतून आसू आणि ओठांतून हासू ओघळू लागते. अनाथ अपंगांबद्दल आणि रंजल्या-गांजल्यांबद्दल जिवंत जिव्हाळा निर्माण करण्याचे विलक्षण सामर्थ्य बांदेकरांच्या विनोदात आहे. म्हणून त्यांच्या विनोदात दंश किंवा द्वेष ह्यांचा लवलेशही कुठे आढळणार नाही. बायकोच्या छळाने गांजलेला नवरा स्वतःच्याच थोबाडीत फडाफडा मारून जसे तिचे हृदयपरिवर्तन घडवून आणतो, त्याप्रमाणे समाजातील सगळ्या हालअपेष्टांचे खापर ते स्वतःच्याच डोक्यावर फोडून घेऊन अन्यायाची आणि जुलमाची रेवडी उडवतात. म्हणून त्यांच्या विनोदात अश्रू आणि हास्य ह्यांची गाठ स्वाभाविकपणे पडल्यावाचून राहात नाही.

साने गुरुजीप्रमाणेच बांदेकरांचे सर्व लेखन अश्रूंनी लिहिलेले आहे. एके ठिकाणी ते म्हणतात, "वाङ्मय रक्ताने लिहावे असे म्हणतात. पण ते अश्रूंनी लिहावे लागते. रक्तापेक्षा या जगात अश्रूच जास्त पवित्र. रक्तात संकर होऊ शकतो. पण अश्रू ही निर्मळ गंगा आहे." मानवी यातनांवर आपल्या अश्रूंचे सिंचन करून बांदेकरांनी आपल्या विनोदाचा बगीचा फुलवला आहे, म्हणून त्याचा सुगंध अनंत काळपर्यंत महाराष्ट्रात दरवळल्यावाचून राहणार नाही. बांदेकरांच्या ह्या कारुण्यमय विनोदाचे आल्हादकारक नमुने किती म्हणून सांगावेत? एकेका वाक्यात विलक्षण हास्य निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत होते. 'नवरा कसा ओळखावा?' ह्याच्या खुणा सांगताना त्यांनी म्हटले आहे की, 'सिनेमा चालू असताना थिएटरच्या बाहेर मूल खेळवणारा माणूस एखाद्या प्रेमळ बाईचा नवरा आहे असे समजावे.' मुंबईतल्या चाळी-मधील एका सार्वजनिक नळाची जेव्हा त्यांनी जबानी घेतली, तेव्हा नळ

म्हणतो, ' स्त्रियांचा माझ्याकडे इतका ओढा असण्याचे कारण माझ्या अंगात असणारे पाणी. आपल्यावर स्त्रिया भाळत नाहीत म्हणून कुरकूर करणाऱ्या पुरुषांनो, तुमच्या अंगात इतके पाणी आहे काय ? रात्री फक्त मला विश्रांती मिळते. कारण दिवसा मला त्रास देणाऱ्या बायका रात्री आपल्या नवऱ्यांना त्रास देण्यासाठी आपापल्या बिऱ्हाडात जातात. ' गरिबांसाठी बांदेकरानी शब्दकोश लिहिलेला आहे. त्यातील पुढील शब्दांचे अर्थ वाचण्यासारखे आहेत " सण = कर्ज काढण्याचा दिवस. कर्ज = परत न करण्यासाठी काढलेली रक्कम. पगार = वेळेवर न मिळणारी वस्तू. पाळणा = संततिनियमनाचे गोड फळ. रस्ता = मोटारीखाली मरण्याची जागा. हुंडा = ज्यामुळे कुरूप मुलींची लग्ने होतात. घर = बायकोला मधून मधून भेटण्याचे स्थळ. " ' लघुलघुतम ' कथा लिहिण्यात बांदेकरांचा हातखंडा होता. ' त्याचे दुःख ' ही त्यांची कथा पाहा. " ट्रामअपघातात एका माणसाचा पाय तुटला. डॉक्टरांनी तो कापून काढला. तेव्हा तो ढळाढळा रडू लागला. नर्स त्याची समजूत घालू लागली. तेव्हा तो म्हणाला, ' पाय गेल्याचे मला दुःख नाही. पण आता मी बायकोला लाथ कशी मारू ? ' " ही दुसरी कथा वाचा. ' इराणी हॉटेलच्या फॅमिलीरूममध्ये एक पुरुष आणि स्त्री तीन-चार तास बसली होती. ती बाहेर येईनात. तेव्हा इराणी मालक हलकेच दार उघडून म्हणाला, " काय हो, इतका वेळ काय करता ? " तेव्हा पुरुष म्हणाला, " पैशांचे पाकीट मी घरी विसरून आलो आहे. तेव्हा बिल दिल्यावाचून बाहेर कसे पडायचे ह्याचा आम्ही खल करतो आहोत. "

पण बांदेकरांचा विनोद केवळ एवढ्याच पातळीवर रेंगाळत नाही. तो जेव्हा जीवनातील भिन्नभिन्न समस्यांच्या भयानक भुयारात शिरू लागतो तेव्हा त्यांची भेदकता अधिक तीव्र होते. कापडाचा दुष्काळ असलेल्या गावातील ' आदम ' आणि ' ईव्ह ' ह्या एका नंग्या जोडप्याचा त्यांनी लिहिलेला संवाद ह्या दृष्टीने पाहण्यासारखा आहे. " मध्यरात्रीच्या वेळी आदम घरचा दरवाजा ठोठावतो. पण ईव्ह दरवाजा उघडत नाही. आदम म्हणतो, दार का उघडत नाहीस ? ईव्ह सांगते, मला लाज वाटते. माझ्या अंगावर कपडे नाहीत. आदम : माझ्या अंगावर तरी कुठे आहेत ? कापडाचा शोध करून अगदी हैराण झालो. पण कापड कुठे आहे ? ईव्ह : आपल्या देशातले कापड गेले तरी कुठे ? लढाईवर का ? आदम : नाही. मध्यवर्ती सरकारने प्रांतिक सरकारला भरपूर पुरवठा केला होता. तसं म्हटलं तर फार थोडे कापड इजिप्तला, दक्षिण आफ्रिकेला, ऑस्ट्रे-



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ वि: ......................

लियाला निर्यात झाले आहे. हिंदुस्थानच्या गिरण्यांत चार अब्ज ऐशी कोटी कापड निघते—ईव्ह : तुम्ही असेंब्लीत व्याख्यान देता की, बायकोपुढे बोलता? आदम : बरे, काल मी पिंपळाच्या पानाची साडी करून दिली होती, ती काय झाली? ईव्ह : ती बकरीने खाऊन टाकली. आदम : अन् केळीच्या पानांची चड्डी? ईव्ह : ती शेजारच्या बैलाने खाऊन टाकली. म्हणजे सरकार कापड देत नाही अन् जनावरे झाडपाला नेसू देत नाहीत. काय करावे?" हिवाळ्यात मुंबईच्या रस्त्यावर रात्री थंडीत कुडकुडत पडलेल्या लोकांकडे पाहून बांदेकर एका ठिकाणी म्हणतात, 'या देशात लक्षावधी लोकांना अंगात घालण्यास कपडाच नसल्यामुळे त्यांना थंडी म्हणजे काय हे माहीतच नाही. हिंदुस्थान देश मोठा चमत्कारिक आहे. येथील गरिबांना भूक लागत नाही. झोप येत नाही. थंडी वाजत नाही. उन्हाळ्यात मुंबईचा गव्हर्नर महाबळेश्वरला जातो व दिल्लीचा व्हाइसरॉय सिमल्यास जातो. पण गोरेगावकरांच्या चाळीतला माणूस गोरेगावकरांच्या चाळीतच राहतो. हिंदी माणूस उन्हाने करपत नाही, थंडीने गारठत नाही की पावसाने भिजत नाही. बिहारमधल्या उपासमारीने मेलेले मृतात्मे जेव्हा स्वर्गात जातात तेव्हा त्यांचा आणि यमदेवाचा जो संवाद बांदेकरांनी लिहिलेला आहे, तो वाचून हृदयाला पीळ पडल्यावाचून राहात नाही. आपण उपासमारीने मेलो असे कोणीच मृतात्मा कबूल करीत नाही. कोणी म्हणतो मी भाववाढीने मेलो, कोणी म्हणतो मी म्हातारपणामुळे मेलो, कोणी म्हणतो मी रोगराईने मेलो, कोणी म्हणतो भूक लागली तेव्हा मी रेशनकार्ड खाल्ले पण उपाशी राहिलो नाही. शेवटी एक भिकारीण स्वर्गात येते. तिला यमदेव विचारतो, 'तू उपासमारीने मेलीस काय?' तेव्हा ती म्हणते, 'छे, कुत्रा चावल्यामुळे मला मृत्यू आला. रस्त्यातल्या एका उष्ट्या पत्रावळीसाठी त्याचे आणि माझे भांडण लागले. तो कुत्रा माझ्यापेक्षा जास्त भुकेला होता. त्याने माझा कडकडून चावा घेतला, म्हणून मी मेले.' अशा रीतीने गरिबांच्या जीवनामधल्या नानाविध दुःखांचे करुण पडसाद बांदेकराच्या विनोदात उमटलेले आहेत. काळ्या बाजारवाल्यांची बिंगे, राजकीय पुढाऱ्यांची ढोंगे, अन् समाजातील संभावित लफंगे ह्याची भंबेरी उडवण्यात बांदेकर जेवढे वाकबगार आहेत, तेवढेच समाजाच्या विराट रथचक्राखाली चिरडून रक्तबंबाळ झालेल्या दुर्दैवी जीवांची आक्रंदने, भेदक सूक्ष्मतेने प्रकट करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे. कामाठीपुऱ्याच्या तेराव्या गल्लीत राहणाऱ्या सुंद आणि उपसुंद

ह्या दोन ' दादां 'ची ' तिलोत्तमा ' नावाच्या एका केळीवालीवरून भयंकर मारामारी होते. असले विलक्षण दृश्य बांदेकरांवाचून कोण चितारणार ? ' हम पंछी दूसरे डाल के ' असे बोलणाऱ्या एका नायकिणीच्या घरच्या पोपटाचा हृदयद्रावक ' किस्सा ' बांदेकरांवाचून कोण ऐकवणार ? अन् रोजच्या रोज एका वेश्येच्या घरी जाऊन भीक मागणारा ' साधू ' तिने दिलेल्या पैशाच्या भांडवलावर गिऱ्हाईक म्हणून जेव्हा एका रात्री तिच्या घरात शिरतो तेव्हा जो चमत्कारिक पेचप्रसंग निर्माण होतो तो तरी बांदेकरांवाचून कोण रंगविणार ? अशी ही बांदेकरांच्या विनोदाची चित्रविचित्र सृष्टी आहे. अनुकरण आणि चर्वितचर्वण हे दोष बांदेकरांच्या लेखनात औषधालासुद्धा सापडावयाचे नाहीत. सतत पंचवीस वर्षे बांदेकरांनी लिहिले. पण त्यांचा प्रत्येक लेख दवबिंदूंनी डवरलेल्या प्रफुल्लित फुलासारखा टवटवीत वाटतो. रुक्ष आणि नीरस असे अक्षरही त्यांच्या लेखणीतून कधी बाहेर पडले नाही. सुभाषितांचा सुंदर आणि सुवासिक सडा सर्वत्र त्यांच्या वाङ्मयात विखुरलेला आहे. गद्य आणि पद्य भाषा हात जोडून त्यांच्यापुढे सदैव सिद्ध असे. वीस वर्षे आमच्या सहवासात असलेला असा अश्रूंचा आणि हास्याचा हा प्रतिभाशाली शाहीर गेल्या रविवारी एकाएकी आम्हांला आणि महाराष्ट्राला अशा आकस्मिक रीतीने सोडून जाईल असे स्वप्नात-सुद्धा आम्हांला कधी वाटले नाही. आमच्या साठाव्या वाढदिवशी त्यांनी आम्हाला ' आशीर्वाद ' दिला होता. ते त्या वेळी म्हणाले, " वयाने मी तुमच्या-पेक्षा लहान असलो, तरी प्रकृतीने मी तुमच्यापेक्षा ' म्हातारा ' आहे, म्हणून तुम्हांला आशीर्वाद देण्याचा मला अधिकार आहे. " आम्हाला ' आशीर्वाद ' देण्याची ती वडिलकी पुन्हा गाजवण्यासाठी त्यांनी एवढी घाई करावी ह्या विचाराने आमच्या हृदयाची कालवाकालव झाल्यावाचून राहात नाही. राम गणेश गडकरी आणि साने गुरुजी ह्या दोघांच्या मृत्यूने आम्हाला जे दुःख झाले, त्याची एकत्रित अनुभूती पुन्हा आज आम्हांस होत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ......................
क्रमांक ........................ नों. दि: ......................

## ६

# पुरुषोत्तम मंगेश लाड

पुरुषोत्तम मंगेश लाड ह्यांचे नाव सर्वसामान्य मराठी जनतेला जरी माहीत नसले तरी साऱ्या महाराष्ट्राने त्यांचा अभिमान बाळगावा असे त्यांचे सारे चारित्र्य आणि कर्तृत्व होते. अवघ्या बावन्नाव्या वर्षी त्यांना मरण आले. म्हणजे वयाने तसे ते तरुणच होते. पण त्यांच्या वयाच्या मानाने त्यांची बुद्धी आणि वृत्ती अत्यंत पक्व आणि प्रगल्भ होती. संस्कृत आणि मराठी भाषेच्या प्राचीन आणि अभिजात परंपरेवर त्यांची कल्पनाशक्ती पोसलेली होती. म्हणून त्यांचे भौतिक व्यवहार जरी आधुनिक जगात चाललेले होते तरी मनाने ते कालिदासाच्या आणि ज्ञानेश्वरांच्या सृष्टीतच वावरत होते. ऐन तारुण्यात विश्वविद्यालयीन परीक्षांमध्ये अलौकिक यश मिळविले, म्हणूनच आय्. सी. एस्. च्या सोनेरी पिंजऱ्यात त्यांना त्यांच्या आप्तांनी ढकलले. पण त्या पिंजऱ्यात त्यांचे मन-मात्र कधीच रमले नाही. कधी त्यामधून आपण बाहेर पडतो आहोत आणि स्वदेशाच्या सेवेला आपले जीवित अर्पण करीत आहोत ह्याचा त्यांना कित्येक वर्षांपासून ध्यास लागून राहिला होता. परकीय राज्यकर्त्यांची सेवा करीत असतानाही स्वदेशाच्या अभ्युदयासाठी ज्ञानोपासनेचे अग्निहोत्र ज्यांनी सतत आपल्या जीवनात प्रज्वलित ठेवले होते त्या न्या. रानडे आणि न्या. तेलंग ह्यांच्या तेजस्वी परंपरेमध्ये शोभण्यासारख्या दोनच महाराष्ट्रीय पुरुषांचा उल्लेख करता येण्यासारखा आहे. एक, श्री. चिंतामणराव देशमुख आणि दुसरे श्री. पुरुषोत्तम लाड. ह्या उभयतांनी सत्तेच्या संसर्गाने आपले जीवन आणि मन यत्किंचितही

कधी मलिन होऊ दिले नाही. एखाद्या उंच डोंगरपठारावरील निव्वळ शंख पाण्याच्या स्वच्छ टाक्याप्रमाणे त्यांनी आपले चारित्र्य आणि वृत्ती सदैव शुद्ध आणि अभिजातच राखली. इंग्लंडमध्ये आयू. सी. एस्. चा अभ्यास करीत असलेल्या तेवीस–चोवीस वर्षांच्या ह्या तरुण ' पुरुषोत्तमा 'च्या डोक्यात कोणते विचार चालत हे त्यांनीच एका काव्यात लिहून ठेवले आहेत.

" श्रीमंतीत मदांध चैन करिती,
ज्याच्या श्रमाने तया
मित्रा, कामकऱ्यास घास न सुका
खायास तोही मिळे
त्याचे रोदन आर्त मूक घुसते
कानी सदा माझिया
झुंझाया अफिणी चिनी उतरती
स्वातंत्र्य रंगी झणी,
काहींना अझुनी गुलामगिरीच्या
पंकीच लाभे सुख
त्यांचे दास्य मलाच का दुखविते
शल्यापरी सारखे ? "

जगात निढळाचा घाम गाळणाऱ्यांना सुका घासदेखील खायला मिळत नाही हा विचार त्यांना व्यथित करीत होता. चिनी लोक आपल्या स्वातंत्र्यासाठी लढावयास सिद्ध झाले असता भारतातले कित्येक लोक पारतंत्र्याच्या नरकात सुखाने जगत आहेत हे शल्य त्यांच्या हृदयामध्ये जास्त सलत होते. स्वातंत्र्य, समता आणि संस्कृती ह्या तीन मूल्यांची जन्मभर लाडांनी उपासना केली. इंग्रजांच्या राज्यात त्यांनी वरिष्ठांचे जसे कधी लांगूलचालन केले नाही, त्याप्रमाणे स्वराज्यात काँग्रेसश्रेष्ठींचीही त्यांनी कधी मनधरणी केली नाही. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रतिष्ठेला सेवाधर्माचा स्पर्शही त्यांनी कधी लागू दिला नाही. गोमंतकाचे स्वातंत्र्य आणि संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती ह्यांचा त्यांना निदिध्यास लागून राहिला होता. गोमंतकाच्या लढ्यात जे शेकडो स्त्री-पुरुष गेले त्यांपैकी अनेकांना लाडांनी प्रेरणा दिली ही गोष्ट पीटर अल्वारीस ह्यांनी त्यांच्या अन्त्य संस्काराच्या वेळी स्मशानात सांगून लाडांच्या ज्वलज्जहाल स्वातंत्र्यनिष्ठेवर प्रकाश टाकला. मुंबईत आणि महाराष्ट्रात काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर काँग्रेसश्रेष्ठींनी

मुंबईचा नि संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न एक गोलमेज परिषद बोलावून तावडतोब मिटवावा नाहीतर भारताला धोका आहे ही आपली अखेरची इच्छा त्यांनी स्पष्टपणे बोलून दाखविली. ' लोकसभे 'मध्ये आपला राजीनामा देताना श्री. चिंतामण देशमुख ह्यांनी पंडित नेहरूंच्या महाराष्ट्रद्वेष्ट्या धोरणावर जी ज्वल-जहाल टीका केली ती ऐकून आम्ही दोघे बरोबरच खाली उतरलो. त्या वेळी त्यांच्या मुद्रेवर जो आनंद आणि आवेश आम्ही पाहिला तो कधीही आम्ही विसरणार नाही. मराठी भाषेचा, साहित्याचा आणि संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान लाडांच्या जीवनातून ओसंडत असे. अशा महाराष्ट्राच्या थोर सुपुत्राला अवघ्या बावन्नाव्या वर्षी मरण यावे हे बघून विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या अकाल मरणाबद्दल न्यायमूर्ती रानडे जसे म्हणाले की, 'He had no business to die so soon !' ( इतक्या लौकर मरायचे त्यांना काय कारण होते ! ) तसेच आम्ही म्हणतो. आपल्याला मरण कसे यावे याची कल्पना त्यांनी एका कवितेत मांडलेली आहे—

" येई मला मृत्यू जरी—
येणार तो शंका नसे
येवो तरी तुजसारिखा
इच्छा गुलाबा, ही असे !
विश्वात त्या तुजसारिखा
पळ एक परिमळ नांदु दे !
आल्हादवो इतरा जनां
त्यांची मने आनंदु दे ! "

गुलाबाप्रमाणे आपोआप पाकळ्या गळून नकळत मरण यावे ही जरी त्यांची इच्छा पूर्ण झाली नसली, तरी त्यांच्या गुणांचा परिमळ एकच पळ काय, पण पुष्कळ काळपर्यंत आम्हांला आनंद देत राहील ह्यात काय शंका ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक .......................... नों: दि: ..................

७

# विनोद-चिंतामणि

महाराष्ट्रातले एक ज्येष्ठ साहित्यकार, प्रतिभाशाली विनोदपंडित आणि पाली भाषेचे पारंगत प्राध्यापक चिंतामण विनायक जोशी हे परवा दुपारी मुंबईमध्ये वयाच्या बहात्तराव्या वर्षी निधन पावले, ही वार्ता ऐकून त्यांच्या विनोदी वाङ्मयाचे हजारो मराठी वाचक हळहळल्यावाचून राहणार नाहीत. १९१२ साली आम्ही जेव्हा पुण्याच्या भावे स्कुलात इंग्रजी पाचव्या इयत्तेमध्ये शिकत होतो, त्या वेळी ते काही काळ आमचे शिक्षक होते. त्यांचे वडील विनायक रामचंद्र जोशी हेही १९१४ साली आम्हांला मॅट्रिकच्या वर्गामध्ये इंग्रजी शिकवीत असत. आगरकरांच्या सुप्रसिद्ध ‘ सुधारका ’चे विनायकराव हे काही काळ संपादन करीत असत. ह्या जोशींच्या घराण्याचे महापुरुष म्हणजे ‘ सार्वजनिक काका ’ जोशी — ज्यांनी अंगात खादी घालावयाला प्रथम भारतात प्रारंभ केला आणि ज्यांनी ब्रिटिश सरकारच्या रोषाला न जुमानता क्रांतिवीर वासुदेव बळवंतांचे वकीलपत्र स्वीकारले. चिंतामणराव जोशींचे चुलतबंधू रावसाहेब गणेश नारायण जोशी हे सासवडच्या आमच्या इंग्रजी शाळेचे हेड-मास्तर होते. नाटकाचे वेड त्यांनीच आम्हांला लावले. त्यांच्यामुळेच चिंतामण-रावांचा आणि आमचा प्रथम परिचय झाला. तथापि, त्या काळात चिंतामणराव हे विनोदी लेखक आहेत, हे आम्हांला माहीत नव्हते. पण फर्ग्युसन कॉलेजमधे गेल्यानंतर कॉलेजच्या त्रैमासिकाचे जेव्हा जुने अंक आम्ही चाळू लागलो, तेव्हा त्यांमधे आम्हांला चिंतामणरावांचे दोन-तीन विनोदी लेख वाचावयाला मिळाले.

ते वाचून आमची हसता हसता पुरेवाट झाली. विनोदी लेखनासाठी त्यांनी धारण केलेले ‘ चिमणराव ’ हे नाव त्यांना प्रा. वामनराव काळे ह्यांनी दिले असे आम्हांला आठवते. खेरीज, त्यांना विनोदी लेखनाची दीक्षा त्यांचे सख्खे मामा महाराष्ट्रातले सुप्रसिद्ध विनोदी लेखक कॅप्टन गोपाळ गंगाधर लिमये ह्यांनी दिलेली होती. मराठी साहित्यात विनोदाचे आद्यपीठ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांनी प्रथम स्थापन केले असे आम्ही मानतो. म्हणून त्यांना आम्ही विनोदाचे शंकराचार्य म्हणतो. त्यांच्या विनोदाला अफाट लोकप्रियता राम गणेश गडकरी ह्यांनी महाराष्ट्रात मिळवून दिली. कोल्हटकर-गडकऱ्यांनी महाराष्ट्राला पहिल्याने हसावयाला शिकविले. त्यांच्या त्या काळात त्यांच्यापेक्षाही अजिबात वेगळ्या धाटणीचा विनोद लिहून लोकप्रियता मिळवणे ही गोष्ट जवळ जवळ अशक्यच होती. पण तो अजब पराक्रम आमच्या चिंतामणरावांनी करून दाखविला. कोल्हटकर-गडकऱ्यांचा विनोद हा अधिक ‘ प्रकट ’ होता. त्यामुळे लोक ‘ खो खो ’ नि ‘ खदाखदा ’ हसत हे खरे. पण चिंतामणरावांच्या विनोदाची जातच वेगळी. त्यांचा विनोद वाचताना काळजाला आतल्या आत गुदगुल्या होतात आणि गालातल्या गालात खसखस पिकते. ज्याला इंग्रजीमधे ‘ Wit ’ ( कोटिबाजी ) म्हणतात ती मराठी साहित्यात कोल्हटकर-गडकऱ्यांनीच निर्माण केली. पण ज्याला Humour ( विनोद ) म्हणतात तो मात्र महाराष्ट्रात प्रथम चिंतामणरावांनीच आणला. जीवनातल्या म्हणा किंवा संसारातल्या म्हणा बारीकसारीक गोष्टींचे सूक्ष्म नि मार्मिक अवलोकन करून त्यातील अतिपरिचयाने अवज्ञित झालेल्या विसंगतीचे पापुद्रे अत्यंत हळुवार हातांनी सोलून वाचकांच्या जिव्हाराला हळूच चिमटा घ्यावयाचा नि त्याचबरोबर त्यांच्या गालावर चिमुकलीशी खळी ( का कळी ? ) फुलवायची ही जादू केवळ चिंतामणरावांच्याच लेखणीत होती.

महाराष्ट्रात ‘ ढोबळ ’ विनोद निर्माण करणारे आमच्यासारखे लेखक पुष्कळ आहेत. पण चिंतामणराव हे ‘ कोमळ ’ विनोदाचे फुलमाळी होते. त्यांनी लिहिलेल्या सर्व विनोदी ग्रंथांचा परिचय ह्या अग्रलेखाच्या एवढ्याशा अवकाशात करून देणे आम्हांला अशक्य आहे. आम्ही ‘ विनोदपंचक ’ नावाचे जे एक पुस्तक अर्धवट लिहिलेले आहे, ते पूर्ण झाल्यानंतर त्यात श्रीपाद कृष्ण, गडकरी, चिंतामणराव, दत्तू बांदेकर आणि पु. ल. देशपांडे ह्यांच्या विनोदाचे आम्ही विस्ताराने नि तपशिलाने विश्लेषण अन् परीक्षण करणार आहोत. म्हणून त्या पुस्तकाच्या ग्राहकांची संख्या कमी करून आमच्या प्रकाशकाला अडचणीत

टाकण्याची आमची इच्छा नाही. वानगीदाखल चिंतामणरावांची एकच विनोदी गोष्ट सांगून—जी आम्ही आमच्या व्याख्यानात नेहमीच सांगतो—ही श्रद्धांजली आम्ही संपवितो. ती गोष्ट अशी—" मुंबईच्या एका इस्पितळात एक बाहेरगावचा रोगी मेला. त्याचे दोन गावकरी त्याच्या समाचारासाठी तिथे आलेले होते. रोगी गेल्यानंतर त्याची शेवटची व्यवस्था करण्याचे काम साहजिकच त्यांच्याकडेच आले. त्याप्रमाणे त्यांनी 'त्या'चा पास काढला. बांबू, कडबा, फडके, मडके, सुतळी इत्यादी अंत्यसंस्काराची सर्व सामग्री त्यांनी खरेदी केली. एवढ्यात त्यांना भूक लागली. त्यांचा एक नातेवाईक गिरगावात आंग्र्यांच्या वाडीतल्या चाळी-मधे तिसऱ्या मजल्यावर राहात होता. त्याच्याकडे जाऊन फराळ करावा नि मग मयताची व्यवस्था करावी असा विचार करून ते दोघेजण ते सर्व सामान घेऊन आंग्र्यांच्या चाळीत गेले, आणि खोलीच्या बाहेर ते सामान व्यवस्थितपणे ठेवून आत शिरले. आपले गावकरी अचानक आपल्याकडे आले म्हणून त्या खोलीकर माणसाला फार आनंद झाला. त्याने बायकोला चहा नि शिरा करावयाला सांगितला नि ते गप्पा मारीत बसले. पण बाहेर ठेवलेल्या त्या सामानाने साऱ्या चाळीत भयंकर धुमाकूळ उडवला. सारे चाळकरी हादरून गेले. त्या खोलीत मेले कोण ? तिथे कोणी आजारी असल्याचे कोणाला माहीत नाही, डॉक्टर वैद्य कोणी कधी आला नाही, आत कोणी रडत नाही. मग हे सामान त्या ठिकाणी कसे आले ? ह्याचा ज्याला त्याला अचंबा वाटून राहिला. एकेक माणूस खोली-वरून दबकत दबकत जाऊ लागला. जाता जाता खोलीत डोकवायचा, पुढे जायचा नि फिरून मागे वळावयाचा. 'अरेच्या, आत तर काहीच दिसत नाही, आणि वर 'स्टोव्ह'चा आवाजही येतो आहे ! ही आहे काय भानगड ?' काही वेळाने दारावरून येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची धिटाई थोडीशी वाढली. मग कोणी तरी दारापुढे थांबून हलक्या आवाजात विचारले, 'को—ण ?' खोलीकराने सांगितले, 'कोणी नाही—पाहुणे !' मग बाहेरून जाणारा माणूस हळहळून चुकचुकायचा, 'अरेरे—पाहुणे काय ?' असा प्रकार बराच वेळ चालला. त्यानंतर विचारपूस करणारी माणसे आणखी धीट झाली. श्वास रोखून त्यांनी प्रश्न टाकला, 'क-क-क-धी ?' खोलीकरानं सांगितलं, 'आत्ताच !' विचारणारी माणसे पुन्हा हळहळली, 'अरेरे—बिचारा !' ही प्रश्नोत्तरावलीची साखळी जशी एक सारखी लांबू लागली, तसा तो खोलीकर अचंब्यात पडला. त्याला कळेना की आपले दोन गाववाले पाहुणे एवढे जगप्रख्यात केव्हापासून झाले की ज्यांचे



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................

' कुशल ' विचारण्यासाठी सारे चाळकरी आपल्या दाराशी जमा होऊ लागले! म्हणून तो बाहेर आला. पाहतो तो दाराच्या भिंतीशी बांबू, कडब्रा, फडके, मडके अन् सुतळी!" ही चिंतामणरावांची गोष्ट आम्ही ज्या पद्धतीने नि अभिनयाने आमच्या श्रोत्यांना सांगतो, त्या रीतीने कोणाही वक्त्याने कोठल्याही सभेत सांगून पाहावे, म्हणजे केवढा हशा पिकतो ह्याचा त्यांना प्रत्यय येईल. चिंतामणरावांच्या विनोदाबद्दल जेवढे लिहावे तेवढे थोडेच. लेखणीचे ते एवढे बरकंदाज. पण वाणीचे मात्र दुबळे. त्यांना बोलता मुळीच येत नसे. म्हणून त्यांच्या व्याख्यानाला अतीव उत्सुकतेने जमलेले श्रोते दुर्मुखलेल्या चेहऱ्यांनी परत जात असत. पुणे सोडल्यानंतर ते बडोद्याला गेले. श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज ह्यांनी त्यांचे गुण ओळखून त्यांना आपल्या पदरी ठेवले. त्या संस्थानात ते राजदप्तरदार होते. तेथून निवृत्त झाल्यानंतर ते पुण्याला स्वतःचा बंगला बांधून स्थायिक झाले. आमच्याबद्दल त्यांचे बरे मत असावे असे वाटते. पण काही कारणामुळे मध्यंतरी त्यांचा आमच्याविषयी गैरसमज झालेला होता. तो दूर करण्याचा आम्ही कधीच प्रयत्न केला नाही. कारण उभ्या आयुष्यात त्यांच्याबद्दल अनादराची भाषा आम्ही व्यक्तिशः कधीच उच्चारली नाही. एकदा त्यांनी बडोद्याच्या एका पत्रातून आम्हांला शिव्या घातल्या, म्हणून आम्ही त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर दिले एवढेच. बाकी काही नाही. त्यांच्या मरणाने महाराष्ट्रातला एक जिव्हाळ्याचा विनोदी लेखक नाहीसा झालेला आहे. स्वभावाने ते अत्यंत भिडस्त नि लाजरे होते. प्रसिद्धीचा तर त्यांना मुळीच हव्यास नव्हता. त्यामुळे बहुजनांत त्यांना मिळावी तेवढी प्रसिद्धी मिळाली नाही. पण निदान महाराष्ट्रातल्या साक्षर विद्वानांनी तरी त्यांच्या गुणांची बूज राखून ' महाराष्ट्र साहित्य संमेलना 'च्या अध्यक्षपदी त्यांची निवड करावयाला हवी होती. पण ते कर्तव्य त्यांनी बजावले नाही, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. पण आता त्याबद्दल बोलून काय उपयोग? आमच्या मुंबई नगरीत ह्या ' विनोद-चिंतामणी 'चे देहावसान व्हावे आणि त्यांच्या शेवटच्या सेवेला आम्हाला कोणी बोलावू नये, ह्याचे सर्वांत आम्हांला दुःख होते. अहो, आमच्या घरापासून अवध्या फर्लांगाच्या अंतरावर त्यांचे दहन झाले. त्या वेळी तेथे अवघी वीस का पंचवीस माणसे हजर होती असे म्हणतात. त्या प्रसंगी कोणा तरी दोघा रुक्ष नि विनोदशून्य माणसांनी भाषणे करावीत, ही चिंतामणरावांच्या आयुष्याची सर्वांत मोठी शोककथा होय. रात्री साडेबारा वाजता आम्ही स्मशानात हार घेऊन गेलो. तेथे

चिंतामणरावांचा देह चितेवर एकटाच शांतपणे जळत होता. ज्वाळा अशा काही दिमाखाने भडकत होत्या म्हणता! आजूबाजूला कोणीही नव्हते. आणि पलीकडच्या धर्मशाळेच्या पायरीवर बसून आम्ही एकटेच रडत होतो?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................. दि: ..................
क्रमांक .................. नों: दि: ..................

८

## ' कोश 'कार कर्वे

नऊ ऑक्टोबर रोजी खंडाळा येथे आमच्या बंगल्यावर महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार ह्यांच्या सत्तरीच्या सत्कारार्थ आम्ही काही मित्रमंडळी जमलो होतो. सबंध दिवस आम्ही काव्यविनोदाच्या आणि परस्पर सहवासाच्या सुवासिक आनंदात एखाद्या स्वप्नाप्रमाणे घालविला. तेच आमचे आणि महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कोशकार चिंतोपंत कर्वे ह्यांचे शेवटचे दर्शन. त्या वेळी त्यांची प्रकृती अतिशय उतरलेली दिसली. आमच्या त्या लहानशा मेळाव्यात सर्वांत कमी बोलले ते. मग मला समजले कीं, त्यांचा एक मुलगा कुठल्याशा विमान कंपनीचा पायलट होता, तो काही दिवसांपूर्वी इराणातील बेहेरीनच्या सामुद्रधुनीवर सुखरूपपणे उड्डाण करून विमानतळानजदीक आला असता काही गूढ घटना घडून तो आणि त्याचे विमान बेपत्ता झाले. विमानाला अपघात तर झाला नाही, आणि विमान तर नाहीसे झाले. जो जो दिवस जाऊ लागले आणि आपल्या पुत्राची काहीच वार्ता कळेनाशी झाली, तसा तसा चिंतोपंतांचा धीर खचू लागला. अंतर्यामी त्यांनी हायच खाल्ली. ती गोष्ट खंडाळ्याला आमच्या लक्षात आली. पण त्याबद्दल त्यांच्याशी बोलण्याचे धैर्य काही आम्हा कोणाला झाले नाही. तथापि, त्यांचा हा मानसिक रोग इतका विकोपास जाऊन त्याचे पर्यवसान दि. १६ डिसेंबर रोजी त्यांच्या आकस्मिक मृत्यूमध्ये होईल अशी आमची कल्पना नव्हती. चिंतोपंतांचा आणि आमचा नाही नाही म्हणता चाळीस वर्षांचा स्नेह होता. तो अशा अनपेक्षित आणि

शोचनीय रीतीने समाप्त होईल असे आम्हाला स्वप्नातही वाटले नाही. महाराष्ट्र विधानसभेचे नागपूर येथील अधिवेशन समाप्त होऊन आम्ही मुंबईला यायला निघालो होतो. तोच कोशकार कर्व्यांच्या निधनाची भयंकर वार्ता आम्हांला कळली. तेव्हापासून आतापर्यंत आमच्या डोळ्यांसमोर, पुत्रहानीच्या व्यथेचे कढ मनातल्या मनात जिरवताना व्याकुळ नि जर्जर झालेली त्यांची मूर्ती पुन्हा पुन्हा येते. ती करुण मूर्ती आम्ही खंडाळ्याला पाहिली होती. तेव्हा खरे पाहता त्यांच्या मनाने या जगाचा अगोदरच निरोप घेतला होता. या देहाने त्यानंतर त्यांचा जीव या जगात जखडून ठेवला होता, तो देहही आता जग सोडून गेला आहे. त्यांच्यासारख्या एवढ्या विद्वान, व्यासंगी, निःस्वार्थी नि सालस माणसाला अशा रीतीने पुत्रशोकाने तळमळत प्राण सोडण्याची शिक्षा देण्यामध्ये परमेश्वराने कोणता दैवी न्याय साधला हेच आम्हांला कळेनासे झाले आहे.

कोशकारांच्या निधनामुळे आम्हांला झालेल्या दुःखात आणखी एका कारणाने भर पडली आहे. ते कारण हे की, महाराष्ट्रासाठी ज्ञानदानाच्या क्षेत्रात त्यांनी वर्षानुवर्षे, अविश्रांतपणे नि तळमळीने जे विद्वत्तापूर्ण कर्तृत्व गाजवले, त्याचा त्यांच्या जिवंतपणी तर योग्य नि यथार्थ गौरव झाला नाहीच, पण त्यांच्या निधनामुळे झालेल्या हानीबद्दल देखील मनापासून हळहळणारी मोजकीच माणसे या महाराष्ट्रात असतील. पण काही माणसेच अशी असतात की, त्यांचे कार्य पर्वताएवढे प्रचंड असले तरी त्या पर्वतावरून कीर्तीच्या शिखरावर चढून सगळ्यांच्या नजरेत भरण्याची अहंकारी इच्छाच त्यांना नसते. निसर्गामध्ये एखादे टीचभर गवताचे पातेदेखील तुरा काढून फालतू दिमाखाने मिरवीत असते. त्याप्रमाणे उगाच आढ्यतेने मिरवणारे क्षुद्र लोक दुनियेत थोडेथोडके नसतात. पण त्या गवताच्या पात्याचे, एवढेच नव्हे तर प्रचंड वृक्षांचे देखील पोषण करणाऱ्या अद्‌भुत शक्ती मात्र मातीखाली दडूनच आपले कर्तव्य करीत असतात. तशाच प्रकृतीच्या काही थोर व्यक्तीही जगात असतात. महाराष्ट्र तर अशा थोर व्यक्तींची एक कधी न संपणारी खाणच आहे. 'कोश'कार कर्वे अशाच व्यक्तींपैकी एक होते. ज्ञानगंगेची कावड खांद्यावर वाहणे हाच त्यांचा जीवनातील एकमात्र हव्यास होता. याच हव्यासामुळे ते 'ज्ञानकोश'कार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या साहाय्यक मंडळीमध्ये सामील झाले. केतकरांची बुद्धी अचाट, विद्वत्ता अमाप आणि व्यासंग नि परिश्रम करण्याचे सामर्थ्य अफाट. त्यांचे साहाय्यक म्हणून कार्य करतानादेखील सामान्य बुद्धीच्या माणसाची

दमछाकच व्हायचा संभव जास्त. पण श्री. य. रा. दाते आणि श्री. चिंतोपंत कर्वे हे दोघे तरुण सहकारीमात्र अखेरपर्यंत त्यांच्याबरोबर मजल मारीत राहिले.

या ज्ञानकोशाचे एकंदर तेवीस खंड आहेत. आणि त्या खंडात केवळ जगातील वेगवेगळ्या विषयांतील जंत्री नसून, त्या विषयांचे विद्वत्तापूर्ण विश्लेषण आहे, हे लक्षात घेतले म्हणजे त्या कार्याच्या प्रचंड नि बिकट स्वरूपाची कल्पना येईल. या कार्याला हात घालणे हा काही फावल्या वेळचा उद्योग नव्हे. ती एक खडतर तपश्चर्याच होती. कर्वे हे कुटुंबवत्सल होते. उपजीवकेचा प्रश्न न उद्‌भवण्यासारखी समृद्ध सांपत्तिक स्थिती त्यांची नव्हती. पण त्यांची ज्ञानदेवतेवरील भक्ती एवढी मोठी होती, की संसारात अनेक अडचणी सोसाव्या लागत असतानाही त्यांनी केतकरांच्या खडतर महत्कार्यात त्यांना साहाय्य करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले. केतकरांसारख्या ज्ञानमहर्षींच्या हाताखाली आचरलेल्या या व्रतामुळे खुद्द दाते व कर्वे यांना कोशविद्येची सिद्धी प्राप्त झाली, आणि केतकरांनी सुरू केलेल्या ज्ञानयज्ञाची परंपरा पुढे चालवणे हेच आपल्या जीवनाचे सार्थक होय, असे त्यांनी ठरविले. दाते आणि कर्वे या द्वयीने, केतकरांकडून मिळालेल्या शिकवणीच्या आधारे, पण स्वतःच्या परिश्रमाने महाराष्ट्र शब्दकोश रचण्याचे महत्कार्य पूर्ण केले, त्या पाठोपाठ या जोडीने मराठी वाक्संप्रदाय कोश पुरा केला. या तीन कोशांच्या रचनेसाठी दाते आणि कर्वे यांनी आयुष्याची पंचवीस वर्षे खर्ची घातली, एवढे सांगितले तरी त्यांच्या एकनिष्ठ परिश्रमाची कल्पना येईल. एवढे कार्य करून कर्व्यांनी विश्रांती घेतली असती तरी महाराष्ट्रातील महापंडितांमध्ये त्यांची गणना करावी लागली असती. पण कर्वे यांना विश्रांती घ्यायला सांगणे म्हणजे महासागरात आपले उदक समर्पित करण्यासाठी सतत वाहणाऱ्या एखाद्या नदीला विश्रांती घ्यायला सांगण्यासारखेच होते. वरील तीन कोशांच्या रचनेत सहभागी झालेल्या कर्व्यांनी ‘ सुलभ विश्वकोश ’ लिहिण्याचा संकल्प केला आणि श्री. य. गो. जोशी यांनी त्याच्या प्रकाशनाची जबाबदारी घेऊन कर्व्यांच्या या धाडसाला साथ दिली. केतकरांचा ‘ ज्ञानकोश ’ एवढा अवाढव्य आहे की, सामान्य माणसाला त्याचा संपूर्ण अभ्यास करणे कठीण. म्हणून कर्वे यांनी अधिक संक्षिप्त स्वरूपाचा ‘ सुलभ विश्वकोश ’ उपलब्ध करून दिला. त्यानंतर कर्वे-जोशी या जोडीने मराठी जनतेला आपल्या मराठी मायभूमीचे ज्ञान मिळवणे सुलभ व्हावे म्हणून अनेक तज्ज्ञ लेखकांकडून लेख लिहवून घेतले आणि ‘ महाराष्ट्र-परिचय ’ हा ग्रंथ

संपादित नि प्रकाशित केला. त्यापाठोमाठ या दोघांनी कै. वा. शि. आपटे यांचा ‘ संस्कृत-इंग्रजी कोश ’ हा दुर्मिळ ग्रंथ पुनर्मुद्रित करण्याचे काम हाती घेतले. पण एकदा कार्य हाती घेतल्यावर मात्र त्याची केवळ पुनर्मुद्रणाची मर्यादा कर्व्यांच्या पल्लेदार प्रज्ञेला अपुरी वाटू लागली, आणि त्यांनी डॉ. परशुरामपंत गोडे या प्राच्य विद्याविशारद विद्वानाला जोडीला घेऊन मूळच्या आपटे कोशात भर घातली आणि त्याची तीन खंडांची नवी आवृत्ती तयार केली. कर्वे यांच्या या प्रचंड नि अखंड कार्याने मराठी भाषेची नि संस्कृतीची एवढी अमोल सेवा बजावली आहे की, त्याबद्दल केवळ आज हयात असलेल्या प्रत्येक महाराष्ट्रीयालाच नव्हे, तर महाराष्ट्राच्या भावी पिढ्यान्‌पिढ्यांना कर्व्यांबद्दल कृतज्ञता वाटली पाहिजे. अशा या तपस्वी वृत्तीच्या ज्ञानयोगी महापंडिताला महाराष्ट्र आता मुकला आहे. आम्ही तर एका थोर मित्राला मुकलो आहोत. आमच्यासारख्या पामरांनी त्यांच्या महत्कार्याचे मूल्यमापन काय करावे, म्हणून महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी एक लेख लिहून श्री. कर्वे यांना जी श्रद्धांजली अर्पण केली आहे, तिच्यामधलाच एक उतारा देऊन कोशकार कर्व्यांच्या स्मृतीला आम्ही वंदन करतो. महामहोपाध्याय म्हणतात, “ कर्वे फारसे बोलत नसत; पण बोलत तेव्हा थोडेच, पण मुद्द्याचे बोलत. ते स्वभावाने शांत होते. निगर्वी होते. कळकळीचे कार्यकर्ते होते. त्यांना कामाचा उरक फार असे. ज्याच्यावर विसंबून विश्वासाने राहावे, असा त्यांच्यासारखा सहकारी आता कोठे शोधावा ? त्यांची जागा रिकामीच राहणार ? आमच्या आयुष्यात ती काही भरून निघणार नाही ! आणि त्यांची आठवण कधीही बुजणार नाही. त्यांचा मित्रपरिवार मोठा आहे, अन् तोही महाराष्ट्रभर पसरलेला आहे. आपल्या कोशाच्या रूपाने कर्वे महाराष्ट्रात सर्वत्र दिसत राहतील आणि त्यांच्या मृत्यूमुळे लागलेला चटका मनाला सतत दुःखी करीत राहील. ”

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. दि: ..................
क्रमांक .................. बाईं दि: ..................

१

# ' नाना ' गेले !

अखेर आमचे नाना गेले! चाळीस वर्षांच्या स्नेहाचा अगदी मणकाच तुटला. काळजाचा जणू पापुद्राच फाटला. ममतेचा नि विश्वासाचा ताटवा कोसळला. मन मोकळे करून बोलण्याचा नि हसण्याचा विसावा नाहीसा झाला. जिवाला आल्हाद नि संतोष देणारा सुवासिक गारवा निघून गेला. सुखदुःखाच्या देववेवीचा अनेक वर्षे साचवून ठेवलेला मौल्यवान ठेवाच हरपला. मनाचा असा ममताळू, हाडाचा कनवाळू नि भावनेचा श्रद्धाळू माणूस सहसा क्वचितच आढळतो. पाच नाही, दहा नाही, चांगली चाळीस वर्षांची आमची मैत्री होती. पण कालपरवापर्यंत चैत्राची पालवी फुटल्यासारखी ती अगदी ताजीतवानी आणि टवटवीत राहिली होती. तसे पाहिले तर कोणत्याही गोष्टीत त्यांच्या नि माझ्यामध्ये सारखेपणा नव्हता. न आहारात, न विहारात; न आचारात, न विचारात; न पोषाखात, न स्वभावात. पण असे असूनही आमचा स्नेह एवढा दाट की लोकांना अचंबा वाटावयाचा. ते म्हणायचे, हे कसं? कधी आमचा वाद नाही, भांडण नाही, गैरसमज नाही. कधी देणे नाही की घेणे नाही. एक-मेकापासून कधी कशाची अपेक्षा केली नाही. मनात कधी काही लपवले नाही. इतकी निर्मळ, निःशंक आणि निर्हेतुक मैत्री होती आमची. विलक्षण ओढ वाटे आम्हाला एकमेकाबद्दल. मुंबई शहरात पंचवीस वर्षे माझे वास्तव्य आहे. फार दूर राहात नव्हतो आम्ही एकमेकापासून. पण ह्या काळात आम्ही बाहेर-गावी गेलो नसलो, तर असा एक दिवसही जात नव्हता, की ज्या दिवशी

आम्ही एकमेकांना भेटलो नाही, किंवा एकमेकांशी बोललो नाही. कित्येकदा तर दिवसातून दोनदोनदा भेटायचे—सकाळी अन् संध्याकाळी. 'आहात का हो ?' अशी भावनेने ओथंबलेली रुद्ध स्वराची त्यांची हाक रस्त्यावरून आली की समजावे की नाना आलेत म्हणून. मग हळूहळू पावलं टाकीत हसतमुखाने ते थोड्या वेळाने वर यायचे, आणि आल्याबरोबर काही वेळ आम्ही एकमेकांकडे बघून उगाच हसावयाचे. इतके की हसत हसता त्यांच्या डोळ्यांतून पुष्कळदा पाणी वाहायला लागायचं. एवढे मंगलाचरण झाले म्हणजे मग आमच्या गप्पागोष्टींना प्रारंभ व्हायचा. बोलण्याला विषयांची कधीच वाण नसे. पाणिनीपासून तो प्रा. फडक्यांपर्यंत आणि इतिहासाचार्य राजवाड्यांपासून तो दामुअण्णा मालवणकरांपर्यंत तास न् तास आमच्या गप्पा चालायच्या. वेळेचं आम्हाला भानच राहात नसे. पुण्याला म्हणा, खंडाळ्याला म्हणा, किंवा आगगाडीतून अथवा मोटारीतून प्रवास करताना दिवसचे दिवस अन् रात्रीच्या रात्री आम्ही बोलून काढल्या आहेत. एकमेकांच्या सहवासाचा अन् एकमेकांशी बोलण्याचा कंटाळा म्हणून कधी आला नाही. त्यात जर का आमच्या बैठकीमध्ये दत्तोपंत पोतदार, माधवराव अळतेकर, मामा हुदलीकर, प्रा. अनंत काणेकर किंवा डॉ. लवंदे ह्यांच्यापैकी कोणाही मंडळींची भर पडली म्हणजे मग आमच्या गप्पागोष्टींना नि वादविवादाला असा काही बहर यायचा की काही विचारू नका. बोलण्याच्या भरात माणूस अनवधानाने एखाद्याबद्दल वाटेल ते बोलून जातो अन् मागून मग पस्तावतो. पण नानांच्या स्वभावाची गंमत ही, की असा गाफीलपणा त्यांच्या हातून चुकूनही कधी होत नसे. विषय कितीही सामान्य असो, नाही तर गंभीर असो. नाना नेहमी आवेशाने बोलत असत. पण त्या आवेशाच्या भरात कधीही कोणाबद्दल ते तोडून बोलत नसत किंवा कधी कोणाच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत नसत. त्याचा असा अर्थ नसे, की ते कधी कोणावर रागावत नसत. रागावले म्हणजे तसे फार रागवायचे, पण त्या रागावण्यातही कारुण्याचा हृदयस्पर्शी ओलावा असे. त्यामुळे त्यांच्या रागावण्याने ऐकणाराचे उलट मनोरंजनच व्हावयाचे. जगात त्यांना वाईट असे काहीच दिसत नसे. प्रत्येक व्यक्तीत वा वस्तूत त्यांना काहीतरी चांगुलपणाच आढळे. प्रा. फडके आणि मामा वरेकर ह्यांच्याशी माझे ह्या ना त्या गोष्टीवरून वर्षानुवर्षे भांडण चाललेले होते. नाना माझे एवढे मित्र. पण त्यांनी ह्या आमच्या वादात कोणाचीच बाजू कधी घेतली नाही. माझ्याबद्दल नाना जितके चांगले

बोलत, तितकेच ते फडके आणि वरेरकरांबद्दल चांगले बोलल्यावाचून राहात नसत. समकालीन साहित्यिकांबद्दल इतक्या गौरवाने आणि जिव्हाळ्याने बोलणारा त्यांच्यासारखा निर्मत्सरी अंतःकरणाचा विद्वान सध्याच्या काळी तरी अपवादभूतच समजला पाहिजे. सर्वांबद्दल चांगले बोलण्याच्या नि कोणाबद्दल वाईट न बोलण्याच्या त्यांच्या ह्या हव्यासामुळे पुष्कळदा मौजेचा विनोद निर्माण होत असे. आपल्या लहानपणीच्या आठवणी एकदा व्याख्यानात सांगत असताना ते म्हणाले, ' अहो, माझ्या मामाने त्या वेळी मला मदत केली नसती, तर आज मी मराठी शाळेतला कुठे तरी मास्तर झालो असतो मास्तर ! ' त्यानंतर ते एकदम थांबून व्याकुळ स्वरात म्हणाले, ' बाकी मराठी शाळेतला मास्तर म्हणजे काही वाईट नाही बरे—तसा तो फार चांगला ! ' त्यावर खूपच हशा पिकला नि त्याचे कारण न समजल्यामुळे नाना एकदम गोंधळल्यासारखे झाले. एकदा वर्गात शिकविताना ते म्हणाले, ' महाराष्ट्रात दादोबा पांडुरंगासारखा वैय्याकरणी झाला नाही बरे—फार मोठा माणूस ! ' त्यानंतर नेहमीप्रमाणे थांबून ते म्हणाले, ' बाकी, त्यांनी लिहिलेले ते व्याकरणाचे पुस्तक आपले अगदीच साधारण ! ' आधी एक अघळपघळ विधान करावयाचे आणि मागून त्याला छेद द्यावयाचा, या त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीला मी ' नानाछाप विनोद ' असे नाव दिले होते. ही त्यांची विशिष्ट लकब केवळ त्यांच्या उपजत चांगुलपणातून निर्माण झाली होती. संयुक्त महाराष्ट्राचा आमचा लढा ऐन निकाराला आला असताना ते मला नेहमी म्हणावयाचे की, " संयुक्त महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण मुख्य मंत्री, भाऊसाहेब हिरे हे महसूलमंत्री, नानासाहेब गोरे गृहमंत्री, एसेम मजूरमंत्री आणि तुम्ही शिक्षणमंत्री हे दृश्य माझ्या डोळ्यांना दिसते आहे. " त्यावर मी पोट धरधरून हसायचा नि म्हणायचे की, " नाना, राजकारण तुम्हांला समजत नाही. काँग्रेसवाले अन् आम्ही जन्मात कधी एकत्र येणार नाही ! " त्यावर ते म्हणत, " तुमचे राजकारण काय वाटेल असो. पण तुम्ही पुन्हा सर्व एक व्हावयाला पाहिजेत एवढे आम्हांला मनापासून वाटते. " चोवीस साली सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजात बी. टी.साठी आम्ही एकत्र आलो. त्यापूर्वी मी त्यांना पाहिलेदेखील नव्हते. पण पहिल्या दिवसापासून त्यांचे नि माझे जे गोत्र जमले ते अगदी परवापर्यंत. जसा काही पूर्वजन्मीचा त्यांचा नि माझा ऋणानुबंधच होता. ह्या चाळीस वर्षांत माझ्या आयुष्यात जे जे सुखदुःखाचे प्रसंग घडले आणि जे जे चढउतार झाले,

त्या त्या प्रत्येक वेळी डोंगरासारखे नाना माझ्या शेजारी किंवा माझ्या मागे उभे राहिले. माझ्या आनंदात ते हसले. माझ्या दुःखात ते रडले. माझ्या वैभवात त्यांनी माझी पाठ थोपटली. माझ्या संकटात त्यांनी माझ्या पाठीवर हात ठेवला. त्यांच्या कोणत्या गोष्टी किती म्हणून आठवाव्यात अन् किती सांगाव्यात ? ह्या गेल्या चाळीस वर्षांत माझ्या आयुष्यात अनेक मित्र आले नि गेले. कित्येक मित्रांचे शत्रू झाले. पण नानांनी शेवटपर्यंत माझी सोबत केली. कधी मला अंतर दिले नाही, की कधी मैत्रीचे इमान सोडले नाही. फार अवघड गोष्ट आहे ही ! वास्तविक मी कविता-नाटके लिहिणारा एक विनोदी लेखक. नाना महान वैय्याकरणी आणि विद्वान संशोधक. त्यांच्या नि माझ्या व्यासंगात नि व्यवसायात केवढा फरक ! त्यांची विद्वत्ता आणि ग्रंथ पाहून तर माझ्या छातीत धडकीच भरे. बत्तीस साली कोल्हापूरच्या साहित्यसंमेलनात व्याकरणासारख्या विषयावर हजारो लोकांपुढे वाघासारखे व्याख्यान देऊन त्यांनी सभा जिंकली. तो त्यांचा चमत्कार पाहून तर आम्ही हादरून गेलो. व्युत्पत्ती, भाषाशास्त्र आणि इतिहास ह्या क्षेत्रामधले तर ते ऐरावत होते, पण एवढे असून त्यांना लवमात्र गर्व नसे. त्यांच्याइतका नम्र, विनीत आणि निगर्वी माणूस विद्वानांत तर विरळाच. शिवाय, त्यांच्या विद्वत्तेमध्ये भावनेचा जिव्हाळा असल्याने त्यांच्या शास्त्रीय बोलण्याच्या नि लिहिण्याच्या शैलीतसुद्धा ललित वाङ्मयाचा सुबोध गोडवा निर्माण झाला होता. भावनेचे आणि भाषेचे लालित्य हा त्यांच्या नि माझ्या प्रेमाचा सर्वांत मोठा दुवा होता. नाना हे स्वभावाने कितीही प्रेमळ आणि आनंदी असले तरी त्यांच्या अंतःकरणाच्या खोल कपारीआड कारुण्याचे फार मोठे टाके भरलेले होते. म्हणून जगातले दुःख पाहून त्यांच्या डोळ्यांना टचकन पाणी येई. माझी विनोदी नाटके त्यांना अतिशय आवडत आणि त्यातील हास्यरसाचा ते मनमुराद आस्वाद घेत. हे खरे असले तरी माझ्या गंभीर नाटकातल्या करुणरसाचे त्यांना अधिक आकर्षण होते. 'घराबाहेर' मधील निर्मला, 'उद्याच्या संसरा' तील शैला नि करुणा अन् 'जग काय म्हणेल' मधील उल्का ह्यांच्याबद्दल बोलताना त्यांचा कंठ सद्गदित होत असे; आणि सतरा वर्षांपूर्वी करुणेने ऐकलेल्या हुंदक्यांची आठवण झाली की त्यांना अक्षरशः हुंदका येई. कारुण्य हाच त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होऊन बसला होता. कारण तरुण वयात त्यांच्या प्रिय पत्नीचे झालेले अकालिक निधन. बत्तीस वर्षांपूर्वी त्यांची पत्नी वारली. त्यानंतर त्यांनी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम
अनुक्रम ७७०५९ दि: ११९/१४
...

पुन्हा लग्न न करता आपल्या सहा अपत्यांचे मातेच्या ममतेने संगोपन केले. किंबहुना आपल्या मुलांवर त्यांची एवढी माया होती, म्हणूनच स्वतःच्या सुखाचा विचार करायला त्यांना सवडच मिळाली नाही. वात्सल्यामुळे त्यांचा स्वभाव कमालीचा हळवा झाला होता. एकदा त्यांचा धाकटा मुलगा मॅट्रिकच्या परीक्षेत नापास झाला. त्यामुळे तो घाबरला नि मुंबईहून पळून गेला. नाना ताबडतोब त्याच्या शोधाला गेले आणि त्याची समजूत घालून ते त्याला परत मुंबईला घेऊन आले. घरी येईपर्यंत एका अक्षराने त्यांनी त्याला दुखविले नाही. पण घरी येताच त्यांच्या संतापाला पारावार राहिला नाही. आपल्या घरात ज्ञानाची पाणपोई वहात असताना आपल्या मुलाने नापास व्हावे ही कल्पनाच मुळी त्यांना असह्य होती. रागाच्या भरात त्यांनी आपल्या मुलाला सडकून बडवले. पण त्याला मारता मारता ते स्वतःच रडू लागले नि मुलाला जवळ घेऊ रडत रडत म्हणाले, " तुझी आई असती तर तुझ्या अंगाला तिनं मला हात तरी लावून दिला असता का ? " त्यांच्या दुसऱ्या एका मुलाचे ते लग्न ठरवीत होते. पण, ती गोष्ट त्याला पसंत नव्हती. तेव्हा त्याने नानांच्या उशाखाली एक चिठ्ठी लिहून ठेवली की, " तुम्ही माझ्या भानगडीत पडू नये. " दुसरे दिवशी नानांनी ती चिठ्ठी वाचली. तेव्हा त्यांचा कंठ भरून आला. त्या मुलाला जवळ बोलावून ते सद्गदित स्वराने म्हणाले, " अरे, तुझ्या भानगडीत मी पडू नये म्हणतोस, तर कोणाच्या भानगडीत आम्ही पडावं ? तुझ्याखेरीज आम्हांला तरी कोण आहे भानगडीत पडावयाला ? " बोलता बोलता नानांच्या डोळ्यांतून अश्रू वहायला लागले. मुलगा तरी त्यावर काय बोलणार ? पित्याच्या वात्सल्यात तो विरघळून गेला. माझे ' पाणिग्रहण ' नाटक मी नानांना अर्पण केले होते. अर्पण-पत्रिकेत मी लिहिले होते, " माझे विद्वान, व्यासंगी आणि मायाळू मित्र प्रा. कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी ह्यांना अर्पण. " ती ' अर्पण-पत्रिका ' वाचून नानांचे डोळे भरून आले. ते मला म्हणाले, " मला तुम्ही विद्वान म्हटलंत–ठीक आहे. व्यासंगी म्हटलंत–समजले. पण ' मायाळू ' हे विशेषण माझ्या नावामागे घालून तुम्ही माझ्या काळजाला अक्षरशः हात घातला आहे ! " काही वर्षांपूर्वी त्यांची धाकटी विवाहित कन्या अपघाताने भाजून मरण पावली. ते दुःख त्यांना अनावर झाले. दोन महिने अहोरात्र ते तिच्यासाठी अश्रू ढाळीत होते. त्यांची समजूत घालता घालता सर्वांनी हात टेकले. तेव्हापासून त्यांचा स्वभाव आणखीनच हळवा झाला होता. बारीक-

सारीक दुःख पाहून ते व्याकुळ होत. ' शिवशक्ती'च्या इमारतीचा पाया घातला तेव्हा अनेक भावनांनी त्यांचा ऊर भरून आला. मला ते म्हणाले, " साठाव्या वर्षी ह्या नवीन जीवनाला तुम्ही प्रारंभ करीत आहात, तेव्हा तुमच्या धाडसाचे कौतुक तरी आम्ही काय करावे ? " त्यानंतर ते हसून म्हणाले, " आता आपली एकच इच्छा आहे. ती ही की ' शिवशक्ती'चे तीन मजले पूर्ण झाले की, तिच्या गच्चीवर तुम्ही आम्ही बसून कांद्याचे थालीपीठ आणि लोणी पोटभर खायचं ! " नानांचे ते भोळे भाबडे मराठी स्वप्न आता अपुरे राहिले याबद्दल वाईट वाटते. दुःखात समाधान एवढेच की, आपली सर्व कौटुंबिक कर्तव्ये त्यांनी पार पाडली होती. सांसारिक जीवनात आता ते कृतार्थ झाले होते. मराठी भाषेची नि साहित्याची त्यांनी केलेली महान सेवा तर सरकारच्या नि जनतेच्या दरबारी केव्हाच रुजू झालेली आहे. आयुष्यभर त्यांनी जो ' वाग्यज्ञ ' केला, त्याचे ' पसायदान ' त्यांनी अमळनेर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाच्या अखेरीसच म्हणून ठेवले आहे. " मराठी भाषा वाढावी. ग्रंथसंपत्ती पुढती-पुढती-पुढती व्हावी अन् आजवरचे सर्व दुरित दैन्य तात्काळ संपावे ! " हे ' पसायदान ' ' महाराष्ट्रात्मक देवाने ' दिले तरच आता त्यांच्या आत्म्याला शांती मिळेल !

दा. क्र. 9630 E
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों. दि: ..................

१०

# मामा गेले हो !

मामा वरेरकर इतक्या लवकर जातील असे कोणालाच वाटले नाही. ह्या महिन्याच्या तीन तारखेला त्यांनी आम्हाला पत्र लिहिले होते. त्यात पंडित नेहरूंवर आम्ही लिहिलेले ‘ सूर्यास्त ’ पुस्तक ‘ अंतर्बाह्य सुंदर ’ आहे असा अभिप्राय व्यक्त करून ‘ तुम्ही लिहिलेली अलीकडील दुसरी पुस्तके अशी का आली नाहीत ? ’ असे वडीलपणाच्या प्रेमळ अधिकाराने त्यांनी आम्हाला दटावले होते. त्या पत्रातील ‘ आपला मामा वरेरकर ’ ही त्यांच्या सुंदर अक्षरातील सही पाहून ह्या वयातही मामांच्या हाताला अजून कंप आलेला नसून त्यांचे अक्षर पूर्वीसारखेच वळणदार असल्याबद्दल, आम्ही त्यांचे कोणापाशी तरी कौतुक केले होते. अवघ्या दोन दिवसांपूर्वीच ते फार आजारी असून त्यांना उचकी लागल्याची बातमी दिल्लीहून आलेल्या एका मित्राने आम्हाला सांगितली होती. तेवढ्या आजारातही त्यांची विनोदबुद्धी कशी शाबूत आहे त्याची एक गोष्टही त्याने सांगितली. “ मामा, तुम्हाला उचकी का लागली ? ” असे त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करावयास आलेल्या एकाने विचारले. तेव्हा मामा तेवढ्यातल्या तेवढ्यात हसून त्यांना म्हणाले, “ अरे, नेहरू माझी आठवण करताहेत ! ” मामांचा हा विनोद वाच्यार्थाने असा खरा होईल, अशी कोणाला कल्पना असणार ? मामांच्या मरणाने मराठी साहित्याचा एक प्रचंड बुरूज कोसळला ह्यात काही शंका नाही. भारताच्या राजधानीत मराठी लेखकांना आणि साहित्यिकांना काही नाही म्हटले तरी मामांचा फार मोठा आधार होता. कोणीही

मराठी साहित्यिक दिल्लीला गेला, की तो हक्काने मामांच्या घरी जाऊन उतरावयाचा. तो जर नाही त्यांच्याकडे गेला, तर ते रागावून त्याला खडसावायचे की, 'का नाही तू माझ्याकडे आलास ? आता पुन्हा असे करू नकोस !'

मामांचे व्यक्तिमत्त्व यांच्या वाङ्मयाइतकेच आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण होते ह्यात काही शंका नाही, म्हणून मामांच्या भोवती तरुण लेखक-लेखिकांचा नेहमी गराडा पडलेला असे आणि महाराष्ट्रातल्या उदयोन्मुख तरुण लेखक-लेखिकांनी आपल्या जवळ यावे, ह्याची मामांनाही भारी हौस असे. तेवढ्यासाठी अमुक लेखिका ही माझी मुलगी आहे, तिचा नवरा हा माझा जावई आहे, तमुक लेखक हा माझा भाचा आहे, अशी निरनिराळी नाती त्यांना चिकटवून देऊन त्यांच्या मनात स्वतःबद्दल ते आपलेपणा उत्पन्न करीत असत. एवढे वय झाले तरी मामांनी आपला खेळकरपणा नि खट्याळपणा शाबूत ठेवला होता. त्यामुळे कोणालाही त्यांच्याशी बरोबरीच्या नात्याने खेळीमेळीने बोलावयाला किंवा त्यांची थट्टामस्करी करावयाला कधी संकोच वाटत नसे आणि मामांना कोणी काहीही बोलले तरी त्याचा डंख ते मनामध्ये कधीच ठेवीत नसत किंवा मागल्या उखाळ्यापाखाळ्या ते कधीही काढीत नसत. आत्मप्रसिद्धीची एखाद्या तरुण मुलाप्रमाणे मामांना हौस होती. चार दोन महिने गेले नाहीत आणि काही तरी एखादा विक्षिप्तपणा मामांनी केला नाही, असे कधीही व्हावयाचे नाही. असल्या गंमती आणि टिवल्याबावल्या करण्याचा मामांना फार फार नाद असे. कोणाची काही तरी ते खोडी काढतील, काणाला काही तरी चिमटा काढतील. अशा रीतीने उभ्या आयुष्यात मामा स्वस्थ म्हणून कधी बसले नाहीत किंवा त्यांनी आपल्या अस्तित्वाचा लोकांना कधी विसर पडू दिला नाही. त्यांच्या वयाचे असे किती तरी लेखक आज आढळतील की, त्यांची आठवण त्यांच्या ह्यातीतच लोक विसरून गेले. पण मामामात्र शेवटच्या क्षणापर्यंत लोकांच्या आठवणीत राहिले. ह्या त्यांच्या खेळकर आणि खोडकर स्वभावामुळे त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घ आयुष्य ह्यांचा जसा लाभ झाला, त्याप्रमाणे 'मामा' हे नाव अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील आबालवृद्धांच्या तोंडी खेळू लागले. 'मामा' म्हणजे वरेरकर हे जणू काही समीकरणच ठरून गेले होते.

मामांच्या बरोबर मराठी वाङ्मयातला एक मोठा कालखंड आज नाहीसा झालेला आहे. विद्यमान साहित्यिकांमध्ये मामा हे सर्वांत श्रेष्ठ आणि ज्येष्ठ असे साहित्यिक होते. गडकऱ्यांपेक्षा ते चार वर्षांनी वडील होते. मामांचे सर्व आयुष्य म्हणजे

एक चमत्कारच होता. शिक्षण अगदी बेताबाताचेच झाले असल्यामुळे त्यांना अगदी तरुण वयात पोस्टात नोकरी करणे भाग पडले. पण तशा परिस्थितीतही आपण कोणी तरी मोठे लेखक व्हावे आणि जगापुढे यावे अशी जबरदस्त आकांक्षा त्यांच्या मनात उचंबळत होती, म्हणून कुठे अलमोऱ्याच्या 'रामकृष्ण' आश्रमात जाऊन विवेकानंदांना भेट, तर कुठे कर्नल कीर्तिकरांना भेटून फारसे इंग्रजी येत नसतानाही त्यांच्याशी शेक्सपीअरच्या किंवा इब्सेनच्या नाटकांची चर्चा कर, असे त्यांचे निरनिराळे उद्योग एकसारखे चालूच होते. वयाच्या चोविसाव्या वर्षी त्यांनी 'कुंजविहारी' हे आपले पहिले नाटक लिहिले. आमच्या लहानपणी ह्या नाटकाचा चांगलाच बोलबाला झाल्याचे आम्हाला आठवते. त्यानंतर मामांनी पोस्टातली नोकरी सोडून दिली आणि नाट्यलेखनाच्या क्षेत्रात त्यांनी पदार्पण केले. त्या काळात एखाद्या लेखकाने आपले आयुष्य सर्वस्वी लेखनाला वाहून घ्यावयाचे, ही फार धाडसाची गोष्ट होती, आणि त्यातून मामा-सारख्या अल्पशिक्षित तरुणाने केवळ वाङ्मयावर आपली उपजीविका करण्याचा निर्धार करावयाचा, म्हणजे उघड्या डोळ्यांनी उपासमारीच्या जबड्यात उडी मारण्यासारखे होते. मामा फारसे शिकलेले नसले, तरी ते जात्या बुद्धिमान होते. शिक्षणाची उणीव त्यांनी वाचनाने, अभ्यासाने आणि अवलोकनाने भरून काढली. त्या काळात राजकीय आणि सामाजिक सुधारणांची जी प्रचंड लाट देशात आली होती, तिचे निरनिराळे प्रवाह त्यांनी चौकसपणाने नीट समजावून घेतले. नाटक मंडळ्यांत अनेक वर्षे राहून यशस्वी नाटकांचे सारे तंत्र त्यांनी आत्मसात करून टाकले, त्यामुळे खाडिलकर, कोल्हटकर किंवा गडकरी ह्यांच्या नाटकांच्या यशोदुंदुभी वाजत असतानाही, त्या काळात मराठी रंगभूमीवर वरेरकरांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना मामा आपले गुरू मानतात. पण कोल्हटकरांच्या काव्याचे नि विनोदाचे वरदान गडकऱ्यांना मिळाले, तर सामाजिक अन्यायाबद्दल कोल्हटकरांना वाटणारी चीड, समाजसुधारणेची त्यांना वाटणारी तळमळ आणि त्यांचा भूतदयावाद हा वरेरकरांच्या वाट्याला आला. त्यामुळे खाडिलकर, कोल्हटकर किंवा गडकरी ह्या थोर नाटककारांनाही जे एक अवघड कार्य साधता आले नाही, ते मामांनी यशस्वितेने साधले, आणि ते हे की, मराठी रंगभूमीला अद्भुतरम्यतेच्या कृत्रिम वातावरणातून खेचून काढून तिला रक्तामांसाच्या खऱ्याखुऱ्या माणसांच्या आणि जिवंत जगात आणून सोडले. त्या दृष्टीने वरेरकर हे पूर्वीच्या सर्व नाटककारांपेक्षा

अधिक यथार्थत्वाने मराठीचे युगप्रवर्तक नाटककार म्हणून संबोधता येतील. देवलांनी ' शारदा ' नाटक लिहून वास्तववादी सामाजिक नाटकांची जी तेजस्वी सुरुवात केली होती, ती परंपरा कोल्हटकर नि गडकरी ह्यांच्यापेक्षा अधिक तत्त्व-निष्ठेने वरेरकर ह्यांनीच पुढे चालविली. काही पौराणिक आणि ऐतिहासिक नाटके जरी मामांनी लिहिलेली असली, तरी त्यांच्या मनाचा नि भावनेचा कल भूतकालापेक्षा वर्तमानकाळाकडेच जास्त झुकलेला होता. देवादिकांच्या नि राजे-लोकांच्या काल्पनिक स्वप्नसृष्टीत रममाण झालेल्या रंगभूमीला सामाजिक अन्यायाने आणि आर्थिक विषमतेने गांजलेल्या कष्टाळू गरिबांच्या दुनियेतून वरेरकरांनी हिंडवून आणले. सध्याच्या मध्यम आणि मजूर वर्गापुढचे बहुतेक सर्व प्रश्न ह्या ना त्या नाटकात मामांनी चितारण्याचा प्रयत्न केला. हुंडा, धर्मांतर नि शुद्धी-करण, गिरणीमालक, मजूर आणि संप, असहकार आणि कोर्ट-बहिष्कार, आकडे आणि सट्टे खेळण्याचे व्यसन, जुगार, अस्पृश्योद्धार नि खादीप्रसार, करमणुकी-वरील कर, मद्यपानबंदी किंबहुना गेल्या दोन अडीच तपांत ज्या ज्या सामा-जिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय चळवळी महाराष्ट्रात होऊन गेल्या, त्यांची नाट्यात्मक नोंद अगदी चिकाटीने आणि क्वचित अपयशाचा कडू वाटा पदरी पत्करूनही वरेरकरांनी केली. टिळकांच्या राजकारणाचे पडसाद जसे खाडिलकरांच्या नाटकात उमटले, तसे गांधीजींच्या राजकारणाचे प्रतिबिंब वरेर-करांच्या नाटकात चित्रित झाले. त्यांच्या लेखनात सहजता आणि विपुलता हे गुण असल्याने, नाटकांच्या संख्येच्या दृष्टीनेही पूर्वीच्या नाटककारांवर त्यांनी मात केली. वरेरकरांचे नाट्यविषय जितके वास्तववादी, त्याहीपेक्षा त्यांचे नाट्यतंत्र अधिक वास्तववादी आहे. किंबहुना, आधुनिक नाट्यतंत्र हेतुपुरस्सर उपयोगात आणून रंगभूमी जास्त वास्तववादी आणि सजीव करावयाची हे ध्येय वरेर-करांच्या इतक्या निष्ठेने पूर्वीच्या कोणत्याही नाटककारांनी समोर ठेवलेले नाही. व्यवहारातली सोपी भाषा, आटोपशीर खटकेबाज संवाद, स्वगत भाषणाचा अभाव, एक-प्रवेशी नाट्यरचना, दोन तासांची नाटके किंवा नाटिका ह्या सर्व तांत्रिक सुधारणा वरेरकरांच्या नाटकात आढळतात. ह्याव्यतिरिक्त रंगभूमीवर खालीवर जाणाऱ्या पडद्यांची हाकालपट्टी करून त्याऐवजी निश्चल भिंतीच्या खोल्या आणि दिवाणखाने दाखविण्याची सुधारणा त्यांनीच प्रथम केली. स्त्रियांच्या सर्वांगीण सुधारणेचे कार्य विलक्षण चिकाटीने महर्षी कर्वे ह्यांनी जसे केले, तसे मराठी रंगभूमी सर्व बाजूंनी सुधारून तिला सामाजिक जीवनात

प्रभावी स्थान देण्याचे अवघड कार्य तितक्याच चिकाटीने मामांनी केले, म्हणून मराठी नाटकांच्या इतिहासात ‘ आधुनिक रंगभूमीचे सुधारक ’ असा वरेरकरांचा उल्लेख इतिहासकारांना करावा लागेल. नाट्यसृष्टीत मोठमोठे विक्रम करून जणू काही त्यांचे समाधान झाले नाही, म्हणून कादंबरीच्या प्रांतावरही त्यांनी स्वारी करून तेथेही त्यांनी आपल्या लेखन-प्रतिभेचे चमत्कार करून दाखविले. बंगाली भाषेतील सर्वश्रेष्ठ कादंबरीकार शरच्चंद्र ह्यांच्या एकूण एक कादंबऱ्यांचा मराठीत अनुवाद करून मामांनी मराठी साहित्याला एक अविस्मरणीय देणगी दिली आहे. मामांची एकंदर ग्रंथसंपत्ती दीड-दोनशांच्या घरात जाईल. सतत पन्नास-साठ वर्षे त्यांनी लेखनाखेरीज दुसरे काही केले नाही. लेखनाची त्यांच्याएवढी जबरदस्त हौस असलेला लेखक महाराष्ट्रात क्वचितच होऊन गेला असेल.

मामांची बहुतेक सारी हयात हलाखीमध्ये गेली. तरी दारिद्र्यामुळे कधी कोणाच्या पुढे त्यांनी तोंड वेंगाडले नाही, किंवा परिस्थितीपुढे लाचार होऊन अथवा बाजारी साहित्याच्या पैदाशीसाठी कधी त्यांनी आपली लेखणी विकली नाही. बैठकीत बोलायला बसले की, मामांच्या जिभेला हाड नसे, पण त्यांच्या बोलण्यातला वाह्यातपणा त्यांच्या वाङ्मयात औषधालासुद्धा सापडणार नाही. त्यांच्या लेखणीतून बाहेर पडलेले अक्षर न् अक्षर निर्मळ नि सोज्वळ आहे. मामांच्या वाङ्मयाप्रमाणे त्यांचे नैतिक चारित्र्यदेखील शुद्ध आणि निरपवाद होते. नाही म्हणावयाला मामांना एकच वाईट खोड होती, आणि ती म्हणजे कारण नसताना भलभलते वाद निर्माण करावयाचे नि त्यासाठी भांडत बसावयाचे. पुण्यातील लोकांसंबंधी त्यांनी एकदा जो आपला वाईट ग्रह करून घेतला होता, तो शेवटपर्यंत त्यांनी सोडला नाही. त्यांमुळे त्यांची नि आमची कोण भांडाभांडी झाली म्हणता ! महाराष्ट्राला तो सारा इतिहास माहीतच आहे. त्यांनी आम्हाला ‘ अल्लाद बेचव पत्रे ’ म्हटले ! नि आम्ही त्यांना ‘ थापाडे मामा ’ म्हणून घेतले ! आम्हा उभयतांमध्ये एवढे ‘ महाभारत ’ घडूनसुद्धा पुन्हा जसे काही घडलेच नाही अशाच निर्वैर वृत्तीने मामा आमच्याशी वागत. १९३७ साली शिवाजी आखाड्यात ‘ अत्रे-माटे ’ वादाची जी आमची प्रचंड सभा झाली, तिचे अध्यक्षस्थान मामांनी मोठ्या आनंदाने स्वीकारले. मामा खोडकर होते, पण चिडखोर नव्हते. खवचट होते, पण हलकट नव्हते. त्यामुळे मामांशी ‘ दोन हात ’ करण्यात एक प्रकारची मौजच वाटायची. ती मौज आता गेली महाराष्ट्रातून !

एखाद्या श्रेष्ठ मराठी साहित्यिकाला महाराष्ट्रात जेवढे मानसन्मान मिळावयाचे, तेवढे मामांना मिळाले, पण सत्तरी उलटेपर्यंत त्यांचे आयुष्य एकंदरीत कष्टातच गेले. त्यांच्या साहित्यसेवेला दिल्ली दरबारची मान्यता त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस मिळून त्यांच्या आयुष्याचे सार्थक झाले. त्यामुळे त्यांना भरपूर आर्थिक आणि मानसिक स्वास्थ्य लाभले. राज्यसभेवर ते दोनदा नियुक्त झाले. भारत सरकारकडून 'पद्मभूषण' ही त्यांना पदवी मिळाली. 'साहित्य अकॅडमी'च्या कार्यकारिणीवर त्यांची निवड झाली. थोर नाटककार म्हणून 'संगीत अकॅडमी'ने त्यांचा सत्कार केला, आणि गेल्या वर्षी त्यांचा ऐंशी-आवा वाढदिवस मुंबईत राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. केवळ लेखणीच्या सामर्थ्यावर मालवणचा हा पी. एम्. (पोस्टमास्तर) अखेर भारताच्या राज्यसभेचा एम्. पी. झाला! आणि भारताच्या राजधानीत यमुनेच्या काठावर आपला देह ठेवण्याचे भाग्य त्याला लाभले! खरोखर मामांच्या आयुष्याचे अक्षरशः सोने झाले. नेहरूंचे मामांवर फार प्रेम होते. नेहरूंनी आपली सिगरेट मामांच्या विडीवर पेटवल्याचे ते सांगत. 'नेहरूंचा दिल्लीमधला पत्ता काय?' असे कोणी त्यांना विचारले तर ते सांगत 'मामा वरेरकरांच्या समोर!' अशा मामांच्या अनेक मौजा आहेत. मामांचे वाङ्मय पुढील अनेक पिढ्यांना वाचावयाला मिळेल, पण मामांच्या ह्या व्यक्तिगत गमती-मात्र आमच्या पिढीबरोबरच विसरल्या जातील ह्याचा विषाद वाटतो. पण ईश्वरी इच्छेपुढे काय इलाज?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

# ११

## प्रा. रामचंद्र कृष्ण लागू

आमच्या आदल्या पिढीमधले इंग्रजीचे विख्यात प्राध्यापक रामचंद्र कृष्ण लागू हे गेल्या रविवारी सकाळी पुण्यातील आपल्या राहत्या घरी वयाच्या त्र्यायंशीआव्या वर्षी निधन पावले. प्रा. लागू ह्यांच्या हाताखाली प्रत्यक्ष शिकण्याचे भाग्य ज्यांना लाभले होते, त्या विद्यार्थ्यांखेरीज किंवा ज्या संस्थेमधे त्यांनी अध्यापन केले, त्या संस्थेमधल्या त्यांच्या सहकाऱ्यांखेरीज बाहेरच्या जगाला प्रा. लागू हे कोण होते, ते काळे होते का गोरे होते ह्याची काडीमात्र माहिती नसेल. इतका लाजरा, बुजरा, भिडस्त आणि प्रसिद्धि-पराङ्मुख विद्वान आम्ही तरी आमच्या आयुष्यात पाहिलेला नाही. आम्ही स्वतः साऱ्या गावाच्या रिकामटेकड्या चौकशा करणारे एवढे उपद्व्यापी, पण जवळ जवळ बावीस वर्षे आम्ही आणि ते एकाच पुणे शहरात वास्तव्य करीत असूनही आम्हांलासुद्धा त्यांची माहिती किती होती म्हणून विचाराल तर आवळ्याएवढे पूज्य! मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात प्राध्यापक असताना सिसन नावाच्या कोणा प्रोफेसराशी त्यांचे म्हणे भांडण झाले, म्हणून सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन ते पुण्याला आले, चिंतामण द्वारकानाथ देशमुख हे त्यांचे अत्यंत लाडके शिष्य होते, आणि ते अविवाहित होते. ह्या तीन गोष्टींखेरीज त्यांच्याबद्दलची चौथी गोष्ट आम्हांला माहीत नव्हती. साहेबाच्या तोंडात मारील असे त्यांचे इंग्रजी होते नि कॉलेजात इंग्रजी ते उत्कृष्ट रीतीने शिकवीत असत, असे ज्याच्या त्याच्या तोंडून आम्ही त्या वेळी ऐकत होतो. पण कॉलेजाबाहेर त्यांचे इंग्रजी ऐकण्याची संधी

आम्हांलाच काय, पण कोणालाही आली असेल असे वाटत नाही. कारण, आमच्या माहितीप्रमाणे उभ्या आयुष्यात जाहीरपणे ते कुठेही इंग्रजी ( वा मराठी ) बोलले नाहीत. बरे, इंग्रजीमध्ये त्यांनी स्वतंत्रपणे एखादी ग्रंथरचना केली असेल असे म्हणावे, तर त्याही भानगडीत ते कधी पडले नाहीत. नाही म्हणावयाला त्यांनी ' सिलेक्शन्स फ्रॉम मॉडर्न इंग्लिश पोएट्री ॲण्ड प्रोज ' आणि ' मॉडर्न स्टोरीज फ्रॉम ईस्ट ॲण्ड वेस्ट ' ही इंग्रजीमधील निवडक उताऱ्यांची दोन पाठ्यपुस्तके संपादित केली होती. त्यामध्ये त्यांनी जी काही त्रोटक इंग्रजी टिपणे लिहिलेली असतील, तेवढेच काय ते त्यांनी उभ्या आयुष्यात इंग्रजी लिखाण केले असेल. मराठीमधले त्यांचे लिखाणही तितकेच त्रोटक आहे. ' साहित्यसुवर्ण ' आणि ' साहित्यसाधना ' ही दोन मराठी वेच्यांची पुस्तके त्यांनी संपादित केली आहेत, आणि ' दिवाकरां 'च्या ' नाट्यछटा ' अन् हरि सखाराम गोखले ह्याचा ' काहीतरी ' हा काव्यसंग्रह ह्यांना त्यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. त्या जमेला धरल्या म्हणजे संपला प्रा. लागूंच्या लेखनाचा कारभार ! ह्याचा अर्थ प्रा. लागू ह्यांचे इंग्रजी वा मराठी भाषेवर असामान्य प्रभुत्व नव्हते, किंवा त्यांच्या अंगी प्रचंड विद्वत्ता नव्हती असा मुळीच नव्हे. पण प्रा. लागूंचा स्वभाव असा विचित्र किंवा चमत्कारिक होता, की त्यांना आपल्या ज्ञानाबद्दल यत्किंचितही आत्मविश्वास वाटत नव्हता. समजा, आपण काही एखादे इंग्रजी लिहिले आणि त्यात व्याकरणाची किंवा वाक्यप्रयोगाची एखादी चूक जर एखाद्या ' साहेबा 'ला आढळली, तर मग आपल्याला आत्महत्या करण्याखेरीज गत्यंतरच राहणार नाही—त्यापेक्षा काही न लिहिलेलेच बरे—अशी त्यांची भावना होती. म्हणून इंग्रजीमधे स्वतंत्र ग्रंथरचना करण्याच्या किंवा जाहीर भाषणे करण्याच्या ते मुळी कधी भानगडीतच पडले नाहीत. त्यामुळे ' साहेबांच्या थोबाडीत मारणारे ' त्यांचे इंग्रजी ही आमच्या त्या काळी एक दंतकथा होऊन बसली होती. व्याकरणशुद्ध इंग्रजी बोलण्याच्या नि लिहिण्याच्या त्यांच्या ह्या फाजील वेडाचे विडंबन करण्यासाठी आम्ही त्या वेळी एक चावट गोष्ट अन्य नावाने लिहिली होती. तिचा सारांश असा. प्रा. लागूसारखा एक इंग्रजीचा प्राध्यापक एका मुलीच्या प्रेमात पडतो. पण ती मुलगी आपल्या प्रेमपत्रात Dearest चे स्पेलिंग जेव्हा Deerest असे करते, तेव्हा त्या प्राध्यापकाने त्या मुलीचे प्रेम झिडकारून आजन्म ब्रह्मचारी राहण्याचे ठरविले वगैरे वगैरे.

प्रा. लागू ह्यांच्या ह्या लहरी स्वभावामुळे त्यांच्याशी कसे वागावे ही त्यांच्या

मित्रांना आणि विद्यार्थ्यांना नेहमीच एक समस्या पडलेली असे. कारण, कोणत्या कारणाने अन् केव्हा त्यांच्या मर्जीचा तोल बिघडेल हे कधी सांगता यावयाचे नाही. ते वर्गात शिरले की नंतर विद्यार्थ्यांना प्रवेश बंद! एकदा ते शिकवायला लागले की मग ते त्यात रंगून जात. अशा वेळी जर कोणी विद्यार्थ्याने खोकण्याचा किंवा नुसती पेन्सील तासण्याचासुद्धा आवाज केला, तर ते एकदम त्याच्यावर भडकत. कधी कधी शिकवणे बंद करून ते वर्गातून बाहेर चालूही लागत. ठरलेल्या वेळी ते आपल्या घरातून निघत आणि टांग्यामधे बसून कॉलेजात येत आणि सरळ आपल्या वर्गात जात. तास संपला की, लायब्ररीत तरी जात नाही तर टांग्यात बसून पुन्हा घरी परतत. ह्या त्यांच्या कार्यक्रमात काडीमात्र कधी फरक व्हावयाचा नाही. शिक्षकांच्या आरामखोलीत चकाट्या मारीत बसलेले कोणीही त्यांना कधी पाहिले नसेल. अनियमितपणाचे ते कट्टर शत्रू होते. त्यांना भेटावयाला येणाऱ्या माणसांनी बरोबर ठरलेल्या वेळीच यावयाला पाहिजे. एक मिनिट आधी येता कामा नये किंवा एक मिनिट उशिरा येता कामा नये. आमचे एक कोणी मित्र एकदा ठरलेल्या वेळी त्यांना भेटावयाला गेले. पण बरोबर ते एक दुसरा माणूस घेऊन गेले. त्याबरोबर प्रा. लागू त्यांच्यावर भडकले. ते म्हणाले, 'तुम्ही मला एकटे भेटावयाला येणार असताना, हा माणूस काय म्हणून तुम्ही बरोबर घेऊन आलात?' तेव्हा त्या दोघांनाही 'दे माय धरणी ठाय' असे होऊन गेले. प्रा. लागू सहसा आपली पुस्तके दुसऱ्या कोणाला वाचावयाला देत नसत, आणि जर एखादे दिले आणि ते जर त्या माणसाने मुडपले किंवा वेड्यावाकड्या तऱ्हेनें वापरले तर मग त्यांच्या रागाला सुमार नसे. ते संतापून म्हणत, "या पुस्तकाशी जर तुम्ही असे निष्काळजीपणे वागता, तर मग विद्येविषयीचा तुमचा आदर वाढणार कसा?" प्रा. लागू हे रोजच्या रोज न्हाव्याकडून स्वच्छ स्मश्रू (Clean shave) करवून घेत. पण जर का त्या न्हाव्याने त्यांची दाढी करताना त्यांच्या गालाला चुकून स्पर्श केला की, त्यांचा संतापाचा पारा एकदम चढे. त्यांच्या ओठाला किंवा गालाला स्पर्श न करता नुसत्या वस्तऱ्याने त्यांच्या दाढीमिशा वरच्या वर सफाचट्ट करावयाचे अत्यंत दुष्कर कर्म त्यांच्या न्हाव्याला करावे लागे. आमचे मोडक म्हणून एक मित्र होते. शास्त्रीय उपकरणे आणि लाकडी फर्निचर करण्याचा त्यांचा व्यवसाय होता. प्रा. लागूंनी त्यांना एक लाकडी कपाट करावयाला सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी ते कपाट तयार करून त्यांच्या खोलीत वर आणले. आता ते ठेवावयाचे

कोठे ? प्रा. लागू म्हणाले, “ रस्त्याकडच्या दारापुढे ठेवा. तिकडे समोर मुलांचे वसतिगृह आहे. माझ्याकडे मुली शिकायला येतात, आणि मग ती पोरे कुचेष्टा करतात. म्हणून ह्या दारासमोर ह्या कपाटाचा आडोसा केलेला बरा ! ” तेव्हा मोडक नुसते हसले. त्याबरोबर प्रा. लागू भडकले. “ का हसलात ? ” त्यांनी विचारले. मोडक म्हणाले, “ तुमच्यासारख्या थोर माणसांनी त्या पोरांच्या कुचेष्टेकडे कशाला लक्ष द्यावयाचे ? ” बापरे, मोडकांचे शब्द ऐकून प्रा. लागूंच्या अंगाचा असा थैमान झाला म्हणता ! ते ओरडून म्हणाले, “ उचला ते कपाट येथून ! मला अक्कल शिकवता ? ” बिचारे मोडक ! त्यांना ते कपाट अखेर परत आपल्या कारखान्यात आणावे लागले. प्रा. लागूंनी पुन्हा त्यांचे तोंड पाहिले नाही.

लागूंचा पोषाख अत्यंत व्यवस्थित असे. गळेबंद लांब काळा किंवा पांढरा कोट, विजार, बूट, गळ्याला स्वच्छ उपकरणे आणि डोक्याला पांढरा रुमाल. ते तो थोडासा मद्रासी पद्धतीने बांधीत. त्यामुळे एकदम पाहणारास ते अ-महाराष्ट्रीय आहेत असा भास होई. त्या काळी पुण्याचे रस्ते डांबरी नसत. रस्त्यावर धूळ फार असे. त्यामुळे रस्त्याने जाताना आपल्या उपरण्याचा बोळा ते एकसारखा नाकातोंडाला लावून चालत. ते दृश्य बघणाराला हसू आल्याखेरीज राहात नसे. ( तशा तऱ्हेने नाकातोंडाला उपरणे लावून रस्त्यातून चालणारे दुसरे पुण्यातले गृहस्थ म्हणजे प्रि. रा. प. सबनीस ! ) एकदा आम्ही प्रा. लागूंची जी गंमत केली, ती इथे सांगण्यासारखी आहे. आम्ही एकदा ‘ डेक्कन क्वीन ’ने पुण्याहून मुंबईला चाललो होतो. तेव्हा डब्याच्या एका कोपऱ्याला प्रा. लागू आणि कोणी तरी एक तरुण मुलगी ( बहुधा हिंगण्याची विद्यार्थिनी वा शिक्षिका असावी ) बसलेली आम्ही पाहिली. अर्थात, प्रा. लागूंनी आम्हांला पाहिलेच नाही. कारण, त्या मुलीकडे तोंड वळून त्यांनी पुण्याच्या स्टेशनपासून तिच्याशी बोलावयाला जी एकदा सुरुवात केली, तिच्यात बोरीबंदर येईपर्यंत एका क्षणाचासुद्धा खळ पडला नाही. तब्बल तीन तास ते तिच्याशी बोलत होते—म्हणजे तिला काही तरी समजावून सांगत होते. ती नुसती ऐकत होती. त्या तीन तासांत चहा घेण्याची किंवा इतर कोणत्याही गोष्टीची त्यांना आठवण झाली नाही. असे काय ब्रह्मांड तिच्याशी ते बोलत होते, परमेश्वर जाणे ! आम्ही ती मौज दुरून पाहात होतो. आमच्या शेजारी पुण्याचे एक वकील बसलेले होते. त्यांची नि प्रा. लागूंची थोडीशी ओळख होती. त्यांनी आम्हांला विचारले, “ कोण हो ? ” काही तरी

चावटपणा करावा म्हणून आम्ही म्हणालो, " ही प्रा. लागूंची नूतन पत्नी— गेल्या आठवड्यातच त्यांनी लग्न केले आहे. " वकीलसाहेब सर्दच झाले, कारण प्रा. लागूंचा अविवाहित राहण्याचा निर्धार त्यांना माहीत होता. काही वेळाने ते म्हणाले, " मग मला तिकडे जाऊन त्या दोघांचे अभिनंदन करावयाला पाहिजे ! " आम्ही म्हणालो, " इतक्यात नको. बोरीबंदरवर उतल्यावर ! " पुढे गाडी बोरीबंदरवर थांबली. प्रा. लागू अन् ती तरुण मुलगी प्लॅटफॉर्मवर उतरली, तोच त्यांचे अभिनंदन करावयाला वकीलसाहेब लगालगा त्यांच्यापुढे धावले. तेवढ्या गडबडीत आम्ही तेथून धूम ठोकली. त्यामुळे तेथे काय भडका उडाला, तो प्रत्यक्ष आम्हांला पाहावयाला मिळाला नाही. तो पुढे दोन महिन्यांनी त्या वकिलांच्या तोंडूनच आम्हांला समजला. अशा प्रा. लागूंच्या स्वभावाच्या अनेक गमती होत्या. असो. प्रा. लागू हे कडक, करारी, तुसडे आणि एककल्ली होते. असे जरी असले, तरी त्यांनी आपली सारी हयात विद्येच्या व्यासंगात आणि ज्ञानाच्या उपासनेत घालविली. अध्ययन आणि अध्यापन ह्याच्या पलीकडे बाकीचे जग जिवंत आहे का मेले आहे ह्याची त्यांनी कधी पर्वा केली नाही. असे छांदिष्ट विद्वान पुन्हा पाहावयाला मिळणार नाहीत, त्याचेच दुःख वाटते.

१२

# कै. नानासाहेब चापेकर

महाराष्ट्राच्या जुन्या पिढीमधले एक थोर विचारवंत, लेखक, संशोधक आणि मराठी साहित्याचे निःसीम उपासक श्री. नारायण गोविंद ऊर्फ नानासाहेब चापेकर हे बदलापूर या आपल्या राहत्या गावी वयाच्या नव्याण्णवाव्या वर्षी निधन पावले, हे कळविण्यास आम्हांला दुःख होते. शंभराच्या आतबाहेर आयुर्दाय लाभण्याचे महान भाग्य ज्यांना लाभले आहे, असे हाताच्या बोटावर मोजण्याइतके महापुरुष जे महाराष्ट्रात आजतागायत विद्यमान आहेत ( किंवा होते ) त्यांत नानासाहेबांचा ठळकपणे समावेश करता येत होता. त्यामध्ये त्यांच्या जाण्याने सर्वांना जाणवण्याइतका यापुढे खंड पडणार आहे यात काही शंका नाही. जवळ जवळ पाऊणशे वर्षांचा महाराष्ट्र, त्या महाराष्ट्रात होऊन गेलेले निरनिराळे थोर पुरुष आणि त्यांनी राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन क्षेत्रांत निर्माण केलेल्या पराक्रमी परंपरा ह्या स्वतः नानासाहेबांनी आपल्या डोळ्यांनी पाहिलेल्या होत्या. त्यांचे स्फूर्तिदायक संस्कार त्यांच्या मनावर आणि जीवनावर उमटलेले होते, आणि त्या संस्कारांच्या प्रकाशात त्यांनी आपले व्यक्तिगत आणि वैचारिक जीवन आजपर्यंत व्यतीत करण्याचा काटेकोरपणे प्रयत्न केलेला होता. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात जे जे म्हणून काही ओजस्वी आणि तेजस्वी होते, ते नानासाहेबांच्या रूपाने काल परवापर्यंत वावरत होते. सार्वजनिक जीवनापासून आणि प्रसिद्धीपासून नानासाहेब पहिल्यापासूनच फटकून वागत होते. स्वतःविषयी काहीही बोलण्याचा,

चारचौघांत आपण होऊन जाऊन मिसळण्याचा किंवा आपण केलेल्या कामाची प्रसिद्धी करण्याचा नानासाहेबांना तिटकारा असे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष ह्या नात्याने मराठी साहित्य संमेलनाशी आणि परिषदेशी संबंधित असलेल्या काही ज्येष्ठ नि विचारवंत साहित्यिकांशी नानासाहेबांचा घनिष्ठ संबंध असे. त्यामुळे काही वर्षे नानासाहेबांची ती आटोपशीर, कृश आकाराची, चपल, गौरवर्णीय, शुभ्रवस्त्रीय, पगडीधारी वैशिष्ट्यपूर्ण आकृती संमेलनाच्या व्यासपीठावर वा परिषदेच्या सभांतून कधी कधी पाहावयास मिळत असे. पण त्या गोष्टीला आता किती किती तरी वर्षे लोटली ! गेली वीस-पंचवीस वर्षे कोणत्याही साहित्य संमेलनात वा मेळाव्यात ते प्रकट झाल्याचे आम्हांला माहीत नाही. त्यामुळे आजकालच्या तरुणांना किंवा मध्यम वयस्कांना त्यांचे नावही माहीत असण्याचे कारण नाही—मग त्यांचे लेखन, विचार वा कार्य ह्यांची ओळख असणे तर दूरच राहिले ! पण स्वतः जरी बाहेरच्या जगापासून नानासाहेब फटकून राहात असत, तरी वर्षामधून एकदा महाराष्ट्रातल्या विद्वानांची नि आपली आपल्या गावी नि आपल्या घरी भेट व्हावी आणि त्यांच्या विचार-विनिमयात आणि सान्निध्यात आपला वेळ आनंदात जावा, ह्याची एक निश्चित व्यवस्था नानासाहेबांनी करून ठेवलेली होती. ती म्हणजे आपल्या मातोश्रींची पुण्यतिथी ते दरवर्षी जेव्हा बदलापूर येथे साजरी करीत, तेव्हा तिला ते धार्मिक स्वरूप देण्यापेक्षा कटाक्षाने साहित्यिक स्वरूप देत; आणि त्या वेळी महाराष्ट्रातल्या आपल्या निवडक साहित्यिक मित्रांना आणि काही नामवंत विचारवंतांना बोलावीत असत; आणि मग कोणती तरी एखादी वैचारिक समस्या घेऊन त्यावर त्यांची दिवसभर मनमोकळी चर्चा चाले. हा त्यांचा परिपाठ कित्येक वर्षेच्या वर्षे अखंडितपणे चाललेला होता. ह्या श्राद्धतिथीला न चुकता उपस्थित राहणारे आमचे दोन मित्र असत. त्यांपैकी एक महामहोपाध्याय ‘ पद्मभूषण ’ डॉ. दत्तोपंत पोतदार आणि दुसरे प्रा. कृष्णाजी पांडुरंग ऊर्फ नानासाहेब कुळकर्णी. ह्या दोघांच्यामुळे नानासाहेब चापेकरांचा आमच्यावर लोभ जडला. इतका की, आम्ही जणू काही त्यांच्या परिवारातलेच एक आहोत एवढ्या आपलेपणाने आणि अगत्याने ते आमच्याशी वागू लागले. मधून मधून आम्हांला ते पत्रेही लिहीत. त्यांचे आमच्यावर प्रेम असण्याचे दुसरे एक गंमतीचे कारण असे, कीं आमचा दोघांचाही जन्म ऑगस्ट महिन्यात झालेला होता. नानासाहेब चापेकर आणि दत्तोपंत पोतदार ह्या दोघांचाही जन्म ‘ ५ ऑगस्ट ’चा,

तर आमचा स्वतःचा ' १३ ऑगस्ट 'चा. एकदा तर दत्तोपंत पोतदार आणि नानासाहेब ह्या दोघांचाही वाढदिवस एकत्र खंडाळ्याला आमच्या ' राजमाची ' बंगल्यावर साजरा करण्याचा योग आला. त्या वेळी अशी काही भाषणांची मौज उडाली म्हणता — दोन साहित्यमहर्षींचा ' वाग्यज्ञ 'च म्हणाना तो! आमच्या नि नानासाहेबांच्या वयात अन् योग्यतेत एवढे अंतर असताना नानासाहेब आम्हांला ' बाबूराव ' असे संबोधून अगदी बरोबरीच्या नात्याने आमच्याशी वागत. कित्येकदा तर ते नाना कुलकर्ण्यांना घेऊन मुद्दाम आमच्या घरी आम्हांला भेटायला आलेले आहेत. आम्ही त्यांना जेव्हा विचारीत असू की, " नानासाहेब, कशाला तुम्ही येण्याची तसदी घेतलीत ? " तर ते स्मितपूर्वक म्हणत, " तुमची आठवण झाली म्हणून मुद्दाम आलो. " असा नानासाहेबांचा स्वभाव मोठा प्रेमळ असे. त्यांच्या त्या प्रेमळपणाने आम्हांला तर पुष्कळदा लाजल्यासारखे होई.

नानासाहेबांच्या पूर्वायुष्याची आम्ही आतापर्यंत जी ऐकली ती माहिती अशी. त्यांचे सर्व शिक्षण मुंबईत झाले. विल्सन कॉलेजातून ते बी. ए. झाले नि लॉ कॉलेजातून एलएल. बी. झाले. काही वर्षे त्यांनी शिक्षकाचा व्यवसाय केला नि वकिली केली. १९०० साली ते सरकारी नोकरीत शिरले. सबजज्ज म्हणून अनेक जिल्ह्यांत त्यांनी कामे केली. १९२५ साली सेवानिवृत्त झाल्यानंतर औंध संस्थानात दहा वर्षे ते हायकोर्ट जज्ज आणि लोकनियुक्त कायदेमंडळाचे सभापती होते. प्रवासाची त्यांना फार आवड असे. काश्मीरपासून तो कन्याकुमारीपर्यंत आणि द्वारकेपासून तो कलकत्त्यापर्यंत प्रवास करून त्यांनी भारताचे सामाजिक अन् धार्मिकदृष्ट्या निरीक्षण केलेले होते. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी साहित्य अन् संशोधक कार्याला स्वतःला वाहून घेतले. पुण्याचे भारत इतिहास संशोधक मंडळ आणि धुळ्याचे राजवाडे संशोधन मंडळ ह्या दोन्ही मंडळांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ते अनेक वर्षे कार्याध्यक्ष होते आणि त्या काळात ' महाराष्ट्र साहित्य पत्रिके 'चे संपादन त्यांनी केलेले आहे. लेखनाच्या प्रारंभ-काळात त्यांनी ' एडमंड बर्कचे चरित्र ' आणि ' पैसा ' हे ग्रंथ लिहिले. त्यांचे काही निवडक लेख मुंबई विद्यापीठाच्या एम. ए. परीक्षेस लावण्यात आले होते. मार्मिक, चोखंदळ आणि सव्यसाची लेखक म्हणून महाराष्ट्रात त्यांचे नाव जर पहिल्या प्रथम त्यांच्या कोणत्या पुस्तकाने प्रसिद्ध झाले असेल, तर ते त्यांच्या ' गच्चीवरील गप्पां 'नी. त्याचप्रमाणे आपल्या ' बदलापूर ' गावाचे ' आमचा गाव ' ह्या ग्रंथात त्यांनी जे अत्यंत



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................. दि.

व्यासंगपूर्ण आणि तपशीलवार समाजशास्त्रीय विश्लेषण केले, त्यामुळे मराठी साहित्यात विचारांचे एक नवीनच दालन त्यांनी उघडले. त्यांच्या 'बदलापूर' गावाला महाराष्ट्राच्या नकाशात एक निराळेच महत्त्व प्राप्त झाले; आणि त्यांचे मित्र 'बदलापूर'ला मौजेने 'आमचा गाव' असे संबोधू लागले. त्याखेरीज, 'वैदिक निबंध', 'चित्पावन', 'पेशवाईच्या सावलीत', 'काश्मीर', 'समाज-नियंत्रण' असे विविध विषयांवर त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. या ग्रंथांव्यतिरिक्त निरनिराळ्या नियतकालिकांतून त्यांनी विविध विषयांवर जे स्फुट लेखन केले, ते जर ग्रंथरूपाने कोणी प्रसिद्ध केले, तर त्याचे दोन-तीन खंड तरी होतील. त्यांचे सर्व लेखन त्या त्या विषयाचा अत्यंत सूक्ष्म विचार करून आणि त्यात कोणत्याही तऱ्हेचे दोष वा चूक राहू नये ह्याबद्दल पराकाष्ठेची सावधगिरी बाळगून अतिशय तर्कशुद्ध पद्धतीने लिहिलेले असे. त्यांच्या लेखनात फालतू मुद्दे आणि गैरलागू युक्तिवाद ह्याचा फापटपसारा मुळीच नसे. स्वतःच्या लेखनावर इतके कष्ट घेणारा त्यांच्या एवढा चोखंदळ लेखक आम्ही पाहिला नाही. कोर्टात एखाद्या खटल्याचे जणू काही आपण निकालपत्रच लिहितो आहोत, इतक्या मुद्देसूद आणि रेखीव पद्धतीने ते आपले वैचारिक लेखन करीत. त्यामुळे त्यांच्या लेखनात मनोरंजनाला मुळीच वाव नसे. कोणत्याही विषयाकडे पाहण्याची त्यांची भूमिका ही वाचकांच्या तर्काला नि विचारांना चालना देणारी असे, त्यामुळे साहजिकच लालित्यापेक्षा गांभीर्य हाच त्यांच्या एकंदर लेखनाचा स्थायीभाव होता. वेदांपासून तो समाजवादापर्यंत प्रत्येक विषयावर त्यांनी मौलिक विचार केलेला होता. तथापि एवढे असूनही त्यांचे काही विचार कधी कधी इतके चमत्कारिक असत, की ते पटण्याची तर गोष्ट दूरच, पण ते ऐकून सर्वसामान्य माणसाला धक्का बसल्याखेरीज राहात नसे. उदाहरणार्थ, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी 'मुंबई ही महाराष्ट्राची नाही' असे त्यांनी आपले मत प्रकट केले होते. 'शिवाजीमहाराजांपेक्षा पहिले बाजीराव मोठे होते' असे ते एकदा म्हणाले. तेव्हा आम्हीच त्यांना हसून म्हणालो, "नानासाहेब, हे तुमचे मत बाहेर कोणाला सांगू नका! आम्हांला सांगितले तेवढेच पुरे!" पण ही असली त्यांची एकांतिक मतें अपवादभूतच होत. त्यांचे वागणे स्वच्छ, राहणे स्वच्छ, बोलणे स्वच्छ, भाषाशैली स्वच्छ, आणि विचारही स्वच्छ. जुन्या पिढीतला नमुनेदार चित्पावन ब्राह्मण कसा होता, ह्याचा ते एक ठळक आदर्श होते. प्रत्येक गोष्टीचा विचार व्हावा, अभ्यास वाढावा, बुद्धिवादाचा विकास

व्हावा, चारित्र्य आणि देशाभिमान यांचा प्रसार व्हावा, ह्यासाठी सारा जन्म ते पोटतिडिकेने झगडले. त्यांचे महान वैशिष्ट्य नि व्यक्तिमत्त्व त्यांच्याबरोबरच गेले. येत्या ५ ऑगस्टला ते शंभराव्या वर्षात पदार्पण करणार होते. शेवटपर्यंत त्यांची बुद्धी आणि प्रकृती तल्लख होती. शतायुष्याचा अमृतप्याला त्यांच्या इतका ओठाजवळ येऊन तो त्यांना अखेर प्राशन करता येऊ नये, एवढे एकच दुःख ह्या त्यांच्या निर्याणसमयी आम्हांला होते!

(मराठा : ८-३-१९६८)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.............................. दि: ......................
क्रमांक .............................. नों: दि: ......................

# १३

## शेजवलकर

शेजवलकर गेले ! कोण हे शेजवलकर हो ? 'मराठ्या'चे असंख्य वाचक आम्हांला असा प्रश्न विचारतील, 'की हे कोण शेजवलकर ?' ठीक आहे. महाराष्ट्रात शेजवलकर आमच्यासारख्या थोड्याशा मित्रांखेरीज कोणालाही माहीत नव्हते. जनतेपासून अलिप्त झालेला एवढा मोठा माणूस या आमच्या महाराष्ट्रात झालेला नाही. महाराष्ट्रात मोठी माणसे कोण झाली हो ? विष्णुशास्त्री चिपळूणकर, महात्मा फुले, डॉ. भांडारकर, इतिहासकार राजवाडे, न्या. रानडे, लो. टिळक, कर्मवीर आगरकर, डॉ. केतकर, डॉ. आंबेडकर इत्यादी इत्यादी. त्याच परंपरेत शोभणारा जर आधुनिक काळात कोणी एखादा महापुरुष होऊन गेला असेल, तर त्याचे नाव त्र्यंबक शंकर शेजवलकर !

आमच्या महाराष्ट्राची शोककथा ही आहे, की त्याला विद्वान माणसांची आठवणही होत नाही. आजकालच्या कॉंग्रेसच्या राज्यात ज्ञानी आणि विद्वान माणसाला कवडीचीही किंमत नाही. काही फडतूस विद्वानांना सरकारी मान्यता आणि अनुदान मिळते हे खरे. तथापि, जातिवंत विद्वानांना ह्या कॉंग्रेसच्या राज्यात काडीचाही मान नाही. शेजवलकरांसारखा विद्वान आणि व्यासंगी माणूस ह्या भारतात आजपर्यंत होऊन गेलेला नाही. तुम्ही विचाराल, 'ही तुमची अतिशयोक्ती आहे.' पण आम्ही तुम्हाला खरं सांगतो, की शेजवलकरांसारखा व्यासंगी आणि बुद्धिमान माणूस क्वचितच या आपल्या देशात होऊन गेलेला नाही. ह्या आपल्या मुंबई शहरात 'टाऊन हॉल'मधे एक राष्ट्रीय ग्रंथालय

आहे. त्या ग्रंथालयामधील संगळीच्या सगळी पुस्तके जर कोणी एका माणसाने वाचली असतील तर ती शेजवलकरांनी ! सकाळपासून संध्याकाळपर्यंत अहर्निश आणि अहोरात्र, वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस ह्या शेजवलकरांनी आपल्याला त्या ग्रंथालयात पुरूनच घेतलेले होते. गेल्या तीनशे वर्षांत ह्या जगामधे जो जो इतिहास घडला, त्याचा तपशील जर कोणाला माहीत असेल तर तो आमच्या शेजवलकरांना.

आपल्या ह्या भारतात विद्वान पुष्कळ झाले असतील, आणखीही पुढे होतील, पण जाणिवेने जगणारा जर कोणी विद्वान झाला असेल ना तर तो फक्त शेजवलकर ! इतिहासाचार्य राजवाडे यांचे ते परमभक्त आणि त्याचबरोबर त्यांचे कठोर टीकाकार ! राजवाड्यांच्यामुळेच शेजवलकरांना इतिहास-संशोधनाचा नाद लागला. तथापि, जर कोणा एका इतिहासकारावर शेजवलकरांचे प्रेम बसले असेल, तर ते ' रियासतकार ' गोविंदराव सरदेसाई यांच्यावर. गोविंदराव एक महान इतिहासकार होते यात मुळीच शंका नाही. तथापि, गोविंदरावांच्या संशोधनाबद्दल भारतीय तज्ज्ञांचा मतभेद आहे. ते काहीही असो. गोविंदरावांनी ' श्रीमंत नानासाहेब पेशवे ' यांचे चरित्र लिहिले. त्या चरित्राला प्रस्तावना लिहिण्याची विनंती शेजवलकरांना त्यांनी केली. शेजवलकरांच्या आयुष्यातली ही सर्वांत महत्त्वाची घटना. कुठे सरदेसाई आणि कुठे शेजवलकर ! असे असूनही सरदेसाईंनी आपल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची विनंती शेजवलकरांसारख्या एका अप्रसिद्ध माणसाला करावी, ही खरोखरच एक अद्भुत गोष्ट होती. शेजवलकरांनी प्रस्तावना लिहिली आणि नानासाहेब पेशवे यांचे चरित्रकार श्री. नानासाहेब सरदेसाई यांचे त्यांनी तिच्यात अक्षरशः वाभाडे काढले; आणि त्या एका प्रस्तावनेमुळे शेजवलकर ह्यांना महाराष्ट्राच्या इतिहास-संशोधकांत कमालीची मानमान्यता मिळाली.

आमची आणि शेजवलकरांची गाठ जवळ जवळ तीस वर्षांपूर्वी पडली. त्या वेळी आम्ही पुण्यामधे नारायण पेठेत राहात होतो. शेजवलकर आमच्या घरात सहा महिने राहिले, आणि सगळ्यात अत्यंत चमत्कारिक गोष्ट अशी की, ते त्या वेळी एका बाईच्या प्रेमपाशात पडलेले होते. शेजवलकर दिसायला अत्यंत सामान्य. वृत्तीने अत्यंत रुक्ष आणि क्रुद्ध. तेव्हा आम्ही त्यांना सांगितलं की, ' स्त्रीवर प्रेम करण्याची तुमची पात्रता नाही, आणि कोणतीही स्त्री तुमच्यावर प्रेम करणार नाही ! ' शेजवलकरांच्या या प्रेमप्रकरणाचा सर्व तपशील आम्ही



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ........................ दि: ......................

या ठिकाणी काही सांगू शकत नाही. पण एवढा मोठा विद्वान आणि व्यासंगी संशोधक हा केवळ आपल्या वैयक्तिक प्रेमामुळे आयुष्यातून बरबाद व्हावा, ही एक अजब गोष्ट आहे.

शेजवलकरांवर प्रेम करणारे आम्ही जे काही दोन-चार लोक होतो, त्यांचे शेजवलकरांना संभाळता संभाळता नाकी नव आले. 'कर्नाटक प्रेस'चे मालक श्री. मंगेशराव कुलकर्णी यांनी शेजवलकरांना ताळ्यावर आणण्यासाठी कमालीचे प्रयत्न केले. त्यांच्यासाठी त्यांनी 'प्रगति' नावाचे एक साप्ताहिक काढले होते. आम्हांला आता आठवत नाही, पण हे 'प्रगति' साप्ताहिक निदान दोन किंवा तीन वर्षे तरी त्यांनी चालविलेले होते. या साप्ताहिकामधे शेजवलकरांनी विविध विषयांवरती जे लिखाण केलेले आहे, ते आपल्या मराठी भाषेचे अमर भूषण आहे. ज्या मुलीवर शेजवलकरांचे प्रेम होते ती त्यांची 'प्रगति' साप्ताहिकातील 'लेखिका' होती. तथापि, तो प्रेमसंबंध निष्फळ ठरल्यानंतर शेजवलकरांच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी मिळाली. मुंबई सोडून ते पुण्याला गेले, आणि काही काळाने ते पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये इतिहासाचे प्राध्यापक झाले. या कालखंडात त्यांनी पानपतच्या तिसऱ्या युद्धाबाबत एक इंग्रजी आणि मराठी भाषेतून अमोलिक ग्रंथ लिहिला. त्यासाठी ते प्रत्यक्ष पानपतच्या रणक्षेत्राचे निरीक्षण करून आले. मराठी भाषेत तर राहू द्याच, पण कोणत्याही भारतीय भाषेत पानपतच्या तिसऱ्या युद्धावर असा संशोधनात्मक ग्रंथ झालेला नाही.

आम्ही दोघे वर्षानुवर्षे जरी एकमेकांना भेटत नसलो, तरी त्यांचे आमच्यावर आणि आमचे त्यांच्यावर विलक्षण प्रेम होते. ते आम्हांला शिव्या द्यायचे आणि आम्हीही त्यांना शिव्या द्यायचे. पण असे असूनही उभयतांच्या प्रेमात कधीही अंतराय पडलेला नाही. अलीकडे छत्रपती शिवाजी महाराज यांचे संपूर्ण चरित्र मराठी भाषेत लिहिण्याचे कार्य 'मराठा मंदिरा'ने त्यांच्याकडे सोपविले होते. त्यासाठी त्यांना जवळ जवळ पन्नास हजार रुपये मानधन देण्याचे 'मराठा मंदिरा'ने कबूल केलेले होते. छत्रपती शिवाजीमहाराजांचे वास्तववादी आणि जिवंत चरित्र लिहिण्याची पात्रता जर महाराष्ट्राच्या कोण्या एका इतिकाराच्या अंगी असेल, तर ती आमच्या शेजवलकरांच्या. त्यांनी हे चरित्र किती लिहिले, हे आम्हांस माहीत नाही. गेली दीड वर्षे ते आजारीच होते. म्हणून हे शिवचरित्र लेखनाचे कार्य त्यांच्या हातून पूर्ण झाले नसावे, असे आम्हांस भय वाटते.

असो. मरणापुढे कोणाचा काय इलाज आहे? इतिहासाचार्य राजवाडे यांच्या-

नंतर त्यांच्याच तोडीचा आणि त्यांच्याच जिद्दीचा असा जर कोणी 'भयंकर' इतिहासकार या महाराष्ट्रात होऊन गेला असेल, तर तो शेजवलकर. शेजवलकर जितका शहाणा होता, तितकाच तो दीडशहाणाही होता. त्यांच्या अंगात जितके गुण होते, तितकेच अवगुणही होते. कृतीने ते महान विद्वान होते, पण वृत्तीने ते अत्यंत स्त्री-लंपट होते, आणि इतके असूनही ते आजन्म ब्रह्मचारी राहिले, हीच त्यांच्या जीवनाची शोककथा. त्यामुळेच उभ्या आयुष्यात त्यांच्या विद्वत्तेला आणि तपश्चर्येला यश प्राप्त झाले नाही. आम्हांला ते मानीत असत आणि घाबरतही पण असत. पण आम्हांला त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेबद्दल आणि अंतर्भेदी प्रतिभेबद्दल कमालीचा आदर आहे. आमचा हा अग्रलेख वाचून लोक विचारतील की, 'कोण हो हे शेजवलकर?' पण शेजवलकर कोण हे फक्त ह्या महाराष्ट्रात आमच्याच जीवाला ठाऊक!

(मराठा : डिसेंबर १९६३)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ५१०५९ वि: निबंध
क्रमांक 2903 नोंद दि: 31974६९

१४

## पुरुषोत्तम रामचंद्र लेले

मराठी रंगभूमीचे एक चोखंदळ नि व्यासंगी अभ्यासी, आग्रही नि वितंडवादी टीकाकार आणि इंग्रजी भाषेतील एक पारंगत लेखक पुरुषोत्तम रामचंद्र लेले हे एवढ्या अकस्मात कालवश होतील ह्याची कोणालाही कल्पना नसेल. निदान आम्हाला तरी नव्हती. पंधरा दिवसांपूर्वीच ते आमच्या घरी आमच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आले होते. त्यांचे वयोमान जरी पाऊणशेच्या घरात येऊन ठेपले होते, तरी प्रकृतीने ते अगदीच जरत्कारू असल्याने आम्ही त्यांना नेहमी थट्टेने म्हणत असू की, मृत्यूच्या दृष्टिपथात तुम्ही सहसा येऊ शकणार नसल्याने, तुम्हांला पुष्कळ आयुष्य लाभणार आहे. पण आमचा तो कयास चुकीचा ठरला आणि कालपुरुषाने त्यांना नेमके टिपून नेले.

बावन्न वर्षांपूर्वी पु. रा. हे पुण्याच्या भावे स्कूलमध्ये आमच्या इंग्रजी पाचव्या इयत्तेचे वर्गशिक्षक होते. त्या वेळीं ते अवघे तेवीस वर्षांचे होते. आजकालचा त्यांचा 'पंचा'वतारी पोषाख पाहून त्या काळात त्यांचा पोषाख कसा असेल ह्याची कल्पनासुद्धा कोणाला करता येणार नाही. त्या वेळीं पु. रा. हे अत्यंत फॅशनेबल तरुण होते. डोक्याचे केस उरफाटे मागे फिरवलेले, गळ्याला 'टॉय', अंगात शॉर्ट कोट, खाली विजार-पायमोजे-बूट. त्या वेळी पुणे शहराच्या 'ब्राह्मणी' वातावरणात अशा 'अप-टु-डेट' वेषभूषेत वावरणारा हिंदू माणूस अक्षरशः विरळाच! आणि त्या वेळच्या शिक्षक लोकांचे पोषाख तर काही विचारूच नका. निम्मे पगडीवाले नि निम्मे रुमाल-

वाले. टोपीवाला शिक्षक क्वचित एखादाच आणि विजारवाला अन् बोडका शिक्षक तर औषधालासुद्धा मिळावयाचा नाही. अशा वातावरणात एके दिवशी आमच्या वर्गावर जेव्हा पु. रा. हे साहेबी पोशाखात लांब लांब टांगा टाकीत आले आणि टेबलाच्या मागे उभे राहून फाड फाड अन् फर्ड्या इंग्रजीत आम्हाला शिकवू लागले तेव्हा वर्गातील आम्ही पुणेरी भटांची पोरे बसल्या जागेवरच 'ओली' झालो. आम्हाला मुळी कल्पनाच होईना की, हा माणूस मास्तर आहे का इन्स्पेक्टर आहे, हिंदू आहे का खिस्ती आहे, मुंबईहून आला आहे का विलायतेहून आलेला आहे ? काही बोधच होईना. आमच्या शाळेचे हेडमास्तर शंकरराव गोळे हे साहेबासारखे गोरे आणि साहेबांच्या वरताण इंग्रजी बोलणारे होते म्हणून इंग्रजी बोलणाऱ्या शिक्षकाची आमच्या शाळेत डाळ शिजणे कठीण होते, असे असूनही पु. रा. लेल्यांनी आपल्या ऐटबाज पोषाखाने आणि इंग्रजी वक्तृत्वाने आमच्या भावे स्कूलमध्ये थोड्याच दिवसांत आपले स्वतंत्र संस्थान स्थापन केले. त्यांनी वर्गात पाऊल टाकले रे टाकले की, वर्गात ओंकारेश्वरासारखी स्मशानशांतता पसरावयाची. आमच्या भावे स्कूलमधली एकेक पोरे शरीराने अशी आडदांड आणि उंचीने एवढी ढंगाळी की काही विचारू नका ! 'टग ऑफ वॉर' मध्ये वर्षानुवर्षे आमच्याच शाळेला पहिल्या नंबरचे 'शील्ड' मिळावयाचे; पण लेले मास्तरांसमोर आमच्या शाळेतले सारे पेहेलवान अगदी शेणामेणासारखे बसल्या जागी थिजायचे ! लेले वृत्तीने अत्यंत रागीट अन् तिरसट असत. त्यांच्या कपाळावर नेहमी आठ्या आणि ओठांवर मुरड. त्यामुळे कोणीही विद्यार्थी त्यांच्या वाऱ्याला उभा राहात नसे. शाळेच्या इतर शिक्षकांपासूनही ते अत्यंत फटकून वागत.

इंग्रजीचे उत्कृष्ट शिक्षक म्हणून त्यांनी लौकिक मिळवला नसता, तर ते भावे स्कूलमध्ये एक दिवसदेखील टिकू शकले नसते. नाटकाच्या वेडाबद्दल आमच्या शाळेची त्या वेळी भलतीच ख्याती होती. बालगंधर्व, सवाईगंधर्व, गोपाळराव मराठे ह्यांचा आमच्या शाळेशी घनिष्ठ संबंध होता. पण मराठी नाटकाबद्दलचे लेल्यांचे वेड आम्हाला त्या वेळी कधीच दिसून आले नाही. सुमारे वर्ष दीड वर्ष लेले भावे स्कूलमध्ये शिक्षक असतील. पुढे शाळा सोडून कधी नि कोठे गेले ते आम्हाला समजले नाही. पुढे वीस साली आम्ही कायद्याच्या अभ्यासासाठी जेव्हा मुंबईला आलो, तेव्हा गिरगावातल्या बाळा भागवताच्या खानावळीत त्यांची नि आमची गाठ पडली नि जुन्या आठवणी निघून त्यांची अन्



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................

आमची जी गट्टी जडली ती परवा परवापर्यंत! त्यांच्या इंग्रजी भाषाप्रभुत्वाबद्दल जरी आम्हाला त्यांच्याविषयी त्या वेळी आदर वाटत असे, तरी त्यांची नाट्यविषयक मते आम्हाला फारशी कधीही पटली नाहीत. शंकरराव मुजुमदारांनी 'रंगभूमि' नावाचे एक मासिक १९०८ ते १९११ च्या दरम्यान काढले होते. त्या मासिकात लेल्यांचे काही नाट्यविषयक लेख आम्हाला मागाहून वाचावयाला मिळाले. पण आम्हाला ते विशेष आकर्षक वाटले नाहीत. पुढे गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभावा'वर त्यांनी पुण्याच्या 'ज्ञानप्रकाशा'त आणि मुंबईच्या 'इंदुप्रकाशा'त जे फुटकळ टीकालेख लिहिले, ते वाचून तर आम्ही त्यांच्यावर अतिशयच चिडलो. 'पुण्यप्रभाव' नाटक 'हृदयात जाग्या होणाऱ्या परमेश्वराच्या प्रभावा' वर आधारलेले आहे. त्या 'ईश्वरा' ची लेल्यांनी आपल्या पत्रात खूपच टर उडविली होती. ती आमच्यासारख्या गडकऱ्यांच्या आंधळ्या भक्ताला कशी रुचणार? श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ह्यांच्याकडे त्यांचे पुष्कळ जाणे-येणे असे, हे त्या वेळी आमच्या कानावर आले होते. पण गडकऱ्यांवर टीका करणाऱ्याला आमच्या हिशेबी फारशी किंमत नसे. म्हणून मराठी नाटकाशी लेल्यांचा काही संबंध आहे किंवा त्या विषयात त्यांना काही गम्य आहे, ह्या गोष्टीकडे आम्ही त्या वेळी कधीच लक्ष दिले नाही.

१९४० साली आम्ही मुंबईस स्थायिक झालो. आमचा छापखाना काँग्रेस हाऊसच्या शेजारी होता. त्या वेळी आम्ही काँग्रेसमध्ये होतो नि लेले हे मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीमध्ये सदोबा पाटलांच्या विश्वासातले एक वजनदार सदस्य होते. त्यामुळे काँग्रेस हाऊसमध्ये जाता-येता आमच्या छापखान्यात ते अनेकदा येऊन बसत असत. रंगभूमीच्या पातळीवर त्यांचे आमचे जे प्रेम जमले नाही, ते राजकारणाच्या पातळीवर जमले. राजकारणाचा नि त्यातल्या त्यात घटनाशास्त्राचा त्यांचा अभ्यास चांगला होता. भारतीय घटनेवर त्यांनी एक उत्कृष्ट पुस्तक लिहिले आहे. पुढे सदोबांचे नि त्यांचे काय बिनसले कोणास ठाऊक ते मुंबई काँग्रेसमधून बाहेर पडले. मध्यंतरी मामा वरेरकरांची नि त्यांची दोस्ती जमली आणि मामांच्या नादाने लेल्यांनी अनेक उपद्व्याप केले. म्हणून शिष्य-गुरूचे नाते विसरून आम्हांला लेल्यांवर अनेकदा कडाडून हल्ला करावा लागला. संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेला लेल्यांचा प्रारंभी विरोध होता. त्याबद्दलही त्यांची पुष्कळदा आम्हांला हजेरी घ्यावी लागली. पण मागाहून मात्र त्यांनी निःसंकोचपणे संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा दिला. लेले हे स्वभावाने अत्यंत

फटकळ आणि दुराग्रही होते. एखाद्याबद्दल त्यांचा काही पूर्वग्रह झाला असला तर तो बदलण्याची त्यांची कधीही तयारी नसे. त्यामुळे चांगले चांगले मित्र त्यांनी गमावले आणि अनेकांना शत्रू करून ठेवले. म्हणून त्यांच्याबद्दल चांगले बोलणारी माणसे फारच क्वचित आढळत. कोणी कितीही मोठा माणूस असो, त्याच्याबद्दल एक तरी बाष्कळ गोष्ट लेल्यांच्या संग्रही असलीच पाहिजे, हे अगदी ठरून गेल्यासारखे होते. प्रत्येक मोठ्या माणसाविरुद्ध त्यांची काही ना काही तरी तक्रार असे. म्हणून त्यांचे टोपणनाव 'पीर' लेले किंवा 'पिरपिर' लेले असे पडले होते. त्यांच्या अंगातल्या काही काही विचित्रपणाला तर सुमारच नव्हता. ढवळे कंपनीसाठी त्यांनी एक कसले तरी पुस्तक लिहिले. त्यात 'मरणात खरोखर जग जगते' ही भास्करराव तांब्यांची कविता त्यांनी गोविंदाग्रजांच्या नावावर घातली होती. ती चूक आम्ही पत्रे लिहून लेल्यांच्या नि ढवळ्यांच्या निदर्शनाला आणली. तेव्हा लेल्यांनी आम्हांला उत्तर दिले की, 'आणखी शंभर वर्षांनी तांबे कोण नि गडकरी कोण हे महाराष्ट्राला माहीतही असणार नाही!' प्रकाशक ढवळे तर बोलून चालून मूर्खच! त्या दोघांनीही आमच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. शेवटी त्यांच्या त्या दुराग्रहाचा परिणाम असा झाला की, सरकारने त्यांचे ते पुस्तक नामंजूर केले!

'डेक्कन कॉलेजात' नावाची त्यांनी एक कादंबरी लिहिली. पण तिच्यात विद्यार्थ्यांच्या समसंभोगाची किळसवाणी वर्णने सूचित करून अन्यथा उत्तम असलेल्या कादंबरीचे वाटोळे करून टाकले. 'नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी' गेल्यानंतरही तेथल्या चांगल्या गोष्टी शोधून काढण्यापेक्षा नटांच्या खाजगी भानगडी हुडकून काढण्याकडेच त्यांची जास्त प्रवृत्ती आढळून येते. आमच्या 'तो मी नव्हेच' या नाटकाच्या तिसऱ्या अंकात 'गणपतराव जोशी, गणपतराव भागवत आणि गणपतराव बोडस' या महाराष्ट्रातल्या तीन नट-श्रेष्ठांचा उल्लेख आहे. त्याबाबत पु. रा. नी आम्हांला पत्र लिहून 'त्या यादीतून गणपतराव भागवत आणि गणपतराव बोडस ही दोन नावे काढून टाकावीत,' असे आम्हांला अत्याग्रहाने सुचविले. त्याबाबत त्यांचा नि आमचा समक्ष पुष्कळच वाद झाला. लेले आपले हाडकुळे हातवारे करीत म्हणाले, "गणपत-राव भागवत अन् गणपतराव बोडस हे मुळी नटच नव्हेत!" आम्ही त्यांच्यापेक्षाही जास्त जोरदार अंगविक्षेप करीत म्हणालो, "आम्ही गणपतराव भागवतांना काही प्रत्यक्ष पाहिले नाही, पण त्यांच्यासारखे 'कीचका'चे नि



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम........................ दि: ........................
........................ नों: दि: ........................

'राघोबा'चे काम पुन्हा मराठी रंगभूमीवर झालेच नाही, असे त्या वेळी आमच्या मनावर झालेले संस्कार आम्हांला अद्याप आठवताहेत; आणि गणपतराव बोडसांच्याबद्दल तर बोलूच नका. ते आमचे श्रद्धास्थान आहे. ते आमचे पूजास्थान आहे. लक्ष्मीधर, सुधाकर अन् फाल्गुनराव अशा विविध रसांच्या वैशिष्ट्यपूर्ण भूमिका करणारा गणपतराव बोडसांसारखा प्रभावी नट महाराष्ट्रात पुन्हा होणारच नाही!" पण भागवत-बोडसांच्याबद्दलचा वेडगळ दुराग्रह पु. रा. नी शेवटपर्यंत सोडला नाही, आणि त्याबद्दल आम्ही त्यांची टर उडवण्याची कोणतीही संधी गमावली नाही.

अलीकडे दोन वर्षांमध्ये 'नाटककार खाडिलकर' आणि 'महाराष्ट्राचे दुसरे वेड' हे जे दोन ग्रंथ पु. रा. नी लागोपाठ लिहिले, त्यामुळे त्यांचे नाव मराठी साहित्यात विशेष आदराने उल्लेखिले जाईल. 'नाटककार खाडिलकर' ह्या ग्रंथाचा गौरव (त्यातील पूर्वग्रहदूषित मते वजा करून) आम्ही 'मराठ्या'च्या अग्रलेखात यापूर्वीच केलेला आहे. 'महाराष्ट्राचे दुसरे वेड' ह्या ग्रंथात यशस्वी विनोदी नाटककार म्हणून त्यांनी आमचा जो महान गौरव केला आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार प्रत्यक्षच मानले होते. अनेक व्यक्तींबाबत नि घटनांबाबत पु. रा. चा नि आमचा मूलभूत मतभेद असून आम्हां उभयतांचे एकमेकांबद्दल विलक्षण प्रेम होते. गेल्या सहा महिन्यांत तर असा एक पंधरवडा नसेल की ज्यात ते आमच्या घरी आले नाहीत; आणि एकदा ते घरी आले की दोन दोन तास नाना विषयांवर आमच्या तोंड भरून गप्पा चालत. 'भावे स्कूल' हा त्यांच्या नि आमच्या स्नेहामधला एक जबरदस्त दुवा होता. 'भावे स्कूल' या नावाचे त्या कालातल्या कल्पनारम्य आठवणींचे एक काव्यमय पुस्तक आम्ही लिहून ते त्यांना अर्पण करावयाचे असे आमचे थोड्या दिवसांपूर्वीच ठरले होते. असो. पु. रा. हे विचित्र तर खरेच, पण त्यांच्या 'विचित्र'पणातही एक प्रकारचा 'सचित्र'पणा होता. त्यांच्या 'चक्रम'पणातही एक तऱ्हेचा 'विक्रम' होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक नव्हते, पण ते उपेक्षणीयही नव्हते. त्यांचा राग येई, पण त्यांची मौजही वाटे. मराठी माणसांच्या अंगातले सारे गुणदोष त्यांच्या अंगात अतिरेकी स्वरूपात वास्तव्य करून होते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे पु. रा. लेले ही गेल्या पिढीतली महाराष्ट्रातली एक रंगदार अन् अविस्मरणीय 'वल्ली' होऊन गेली, यात मुळीच शंका नाही!

(मराठा : ३-६-१९६५)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम.............. दि: ..............
क्रमांक .............. नों: दि: ..............

# १५

## भीमराव खंडेराव कोरान्ने

जुन्या पिढीतील एक नामवंत नि अभिजात साहित्यिक आणि अर्ध शतकाच्या वर ज्येष्ठ बंधूप्रमाणे आमच्यावर ममता करणारे आमचे परममित्र भीमराव खंडेराव ऊर्फ भाऊराया कोरान्ने हे दहा जून रोजी पहाटे वयाच्या एक्यायशीआव्या वर्षी विलेपारले येथे आपल्या राहत्या घरी निधन पावले, ही दुःखद वार्ता आम्ही गेल्या रविवारच्या अंकात प्रसिद्ध केलेली आमच्या वाचकांनी वाचलेली असेलच. दि. २७ मे रोजी अतिसाराच्या विकाराने ते रुग्णाईत झाल्यामुळे त्यांना ताबडतोब के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये हालवण्यात आले. तेथे त्यांना स्वतंत्र खोलीमध्ये ठेवण्यात आले होते. त्यांचे मावसभाऊ कै. डॉ. अ. ना. भालेराव ह्यांचे चिरंजीव डॉ. बाळ भालेराव ह्यांची त्यांच्यावर विशेष देखरेख होती. वार्धक्यामुळे भाऊरायांच्या अंगी अत्यंत अशक्तता आलेली होती. तथापि, त्यांची प्रकृती हळूहळू सुधारत असल्याचे आम्हांला खंडाळा मुक्कामी त्यांच्या घरून कळविण्यात आले होते. म्हणून थोड्याच अवधीत त्यांच्या प्रकृतीला आराम वाटेल अशी साहजिकच आम्हांला आशा वाटत होती. तथापि, काही दिवसांनी त्यांच्या दम्याच्या जुन्या दुखण्याने उचल खाल्ली. त्यांचे हृदयही क्षीण झाल्याची चिन्हे दिसू लागली, आणि आपल्याला हॉस्पिटलातून घरी नेण्यात यावे असा त्यांनी ध्यास घेतला. म्हणून 'ॲम्ब्युलन्स'-मधून त्यांना विलेपारले येथील त्यांच्या 'चिमणाराम मंदिरा'तील निवासस्थानी नेण्यात आले. त्याच रात्री त्यांची प्राणज्योत रामरूपी विलीन झाली.

गेल्याच वर्षी भाऊरायांचा ऐशीआवा वाढदिवस त्यांच्या मित्रांनी आणि आप्तांनी आमच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटामाटाने विलेपारले येथे साजरा केला होता. आम्ही अनेक साहित्यिकांचे नि समाजसेवकांचे वाढदिवस पाहिलेले आहेत. पण भाऊरायांच्या ह्या वाढदिवशी त्यांच्याशी नाना तऱ्हेच्या ऋणानुबंधांनी निगडित झालेल्या स्त्रीपुरुषांनी त्यांच्यावर अश्रुपूर्ण भावनांचा जो अनावर वर्षाव केला, तो पाहून आम्ही स्वतः इतके सद्गदित झालो की, आमच्या तोंडून शब्दच मुळी फुटेनासे झाले. भाऊरायांच्या आयुष्यामध्ये जो जो कोणी म्हणून त्यांच्या सहवासात आला, तो भाऊरायांच्या प्रेमळ अन् मायाळू व्यक्तिमत्त्वावर लुब्ध झाल्याखेरीज मुळी राहिलाच नाही. त्या दृष्टीने भाऊराया हे एक संत पुरुषच होते. 'ऐसी कळवळ्याची जाति । करी लाभाविण प्रीती' असा त्यांचा देहस्वभावच झाला होता. 'दीपा नाही पाठीपाटी अंधकार । सर्वांगे साकर अवघी गोड' या नियमाप्रमाणे विशुद्ध प्रेमाने भाऊरायांचे देहकण अंतर्बाह्य ओथंबून गेलेले होते. त्रेपन्न वर्षांपूर्वी भाऊरायांची आणि आमची प्रथम ओळख झाली. पुणे शहरात आम्ही सरदार पुरंदऱ्यांच्या ज्या 'जुन्या कोटा'त राहात होतो तेथेच भाऊरायांचे एक आप्त राहात होते. भाऊराया त्या वेळी मुंबईत पोस्टात नोकरीस होते. तथापि, असे असून त्यांचे श्वशुर कै. एकनाथपंत भांडारे ह्यांच्यामुळे त्यांना वाङ्मयाचा नाद लागला. एकनाथपंत भांडारे हे एक मराठी भाषेतले नामांकित कवी होऊन गेले. विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विद्यार्थ्यांनी जे 'शिष्यजनविलाप' नावाचे काव्य लिहिले, त्याच्या लेखनात हरि नारायण आपटे ह्यांच्यासमवेत एकनाथपंत भांडारेही होते. त्या वेळी हरिभाऊंचे 'करमणूक' हे साप्ताहिक अतिशय लोकप्रिय होते. ह्या साप्ताहिकातर्फे त्या काळी लघुकथांची एक स्पर्धा जाहीर झाली. एकनाथपंतांना वाटले की, आपल्या जामातांनी त्या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा. तथापि, भाऊरायांना त्यापूर्वी लेखनाचा कसलाही अनुभव नव्हता, पण आपल्या श्वशुरांच्या उत्तेजनाने त्यांनी 'तिजोरीच्या किल्ल्या' ही आपली पहिली गोष्ट घाईघाईने कशीतरी लिहिली. तथापि, ती त्यांना स्वतःलाच न आवडल्याने त्यांनी ती फेकून दिली. पण एकनाथपंतांनी त्या गोष्टीची सुवाच्य नक्कल करून परस्परच हरिभाऊंकडे पाठवून दिली, आणि आश्चर्याची गोष्ट ही की, 'करमणुकी'च्या कथास्पर्धेत भाऊरायांच्या त्या गोष्टीला पहिले बक्षीस मिळाले.

ह्याच सुमारास भाऊरायांची नि आमची ओळख झाली. 'तिजोरीच्या

किल्ल्या 'मुळे त्या काळी भाऊरायांच्या नावाचा पुष्कळच बोलबाला झाला. त्यानंतर अनेक मासिकांतून त्यांच्या गोष्टी हळूहळू प्रसिद्ध होऊ लागल्या. पुण्याच्या मुक्कामात भाऊराया एखादी तरी गोष्ट लिहावयाचे, आणि ते ती लिहीत बसले असताना आम्ही लांब बसून अत्यंत स्तिमित नेत्रांनी त्यांच्याकडे टक लावून पाहात बसलेले असू. त्यांच्यामुळेच आम्हालाही लघुकथालेखनाची स्फूर्ती मिळाली, ह्या गोष्टीचा आम्ही आमच्या आत्मचरित्रात उल्लेख केलेलाच आहे. १९१४ साली आम्ही ' महाराष्ट्र–मोहरा ' ही आमची पहिली कादंबरी लिहिली. ती वाचून भाऊरायांनी आमचे एवढे कौतुक केले की आमच्या समाधानाला अन् आनंदाला पारावार राहिला नाही. दुसऱ्यांचे कौतुक करावयाचे नि दुसऱ्यांना उत्तेजन द्यावयाचे ह्या भाऊरायांच्या स्वभाव-वैशिष्ट्याचा परिचय आम्हांला तेव्हापासून आहे. भाऊरायांच्या स्फुट कथांचा संग्रह त्या काळी ' मंजुगुंजावलि ' या नावाने प्रसिद्ध झाला. त्याचा त्या वेळी सर्वत्र उत्तम तऱ्हेने सत्कार झाला. त्याखेरीज ' सद्गुणी माधव ', ' सुशील गोदावरी ' अशा त्यांच्या सात-आठ दीर्घकथा पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्या. आपल्या लेखनाने समाजातील कौटुंबिक वातावरणाचे पावित्र्य आणि मांगल्य यत्किंचित दूषित होता कामा नये, अशा सावधगिरीने भाऊराया आपल्या लघुकथा लिहीत असत. त्यामुळे तरुण मुलां-मुलींमधे त्यांच्या कथा त्या काळी चांगल्याच लोकप्रिय झाल्या होत्या. त्यानंतर त्यांनी ' अहंकार ' आणि ' जयशंकर ' ही दोन नाटके लिहिली. ती रंगभूमीवरही पण आली होती.

भाऊरायांच्या विनीत आणि भिडस्त स्वभावामुळे आत्मप्रसिद्धीचा त्यांनी कधीही हव्यास धरला नाही. त्यामुळे भाऊरायांनी वयोमानपरत्वे जसा लेखन-संन्यास घेतला, तसे त्यांचे नाव साहित्यक्षेत्रातून हळूहळू अस्तंगत होत गेले आणि आजच्या पिढीला त्यांची आठवणही शिल्लक उरलेली नाही. तथापि भाऊरायांचे साहित्याचे वेड मात्र आयुष्यात कधी कमी झाले नाही. ' मुंबई मराठी साहित्यसंघा 'चे संचालक आणि सूत्रधार डॉ. अ. ना. भालेराव हे त्यांचे मावसभाऊ होते. त्यांच्यावर भाऊरायांची अतीव श्रद्धा होती. १९२० साली डॉ. भालेरावांनी मुंबईत ' अरविंद ' हे मासिक काढले. त्या वेळी डॉ. भालेराव अवघे अठरा वर्षांचे होते. ' संपादक ' म्हणून जरी त्या मासिकावर डॉ. भालेरावांचे नाव घालण्यात आलेले होते, तरी त्या मासिकाची सर्व संपादकीय व्यवस्था भाऊरायांकडेच सोपविण्यात आलेली होती. ती आपली जबाबदारी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................

भाऊरायांनी उत्तम तऱ्हेने पार पाडली. त्यानंतर डॉ. भालेरावांनी ' मुंबई मराठी साहित्यसंघ ' स्थापन केला. ह्या संघाच्या कार्यकारी मंडळात जरी भाऊरायांचे नाव प्रत्यक्ष कुठेही नसले, तरी संघाच्या प्रत्येक कार्यामधे भाऊरायांचा डॉ भालेरावांना संपूर्ण पाठिंबा असे. प्रत्येक लहानसहान कामात डॉ. भालेराव भाऊरायांचा सल्ला घेत असत. त्यामुळे डॉक्टरांना भाऊरायांचा फार मोठा आधार वाटत असे. गेल्या वर्षी जेव्हा मुंबई मराठी साहित्यसंघाच्या ' डॉ. भालेराव नाट्यमंदिरा 'चे उद्घाटन झाले, तेव्हा त्या प्रसंगी वार्धक्यावस्थेतही भाऊराया मुद्दाम उपस्थित राहिले. आपल्या आयुष्यातले आवडते स्वप्न साकार झालेले पाहण्यास डॉ. भालेराव हयात असू नयेत, या विचाराने भाऊराया एखाद्या लहान मुलाप्रमाणे त्या वेळी ढसाढसा रडले.

डॉ. भालेरावांप्रमाणे भाऊरायांचे व्यक्तिशः आमच्यावरही प्रेम होते. गेल्या कित्येक वर्षांत आमच्या आयुष्यातला आनंदाचा किंवा सन्मानाचा कोणताही प्रसंग असो, भाऊरायांनी त्याबद्दल अभिनंदनपर पत्र आम्हांला लिहिले नाही असे एकदाही कधी झाल्याचे आम्हांला आठवत नाही. सेवानिवृत्त झाल्यानंतर गेली तीस वर्षे भाऊरायांचे वास्तव्य विलेपारले येथे होते. तेथे त्यांनी आपल्या कर्तृत्वावर ' चिमणा राममंदिरा 'ची उभारणी केली. हे ' राममंदिर ' म्हणजे नुसतेच पूजेचे किंवा उपासनेचे स्थान नव्हते. तर त्याला भाऊरायांनी सांस्कृतिक आणि साहित्यिक केंद्राचेही स्वरूप दिले होते. रामनवमीच्या उत्सवात ते अनेक साहित्यिकांना बोलावीत आणि त्यांपैकी कोणाचे तरी कीर्तन, कोणाचे तरी भाषण, नाही तर कोठल्या तरी मनोरंजक साहित्यविषयावर चर्चा, असा वर्षानुवर्षे कार्यक्रम ते योजीत आले होते. अशा कार्यक्रमाला ते श्रीनिवास नारायण ताडपत्रीकर, लक्ष्मीकांत रंगाचार्य रेड्डी, प्रा. कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी किंवा अहमदाबादचे प्रा. रामचंद्र बळवंत आठवले ह्यांच्यासारख्या आपल्या विद्वान आणि रसिक मित्रांना मोठ्या अगत्याने बोलावीत असत. दोन-तीन वेळा आग्रहीही या कार्यक्रमात भाग घेतलेला आम्हांला आठवतो. प्रा. आठवले ह्यांचा नि त्यांचा तर विलक्षण लोभ होता. त्याचे वर्णनही करता येणार नाही. भाऊरायांच्या मृत्यूच धक्का त्यांना तर असह्यच होईल. आपल्या आयुष्याची शेवटची पंचवीस वर्षे भाऊरायांनी निर्भेळ समाजसेवेत घालविली. आपल्या भोवतालच्या मंडळीवर प्रेम करण्यात आणि त्यांची आपल्या हातून होईल ती सेवा करण्यातच ते आपला उर्वरित काळ ' तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ' या भावनेने घालवीत

होते. त्यांच्या मृत्यूने महाराष्ट्रातला एक साधुवृत्तीचा साहित्यिक आणि सोज्वळ समाजसेवक नाहीसा झालेला आहे. भाऊरायांच्या आत्म्याला शांती मिळो अशी परमेश्वराला प्रार्थना करण्याची आवश्यकताच नाही. कारण जिवंतपणीच त्यांच्या आत्म्याला ती शांती लाभलेली होती.

(मराठा : १५-६-१९६५)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों दि: ..................

## १६

# मायदेव

स्वरमधुर नि भावललित काव्यकूजन करणारे महाराष्ट्राचे एक श्रेष्ठ कवी आणि आजन्म स्त्रीशिक्षणाचे कार्य निष्ठेने अन् श्रद्धेने करणारे एक थोर समाजसेवक प्रा. वासुदेव गोविंद मायदेव, एम्. ए. ह्यांच्या निधनाची वार्ता ऐकून त्यांच्या काव्याशी नि कार्याशी परिचित असणाऱ्या मंडळींना पराकाष्ठेचे दुःख होईल यात काय शंका ? पण अर्धशतकाहूनही अधिक काळ ज्यांची नि आमची मैत्री होती आणि अलीकडे अलीकडे तर त्या मैत्रीला एक निराळीच पक्वता नि गोडी प्राप्त झाली होती, त्यांच्या अनपेक्षित मृत्यूची अकस्मात वार्ता ऐकून आमच्या मनाची काय स्थिती झाली असेल त्याची कल्पना शब्दांनी कशी करून द्यावी ? हृदयविकृती नि पक्षघात ह्या व्याधींनी त्यांच्या शरीराभोवती आपले पाश पूर्वीच टाकले होते हे खरे, पण सुदैवाने त्यातूनही त्यांनी आपली पुष्कळशी सोडवणूक करून घेतली होती नि स्थिर चित्ताने, सस्मित मुखाने आणि पूर्वीच्याच आत्म-विश्वासाने त्यांनी आपला जीवनक्रम चालू ठेवला होता. आठवड्यातून एकदा तरी त्यांचा फोन यावयाचा नि पंधरवड्यातून बहुधा एखाद्या सकाळच्या वेळी आम्हाला भेटण्यासाठी ते ' शिवशक्ती 'त यावयाचे. महिन्यातून दोन-तीन दिवस तरी आपण एकमेकांच्या सहवासात घालवावयाचे असे आम्ही नुकतेच ठरविले होते. पण त्या कराराची अंमलबजावणी करण्याची वेळ दुर्दैवाने आतापर्यंत आलीच नाही. मध्यंतरी ते पुण्याला केव्हा गेले नि त्यांचा शेवटचा आजार अचानक कसा विकोपाला गेला ह्याची आम्हाला काहीच माहिती नव्हती.

म्हणून ध्यानीमनी नसता त्यांच्या निधनाची वार्ता जेव्हा एकदम आमच्या कानावर आदळली, तेव्हा आमचा तिच्यावर विश्वासच बसेना! धरणीकंपाचा धक्का बसावा अशी आमची स्थिती झाली.

काही वेळाने आम्ही अंतर्मुख झालो. गेल्या अर्धशतकाचा चित्रपट आमच्या डोळ्यांसमोरून झरझर सरकू लागला. मायदेवांची नि आमची पहिली ओळख १९१५ मध्ये फर्ग्युसन कॉलेजात झाली. आम्ही पहिल्या वर्षात होतो नि मायदेव आमच्या पुढे तीन वर्षे म्हणजे बी. ए. च्या पहिल्या वर्षात होते. ह्याच सुमारास प्रा. वैजनाथ काशीनाथ राजवाडे हे फर्ग्युसनमधून निवृत्त झाले. त्यांना निरोप देण्याचा मोठा समारंभ ॲंफी-थिएटरमध्ये झाला. त्या प्रसंगी गुरुवर्य राजवाडे यांच्याबद्दल आदर भावना व्यक्त करणाऱ्या ज्या चार-पाच कविता गाऊन दाखविण्यात आल्या, त्यांमध्ये जशी आमची एक कविता होती, तशाच मायदेव, धोंडो वासुदेव गद्रे ( काव्यविहारी ), वेणू केळकर ( पुढे मोडक ) नि विश्वास आनंद सत्राळकर ( पुढे रे. सत्राळकर ) ह्यांच्या कविता होत्या. त्या निमित्ताने आमच्या एकमेकांशी ओळखी झाल्या. तथापि, त्यांपैकी मायदेव अन् काव्यविहारी ह्यांचे नि आमचे जे विशेष स्नेहसंबंध जडले ते अगदी आजतागायत.

मायदेवांच्या नि आमच्यामध्ये चार वर्षे अंतर होते. ते १८९४ चे नि आम्ही १८९८ चे. पुढे १९१६ साली ते बी. ए. होऊन महर्षी कर्वे ह्यांच्या महिला शिक्षणसंस्थेचे आजीव सदस्य नि प्राध्यापक झाले. मुद्रा सदैव प्रफुल्लित, ओठावर सौम्य स्मित, डोळे चमकदार अशी मायदेवांची ती आटोपशीर बांध्याची प्रसन्न आकृती कोणाचेही मन आकर्षित करून घेईल अशीच होती. त्यांचा बोलता आवाज जितका मृदू नि प्रभावी, तितकाच त्यांचा गाता आवाज विलक्षण मधुर अन् मुलायम. प्रारंभी प्रारंभी 'वनमाळी' या टोपणनावाने ते आपल्या कविता प्रकाशित करीत असत. तथापि त्यामुळे त्यांना जेवढी प्रसिद्धी मिळाली नसेल तेवढी गायक कवी म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली. महाराष्ट्रात काव्य-गायन करण्याचा उपक्रम पहिल्याने कोल्हापूरचे सुमंत, नागपूरचे आनंदराव टेकाडे ह्या कवींनी सुरू केला, आणि 'हा हिंद देश माझा' ही टेकाड्यांची कविता त्यांच्या गायनानेच महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात जाऊन पोहोचली. पण त्यांची काव्य-गायनाची धाटणी बरीचशी तारस्वरातली होती. त्याच्या उलट मायदेवांचे काव्य-गायन हे सनईसारखे मंजुळ नि हृदयस्पर्शी असे. भावनेला आवाहन करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या सुरावटीत होते. आम्ही त्यांचे



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... दि: ....................
.................... ....................

काव्य-गायन फर्ग्युसन कॉलेजात पहिल्याने ऐकले. त्यात त्यांनी स्वतःच्या कविता म्हणून न दाखविता महाराष्ट्रातल्या नामवंत कवींच्या काही निवडक कविता म्हणून दाखविल्या. त्या वेळी त्यांनी केशवसुतांच्या 'घुबड' ह्या कवितेला जी चाल लावली होती ती अद्याप आमच्या स्मरणात आहे.

"श्यामा राणी गभीर रजनी
अलंकृता जी नक्षत्रगणी
नेत्र आ पुले ठंच वनी
बसुनी राज्यासनी दरारा
दावित आहे जो फार !
समोरच्या चिंचेवरुनि तो
घुबड तियेचा बंदीजन तो,
घूघू घूघू महिमा तीचा
वर्णी करुनी घूत्कार !"

हे त्या कवितेचे पहिले कडवे गाऊन दाखविताना 'रात्रीच्या वेळी चिंचेवरून घूत्कार करणाऱ्या घुबडाचे दृश्य' मूर्तिमंत आमच्या डोळ्यांपुढे मायदेवांनी उभे केले.

केशवसुतांच्या काव्याइतकेच भास्करराव तांबे ह्यांच्या काव्याचे मायदेवांना जबरदस्त आकर्षण होते. ते पुढे इतके वाढत गेले, की मायदेव संपूर्ण तांबेमय झाले. तांब्यांची 'कळा ज्या लागल्या जीवा' ही गझल मायदेव इतक्या आर्त नि व्याकुळ स्वरात गात की, तिच्या प्रत्येक शब्दाशब्दाने काळजाची काल्वा-काल्व होई. अशा रीतीने तांब्यांची अनेक भावमधुर काव्ये वेळोवेळी गाऊन दाखवून महाराष्ट्राला तांब्यांची खरीखुरी ओळख मायदेवांनीच करून दिली असे म्हणावे लागेल. त्यांच्या स्वतःच्या काव्यावरदेखील तांब्यांच्या नादमाधुर्याचा नि लालित्याचा अतिशय परिणाम झाला. 'भावतरंग' हा त्यांच्या स्फुट काव्याचा पहिला काव्यसंग्रह होय. हा संग्रह लहानच आहे, पण त्यातल्या काही कविता विलक्षण भावमधुर आहेत. 'लतांनो, सांगु का तुम्हां उद्या श्रीराम येणार !' आणि 'हे चिमण्या चंद्रा, पाहुनि तुजला खचतो माझा धीर !' ही त्यांची दोन काव्ये त्या वेळी अत्यंत लोकप्रिय झालेली होती. मायदेव फार थोडे लिहीत. पण जे लिहीत त्यात त्यांच्या प्रतिभेचे काही तरी विलक्षण वैशिष्ट्य प्रकट झालेले असे. त्यांचे लहान लहान काव्यसंग्रह अधूनमधून प्रकाशित होत होते. पुढे त्यांनी

लहान मुलांसाठी ' शिशुगीते ' नि ' अभिनय गीते ' लिहिली तीही अतिशय लोकप्रिय झाली. ' चला सुटी झाली आता खूप खूप खेळायचे ' हे त्यांचे शिशुगीत आम्ही आमच्या ' नवयुग बालवाचन 'मधे घेतले होते. त्याने लोकप्रियतेचा अगदी उच्चांक गाठला.

तथापि कॉलेजच्या तरुण विद्यार्थ्यांत त्यांचे काव्यगायन जे पराकाष्ठेचे लोकप्रिय झाले ते त्यांच्या ' फसल्ये ग बाई । सुख कपाळि माझ्या नाही ' आणि ' बघ हिची हौस । हिज हवा ग आय. सी. एस. ' या दोन विनोदी कवितांनी. मायदेवांच्या प्रतिभेचा तो अगदी निराळाच पैलू होता. एका कवीशी लग्न केल्यामुळे आपली कशी फसगत झाली, याचे बहारदार वर्णन पहिल्या कवितेत एक गृहिणी करीत आहे, तर एका काळी महाराष्ट्रातल्या पदवीधर मुलींना ' आय. सी. एस. ' नवरा हवा असे, ह्या त्यांच्या हव्यासाची फर्मास चेष्टा दुसऱ्या कवितेमधे करण्यात आलेली आहे. मायदेव कुठेही काव्यगायनाला गेले की या दोन कवितांच्या नावाने श्रोते प्रचंड गिल्ला करून त्यांना भंडावून सोडीत. त्यामुळे पुढे पुढे मायदेव काव्यगायनाचा कार्यक्रम चुकवू लागले आणि गेलेच कुठे तर त्यासाठी, तर तेवढ्या दोनच कविता वगळून ते आपल्या इतर कविता म्हणत असत. त्यामुळे त्यांचे काव्यगायन हळूहळू मागे पडले, आणि वाढत्या वयाबरोबर त्यांच्या आवाजातले पहिले माधुर्यही ओसरत गेले.

त्यांनी एकंदर चौदा काव्यसंग्रह ( दोन खंडकाव्ये धरून ) प्रसिद्ध केले. भास्करराव तांबे ह्यांची नि स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांची समग्र कविता संपादून प्रसिद्ध केली. १९६२ साली ' वेचलेले क्षण ' हे तीनशे पानांचे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. तेच त्यांचे शेवटचे प्रकाशन ! अलीकडे कित्येक वर्षे त्यांनी हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेसाठी निधी जमा करण्याच्या कार्याला स्वतःला इतके वाहून घेतले होते, की त्यामुळे काव्याकडे नि साहित्याकडे लक्ष द्यायला त्यांना सवडच मिळाली नाही, आणि गेल्या दोन पिढ्यांना तर त्यांच्या भावमधुर काव्याची आठवणसुद्धा राहिली नाही. गेली कित्येक वर्षे त्यांना अध्यात्माची गोडी लागली होती. संत ज्ञानेश्वरांचे त्यांना सर्वांत जास्त आकर्षण होते. ' ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली नसून आत्महत्या केली ' हे वि. द. घाटे ह्यांनी ' दिवस असे होते ' या आपल्या आत्मचरित्रात ( पान ४९८ ) जे विलक्षण विधान केले आहे, ते वाचून त्यांना विलक्षण दुःख झाले. त्यांनीच त्या विषयाकडे आमचे लक्ष्य वेधले नि तत्संबंधी काही ग्रंथ आणून आमच्या हवाली केले. त्यावर त्यांनी जो एक लहानसा लेख



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................

लिहून आमच्याकडे पाठविला होता, तो आम्ही ' मराठा 'मध्ये छापलाही होता. तोच त्यांचा शेवटचा लेख !

उभ्या आयुष्यात त्यांनी कोणाचा बोल लावून घेतलेला नाही. कोणालाही कसला त्रास दिला नाही. आपल्या कौटुंबिक जीवनात ते सदैव सुखी नि संतुष्ट असत. अनेक व्यक्तिगत दुःखे त्यांनी पचविली, पण त्यामुळे त्यांच्या तोंडावरचे हसू कधी मावळले नाही, आणि आयुष्यातील प्रत्येक क्षण न् क्षण त्यांनी समाजसेवेत नि परोपकारात वेचला! आमची त्यांची घनिष्ठ मैत्री होती असे आम्ही म्हणू शकणार नाही. पण आमच्यावर त्यांची माया होती. त्या जिव्हाळ्याने ते आम्हांला अधूनमधून भीत भीत हळूच एखादा इशारा देत! तो त्यांचा अधिकारही होता. त्यांनी आपले आत्मचरित्र ज्या शब्दांनी संपविले त्याच शब्दांचा पुनरुच्चार करून ही श्रद्धांजली त्यांच्या स्मृतीला आम्ही वाहतो. " मी आपल्या जीवनपथावर बरीच वाटचाल केली आहे. माझे बरेच सोबती माझे आधी कधीच निघून गेले आहेत. मलाही माझे पाउल कधी तरी थांबवावे लागेल हे मी जाणून आहे. त्या प्रसंगाला माझ्या मनाची पूर्ण तयारी आहे. जगाने माझी उपेक्षा केलेली नाही. मला काही उणे पडू दिलेले नाही. उलट माझ्या योग्यतेपेक्षा जास्त प्रेम, पैसा व मान मला मिळवून दिला आहे. त्याबद्दल मला पूर्ण समाधान आहे. म्हणूनच मृत्यूला उद्देशून पुढील ओळी म्हणण्यात मला काहीच हरकत वाटत नाही.

ये जेव्हा येणार मंगला,
ये जेव्हा येणार !
आल्यावरती खोटी क्षणभर
नाहि तुझी करणार ! "

( मराठा : २-४-१९६९ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

# १७

## मंगेशराव कुळकर्णी

महाराष्ट्रातले एक नामवंत मुद्रक आणि प्रकाशक, मंगेश नारायण कुळकर्णी हे वयाच्या ८१ व्या वर्षी नुकतेच निधन पावले. एक वेळ अशी होती की, ‘ कर्नाटक प्रेस ’ म्हटला की, मंगेशरावांचे नाव डोळ्यांसमोर उभे राहावयाचे नि मंगेशराव कुळकर्णी ह्यांचे नाव उच्चारले की, त्यांचा ‘ कर्नाटक प्रेस ’ समोर दिसू लागायचा. मुद्रणसौंदर्याबद्दल मुंबईतल्या ‘ निर्णयसागर छापखान्या ’चे नाव वर्षानुवर्षे ज्याच्या त्याच्या तोंडी असे. पण त्या ‘ निर्णयसागर ’च्या लोकप्रियतेच्या जमान्यात मंगेशरावांनी आपल्या ‘ कर्नाटक छापखान्या ’ची कीर्ती उत्कृष्ट आणि कलात्मक छपाईबद्दल महाराष्ट्राच्या या सीमेपासून त्या सीमेपर्यंत पसरविली होती. केवळ मराठी छपाईबद्दलच नव्हे, तर इंग्रजी छपाईबद्दलही ! ‘ टाईम्स ऑफ इंडिया ’च्या तोंडात मारील असे त्यांच्या ‘ कर्नाटक ’चे इंग्रजी मुद्रण असे. इतका सुंदर मराठी नि इंग्रजी टाईप त्यांनी कसा निर्माण केला आणि कोणाच्या देखरेखीखाली तो केला, ह्याचे सर्वांना कायमचे जणू काही कोडे पडलेले असे. कर्नाटक छापखान्यात छापलेले कोणतेही मराठी वा इंग्रजी पुस्तक असो, ते हजार पुस्तकांत कसेही ठेवलेले असले तरी पाहताक्षणीच एकदम डोळ्यांत भरल्याखेरीज राहत नसे.

नुसत्या मुद्रणकलेतील कीर्तीवर ज्यांनी आपले नाव महाराष्ट्रात सर्वतोमुखी केले होते, असे त्या काळातले माझ्या माहितीचे मंगेशराव कुळकर्णी हे मुंबई-मधले एकच मुद्रक होते. वस्तुतः, तसे ते काही फारसे शिकलेले नव्हते, आणि

मुद्रणकलेचे त्यांना तर मुळीच ज्ञान नव्हते. पण त्यांचे थोरले बंधू मुंबईत प्रथम येऊन मुद्रण व्यवसायात पडले. त्यांनी 'कर्नाटक प्रेस'ची स्थापना केली. पण वडील बंधू पुढे आजारी पडले आणि त्यातच त्यांचे निधन झाले. तेव्हा साहजिकच तो छापखाना चालविण्याची सर्व जबाबदारी मंगेशरावांच्या शिरावर येऊन पडली. पण ती जबाबदारी त्यांनी इतक्या चांगल्या रीतीने पार पाडली की, वडील बंधूंच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर येऊन पडलेल्या अनेक संकटांना यशस्वीपणे तोंड देऊन त्यांनी 'कर्नाटक छापखान्या'ला विलक्षण लोकप्रियता आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

नुसता छापखाना चालविण्यातच मंगेशरावांनी आपल्या व्यवसायाची इतिकर्तव्यता मानली नाही, तर त्यांनी त्याला प्रकाशनाची जोड दिली; आणि मुद्रणाप्रमाणेच मराठी भाषेत एकापेक्षाही एक उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित करण्याचा त्यांनी थोड्याच अवकाशात उच्चांक मोडला. पूर्वी महाराष्ट्रात कै. प्रभाकर श्रीपत भिसे नावाचे एक नामांकित प्रकाशक होऊन गेले. त्यांची लोकप्रिय 'भारत-गौरव-ग्रंथ-माला' मंगेशरावांनी चालवावयाला घेऊन तिच्यामार्फत त्यांनी मराठी साहित्यात बहुमोल प्रकाशनांची भर घातली. त्याखेरीज 'संपूर्ण विवेकानंद' आणि 'महाभारताचे संपूर्ण भाषांतर' प्रसिद्ध करून तर मंगेश-रावांनी मराठी भाषेची अमर सेवा केली. या दोन बिकट योजना यशस्वी करून दाखविण्यात मंगेशरावांनी जी वाङ्मयीन कल्पकता दाखविली, तिच्यामुळे त्यांचे नाव मराठी भाषेत चिरंतन झाल्याखेरीज राहणार नाही.

व्यक्तिशः आमची नि मंगेशरावांची ओळख १९३१ साली झाली. आम्ही त्या वेळी शिक्षणशास्त्राचा अभ्यास पूर्ण करून नुकतेच विलायतेहून परत आलो होतो, आणि पुण्याच्या कॅंप एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलचे प्रमुख होतो. आपण प्रसिद्ध केलेली काही पाठ्य-पुस्तके आम्ही आमच्या शाळेत लावावीत म्हणून मंगेशराव आम्हांला भेटण्यासाठी आमच्या शाळेत आले. बोलता बोलता मराठी क्रमिक पुस्तके लिहिण्याची आमच्या डोक्यात असलेली कल्पना आम्ही त्यांना सहज बोलून दाखविली. तेव्हा मंगेशराव आपल्या नेहमीच्या अनुनासिक स्वरात म्हणाले, "नुसते बोलू नका! डोक्यात काय आहे ते लिहून काढा!" तेव्हा आम्ही काही तरी बोलायचे म्हणून म्हणालो, "पण ते सहा-सात महिन्यांचे काम आहे. त्यासाठी रजा घ्यावी लागेल. साहाय्यक संपादक घ्यावे लागतील. पुस्तके खरेदी करावी लागतील. सारांश, ते पैशाचे काम आहे!"

त्यावर मंगेशरावांनी फाटकन् आम्हांला विचारले, " किती पैसें लागतील ? " तोंडाला येईल तो आकडा आम्ही बोलून गेलो. म्हणालो, " लागतील अदमासे पाच हजार रुपये ! " मंगेशरावांनी ताडकन् आपल्या खिशातून चेकबुक काढले आणि आमच्या नावाने पाच हजारांचा चेक लिहून तो आमच्या हाती ठेविला ! पाच हजार रुपये तर राहू द्याच, पण आम्हांला पाच रुपये देणारा मंगेशराव हा आमच्या आयुष्यातला पहिलाच प्रकाशक. आमचा गिरसप्पा झाला. नऊशे फुटांवरून कोसळून आम्ही खाली पडलो. मंगेशरावांनी आम्हांला खिंडीतच गाठले. मग काही इलाज नव्हता. महिन्याभराने आम्ही मुंबईला गेलो. ' न्यू ईरा स्कूल 'मध्ये आमचे ऑफिस थाटले. मराठीतले चांगले चार-पाच लेखक साहाय्यक म्हणून घेतले. व्यास नि देसाई ह्या दोन गुजराती शिक्षणतज्ज्ञांकडून पाठ्यपुस्तकांचा गुजराती तर्जुमा करून घेतला, आणि अशा रीतीने सहा महिन्यांच्या आत आम्ही आमच्या ' नवयुग वाचनमाले 'ची पहिली चार पुस्तके तयार केली. पुढे त्यांच्या प्रकाशनाच्या बाबत सरकारी शिक्षणखात्याकडून पुष्कळ अडचणी आल्या. पण मंगेशरावांनी आकाशपातळ एक केले. सगळ्या अडचणींची कंबरडी मोडून अखेर दोन वर्षांच्या आत ती वाचनमाला प्रसिद्ध करून तिला शिक्षणखात्याची मंजुरीही पण मिळविली.

खरोखर तो एक महान चमत्कार होता आणि केवळ मंगेशरावांसारखा भीष्म-पुरुष मागे होता, म्हणूनच त्यांनी हा चमत्कार करून दाखविला. ही आमची ' नवयुग वाचनमाला ' त्यानंतर जवळ जवळ पंचवीस वर्षे महाराष्ट्रात चालू होती. महाराष्ट्राच्या तीन पिढ्या तिजवरून मराठी भाषा शिकल्या. व्यक्तिशः आम्ही त्या मालेवर हजारो रुपये मिळविले. आमच्या आयुष्यातली पहिली कोरी करकरीत मोटारगाडी या मालेमुळेच आम्हाला घेता आली. ' कर्नाटक प्रेस 'च्या आयुष्यात तर या आमच्या ' नवयुग वाचनमाले 'ने ' नवयुग 'च निर्माण केले. त्यानंतर पुढे ' साहित्य परिचय ', ' गद्य वैभव ' आणि ' महाराष्ट्र रसवंती ' ही आदर्श क्रमिक पुस्तके मंगेशरावांनी प्रसिद्ध केली, पण ' नवयुग ' वाचनमालेची मौज काही त्यांच्यामध्ये आली नाही. पुढे काही वर्षांनी मंगेशरावांनी आपला ' कर्नाटक छापखाना ' मुंबईच्या ' ढवळे कंपनी 'ला विकला. ही ढवळे कंपनी एवढी कर्मदरिद्री की तिने छापखाना हाती घेताच आमची ' नवयुग ' वाचनमाला आमच्या अंगावर परत फेकून दिली, आणि स्वतःचे सपशेल वाटोळे करून घेतले !



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... दि: ....................
क्रमांक .................... नोंद दि: ....................

उभ्या आयुष्यात मंगेशरावांची प्रकृती तशी कधीही चांगली नव्हती. काही ना काही तरी त्यांच्या नेहमी तक्रारी असत. पण असे असूनही कामाचे डोंगरच्या डोंगर डोक्यावर घेण्याबाबत त्यांचा पाय सदैव पुढे असे. ‘ कंटाळा ’ हा शब्दच मुळी जणू काही त्यांच्या कोशात नसे. दुपार असो, ऊन असो, पाऊस पडो, गाडी असो अगर नसो, एखाद्या शाळेने आपले पुस्तक लावावे एवढ्यासाठी तशा परिस्थितीत ते त्या ठिकाणी दहा चकरा मारल्याखेरीज राहात नसत. मित्रांचे ते फार शोकी असत. चांगल्या चांगल्या लोकांशी नि लेखकांशी आपला परिचय व्हावा आणि समाजाच्या कार्यासाठी त्यांचा आपल्याला उपयोग करता येईल की नाही ते पाहावे, याबद्दल ते सदैव जागरूक असत. सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक कै. त्र्यं. शं. शेजवलकर ह्यांच्या स्वभावातील सर्व विक्षिप्तपणाकडे दुर्लक्ष करून त्यांना मंगेशरावांनी किती वर्षे तरी आपल्या जवळ बाळगले होते. ‘ प्रगति ’ नावाचे एक सुंदर साप्ताहिक काही काळ त्यांच्या संपादकत्वाखाली त्यांनी चालविले होते.

प्रकृतिस्वास्थ्याप्रमाणेच मंगेशरावांना संसारसौख्यही आयुष्यात फारसे लाभले नाही. त्याबाबतीत त्यांची अनंत दुःखे असत. त्यांचा एकुलता एक मुलगा नारायण नावाचा होता. त्याच्या नावाने त्यांनी शिवाजी पार्कमध्ये ‘ नारायणाश्रम ’ नावाची एक टोलेजंग इमारत बांधलेली आहे. तोही अल्पायुष्यातच मरण पावला. ‘ कर्नाटक छापखाना ’ विकल्यानंतर दोनतीन व्यवसायांत पडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण त्यात त्यांना फारसे यश मिळाले नसावे. दक्षिण कारवारमध्ये आपल्या जन्मग्रामी खूपसा पैसा खर्च करून त्यांनी अलीकडे एका देवाल्याचा जीर्णोद्धार केलेला होता. त्याप्रमाणे तेथील शैक्षणिक कार्यालाही त्यांची नेहमी मदत असे. त्यांच्या वयाला ऐशी वर्षे पूर्ण होऊन गेली असूनही ते पुष्कळदा मुंबईमध्ये बसमधून हिंडत असताना पाहून आम्ही त्यांच्यावर रागावत असू, पण आमचे बोलणे ते हसण्यावारी न्यायचे. कोणाचे काही बारकेसारके काम असले तरी या वृद्ध वयात आणि प्रकृतीच्या अशा दुर्बल परिस्थितीत ते तीन तीन मजले वर चढून लोकांना भेटावयाला जावयाचे. मृत्यूआधी एका पंधरवड्यापूर्वीच ते आमच्या ‘ शिवशक्ती ’त आले होते. पुन्हा त्यांची नि आमची भेट होणार नाही ह्याची आम्हाला कल्पना नव्हती. आम्ही सहज त्यांना म्हणालो, “ मंगेशराव, तुमची एक आठवण मला पाहिजे. ” “ बोला, काय देऊ ? ” मंगेशराव हसत म्हणाले. “ तुमच्या महाभारताचा एखादा

'सेट' असेल तुमच्याजवळ तर तो मला हवा आहे!" आम्ही म्हणालो. "फक्त एकच उरला आहे! तो तुम्हाला पाठवून देतो!" असे म्हणून मंगेशरावांनी आमचा निरोप घेतला. कबूल केल्याप्रमाणे तो सेट मंगेशरावांनी लागलेच पाठवून दिला. त्यांनी प्रेमाने आणि आठवणीने दिलेला तो महाभारताचा संभार आम्ही आमच्या ग्रंथालयामध्ये अत्यंत आदराने ठेवून दिलेला आहे. त्याकडे पाहत पाहतच आम्ही मंगेशरावांचे हे पुण्यस्मरण या क्षणी पूर्ण करतो आहोत.

(मराठा : २०-२.१९६८)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ..................
क्रमांक .................... नों दि ..................

## १८

# कै. दामूअण्णा पोतदार

महाराष्ट्राचे महान इतिहाससंशोधक आणि साहित्यवाचस्पती म. म. पद्मभूषण डॉ. दत्तोपंत पोतदार ह्यांच्या कुटुंबावर परवा रात्री दुःखाचा प्रचंड वज्राघात झाल्याची वार्ता ऐकून आमची तर अक्षरशः कंबरच मोडली आहे. दत्तोपंतांचे कनिष्ठ बंधू श्री. दामूअण्णा पोतदार हे एक पुणे शहराच्या सार्वजनिक जीवनात एखाद्या झंझावाताप्रमाणे वावरणारे स्वयंप्रज्ञ, स्वयंप्रकाशी आणि प्रभावी गृहस्थ होते. डोंगराएवढे त्यांचे थोरले बंधू पण त्यांच्या नावाचा आधार घेतल्यावाचून जगण्याएवढे कर्तृत्व त्यांनी स्वतः केलेले होते. ह्या दामूअण्णांना दि. १९ मे च्या उत्तर रात्री साडेबारा वाजता ज्या परिस्थितीत आणि ज्या वातावरणात आकस्मिक मृत्यू आला, तो पाहिल्यानंतर मानवी जीवनात केवढे भीषण नाट्य भरले आहे, त्याचा प्रत्यय येतो. दामूअण्णांचे ज्येष्ठ चिरंजीव नारायण ह्याचा सौ. कां. निर्मला फडणीस हिच्याशी दि. १६ मे रोजी सकाळी पुण्यात मोठ्या थाटामाटाने विवाह साजरा झाला होता. पोतदारांच्या कुटुंबात बरेच दिवसांनी हे मंगलकार्य घडत होते. दामूअण्णांचे स्वतःचे असे तर हे पहिलेच कार्य असल्यामुळे कृतकृत्यतेचे आणि साफल्याचे केवढे समाधान त्यांना आपल्या व्यक्तिगत जीवनात ह्या निमित्ताने लाभले असेल ह्याची त्यांना वर्षानुवर्षे जवळून ओळखणाऱ्या आमच्यासारख्या आप्तांनाच केवळ कल्पना येण्यासारखी आहे. नाहीतर सारा जन्म कामाच्या रामरगाड्यात स्वतःला बुडवून घेणाऱ्या दामूअण्णांना स्वतःच्या सुखासमाधानाचा विचार

करावयाला वेळ होताच कुठें मुळी ? विवाह-समारंभ मोठ्या दणक्याने पार पडला, आणि दि. १९ रोजी संध्याकाळीं वधूवरांचे स्वागत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेजच्या इमारतीत तेवढ्याच थाटानें झाले. दोन-तीन दिवसांच्या अतिरिक्त परिश्रमाने दामूअण्णा अंतर्बाह्य थकून गेले होते. म्हणून स्वागत समारंभाच्या कार्यव्यापृतीमधून मुक्त होता क्षणीच ते रात्रौ तडक '१८० शनिवार' येथील आपल्या निवासस्थानी विश्रांतीसाठी परत आले, आणि तसेच आपल्या पलंगावर त्यांनी अंग टाकून दिले नि डोळे मिटले. तीच त्यांची शेवटची निद्रा ठरली. रात्रौ साडेबारा वाजता सर्व कारभार आटोपला होता. आनंदाच्या आणि सार्थकतेच्या परमशिखरावर स्थानापन्न झालेले असताना तेथून ते मृत्यूच्या खोल दरीत अशा आकस्मिक रीतीने कोसळले जातील ह्याची कल्पना तरी त्यांना स्वतःला किंवा त्यांच्या परिसरात वावरणाऱ्या कोणाला तरी होती काय ? विवाह समारंभाच्या सनयांचे मंजुळ आणि मंगल संगीत घरात निनादत असताना त्याचे पर्यवसान 'हाहेति रुदितम्'च्या अमंगल शोकस्वरात एवढ्या तडकाफडकी होईल असे स्वप्नात तरी कोणाला वाटले असते काय ! पण दामूअण्णांच्या साचेबंद, व्यवहारी नि भावनांच्या कधीही आहारी न जाणाऱ्या रोखठोक जीवनाची परिसमाप्ती दुर्दैवाने या भीषण नाट्याने करून त्यांच्यावर एक प्रकारचा सूडच घेतला आहे.

म. म. दत्तोपंत आता जवळ जवळ ऐंशीच्या घरात येऊन ठेपलेले आहेत. अद्यापिही कामाचे प्रचंड पर्वत अंगाखांद्यावर वागवून ते श्रीहनुमंताप्रमाणे जीवनात वावरत आहेत. जन्मभर अनेक कौटुंबिक दुःखांचे हलाहल त्यांनी स्थिर नि निर्विकार बुद्धीने पचविले आहे. दुःखांनी आणि संकटांनी स्वतःच्या मनाचा तोल ते यत्किंचितही ढळू देणार नाहीत, एवढे अध्यात्मिक बल त्यांच्या जवळ आहे. आमचे जीवश्चकंठश्च बालमित्र डॉ. दिनकरराव पुरंदरे ह्यांना दत्तोपंतांची नि दामूअण्णांची धाकटी बहीण चि. बायडी ही १९२४ साली दिली होती. तेव्हापासून तो आजतागायत जवळ जवळ पंचेचाळीस वर्षे आम्ही पोतदार-पुरंदरे-अत्रे मंडळी जणू काही एकाच कुटुंबातले घटक आहोत, अशा आपलेपणाने आणि जिव्हाळ्याने वागत आलो आहोत. त्यातून दत्तोपंतांचा तर व्यक्तिशः आमच्यावर अमर्याद लोभ. आयुष्यात वडील बंधूच्या प्रेमाने आणि वात्सल्याने त्यांनी आमच्या पाठीवरून हात फिरवून आम्हांला केवढा धीर दिला आहे म्हणून सांगावे ? त्यांचे मेहुणे नि माझे बालमित्र डॉ. दिनकरराव पुरंदरे हे

१९५२ साली यकृताच्या विकाराने लंडन येथे मरण पावले. त्यांच्या अस्थींचे विसर्जन सासवड येथें ‘ कऱ्हेच्या पाण्यात ’ आम्ही केले त्याप्रसंगी बोलताना म. म. दादा पोतदार म्हणाले की, “ ‘ नाभिनन्देत मरणम्, नाभिनन्देत जीवितम् । ’ जीवनाचे किंवा मरणाचे अभिनंदन करू नये असे ‘ महाभारता ’त सांगितले आहे तेच खरे आहे. अपराजित हृदयाने प्राप्त परिस्थितीला तोंड देणे हेच मनुष्याचे कर्तव्य आहे. हृदय का पराभूत झाले म्हणजे मग संपलेच ! ” आपल्या कनिष्ठ बंधूंच्या मृत्यूकडे बघताना ह्याच तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून ते आपले सांत्वन करून घेतील. हे जरी खरे असले तरी, दामूअण्णांच्या ह्या आकस्मिक मृत्यूने दादांना जबरदस्त धक्का बसल्याखेरीज राहणार नाही, ह्याबद्दल आम्हांला मुळीच शंका वाटत नाही. ती गोष्ट अगदी अपरिहार्य आहे.

दत्तोपंतांच्या नि दामूअण्णांच्या दर्शनी स्वभावात जमीन-अस्मानाचे अंतर. तसे पाहिले तर आडनावापलीकडे उभयतांत काहीही साम्य तिऱ्हाइतांना आढळले नसते. दत्तोपंत जितके शांत नि विचारी तितकेच दामूअण्णा तापट नि फटकळ. मुंगीलादेखील आपला धक्का लागू नये इतक्या सावधगिरीने दत्तोपंत वागत; तर कोणाच्याही दोषांकडे क्षमेच्या दृष्टीने न पाहता किंवा त्याचा कसलाही मुलाहिजा न धरता तो समोर आला तर त्याचे वाभाडे काढावयाला दामूअण्णा एवढेसेसुद्धा कचरत नसत. असे असूनही ‘ पोतदार ’ कुलाचा, बुद्धिमत्तेचा नि कर्तृत्वाचा फार मोठा वारसा उभयतांना त्यांच्या तपस्वी वडिलांकडून लाभला होता. दत्तोपंतांचा मोठेपणा दामूअण्णा ओळखून होते, आणि दामूअण्णांच्या धडाडीचे दत्तोपंतांना कौतुक होते. परस्परांबद्दल वाटणाऱ्या अनिर्वचनीय प्रेमाचे उभ्या आयुष्यात एकमेकांनी एकमेकांसमोर कधी निदर्शन केले नसेल. तो मराठी माणसांचा मुळी पिंडच नव्हे, किंबहुना जवळच्या मंडळींशी बोलताना दोघेही एकमेकांच्या बारीकसारीक चुकांवर खेळीमेळीने का होईना टीका करावयाला चुकत नसत. पण एवढे असूनही दोघांचे एकमेकांवर किती निस्सीम प्रेम होते, ह्याची केवळ आमच्यासारख्या त्यांच्या आप्त-सुहृदांनाच कल्पना होती. दत्तोपंत जेवढे मोठे होते, त्यापेक्षा अनंत पटीने ते मोठे व्हावेत अशी दामूअण्णांना आंतरिक तळमळ लागून राहिली होती. त्यामुळे ‘ दादा बारीकसारीक गोष्टींत निष्कारण वेळ घालवितात आणि जे करायचे त्याकडे पुरेसे लक्ष देत नाहीत ’ अशी दामूअण्णांची दत्तोपंतांविरुद्ध नेहमीच तक्रार असे, आणि ती ते नेहमीच आमच्याकडे आपल्या वैशिष्ट्यपूर्ण तऱ्हेवाईकपणे करीत असत. त्यांच्या अनेक

मनोरंजक गोष्टी आमच्याकडे आहेत, आणि त्या तक्रारीत अगदीच अर्थ नसे असे नव्हते. पण दामूअण्णांनी एकसारखे बोलत राहायचे आणि दत्तोपंतांनी आपला नेहमीचा खाक्या आहे तसाच चालू ठेवायचा, असा जणू काही उभयतां मध्ये एक अलिखित करारच झालेला होता. पण दत्तोपंतांच्या सेवेसाठी दामूअण्णा सदैव हात जोडून एखाद्या मारुतीसारखे त्यांच्यासमोर उभे असत. १९३५ साली दत्तोपंत नगर-साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष झाले. त्या प्रसंगी आपल्याजवळच्या जुन्या ग्रंथसंग्रहाचे प्रदर्शन नगर संमेलनात दत्तोपंतांना करावयाचे होते. हा सर्व ग्रंथसंग्रह पुण्याहून आपल्या मोटारीमधून नगरला वाहून नेताना दामूअण्णांनी जे अपरंपार कष्ट केले, ते आम्ही पाहिले आहेत. त्याची आठवण झाली की आमच्या डोळ्यांत अक्षरशः पाणी येते.

आमचे बालमित्र डॉ. पुरंदरे ह्यांना पोतदारांनी आपली बहीण दिल्यानंतर आमचा नि दामूअण्णांचा फार घनिष्ठ संबंध आला, तो एकसारखा वाढतच गेला. ते दत्तोपंतांप्रमाणेच आम्हांलाही आपल्या थोरल्या बंधूसारखा मान देत. दामूअण्णांच्या अंगी अनेक गुण होते. गोपाळराव भोंड्यांप्रमाणे ते महाराष्ट्रातल्या मोठमोठ्या राजकीय पुढाऱ्यांच्या सुंदर नक्ला करून आपल्या मित्रमंडळींची उत्कृष्ट करमणूक करीत असत. इंग्रजी आणि मराठी भाषेमधे अगदी तरुण वयापासून प्रभावी वक्तृत्व करण्याची कला त्यांनी साध्य करून घेतली होती. त्याचा त्यांना भावी आयुष्यात फार मोठा फायदा झाला. इलेक्ट्रिक इंजिनीयर म्हणून त्यांनी पुण्यात व्यवसाय केला. तो त्यांनी इतका यशस्वी करून दाखविला, की त्या व्यवसायात त्यांनी लाखो रुपये मिळविले. शनिवार पेठेसारख्या जुनाट पेठेत त्यांनी तीन मजल्यांचे अद्ययावत निवासस्थान बांधून आपल्या रसिक नि विधायक कल्पकतेची पराकाष्ठा केली.

गेल्या वीस वर्षांत दामूअण्णांनी आपले आयुष्य आमूलाग्र बदलले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्याला त्यांनी आपले सर्वस्व वाहिले. काही काळ ते त्या संघटनेचे माजी कार्याध्यक्ष होते. तेथे महाराष्ट्रातल्या मोठमोठ्या उद्योगपतींशी त्यांचे संबंध आले. त्यामुळे वरिष्ठ बँकिंगच्या नि सहकारी पतपेढ्यांच्या क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखविण्याची त्यांना भरपूर संधी मिळाली. गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रात ज्या निरनिराळ्या व्यापारी आणि औद्योगिक घडामोडी झाल्या त्या सर्वांत दामूअण्णा अगदी प्रामुख्याने वावरत होते. त्यांच्या बुद्धिमत्तेची आणि कर्तृत्वाची कसोटी तेथे प्रथम लागली आणि त्यांनी त्या त्या क्षेत्रात आपले



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ वि: ....................
....... नों दि: ....................

स्वतंत्र स्थान प्रस्थापित केले. लोकदरबारी जेवढा त्यांनी मान मिळविला, तेवढाच त्यांना राजदरबारीही मिळाला. त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी जी बहुमोल कामगिरी केली, त्याचा साद्यंत इतिहास यथाकाल आम्ही सांगूच. आता त्यांच्या कर्तृत्वाचे तेज पूर्ण विकसित झाले होते आणि त्यांना अधिक आयुष्य लाभले असते तर त्यांच्या हातून फारच देदीप्यमान कामगिरी झाली असती. पण मृत्यूने त्यांच्यावर एवढ्या आकस्मिकतेने घाला घातला की त्यांचे सर्व मनोरथ त्यांच्या निदान मित्रांना ज्ञात होण्यापूर्वीच ते नष्टप्राय झाले.

दामूअण्णांच्या मृत्यूच्या बातमीवर प्रथम आमचा तरी विश्वासच बसेना. पण पुण्याहून आमच्या प्रतिनिधीकरवी ती. स्व. दादांनी मुद्दाम फोन करून आम्हांला ही दुर्घटना कळविली. तेव्हा काही काल तरी आमच्या डोळ्यांतून आसवांचे ओघळ एकसारखे वाहत राहिले. दामूअण्णांच्या मृत्यूने पुण्याच्या सार्वजनिक जीवनातले एक वादळी आणि झंझावाती व्यक्तिमत्त्व नाहीसे झाले, ह्यांत शंका नाही. तथापि, आमच्या सुखदुःखांशी सतत साडेतीन तपे तन्मय नि समरस झालेला आमचा आवडता कनिष्ठ बंधू गेला, ह्याचे सर्वांत जास्त दुःख आम्हांला होते आहे. दामूअण्णांच्या मागे त्यांच्या पत्नी, दोन चिरंजीव आणि आता सून आहे. त्यांचे सांत्वन जगरहाटीप्रमाणे यथाकाल होईलच. पण ती. स्व. दादा आम्हांला प्रत्यक्ष भेटल्यानंतर आम्ही त्यांच्याशी काय बोलावयाचे आणि त्यांना कसा धीर द्यावयाचा या विवंचनेने ह्या क्षणी तरी आमच्या काळजाचे अक्षरशः पाणी पाणी झालेले आहे. इतरांना हे कसे सांगायचे ?

(मराठा : २१-५-१९६८)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम ८९०५९ वि. निबंध
क्रमांक 2963 नों. दि. ३१/१२/६९

१९

# महाराष्ट्राचा लाडका विनोदी नट नागेश जोशी

महाराष्ट्रामधला एक अत्यंत प्रतिभाशाली आणि लोकप्रिय विनोदी नट अन् नाटककार श्री. नागेश जोशी ह्याला माझ्या ‘पाणिग्रहण’ नाटकात काम करता करता अकस्मात मृत्यू आला हे ऐकून अतिशय दुःख झाले. गेली पंचवीस वर्षे त्याच्याशी माझा अतिशय जिव्हाळ्याचा संबंध होता. १९३३ साली माझ्या ‘साष्टांग नमस्कार’ नाटकात ‘भद्रायू’ची विनोदी भूमिका पाहिल्याने त्याने केली; ती त्याने इतकी उत्कृष्टपणे वठविली की, प्रेक्षकांनी त्याला अक्षरशः डोक्यावर उचलून घेतले. त्या एकाच भूमिकेने त्याचे नाव महाराष्ट्रात सर्वतोमुखी झाले.

माझ्या पुढच्या दोन नाटकांत त्याच्या वाट्याला आलेल्या भूमिका त्या मानाने लहान होत्या. ‘घराबाहेर’ मध्ये शंकर गड्याचे काम आणि ‘भ्रमाच्या भोपळ्या’मध्ये पहिला अंकात टांगेवाला अन् तिसऱ्या अंकात मारवाडी ह्या भूमिका तो करीत असे. पण काम कितीही लहान असले तरी प्रेक्षकांचे लक्ष तो आपल्याकडे खेचून घेतल्याखेरीज राहात नसे. संवाद कितीही त्रोटक वा लहान असले तरी तो नुसत्या डोळ्यांच्या हालचालीने आणि आविर्भावाने प्रेक्षकांना खदखदून हसावयाला लावी. घराबाहेरमधील शंकर गड्याची भूमिका तशी पाहिली तर अगदी मामुली होती. पण त्या भूमिकेला नागेशने अशी जिवंत केली की सांगता सोय नाही. एका इरसाल नि बदफैली वकिलाच्या घरचा उर्मट आणि आगाऊ गडी कसा असतो तो त्याने मूर्तिमंत रंगभूमीवर उभा केला.

एका कॉलेजचे सुप्रसिद्ध प्राचार्य त्याची ती भूमिका पाहून इतके भडकले की, नाटक चालू असताच 'असा गडी आपल्या घरी असता तर आपण त्याला गोळी घालून ठार मारले असते' असे ते माझ्या कानात कुजबुजले.

तथापि, नागेशने आपल्या विनोदी अभिनयाचा परमोच्च कळस 'लग्नाच्या बेडी'त गाठला. गोकर्णाच्या भूमिकेत धुमाळ नि अवधूताच्या भूमिकेत नागेश हे दोघे रंगभूमीवर प्रकट झाले की, नाटकात हास्याचा महापूर उसळे; अन् प्रेक्षकांच्या हसता हसता मुरकुंड्या वळत. सबंध नाटकचे नाटक दोघेजण अक्षरशः आपल्य डोक्यावर घेऊन जणू काही जात. 'भावबंधन' नाटकात 'कामण्णा'ची भूमिक दिनकर ढेरे ह्यांनी जेवढी गाजवली, तेवढीच अवधूतची भूमिका नागेश ह्याने अजरामर केली. ह्या नाटकाच्या यशाचा सर्वांत मोठा वाटा धुमाळ अन् नागेश ह्या जोडगोळीकडे जातो.

म्हणूनच 'वंदे मातरम्' आणि 'मी उभा आहे' ह्या दोन्हीही नाटकांत ह्या जोडगोळीचा मी जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. 'वंदे मातरम्' मधे धुमाळ 'सोमेश्वर' अन् नागेश 'कल्याण' तर 'मी उभा आहे' मध्ये धुमाळ 'भीमाशंकर' अन् नागेश 'भाई टोळ' ह्या भूमिकांमधली ह्या दोघा विनोदी 'वस्तादां'ची 'द्वंद्वयुद्धे' ज्यांनी पाहिली असतील त्यांच्या स्मरणामधून ती कधीही नाहीशी होणार नाहीत. लॉरेल आणि हार्डीप्रमाणे हे दोघेही नट एक-मेकांना पुरत असत.

नागेशच्या विनोदी अभिनयाची जातच मुळी वेगळी होती. वेडेवाकडे अंग-विक्षेप नि हातवारे करून किंवा विदूषकी आक्रांडतांडव करून हास्यरस पिक-विणाऱ्या विनोदी नटांचा जो एक वर्ग आहे त्याच्या नेमके उलट नागेशच्या अभिनयाचे तंत्र असे. त्याचा विनोद त्याच्या शब्दोच्चाराच्या ढंगातून आणि ठसक्यामधून प्रकट होई. त्याच्या तोंडून एखादे वाक्य किंवा एखादा शब्द बाहेर पडला की, त्याचे स्वरूपच मुळी एकदम बदलून जाई. एखाद्या शब्दामधून तो असा काही सूक्ष्म ध्वनी काढा की, प्रेक्षकांना हसू आवरणे मुश्कील होऊन जाई. शब्दोच्चारावर त्याचे विलक्षण प्रभुत्व होते, आणि त्याला डोळे आणि चेहरा ह्यांची विलक्षण जोड मिळाल्यामुळे त्याच्या विनोदी व्यक्तिमत्त्वात अमोघ सामर्थ्य निर्माण झाले होते. नाटकगृहात हास्यरसाचा कल्लोळ उडत असतानाही नागेशने आपले गांभीर्य आणि संयम कधी सोडला नाही. त्यामुळे त्या हास्यरसाच्या लाटा अधिकच जोराने उचंबळू लागत.

नागेश जरी फारसा शिकलेला नसला तरी त्याची बुद्धिमत्ता चांगलीच तल्लख होती. त्यामुळे नाटकांत भूमिका करता करता साहित्याचे नि नाट्याचे तंत्र आपोआप त्याच्या पिंडात रुजत गेले आणि एके दिवशी ह्या यशस्वी नटाचे रूपांतर फुलामधून सहजगत्या जसे फळ निर्माण व्हावे तसे यशस्वी नाटककारामध्ये झाले. ' देवमाणूस ' ह्या त्याच्या नाटकाने मराठी रंगभूमीवर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. रंगभूमीप्रमाणेच चित्रपटसृष्टीतही तो यशस्वी होऊ शकला असता. ' ही माझी लक्ष्मी ' आणि ' श्यामची आई ' ह्या माझ्या दोन चित्रपटांत त्याने लहानच भूमिका केल्या; पण त्यांवर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा अगदी ठसठशीत ठसा उमटवला.

अशा रीतीने महाराष्ट्रामधला स्वतंत्र प्रतिभेचा एक अत्यंत यशस्वी आणि लोकप्रिय नट आणि नाटककार ऐन तारुण्यात निधन पावावा हे मराठी रंगभूमीचे आणि साहित्याचे खरोखर दुर्दैव आहे. ' बालमोहन ' नाटक मंडळीमध्ये लहानाचे वयाने आणि कीर्तीने मोठे झालेले आणि आज लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन बसलेले छोटा गंधर्व, बापूराव माने, धुमाळ, नागेश जोशी, कोरडे, शंकर आपटे ही सर्व मंडळी मला तर अगदी माझ्या मुलांसारखी होत. माझ्या यशात त्या सर्वांचा फार मोठा भाग आहे. म्हणून त्यांच्या गुणांचे कौतुक करण्यात मला केवढी धन्यता वाटे ! अशा ह्या आमच्या ' बालमोहन ' कुटुंबामधला एक ' कुलदीपक ' अकाली मालवला ह्याचे सर्वांत जास्त दुःख मला आणि श्री. दासूअण्णा जोशी ह्यांना होणे साहजिकच आहे. पण होणाऱ्या गोष्टीपुढे इलाज काय ? नागेश जोशींच्या जितक्या आठवणी काढाव्यात तितक्या थोड्या आहेत. असा गोड आणि गुणी नट पुन्हा दिसणे कठीण आहे !

( मराठा : १८-५-१९५८ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों. दि ..............

२०

# नटश्रेष्ठ दामूअण्णा जोशी

नटश्रेष्ठ गणपतराव बोडस ह्यांच्या मृत्यूनंतर इतक्या लवकर मराठी रंगभूमीवर आणि व्यक्तिशः आमच्या जीवनावर दुसरा जबरदस्त आघात होईल असे स्वप्नातसुद्धा आम्हांला कधी वाटले नव्हते. पण जे होऊ नये ते झाले. जे घडू नये ते घडले. मराठी रंगभूमीवर नाटककार म्हणून ज्यांनी आम्हांला जन्म दिला, आमच्या सर्व नाटकांची ज्यांनी अपरंपार कौतुकाने आणि उत्साहाने निर्मिती केली आणि गेली बत्तीस वर्षे अहोरात्र वडीलभावाप्रमाणे ज्यांनी आम्हांला आमच्या बऱ्यावाईट परिस्थितीत धीराने सोबत दिली, ते 'बालमोहन नाटक मंडळी'चे संस्थापक नटश्रेष्ठ दामोदर रामचंद्र ऊर्फ दामूअण्णा जोशी हे सातारा जिल्ह्यातील कोरेगावजवळच्या शिरढोण ह्या आपल्या जन्मग्रामी निधन पावल्याची वार्ता आताच आमच्या कानी आल्याने, अत्यंत व्याकुळ आणि विकल अंतःकरणाने आम्ही त्यांना ही श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

दामूअण्णा हे मूळचे प्राथमिक शिक्षक. पुणे नगरपालिकेच्या मराठी शाळेत अनेक वर्षे ते शिक्षकाचे काम करीत असताना, अनंतराव गद्रे ह्यांच्या प्रेरणेने आणि उत्तेजनाने ते नाट्य-व्यवसायात पडले. प्रथमतः ते 'आनंद संगीत नाटक मंडळी'त होते. त्यानंतर त्यांनी स्वतःच्या मालकीची लहान मुलांची 'बालमोहन नाटक मंडळी' स्थापन केली. ही नाटक मंडळी म्हणजे अत्यंत कडक आणि करड्या शिस्तीची एक प्राथमिक शाळाच होती असे म्हणानात. प्रारंभी प्रारंभी अनंतराव गद्रे आणि सदाशिव अनंत शुक्ल ह्या त्या काळातील प्रथितयश

म. क्र. ९८३०६

नाटककारांची नाटके दामूअण्णांनी आपल्या रंगभूमीवर आणली. छोटा गंधर्व हा त्या वेळी अगदी लहान होता. तो त्यांच्या कंपनीत नायिकेची भूमिका करीत असे. त्याच्या गंधर्वतुल्य गायनाने आणि स्वरूपसुंदर बापूराव मान्यांच्या स्त्रीभूमिकांनी ' बालमोहन नाटक मंडळी 'चे नाव महाराष्ट्रात सर्वतोमुखी झाले.

१९३३ साली पुण्यामधल्या ' रत्नाकर ' मासिकाचे संपादक अप्पासाहेब गोखले आणि विष्णुपंत रानडे हे दामूअण्णांना एका सकाळी आमच्या घरी घेऊन आले. त्या वेळीं आम्ही नारायण पेठेतल्या डोल्कर आळींत लोखंड्याच्या तालमीसमोरील बागलांच्या वाड्यात राहात होतो. आपल्या कंपनीसाठी एखादे नाटक लिहावे अशी दामूअण्णांनी जेव्हा आम्हांला विनंती केली, तेव्हा आम्ही सर्दच झालो. गडकऱ्यांचे आम्ही शिष्य असल्याने नाटककार होण्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा आमच्या मनात होती. १९२० सालापासून आम्ही त्या प्रयत्नातही होतो. पण नाटक कंपन्यांच्या मालकांच्या कुत्सित स्वभावाची आणि त्यांच्या भोवतालच्या अनिष्ट वातावरणाची आम्हांला बरीचशी कल्पना असल्याने स्वतःच्या नाटकाचे ' बाड ' काखोटीला मारून एखाद्या माधुकऱ्या-प्रमाणे नाटक मंडळ्यांचे उंबरठे झिजविण्याची आम्हांला कधीच हिंमत झाली नाही. म्हणून दामूअण्णासारखे नाटक मंडळीचे मालक जेव्हा आपण होऊन नाटक मागण्यासाठी आमच्या घरी आले, तेव्हा साहजिकच आम्ही आश्चर्याने आणि आनंदाने चाट पडलो. आम्ही नाटक लिहू शकू ह्याबद्दल आम्हांला सुतराम् आत्मविश्वास नव्हता. तथापि, भिडस्तपणाने आम्ही दामूअण्णांना कसाबसा होकार दिला. त्याचा परिणाम असा झाला की, त्यानंतर ते आमच्या खनपटीलाच बसले. रोज सकाळीं एखाद्या सावकाराप्रमाणे ते आमच्या घरी येत आणि ' कोठपर्यंत लिहून झाले ' म्हणून तगादा लावीत. म्हणून लाजेकाजेस्तव आम्ही एक दिवस काहीतरी लिहावयाला बसलो आणि ' साष्टांग नमस्कारा 'चा पहिला अंक कसाबसा लिहून काढला. तो अंक हातात पडला रे पडला तोच दामूअण्णांनी एका आठवड्याच्या आत तो आपल्या मुलांकडून बसवून घेतला आणि साऱ्या गावभर चौकाचौकात त्या नाटकाच्या भरमसाट जाहिराती फडकविल्या. तेव्हा ते नाटक पुरे करण्यावाचून आम्हांला गत्यंतरच नव्हते. उरलेले दोन अंक एका महिन्याच्या आत आम्ही पुरे केले.

नाटकाची रंगीत तालीम सपशेल पडली. ती पाहून आमचा धीरच खचला. पण दामूअण्णांना जाहीर प्रयोगाची कल्पना होती. १० मे १९३३ रोजी रात्री


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ................ दि: ................

पुण्याच्या विजयानंद नाटकगृहात साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांच्या अध्यक्षतेखाली आमच्या ‘ साष्टांग नमस्कार ’ नाटकाचा पहिला प्रयोग ‘ बालमोहन ’ने सादर केला. त्यात स्वतः दामूअण्णांनी ‘ रावबहाद्दुरा ’ची भूमिका केली. छोटा गंधर्व ‘ त्रिपुरी ’, बापू माने ‘ शोभना ’, कै. नागेश जोशी ‘ कवी भद्रायू ’, हंसराज कोरडे ‘ सिद्धेश्वर ’. नाटक पहाटे चार वाजेपर्यंत चालले होते. हसूनहसून प्रेक्षक बेजार झाले आणि एका रात्रीत ‘ यशस्वी नाटककार ’ म्हणून आम्ही जन्माला आलो.

नाटक कसे बसवावे आणि त्यासाठी काय काय परिश्रम घ्यावेत, ह्याबाबत दामूअण्णांचा हात कोणी धरू शकला नसता. ‘ घराबाहेर ’ नाटकाने तर ‘ बालमोहन ’च्या कीर्तीवर सुवर्णकळसच चढवला. ह्या नाटकात दामूअण्णांनी काम केले नाही. छोटा गंधर्व ह्या नाटकापासून पुरुषपात्रांत आला. मुंबईच्या ‘ रायल ऑपेरा हाऊस ’मध्ये ह्या नाटकाचे लागोपाठ सहासष्ट प्रयोग ‘ हाऊस फुल्ल ’ झाले. ( किंबहुना, ‘ हाऊस फुल्ल ’ हा शब्द अनंतराव गद्रे ह्यांनी ह्याच नाटकाच्या वेळी निर्माण केला. ) ‘ भ्रमाच्या भोपळ्या ’त ‘ कचेश्वरा ’ची नि ‘ उद्याच्या संसारा ’त ‘ बॅरिस्टर विश्राम ’ ची अशा दामूअण्णांच्या दोन्ही भूमिका कमालीच्या यशस्वी झाल्या. ‘ कचेश्वरा ’ची भूमिका होती विनोदी आणि ‘ विश्राम ’ची भूमिका होती कारुणरसात्मक. पण प्रेक्षकांना दामूअण्णा जितके खदखदून हासवीत असत, तितकेच ते त्यांना ढसढसून रडवीतही असत. ‘ संशयकल्लोळ ’ नाटकात ‘ फाल्गुनराव ’ची भूमिकाही त्यांची अगदी हातखंडा असे.

मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात नाट्यव्यवसाय सावरून धरल्याबद्दल आम्हाला जे श्रेय देण्यात येते, त्याचे अर्धे वाटेकरी ‘ बालमोहन ’चे दामूअण्णा जोशी होत, ही गोष्ट आम्ही कधीही विसरलेलो नाही. आम्ही चित्रपट-व्यवसायात पडल्यानंतर आम्हाला साहाय्य करण्यासाठी दामूअण्णा मोठ्या पोटतिडिकेने मुंबईला धावत आले. ‘ घरजावई ’ मध्ये ‘ कोल्हापुरी काका ’, ‘ श्यामची आई ’ मध्ये ‘ सावकार ’ आणि ‘ महात्मा फुले ’ मध्ये ‘ ज्योतिबांचे वडील ’ ह्या त्यांच्या भूमिका अविस्मरणीय होत. त्यांचे प्रभावी डोळे आणि खणखणीत आवाज हे त्यांच्या यशस्वी अभिनयाचे मुख्य भांडवल होते.

नाट्यव्यवसायात वर्षानुवर्षे काढूनसुद्धा त्यांच्याइतका निर्व्यसनी आणि धर्म-निष्ठ माणूस क्वचितच आढळला असता. दैनिक ‘मराठा’ सुरू केल्यानंतर

आमच्या मुद्रणालयाच्या व्यवस्थापकाचे काम आम्ही त्यांच्याकडे मोठ्या विश्वासाने सोपविले. शेवटपर्यंत त्यांनी ते काम अत्यंत आपलेपणाने केले. एवढेच नव्हे तर दोन वर्षांपूर्वी जेव्हा आम्ही आमची ' अत्रे थिएटर्स ' ही संस्था स्थापन केली तेव्हा त्याच्या एका विभागाची सूत्रे आम्ही त्यांच्याकडेच सोपविली. ' मोरूची मावशी ' आणि ' बुवा तेथे बाया ' ह्या दोन्ही नाटकांचे यशस्वी दिग्दर्शन त्यांनीच केले आणि त्यांची सर्व व्यावहारिक व्यवस्था तेच पाहात होते. बत्तीस वर्षांची त्यांची नि आमची मैत्री. मुंबईत आल्यानंतर तर असा एक दिवस गेला नसेल की, दामूअण्णा सकाळी आमच्या घरी आले नाहीत आणि नवीन नाटक लिहिण्याची त्यांनी निकड आम्हाला केली नाही. जो भेटेल त्याच्याजवळ आमच्या गुणांचे तोंड भरून कोडकौतुक करण्यात त्यांना जो काही विलक्षण हर्ष वाटत असे, तो पाहून आम्ही आमचे देहभान विसरून जात असू.

हैद्राबाद साहित्य संमेलनाला जाताना पुणे येथे नटश्रेष्ठ गणपतराव बोडसांना भेटण्यापूर्वी आम्ही छोटा गंधर्व ह्यांच्या निवासस्थानी दामूअण्णांना भेटलो. तीच त्यांची नि आमची शेवटची भेट. त्या वेळी त्यांनी आम्हाला ' नवीन नाटक केव्हा पुरे करता ? ' म्हणून भावनाविव्हल स्वराने विचारले. पण आमचे नवीन नाटक पुरे होण्याच्या आधीच दामूअण्णा निघून गेले! आता आमच्या नाटकाचे कौतुक कोण करणार ? आमच्यावर वर्षानुवर्षे निरपेक्ष प्रेम करणारा आमच्या नाट्यलेखनाचा एक मोठा आधारस्तंभच आज कोसळून पडला ! काय करावे ? ' बालमोहन ' मंडळीमधली त्यांच्या हाताखाली तयार झालेली आणि त्यांच्यावर वडिलांसमान माया करणारी छोटा गंधर्व, बापू माने, अनंत धुमाळ, हंसराज कोरडे, ही मंडळी तर धाय मोकलून रडतील ! आम्हांलाही आमच्या काळजाचा कोणी तुकडाच तोडून नेला आहे असे आज दुःख होत आहे.

( मराठा : १०-२-१९६६ )

२१

## अरेरे, बाबूराव गेले !

आमचे अनेक वर्षांचे परम मित्र आणि महाराष्ट्राचे थोर कलाकार नटश्रेष्ठ बाबूराव पेंढारकर यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टीच्या एका महान पर्वाची परिसमाप्ती झालेली आहे! बाबूरावांचे निधनसमयी वय बहात्तर वर्षांचे होते, आणि त्यांची प्रकृती दोन वर्षांपूर्वीपर्यंत चांगलीच होती. तरुणपणी कोल्हापूरच्या लाल मातीत मेहनत नि कुस्ती केलेली असल्यामुळे त्यांची शरीरसंपदा कौतुकास्पद होती. दीडदोन वर्षांपूर्वी त्यांना पोटातील कॅन्सरने ग्रासिले आणि जरी त्यावर मुंबईत शस्त्रक्रिया करण्यात आली होती, तरी त्या दुष्ट रोगाने या नटश्रेष्ठाचा पिच्छा सोडला नाही! अगदी अलीकडे त्यांना कर्करोगाचा वाढता त्रास होऊ लागला होता. आम्हांला पाठवलेल्या अलीकडच्या एका पत्रात त्यांनी लिहिले होते–" प्रकृतीबद्दल लिहायचे म्हणजे ती ताब्यात नाही. आज बरे, तर उद्या काय ते सांगता येत नाही. दिवसेंदिवस अशक्तपणा वाढत आहे. वजन कमी होत आहे. ‘ ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असो द्यावे समाधान ’, या मनःस्थितीत आहे. बाहेर कोठे जाता येत नाही. सारा दिवस घरी पडून राहणे ही एक अगदी अनोखी अवस्था आहे. सध्या मला करता येण्यासारखी एकच गोष्ट आहे आणि ती तुम्हीच मला शिकवली याबद्दल तुमचा मी अक्षय ऋणी आहे. ‘ महात्मा फुले ’ चित्रपटाच्या वेळी वाचनाची व लेखनाची गोडी लावलीत. प्रसंगी सभांतून बोलण्याचीही सक्ती केलीत. त्या सर्वांचा आज मला या बैठ्या जीवनात फार उपयोग होत आहे.

या वाचनाने मनात आलेले विचार लिहून ठेवतो. ही माझ्या 'मनःशांतीची कबुतरे' मी तुमच्याकडे पाठवतो. या 'कबुतरां'च्या संगतीत दिवस घालवीत मृत्यूच्या हाकेला ओ देण्याची तयारी करीत आहे." बाबूरावांचे हे लिहिणे त्यांच्या मनःस्थितीचे निदर्शक असले तरी त्यांची प्रकृती इतकी घसरली असेल असे आम्हांला बिलकुल वाटले नाही. उलट, आमचे नवे नाटक 'डॉक्टर लागू' पाहण्यासाठी ते उत्सुक झाले होते. या नाटकाचा होत असलेला बोलबाला ऐकून ते अतिशय आनंदित झालेले होते.

आमचे ते दीर्घकालीन जीवश्चकंठश्च मित्र! आमच्या जीवनाशी ते संपूर्णपणे समरस झालेले! आमच्या सुखाने आनंदित होणारे आणि आमच्या दुःखाने विव्हळ होणारे आमचे जीवाभावाचे मित्र बाबूराव पेंढारकर असे आम्हांला न सांगतासवरता एकाएकी निघून जातील असे आम्हांला स्वप्नातही कधी वाटले नव्हते. त्यांनी आपल्या सर्व कल्पना नि योजना आम्हांला सांगण्यात आणि आम्ही आमच्या प्रत्येक गोष्टीत त्यांचा सल्ला घ्यावा असे हे वर्षोनुवर्षे चालले होते! बाबूराव मितभाषी होते, पण मैत्रीला पक्के. दुसऱ्याच्या स्वभावातील दोषांकडे दुर्लक्ष करून त्याच्या गुणांचे कौतुक करण्याचा, त्याला उत्तेजन देण्याचा बाबूरावांचा स्वभाव होता. दुसऱ्याच्या उत्कर्षात आनंद मानण्याकडे त्यांचा कल होता. त्यामुळेच त्यांनी चित्रपटसृष्टीत नवे नवे कलाकार आणले. नवे नवे प्रयोग केले. नवे नवे साहित्यिक चित्रसृष्टीशी जोडले. महाराष्ट्रात चित्रपट-निर्मितीला सुरुवात झाली, तेव्हापासून आतापर्यंत या सृष्टीशी बाबूरावांचा अगदी जवळचा संबंध राहिला होता. या अर्धशतकाच्या कालखंडात चित्रपट-सृष्टीच्या विविध शाखांशी त्यांचा निकट संबंध आला आणि प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या विचारांची नि व्यक्तिमत्त्वाची छाप पाडली. 'महाराष्ट्र', 'प्रभात', 'हंस', 'न्यू हंस', 'नवयुग', 'अत्रे चित्र', 'राजकमल' वगैरे अनेक चित्रसंस्थांशी या प्रदीर्घ काळात बाबूराव संबंधित होते. व्यवस्थापक म्हणून, निर्माता म्हणून, चित्रप्रदर्शक म्हणून चित्रपटसृष्टीच्या सर्वांगीण उन्नती-साठी ते झिजले.

चित्रपटसृष्टी हा सामुदायिक व्यवसाय आहे. गेल्या वर्षी कोल्हापूर येथे भरलेल्या मराठी चित्रपटव्यावसायिकांच्या द्वितीय स्नेहसंमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणात बाबूरावांनी म्हटले होते की, "महाराष्ट्र, प्रभात, सरस्वती, हंस या कंपन्यांनी जी काही चांगली कामगिरी केली, ती त्यांतील सामूहिक



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
........................ दि: ....................

प्रयत्नांचे फळ होते हे विसरता येणार नाही. तेव्हा यापुढे एकांडे शिलेदाराची वृत्ती सोडून देऊन सामूहिक प्रयत्न व्हावेत. त्यामुळे गुण, कष्ट आणि भांडवल यांच्या प्रमाणात, आज न मिळणारे लौकिक यशही पदरात पडू शकेल. " चित्रपट ही सामूहिक प्रयत्नांनी सिद्ध होणारी कलासृष्टी आहे, ह्या गोष्टीची जाण बाबूराव पेंढारकरांच्या अंतःकरणात खोल रुजलेली होती नि त्यांचा सगळा प्रयत्न त्याच दिशेने चाले. नेहमीच त्यांना यश आले नसले, तरी त्यांच्या प्रयत्नांनी मराठी चित्रपटसृष्टीला वैभव, प्रतिष्ठा अन् कलात्मकता यांचा लाभ घडवून दिलेला आहे हे नाकारता येणार नाही. नवे काहीतरी करावे, व्यासंगाने आपला अभिनय नटवावा, हा त्यांना छंद असे. खऱ्या अर्थाने त्यांना 'कॅरॅक्टर ॲक्टर' म्हणता येईल. नाना व्यक्तिमत्त्वाच्या भूमिका सरस वठवण्याचा त्यांना सोसच होता!

'महात्मा फुले' या आमच्या चित्रपटात मिळालेली महात्मा फुल्यांची भूमिका यथातथ्य वठावी म्हणून त्यांनी अपार कष्ट केले. 'अयोध्येचा राजा'-मधील गंगानाथ महाजनाच्या भूमिकेने त्यांनी मिळविलेले यश आजतागायत रसिकांच्या मनात ताजेतवाने आहे. पण एकदा मिळालेल्या यशावर संतुष्ट होऊन, त्याच्या फक्त आवृत्त्यावर आवृत्त्या काढीत बसण्याचा त्यांना कंटाळा होता. त्यांना सदा काही तरी नवे, काही तरी निराळे, रसिकांसमोर ठेवण्याची त्यांची जिद्द असे. म्हणूनच त्यांनी 'धर्मवीर', 'देवता', 'अर्धांगी', 'अमृत', 'पहिला पाळणा', 'भक्त दामाजी', 'जय मल्हार', 'डॉ. कोटणीस', 'नवरंग', 'दो आँखें बारह हाथ', 'मी दारू सोडली', 'मानाचं पान', 'श्यामची आई,' 'म. फुले', 'पुनवेची रात' वगैरे बोलपटांत वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखेच्या भूमिका यशस्वी करून दाखविल्या. वैचित्र्य आणि समरसता हे बाबूरावांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य सांगता येईल.

अभिनयाबाबत ते गणपतराव जोशी आणि नारायणराव राजहंस (बालगंधर्व) या दोन श्रेष्ठ नटांना आदर्श मानीत. बालगंधर्वांच्या निधनाने व्याकुळ होऊन त्यांनी 'एकमेवाद्वितीय कलानिधी' असा त्यांचा गौरव करणारा लेख 'दैनिक मराठा'मध्ये लिहिला होता, त्याला अजून चार महिनेही झालेले नाहीत. तोच स्वतः बाबूरावच आज जणू बालगंधर्वांच्या भेटीलाच गेले आहेत! अभिनयामध्ये सहजता असावी हा त्यांचा आग्रह बालगंधर्व आणि गणपतराव यांच्या अभिनयाने त्यांच्या मनावर केलेल्या संस्कारांतून जन्मलेला होता. अर्धशतकभर त्यांनी पन्नाससाठ चित्रपटांत भूमिका केल्या. त्या करताना त्यांनी हेच सूत्र मनाशी

बाळगलेले होते. त्यामुळेच भूमिका छोटी वा मोठी असली तरी बाबूराव चांगली छाप पाडून जात.

चित्रपटात सपाटून यश मिळाल्यावर वय पन्नाशीकडे झुकू लागल्यानंतर बाबूराव रंगभूमीवर कामें करू लागले. ' झुंझारराव ' ही त्यांची रंगभूमीवर गाजलेली भूमिका आम्हीच त्यांच्यावर लादली होती ! रंगभूमीवरही त्यांनी खूप प्रेम केले. ' झुंझारराव ', ' घनश्याम ', ' सुधाकर ', ' शहाजी ', ' अंभी ' यांसारख्या भूमिका त्यांनी चांगल्याच गाजवल्या. मध्येच दुष्ट कर्करोगाने त्यांना पछाडले नसते तर आणखीही काही भूमिका करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. पण दोन वर्षांपूर्वी कॅन्सरने त्यांना गाठले आणि अलीकडे पाचसहा महिने तर अगदी अगतिक करून टाकले. कर्तबगार माणसाचे जीवन कर्करोग कसे बेकार करू शकतो, याचे हे उदाहरणच म्हणता येईल.

तसे बाबूरावांचे जीवन सांसारिक आणि आर्थिक दृष्टया पूर्ण सुखी होते. त्यांचे दोन्ही मुलगे—त्यागराज आणि श्रीकांत उद्योगाला लागलेले आहेत. दोन्ही मुली पदवीधर असून सुरेखाचे लग्नही दोन वर्षांपूर्वीच झालेले आहे. गतवर्षीच त्यागराजला पुत्रलाभ झाल्याने बाबूरावांनी नातवंडाचेही तोंड पाहिले ! त्यांचा कोल्हापूरच्या राजारामपुरीतील स्वतःच्या मालकीचा बंगला–साईस्मृती–सरकार-कडे सेल्स टॅक्सच्या कार्यालयासाठी गेला होता. तो त्यांना सहा महिन्यांपूर्वीच परत मिळाला होता. स्वतःच्या वास्तूत राहावयास आल्याचे समाधान त्यांना लाभले होते. सुगृहिणी पत्नी कुमुदिनीबाई यांच्या सोबतीने ते सुखी जीवन जगत होते. सहा वर्षांपूर्वी ' चित्र आणि चरित्र ' हे आत्मचरित्र त्यांनी लिहून प्रसिद्ध केले आणि आपल्या अंगचा एक वेगळाच तेजस्वी पैलू मराठी जनतेच्या प्रत्ययास आणून दिला. या यांच्या आत्मचरित्राचा सर्वांनी मोठा गौरव केला आणि मराठी चित्रपटसृष्टीसंबंधीचे पहिलेच प्रमाणित पुस्तक म्हणून ते सर्वमान्यही झाले होते. अशा सर्व परिस्थितीमुळे बाबूरावांच्या जीवनात असमाधानाला अवसर राहिला नव्हता. म्हणूनच त्यांनी आम्हांला एका पत्रात लिहिले होते की, " मृत्यूच्या हाकेला ओ देण्यास सिद्ध आहे. "

जीवनातील सारे रस रसिकतेने उपभोगून संतुष्ट झालेले बाबूराव पेंढारकरांचे मन आजची मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टी यांची अवस्था पाहून मात्र तळमळत असे ! ज्या कलेने त्यांना जोपासले–मोठे केले, कीर्ती-यश-पैसा यांचा लाभ करून दिला, त्या कलेला सध्या जे दुर्दैवाचे दशावतार पाहावे लागत

आहेत त्यामुळे ते विव्हल होत. वैयक्तिक जीवनात पूर्ण सुखी असलेल्या बाबूरावांना सध्याचे मराठी चित्रकलाजीवन व्याकुळ करी! या कलेसाठी काही तरी करावे म्हणून त्यांच्या मनाची तगमग चाले. पुन्हा ' हंस पिक्चर्स ' सुरू करण्याचे स्वप्न त्यांच्या डोळ्यांपुढे तरळत होते. ' भक्त कबीर ' चित्राची कथा त्यांच्या मनात घोळत राही. नवे नाटक रंगभूमीवर आणण्यासाठी त्यांचे मन उसळ्या मारी. ' चित्र आणि चरित्रा 'ची पुढील कथा लिहून काढावी अशी उत्कंठा त्यांना बेचैन करी! शरीर दुबळे होत होते. पण ' मनःशांतीची कबुतरे ' आकाशात उंच उंच भराऱ्या मारीत होती! आणि आज बाबूराव पेंढारकर स्वतःच त्या कबुतरांप्रमाणे उंच उंच उडून गेले आहेत! आता पुन्हा ते आमच्या हाती सापडणार नाहीत की राजारामपुरीतील त्यांच्या ' साईस्मृती 'मध्ये दिसणार नाहीत! गुरुवारी रात्रौ आकाशातील तारकापुंजात बाबूराव पेंढारकर या तेजस्वी ताऱ्याची भरती झाली आहे! त्यांच्या वियोगाश्रूंनी डबडबलेल्या आमच्या दुबळ्या डोळ्यांना मात्र तो नवा तारा दिसत नाही. दुर्दैव आमचे! दुसरे काय म्हणावे?

(मराठा : २१-११-१९६७)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

२२

## गुणीदास गेले !

'गुणीदास' ह्या नावाने सर्वविख्यात असलेले पंडित जगन्नाथबुवा पुरोहित हे अकस्मात दिवंगत झाले, आणि त्यांच्या निधनाने भारतीय संगीताच्या आकाशात इतकी वर्षे अढळ तेजाने चमकत असलेली एक अलौकिक विभूती अंतर्धान पावली. संगीतातली प्रगाढ विद्वत्ता, त्या विद्येचे दातृत्व, नितांत गुरुभक्ती अन् तसेच आपल्या शिष्यांवरचे अपरंपार प्रेम अशा अनेक दुर्मिळ गुणांचा जगन्नाथबुवांमधे मोठा मनोज्ञ समन्वय झाला होता, आणि इतके असून बुवांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य हे की, संगीत सृष्टीतल्या वेगवेगळ्या नि कदाचित परस्पर-विरोधी अशा अनेक थरांतही ते सारखेच प्रिय नि आदरणीय होते. देवधर, रातंजनकर ह्यांच्यासारखे पंडित शिक्षक-गायक, कुमारगंधर्व, भीमसेन जोशी ह्यांच्या-सारखे मैफली गाजविणारे गायक, राम मराठे, सुरेश हळदणकर ह्यांच्यासारखे नटनायक अथवा गोविंदराव जोशी, बाबूराव जोशी ह्यांच्यासारखे हौशी गायक आणि मुंबई, पुणे, कोल्हापूर इत्यादी अनेक ठिकाणी इतस्ततः पसरलेला बुवांचा असंख्य शिष्यगण या सर्व स्तरांत असामान्य लोकप्रियता संपादन करणारा हा थोर कलावंत फारच मोठ्या अधिकाराचा असला पाहिजे, हे काय निराळ्या शब्दांमधे सांगावयाला हवे ? बुवांशी नाना ऋणानुबंधांनी निगडीत झालेल्या ह्या अनेक व्यक्ती काय एकाच प्रवृत्तीच्या होत्या असे म्हणता की काय ? कोणाला बुवांकडून स्नेहाचा संगीतमय सुखसंवाद हवा होता, तर कोणाला रागरूपाची खोल चिकित्सा बुवांकडून हवी होती. कोणाला वेगवेगळ्या

बनावटीच्या बंदिशीचा व्यास होता, तर कोणाला बुवांकडून तात्त्विक चर्चा हवी होती. त्यांच्या स्वतःच्या शिष्यांना तर वर्षानुवर्षे सातत्याने बुवांनी तालमी दिलेल्या असताही त्यामुळे लेशमात्र न घटलेल्या ज्ञानाच्या वाहत्या नि जिवंत झऱ्यात पुन्हा पुन्हा अवगाहन करण्याची तगमग वाढतच होती. म्हणून अंगात विविध गुणांचा प्रचंड समुच्चय असल्याखेरीज भिन्नभिन्न प्रवृत्तीच्या या व्यक्तींची मने वर्षानुवर्षे आकर्षित ठेविता येत नाहीत, किंवा त्यांच्यामधे लोकप्रियता मिळविता येत नाही, आणि मिळालीच तर ती टिकविता येत नाही. नुसता मैफलीतला यशस्वी गायक असूनही तो पुरा पडत नाही. तो कलावृत्तीच्या दृष्टीने कुबेर अन् ज्ञानाच्या नि चिजांच्या दृष्टीने 'भांडवलदार' गवईच असावयाला पाहिजे. जुन्या काळी अशा 'भांडवलदार' गायकांना 'कोठीवाले' गवई असे म्हणत. बुवांच्याजवळ या सर्व प्रकारच्या ज्ञानाचे नि वेगवेगळ्या बनावटीच्या चिजांचे भांडवल तर अमर्याद होतेच; पण त्याच्या जोडीला त्यांच्याजवळ आणखी एक अद्‌भुत विद्या होती. ती म्हणजे त्यांची सृजनशीलता. त्यांनी स्वतः केलेले किती तरी राग नि चिजा गेली कित्येक वर्षे हौसेने शिकल्या जात आहेत नि शिकविल्या जात आहेत. अनेक जुन्या रागांतून, त्याचप्रमाणे स्वतः केलेल्या नव्या रागांतून नवीन चिजा त्यांनी किती तरी बांधल्या असतील, त्याची त्यांना स्वतःलासुद्धा कल्पना नसावी. त्यांची जोगकंसमधील 'सुगर भर पायो' ही चीज किंवा 'सखी मंदरवा मे' ही बिहागड्यातील चीज अथवा 'बेग बेग आवो मंदर' ही अहिरभैरवामधील चीज अशा त्यांच्या अनेक चिजा इतक्या लोकप्रिय झाल्या आहेत, की किती तरी नामवंत गायक कैक मैफलींमधून त्या सतत गात असतात किंवा कोठल्या ना कोठल्या तरी नभोवाणीवरून त्या गायल्या जात असताना कानावर पडत असतात.

नवीन नवीन बंदिशी तयार करण्याला संगीतकाराच्या अंगी असामान्य प्रतिभा असावी लागते. काहींच्या नुसत्या अस्तायाच बांधून झालेल्या असतात, तर अंतरे वर्षानुवर्षेही सुचत नाहीत; आणि काहींची नुसती समेची तोंडेच सुचलेली असतात. तात्पर्य काय की, पूर्णावस्थेला पोहोचलेल्या बंदिशीचे प्रमाण आधी एकूण कमीच. शिवाय नवीन होणारी चीज अत्यंत सुबक पाहिजे. तिचा चेहरा सुंदर पाहिजे. तिचे चालणे आकर्षक पाहिजे. पदन्यास लयबद्ध हवेत आणि तिचे विभ्रम उन्मादकारक पाहिजेत. एकूण ती साक्षात स्वरूप-सुंदरी आणि मोहमयीच असावयाला हवी. इतक्या सर्व परीक्षांतून ती उतरली तरच

ती गायकांना हवीहवीशी वाटणार. नाहीतर ती कोठल्या तरी सांदीकोपऱ्यात तशीच पडून राहणार. अशा अनेक कसोट्यांच्या अग्निदिव्यातून शतगुणित तेजाने बाहेर पडलेल्या बुवांच्या चिजा-रूपी कन्यका एकापेक्षाही एक रूपवती ठरलेल्या आहेत. म्हणून त्यांना जगात एवढी अपरंपार लोकप्रियता प्राप्त झाली आहे. बुवांच्या जीवनातली ही एक असाधारण सिद्धी होय! बुवांनी देखील आपली कोठलीही चीज नीटपणे बसवून मैफलीमधे गाऊन स्वतःची खात्री करून घेतल्याखेरीज कधी पक्की केली नाही, अथवा आपल्या शिष्यांना शिकविली नाही.

त्यांच्या या विद्वत्तेचे नि असामान्य कर्तृत्वाचे बीज हे की, वयाच्या दहाव्या वर्षापासून त्यांचा जन्म हैद्राबादच्या मुसलमान उस्तादतांच गेला. सतत तीस पस्तीस वर्षे त्यांचे सर्व जीवन अन् सर्व व्यवहार, अशा उस्ताद लोकांच्या सहवासात गेल्यामुळे मुसलमानी संस्कार त्यांच्या रोमरोमात भिनले जाणे हे साहजिकच होते. वास्तविक त्यांना 'बुवा' अगर 'पंडित' म्हणणेदेखील जिवावर यावे. 'जगन खाँ' असेच त्यांचे नाव पडावयाला पाहिजे होते. आयुष्यात महान महान उस्ताद त्यांना भेटले. उदाहरणार्थ, सिकंद्रा घराण्यातले महंमदअली खांसाहेब, तीनरस खाँचे पुत्र उमराव खाँसाहेब, त्यांचे पुत्र सरदारखाँ आणि भांजे शब्बू खाँसाहेब, गुडीयाना घराण्यातले बशीर खाँ, तलवंग घराण्यातले गुलाब महंमद खाँसाहेब आणि अखेर आग्रेवाले विलायत खाँसाहेब इतक्या वेगवेगळ्या नि नामवंत अन् घरंदाज गवयांच्या तालमी आणि त्याही इतक्या वर्षे सातत्याने मिळण्याचे भाग्य एखाद्यालाच लाभते. कोणाजवळ त्यांनी 'स्वर'साधना केली, कोणाजवळ 'आलापी' शिकली, कोणाची 'बोलउमज' घेतली, कोणाकडून 'खेचतानी' घेतली, तर कोणाकडून 'आडीदिंडी'चे चलन आत्मसात केले आणि वेगवेगळ्या बनावटीच्या चिजा तर सर्वांकडून घेतल्या. अन् आश्चर्याची गोष्ट ही, की या सर्व थोर पुरुषांनी आत्मीयतेने त्या त्यांना दिल्या आणि त्याहीपेक्षा सर्वांत आश्चर्य हे, की हे सर्व वैभव खिशामधे दिडकी नसताना त्यांनी मिळविले. केवळ स्वतःच्या सेवेच्या सामर्थ्यावर की, जे त्यांच्याजवळ अपरंपार होते! या निरपेक्ष नि निरलस सेवेमुळेच बुवा या सर्व लोकांचे लाडके झाले, आणि त्यांची सर्व उस्तादी विद्या त्यांना हस्तगत करता आली.

ज्या 'गुणीदास' या नावाने त्यांनी आपली बंदिशी केली आहे, ते नावदेखील त्यांनी स्वतः ठेवलेले नसून, ते हैद्राबादमधल्या या खाँसाहेब लोकांनीच



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... दि: ...................
क्रमांक .......................... नों: दि: ..................

त्यांना दिले आहे. 'तू खरा गुणांचा दास आहेस!' असे हे खाँसाहेब लोक म्हणता म्हणताच 'गुणीदास' हे त्यांचे नाव जे एकदा पडले, ते कायमचेच त्यांना चिकटले. बुवांचे गुरू विलायत खाँसाहेब. त्यांच्या त्या गुरुप्रेमाचे पर्व त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात जितके रमणीय होते, तितकेच ते संगीत-विद्येच्या गुरु-शिष्यसांप्रदायाचे भूषण म्हणून अमर ठरेल! साधुसंतांनी भगवंताची जी भक्ती केली तिने ओवीरूप वा अभंगरूप धारण केले. पण बुवांनी आपल्या गुरुजीची भक्ती केली ती संगीतात बंदिशीच्या रूपाने प्रकट झाली. पण दोन्हीही भक्तींचा प्रकार मुळात एकच. किंबहुना संगीत-विद्येतला हा एक अद्‌भुत प्रेम-संबंधच होता. या प्रेमसंबंधातले 'प्रियकर' होते विलायत खाँसाहेब आणि 'प्रेयसी' होते स्वतः जगन्नाथबुवा! या प्रेमसंबंधात बुवांनी खाँसाहेबांवर भक्ति-भावाने जसा बंदिशीरूपी फुलांचा अक्षरशः वर्षाव केला, तशाच खाँसाहेबांनीही बुवांच्यावर प्रसन्न होऊन त्यांच्यावर आशीर्वादाच्या अनेक बंदिशी उधळल्या. ही प्रेमसंबंधाची साथ बुवांच्या शिष्यापर्यंत पसरत गेली आणि त्यांनीही पण बुवांच्या चरणी शेकडो बंदिशी अर्पण केल्या. "एकमेकांवर प्रेमिकाप्रमाणे आषक असलेल्या या गुरुशिष्यांत प्रेमाचे रुसवे–फुगवे काही कमी झाले नाहीत. पण ते लागलेच दूर होत. अशा एका प्रसंगी आपल्या सुप्रसिद्ध जोगकंसातल्या मध्यलयीतल्या चिजेने बुवांनी आपली व्यथा प्रकट केली. 'प्राणपिया तुम ऐसे निष्ठुर भये। गुनिदास की सारी आस गमाई।' 'सुंदर भर पायो' आणि 'पीर पराई जानी नाही' या चिजा तर आता इतक्या मान्य झाल्या आहेत, की त्या कुणा तरी पूर्वीच्या सदारंग–अदारंग ह्यांनी रचल्या आहेत की काय असा संभ्रम पडावा." (षड्ज–गांधार, पान १३५)

विलायत खाँसाहेब आग्र्याला आजारी आहेत असे कळताच बुवा पराकाष्ठेचे अस्वस्थ होत असत. पत्र पाठवायला वेळ नसे म्हणून ते स्वररूपाने परमेश्वराला प्रार्थना करीत, "तेरो जिया सुख पावे निसदिन मेरे गुणवंता। बिनती प्रभुसे 'दासगुनी' की, जुगजुग जिया मेरे 'प्राण' (राग : अहिर भैरव 'प्राणपिया' हे खाँसाहेबांचे चिजेतील नाव)" त्यानंतर खाँसाहेबांना आता बरे वाटत असावे अशी स्वतःच कल्पना करून घेऊन पुन्हा त्याच रागात ते खाँसाहेबांना प्रार्थना करीत, "बेग बेग आवो मंदर। बहुत दिन न बीते॥ सूजत कछु नाहीं मोहे। निस दिन घरी पल छिन। 'गुनीदास' को दरस दीजे ओ प्राणपिया॥" तेव्हा अखेर गुरूंनी प्रसन्न होऊन बुवांना पुढील आशीर्वाद दिला,

"साच गुरुनकी सेवा । करत वोहि पावे समाधान । प्रेमभक्त 'प्राण' कहत । सुन हो 'गुनीदास'। या दोऊ जगमें प्रभू। तोहे देत बढो नाम ॥ (राग पटदीप)" खाँसाहेब असेच एकदा मुंबईत आजारी असताना त्यांना आराम पडो अशी प्रार्थना असलेली एक चीज बुवांनी आकाशवाणीवरून गायिली. खाँसाहेबांनी ती ऐकली. नंतर बुवा त्यांना भेटायला गेले, तो आजारीपणात उठूही न शकणारे खाँसाहेब ताडकन उठून उभे राहिले आणि त्यांनी बुवांना कडकडून मिठी मारली. दोघांच्याही डोळ्यांतून आसवे पाझरू लागली. अखेर सद्गदित कंठाने खाँसाहेब म्हणाले, "बुवा, तुम्ही जे माझ्यासाठी केले ते कोणीही — माझ्या मुलांनीही केले नाही।" असे म्हणून पुन्हा त्यांनी अश्रूंना वाट करून दिली. खाँसाहेब जेव्हा कालवश झाले, तेव्हा बुवांनी आकांत केला. 'षड्ज-गांधार' कर्ते म्हणतात, "खाँहेब आणि जगन्नाथबुवा ना नात्यागोत्याचे, ना एका रक्ताचे, ना एका धर्माचे, कुठून कशी ही नादलुब्ध कलावंत मंडळी एकत्र येतात आणि एकमेकांच्या स्नेहपाशात गुंतून पडतात. या विषयावर जर संगीतकलेच्या साधकांनी इतिहास लिहिला, तर खासाहेब आणि जगन्नाथबुवा यांच्या अन्योन्य भक्तीचे–गुरुनिष्ठेचे आणि गुरुप्रेमाचे एक स्वतंत्र नि मनोज्ञ असे प्रकरण लिहावे लागेल!" बुवांच्या निधनाने भारतीय संगीताची केवढी हानी झाली आहे, हे सर्वसामान्य वाचकांना कसे समजणार? म्हणून त्यांना आम्ही एवढेच सांगतो की, केवळ गुणांवर प्रेम करण्याचीच ज्याने जन्मभर तपश्चर्या करून मोठमोठ्या उस्तादांचे अमर वरदान मिळवले, तो भारतीय संगीतकलेचा संगमरवरी शिल्पकार 'गुणीदास' आज नादब्रह्मात विलीन झाला आहे!

सूरज चंदा जब तक फिरे,
सबन तोरे नाम सुमीरन करे।
ऐसो 'गुनीदास' तुम कियो,
अमर धुन साच सप्तसुरनमे।

(मराठा : २८-१०-१९५९)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

२३

## बालमनोवृत्तीचा मास्टर विनायक

एकतीस साली विनायकाला मी कोल्हापूर येथे प्रथम पाहिले. त्या वर्षी कोल्हापूर येथे साहित्य संमेलन भरले होते. त्या संमेलनासाठी मी तेथे गेलो होतो. महाराष्ट्रातले बरेचसे प्रमुख कवी त्या ठिकाणी एकत्र जमलेले पाहून त्यांच्या काही कविता रुपेरी पडद्यावर चित्रित करण्याची कल्पना श्री. व्ही. शांताराम यांना सुचली. त्यांच्या बोलावण्यावरून आम्ही पाच-सहा कवी ' प्रभात स्टुडिओ 'मध्ये गेलो. आम्ही प्रवेश करताच विनायक हसत हसत आम्हाला सामोरा आला. त्या वेळी त्याचे वय बावीस-तेवीस वर्षांचे असावे. त्याचे दोन दात ओठाबाहेर किंचित डोकावत असले तरी त्याचा चेहरा मला अतिशय सुबक आणि मोहक वाटला. कपाळावरून उलटे फिरविलेले आणि मानेवर मागे रुळणारे त्याचे काळेभोर केस, अंगात गुडघ्यापर्यंत लांबीचा गळेबंद पांढरा सैलसा सदरा, धोतराचा सोगा पुढे सोडलेला आणि एका हातात कसला तरी जाड लठ्ठ ग्रंथ अशी ती विनायकाची मूर्ती बघून हा चित्रपटात काम करणारा रंगेल नट नसून योग-विद्येचा किंवा अध्यात्मशास्त्राचा अभ्यास करणारा एखादा तापसी तरुण असावा असे मला वाटले.

प्रथमदर्शनी ही जी माझी समजूत झाली ती पुष्कळ अंशी बरोबर होती. विनायकाला गाण्याचा नाद होता, अभिनयाची आवड होती आणि चित्रपटाचे त्याला आकर्षण वाटत होते, हे सर्व खरे. तथापि, त्याचे जीवन आध्यात्मिक वातावरणात वाढलेले होते. नैतिक मूल्यांचा त्याच्या मनावर जास्त पगडा पडलेला

होता. ब्रह्मचर्यपालनाचे विचार त्याच्या मनात घोळू लागले होते. ऐहिक गोष्टीपेक्षा पारमार्थिक ध्येयांबद्दल त्याला अधिक आस्था वाटत होती. मेहेरबाबांच्या शिष्यमंडळात तो जवळजवळ दाखलच झाल्यासारखा होता. व्ही. शांताराम, भालबा पेंढारकर आणि बाबूराव पेंढारकर असे मराठी चित्रपटांचा पाया घालणारे एकाहीपेक्षा एक पराक्रमी आणि कर्तबगार भाऊ जर विनायकाला लाभले नसते तर विनायक हा चित्रपटात येण्याऐवजी कुठल्या तरी विद्यापीठात शिक्षक झालेला महाराष्ट्राला दिसला असता. विनायकाच्या नैसर्गिक प्रवृत्तीपेक्षा त्याच्या भोवतालच्या वातावरणानेच त्याच्या जीवनाची दिशा ठरवली. बाबूराव पेंढारकरांच्या प्रेरणेने आणि व्ही. शांताराम यांचा तेजस्वी आदर्श डोळ्यांसमोर ठेवून विनायकाने शिक्षकाच्या धंद्याचा निरोप घेतला आणि चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले.

चित्रपटसृष्टीत त्याच्याइतका यशस्वी प्रवेश कुणीही केलेला नसेल. ' अयोध्येचा राजा 'मधील आपल्या पहिल्या भूमिकेनेच त्याने हजारो प्रेक्षकांची मने आपल्याकडे वेधून घेतली आणि ' गोरखा 'च्या कामामुळे तर तो लोकप्रियतेच्या शिखरावरच जाऊन बसला. विनायकाचा अध्यात्मवादी स्वभाव गोरखाच्या भूमिकेशी सर्वस्वी जुळणारा असा होता, म्हणूनच ते काम त्याच्या हातून अधिक यशस्वीपणे वठले. मराठी रंगभूमीवर बालगंधर्वांना जेवढी कीर्ती मिळाली तेवढी विनायकाला पहिल्या वर्षाच्या आतच रुपेरी पडद्यावर लाभली. म्हणून विनायकाला ' मराठी चित्रपटामधला बालगंधर्व ' असेच म्हणावयाला हवे. तथापि विनायकाचा आवाज त्या वेळीं जसा सुरेल आणि चढा होता, तसा तो पुढे फार दिवस राहू शकला नाही हे त्याचे खरोखर दुर्दैवच होय. नाही तर संगीत नट म्हणून त्याने रुपेरी सृष्टीत सायगलच्या खालोखाल असामान्य लोकप्रियता मिळविली असती याविषयी मला तरी शंका नाही.

यानंतर चार वर्षांनी विनायकाची आणि माझी पुन्हा गाठ पडली. त्या वेळी ' हंस पिक्चर्स 'ची स्थापना झालेली होती आणि ' छाया ' चित्रपटाला प्रारंभ झाला होता. विनायकाच्या गळ्यात एकदम फरक पडल्याचे त्याच वेळी माझ्या नजरेला आले आणि मला अतिशय वाईट वाटले. पुण्याच्या डॉ. घारपुऱ्यांकडून त्याने त्या वेळी आपल्या टॉन्सिल्सही काढून घेतल्या, पण त्याचा आवाज पूर्वीप्रमाणे काही सुधारला नाही. ' धर्मवीर ' बोलपटापासून माझा आणि विनायकाचा प्रत्यक्ष असा संबंध आला. या बोलपटात मुख्य भूमिका बाबूराव

पेंढारकरांची होती. विनायकाला तडफदार, भावनाप्रधान पण गंभीर अशीच भूमिका जमते अशी तोपर्यंत माझी कल्पना होती, आणि म्हणूनच तशाच ढंगाची भूमिका मी त्याच्यासाठी त्या बोलपटात मुद्दाम लिहिली. तथापि माझ्या पद्धतीप्रमाणे काही विनोदी वाक्ये मी त्याच्या तोंडी अधूनमधून घातली होती. ती त्याने इतक्या ठसकेबाज अभिनयाने वठवून दाखविली की, बोलपट तयार झाल्यानंतर विनायक हा गंभीर अभिनयापेक्षा विनोदी कामच अधिक चांगले करू शकेल असे माझ्या लक्षात आले. ही गोष्ट तोपर्यंत माझ्याखेरीज कोणाच्याही ध्यानी आलेली नव्हती. विनायकाच्या अभिनयाची ही नवीन बाजू मी त्याच्या निदर्शनाला आणून दिली, आणि 'तुमच्यासाठी आरंभापासून अखेरपर्यंत संपूर्ण विनोदी बोलपट' लिहिण्याच्या विचारात मी आहे, असे मी त्याला सांगितले. त्याबरोबर 'अशी भूमिका आपण उत्तम तऱ्हेने वठवून दाखवू' असे हर्षभरित होऊन विनायक उद्गारला. लागलेच मी 'प्रेमवीर' बोलपट लिहून पुरा केला. येथून पुढे विनायकाच्या विनोदी आणि लोकप्रिय अभिनयाच्या नव्या कालखंडाला सुरुवात झाली. 'प्रेमवीर'चे ध्वनिमुद्रण अत्यंत वाईट असूनही विनायकाच्या उत्कृष्ट अभिनयामुळे तो चित्रपट अतिशयच लोकप्रिय झाला.

चित्रपटाच्या धंद्यात यशस्वी होण्यास लागणारे सारे गुण जसे विनायकाच्या अंगी होते, त्याप्रमाणे चित्रपटाच्या धंद्यामध्ये नडणारे काही अवगुणही त्याच्या अंगात तीव्रतेने होते, असे या वेळी मला आढळून आले. त्याचा स्वभाव अतिशय हट्टी, दुराग्रही, एककल्ली आणि अनियमित असे. दिग्दर्शनाची उत्तम प्रतिभा त्याच्याजवळ होती, पण त्याचा शास्त्रीय अभ्यासमात्र त्याने मुळीच केलेला नव्हता. श्री. जुन्नरकरांचे व्यासंगी साहाय्य आरंभी त्याला मिळत गेले हे खरोखरच त्याचे भाग्य म्हटले पाहिजे. कोणत्या दिवशी काय चित्रण करावयाचे याचा आराखडा जुन्नरकर लिहून काढीत. पण विनायक आयत्या वेळी त्यात एकसारखा बदल करीत जाई. त्यामुळे रोजचे ठराविक काम वेळेवर कधी सुरू होत नसे आणि ठराविक वेळेच्या आत कधी संपत नसे. एखाद्या कवीप्रमाणे दिग्दर्शनाची स्फूर्ती यावी म्हणून डोक्याला हात लावून विनायक 'सेट'वर तासन् तास वाट पाहात बसे, आणि तोंडाला रंग लावून नट आणि नटी आजूबाजूला माश्या मारीत बसत. कॅमेऱ्याचे आणि पटजुळणीचे तांत्रिक ज्ञानही त्या वेळी विनायकाला फारसे नव्हते. ती त्याची कच्ची बाजू श्री. पांडुरंग नाईक यांनी उत्तम सांभाळून

ठेवली होती. अभिनय शिकवण्याच्या बाबतीतमात्र विनायक हा वाघ होता. तेच खरे त्याच्या दिग्दर्शनाचे सामर्थ्य होते. त्याखेरीज शांतारामबापूंच्या संगतीमुळे बोलपट सजवण्यासाठी नवीन नवीन क्लृप्त्या आणि हिकमती शोधून काढण्याचा विनायकाला हव्यास जडलेला होता. तो त्याच्या दिग्दर्शनाला फारच उपकारक ठरला.

विनायक हा जात्या तल्लख आणि बुद्धिमान असल्याने आपल्या दिग्दर्शनामधल्या आरंभीच्या ह्या सर्व तांत्रिक उणिवा भरून काढावयाला त्याला काही फारसा वेळ लागला नाही. त्याच्या दिग्दर्शनात झपाट्याने सुधारणा होत गेली. पण ठराविक मुदतीत आणि ठराविक लांबीत बोलपट पुरा करण्याची शिस्त आणि आटोप हे गुणमात्र त्याच्या अंगी कधीही येऊ शकले नाहीत. त्यामुळे पैशाच्या दृष्टीने संस्थेचे नेहमीच नुकसान होत असे. ‘ज्वाला’ या बोलपटाचे असेच झाले. विनायकाच्या लहरीपणामुळे आणि दिरंगाईमुळे तो बोलपट वेळेवर पुरा होऊ शकला नाही. त्या बोलपटाबाबत कोणाच्या कसल्याही सूचना ऐकण्याचे त्याने हट्टीपणामुळे साफ नाकारले. याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला. बोलपट कोसळला आणि ‘हंस पिक्चर्स’ नेस्तनाबूत होण्याची पाळी आली. या प्राणसंकटामधून विनायकाला आणि त्याच्या संस्थेला ‘ब्रह्मचारी’ ने वाचवले. हा खरोखर आयुष्यातला एक अद्‌भुत योगायोगच म्हणायला हवा. ‘ब्रह्मचारी’ बोलपट लिहिण्याची कल्पना प्रथम माझ्या डोक्यात कशी आली हे आज काही मला सांगता येणार नाही. ‘हंस पिक्चर्सला वाचविणे आता सर्वस्वी तुमच्या हातात आहे’ असे बाबूराव पेंढारकरांनी डोळ्यांत अश्रू आणून मला सांगितले, आणि मीही मागलापुढला विचार न करता नाटकातल्या परमेश्वराप्रमाणे, ‘वत्सा, काळजी करू नकोस’ असा त्यांना आशीर्वाद देऊन टाकला. त्या वेळी स्वामी शिवानंदाचे ‘ब्रह्मचर्य हेच जीवन आणि वीर्यनाश हाच मृत्यू’ हे भयंकर पुस्तक सहज एके ठिकाणी मला वाचायला मिळाले होते. म्हणून त्याच विषयावर विनोदी बोलपट लिहून ब्रह्मचर्याविषयी मूर्खपणाच्या कल्पना बाळगणाऱ्या दाढीवाल्या बैराग्यांची चांगली हजामत करावी असे मी ठरवले. विनायकाला हा विषय अतिशय आवडला. कारण ब्रह्मचर्यपालनातल्या साऱ्या हास्यास्पद उणिवा त्याला स्वानुभवाने कळून चुकल्या होत्या. त्या त्याच्या अनुभवाचा मी या बोलपटात भरपूर उपयोग करून घेतला. हा बोलपटमात्र विनायकाने कमालीच्या वेगाने पुरा केला. कारण तो यशस्वी तऱ्हेने आणि ठराविक वेळेच्या आत पुरा



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ७२०५६ वि: निबंध

होण्यावरच ‘हंस पिक्चर्स’चे जीवन-मरण अवलंबून होते. ‘ब्रह्मचारी’ बोलपटाने ‘हंस पिक्चर्स’ला फारसा पैसा दिला नाही. (कारण फायद्याचा सारा वाटा प्रकाशकाच्याच खिशात पडला.) पण त्या बोलपटाने ‘हंस पिक्चर्स’ला गडगंज कीर्ती लाभली आणि पुनर्जन्म मिळाला. विनायकाचे नाव लहानापासून मोठ्यापर्यंत साऱ्यांच्या तोंडी झाले. ह्या चित्रपटानंतर विनायकाच्या दिग्दर्शन-कौशल्यात एकदम क्रांती झाली. ‘ब्रँडीची बाटली’ आणि ‘अर्धांगी’ हे त्याच्या दिग्दर्शनाचे दोन उत्कृष्ट नमुने होत.

वास्तविक सांपत्तिकदृष्ट्या ‘हंस पिक्चर्स’ यशस्वी व्हावयाला हवी होती. तथापि, विनायकाच्या पेशवाई थाटामुळे ते काही होऊ शकले नाही. दिवसेंदिवस हिंदी भाषेतील बोलपटांचे महत्त्व वाढत चालले होते. पण हिंदी भाषा शिकून तिच्यात प्रावीण्य मिळविण्याचा विनायकाने कधीच प्रयत्न केला नाही. म्हणून ‘हंस पिक्चर्स’चे हिंदी बोलपट मराठी बोलपटांइतके यशस्वी झाले नाहीत. पुढे एकूणचाळीस साली अभ्यंकर-राजगुरूंच्या साहाय्याने मी ‘नवयुग चित्रपट लिमिटेड’ कंपनी स्थापन केली. यामध्ये प्रारंभी ‘हंस पिक्चर्स’चा समावेश करून घेण्याचा माझा विचार नव्हता, पण काकासाहेब लिमयांच्या आग्रहावरून ती घटना घडून आली, आणि ‘हंस पिक्चर्स’च्या भागीदारांना आम्ही आपल्या भागीदारीत घेतले. तथापि, ‘नवयुग चित्रपट’ या संस्थेला आमच्या ऐक्याचा आणि सहकार्याचा लाभ फार दिवस मिळू शकला नाही. ‘पटनिर्मितीचा सर्वाधिकार एकट्या मजकडेच पाहिजे’ असा पहिल्या चित्रानंतर विनायकाने हट्ट धरला. बाबूराव पेंढारकरांचे आणि त्याचे वैयक्तिक मतभेद फार विकोपाला गेले आणि त्याचा परिणाम असा झाला की, आधी कंपनीतून मी निघून गेलो, नंतर बाबूराव निघाले आणि शेवटी ती कंपनी स्वतः विनायकालाही पण सोडावी लागली. आमचे सर्वांचे असे तिरपागडे होण्यास केवळ विनायकाचा बालहट्टच कारणीभूत झाला.

तेव्हापासून आतापर्यंत विनायकाच्या आणि माझ्या चित्रपटसृष्टीतील सहकार्यामध्ये खंड पडलेला असला, तरी उभयतांचे ऋणानुबंध मात्र पहिल्याप्रमाणेच अबाधित राहिले होते. मुंबईत येऊन त्याने स्थापन केलेल्या ‘प्रफुल्ल पिक्चर्स’च्या अनेक कार्यक्रमांच्या प्रसंगी तो मला आर्जवून बोलावीत असे आणि मीही अगत्याने त्या प्रसंगी हजर राहून त्याला शक्य ती मदत करीत असे. पुन्हा मी त्याच्यासाठी एखादा विनोदी बोलपट लिहावा असे माझे दोन्ही दंड धरून तो

मला नेहमी आग्रहपूर्वक सांगे, आणि मीही त्याच्या त्या विनंतीला कधी नकार देत नसे. पण काही ना काही तरी कारणामुळे पुन्हा तो योग काही जुळून आला नाही.

गेल्या चार वर्षांत हिंदी चित्रपटांचा धंदा अनेक संकटांमधून गेला आहे, आणि सध्याच्या घटकेला तर तो जवळजवळ जमीनदोस्तच झालेला आहे. अशा परिस्थितीत नाना तऱ्हेच्या विकट संकटांना तोंड देत विनायक अद्यापपर्यंत या धंद्यात तग धरून राहिला होता. विनायकाच्या स्वभावात गुणदोषांचे इतके चमत्कारिक मिश्रण झाले होते की, व्यावहारिक दृष्ट्या आपला धंदा यशस्वी करून दाखविणे हे त्याला अगदी अशक्य होते. स्वतःच्या संस्थेतल्या नोकरांना तो आपल्या कुटुंबातल्या माणसांप्रमाणे वागवी. म्हणून पुष्कळांची जरूर नसतानाही त्यांना नोकरीमधून काढून टाकण्याचे धैर्य त्याला होत नसे. त्यामुळे त्याच्या डोक्यावरील आर्थिक ताण एकसारखा वाढत गेला. कलेचा विचार करण्याऐवजी कर्जाचा विचार करणे त्याला भाग पडू लागले. पुढे पुढे कलाही जमेना आणि व्यवहारही साधेना, असा त्याच्या जीवनाचा सगळा घोटाळा होऊन बसला. विनायकाचा खरा पिंड हा कलावंताचा होता. व्यवहार आणि धंदा यात त्याच्या बुद्धीला काहीही गम्य नव्हते. पण तेही तंत्र आपण जाणू शकतो या अभिमानाला विनायक बळी पडला. विनायकाच्या निर्मळ कलात्मकतेचा विकास व्हावा हीच 'नवयुग चित्रपट कंपनी'च्या स्थापनेमागची आम्हा सर्वांची भावना होती. विनायकाच्या हट्टामुळे आम्हा सर्वांपेक्षा त्याचे स्वतःचेच जास्त नुकसान झाले.

अमर्याद प्रेम हे विनायकाच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते. कोणत्याही व्यक्तीवर, वस्तूवर किंवा कार्यावर जेव्हा तो प्रेम करी, तेव्हा तो त्या प्रेमाच्या शेवटच्या पायरीवर जाऊन उभा राहात असे. अर्धेमुर्धे प्रेम करणे हे मुळी त्याला ठाऊकच नसे. विनायकाचे आपल्या आईवरील प्रेम पाहून जगात कोणत्याही पुत्राने आपल्या मातेवर असे प्रेम केलेच नसेल असे इतरांना वाटे. विनायकाला आपल्या भावांबद्दल एवढे प्रेम वाटे की, जेवढे जगात कोणत्याही भावाला आपल्या भावाबद्दल कधी वाटलेच नसेल. विनायकाला आपल्या मुलांबद्दल इतके अपरिमित वात्सल्य वाटे की, तितके कोणत्याही पित्याला आपल्या अपत्यांबद्दल वाटले नसेल. विनायकाच्या या असीम प्रीतिवृत्तिमधूनच त्याच्या थोर कलेचा उगम झाला. त्याच्या व्यक्तिमत्त्वात पुरुषप्रकृतीपेक्षा स्त्रीप्रकृतीचेच प्रमाण अधिक

होते. त्यामुळे कधी तो रडेल, कधी तो हसेल, कधी तो रुसेल आणि कधी तो संतापून तुमच्याशी भांडू लागेल याचा अंदाज बांधता येणे कठीण होते. क्षणात तो गट्टी फू करील, तर क्षणात तो पुन्हा गळ्याला मिठी मारील. या त्याच्या बालिश पण निष्कपट स्वभावामुळे त्याच्या गुणांबरोबर त्याच्या दोषांचेही कौतुक करण्याचा दुसऱ्याला साहजिकच मोह होत असे. विनायक वयाने वाढला पण वृत्तीने तो मूलच राहिला. म्हणून 'मास्टर' विनायक हे संबोधनच त्याला जास्त शोभते. विनायकाच्या या हट्टी मूलस्वभावामुळे शांतारामबापू किंवा बाबूराव पेंढारकर अशा आपल्या कुटुंबातील कर्त्या वडील माणसांच्या साहाय्याचा जेवढा फायदा करून घ्यायला पाहिजे होता तेवढा त्याने करून घेतला नाही. त्यामुळेच त्याने आपले मरण अकाली ओढवून घेतले असे आम्हांला तरी वाटते. पण त्याबद्दल आता त्याला दोष देण्यात काय अर्थ आहे? लहान मूल आपल्याला मिळालेली रंगीबेरंगी खेळणी हातात घेऊन जसे काही वेळ हसते, नाचते, ओरडते आणि जरा वेळाने ती खेळणी दूर कुठे तरी भिरकावून देऊन तसेच जमिनीवर झोपी जाते, त्याप्रमाणे आपल्याला प्राप्त झालेल्या प्रतिभेच्या देणग्यांचे अनेकविध रंगीबेरंगी चमत्कार जगाला दाखवून खेळता खेळता पटकन मध्येच हा छांदिष्ट विनायक झोपी गेलेला आहे. वृत्तीने तो रडका असेल, चिडका असेल, हट्टी असेल किंवा रागीटही असेल; पण त्याचबरोबर तो हसरा होता, आनंदी होता, प्रेमळ होता, भोळा होता आणि भावडाही होता, हे आपण विसरता कामा नये. नादी कलावंताचा असा जातिवंत नमुना महाराष्ट्राला पुन्हा लवकर पाहावयाला मिळणार नाही.

२४

## दुष्ट लोकांनी काकांना मारले हो !

पंचेचाळीस सालामधल्या डिसेंबर महिन्याची चार तारीख. त्या रात्री पुण्याच्या मंडईमध्ये मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीत यशस्वी झालेल्या हिरे-गाडगीळ या काँग्रेसच्या उमेदवारांचा जाहीर सत्कार माझ्या अध्यक्षतेखाली होण्याचे ठरले होते. मी मुंबईहून 'डेक्कन क्वीन'ने रात्री साडेआठचे सुमारास पुण्यास आलो. स्टेशनबाहेर माझी वाट पाहात काकासाहेब लिमये उभे होते. नेहमीप्रमाणे हासून माझ्या हातावर त्यांनी टाळी मारली नाही. त्यांचा चेहरा चिंताक्रांत दिसत होता. मी जरा चपापलोच. मी विचारले, "काय हो काकासाहेब, काही विशेष?" काकासाहेब म्हणाले, "चला, गाडीत तर बसा. म्हणजे सांगतो." मोटारीत बसून आम्ही मंडईच्या रोखाने निघालो. काही वेळाने काकासाहेब म्हणाले, "आज तुमचे काका गाडगीळ काही खुषीत दिसत नाहीत. काही तरी बिनसलेले दिसते आहे त्यांचे." मी विचारले, "का? आज तर त्यांचा जाहीर सत्कार आहे. बिनसायला काय झाले त्यांचे?" काकासाहेब म्हणाले, "तुम्ही अध्यक्ष आहात ना त्या सभेचे!" मी म्हणालो, "पण त्यांना विचारूनच हा सभेचा कार्यक्रम ठरला आहे. मी या सभेत बोलणार आहे हे त्यांना ठाऊक आहे. त्याला त्यांनी मान्यता दिलेली आहे. पण आता त्याबद्दल त्यांच्या पोटात दुखायचे काय कारण आहे?" काकासाहेब म्हणाले, "ते मला काही ठाऊक नाही. मला काय वाटले ते मी आपले तुम्हांला सांगितले." मंडईत सभेच्या जागी जाऊन पाहिले तर हजारो लोक

आधीपासूनच जागा धरून बसले होते. ते पाहून मला समाधान वाटले. मी काकासाहेबांना म्हटले, " काका, तुमचे भय विनाकारण आहे. काका गाडगिळांना काहीही वाटत असले तरी आजची सभा खूप गाजणार. चला, सभेला तासभर अवकाश आहे, तोपर्यंत आपण जेवून तर येऊ."

स्टेशनसमोरच्या 'नॅशनल हॉटेल'मध्ये आम्ही परत आलो. तेथे आम्ही जेवलो. इंग्लिश पद्धतीच्या हॉटेलात काकासाहेब माझ्याबरोबर आले म्हणजे ते टोमॅटो सूप, आणि पावलोणी खात व कॉफी पीत. तोच आहार त्या दिवशी त्यांनी केला. नंतर बरोबर दहा वाजता आम्ही सभेच्या जागी गेलो. ह्या सुमारास श्रोत्यांची संख्या सत्तर ते ऐंशी हजारांपर्यंत जाऊन पोहोचली होती. व्यासपीठावर माझ्या मागे काकासाहेब येऊन बसले. अर्धा तासापर्यंत मी हिरे-गाडगिळांची वाट पाहात तसाच बसलो होतो. इतक्यात 'काकासाहेब गाडगिळांनी तुम्हांला बाहेर बोलावले आहे' असा कोणी तरी वर येऊन मला निरोप सांगितला. त्याच्यामागून मी गर्दीमधून वाट काढीत व्यासपीठाच्या मागल्या बाजूला गेलो. काकासाहेबांना त्याच क्षणी संशय आला की, काही तरी इथे भानगड आहे. ते एकदम उठले, आणि माझ्यामागून घाईघाईने आले. मला ते माहीतच नव्हते. काका गाडगिळांचा आणि माझा संवाद अंधारात माझ्यामागे उभा राहून त्यांनी ऐकला. " मी या सभेत बोलू नये अशी तुमची इच्छा असेल तर ठीक आहे. मी जातो इथून. तुम्ही आपला घ्या खुशाल सत्कार करून!" असे रागाने काका गाडगिळांना सांगून मी मागे वळलो तो काकासाहेब लिमयांनी माझा हात पकडला. " अरे तुम्ही आलाच का?" मी त्यांना बघून ओठातल्या ओठात अर्धवट पुटपुटलो. काकासाहेब म्हणाले, " चला आमच्या घरी जाऊ." पलीकडे एक टांगा उभा होता. त्यात चटकन आम्ही दोघे जाऊन बसलो. मी टांगेवाल्याला जोराने म्हणालो, " आंबराई कँप. चल, पिटाळ टांगा!"

अंधारात आमचा टांगा जोराने लकडी पुलाकडे चालला होता. बराच वेळ कोणी कोणाशी बोलले नाही. काही वेळाने मी म्हणालो, " काकासाहेब, तुमचा तर्क अगदी बरोबर होता. काका गाडगिळांच्या मनात माझ्याविषयी मत्सर उत्पन्न झाला आहे याविषयी आता मला तरी कसलीही शंका राहिली नाही." काकासाहेब म्हणाले, " सभेत न बोलण्याचा तुम्ही निर्णय घेतलात हे फार उत्तम केलेत. या तुमच्या निर्णयाने तुम्ही आजची सभा जिंकलीत म्हणून समजा. आता ती सभा होत नाही. आपण घरी पोहोचेपर्यंत सभा उधळल्याची बातमी येते की

नाही ती पाहा." काकासाहेबांचा तोही तर्क अगदी तंतोतंत खरा ठरला. मी सभेत बोलणार नाही असे काका गाडगिळांनी जाहीर करताच हजारो श्रोते एकदम उठून चालते झाले आणि एका मिनिटात सभेचे काम खतम झाले. काका गाडगिळांवर संतापलेले मंडईतले कार्यकर्ते आमच्या पाठोपाठच आंबराई कँपमध्ये काकासाहेब लिमयांच्या घरी धापा टाकीत आले. त्यांच्या डोळ्यांमधून अक्षरशः अश्रूंच्या धारा वहात होत्या. मी आणि काकासाहेबांनी त्यांची समजत घालण्याचा खूपच प्रयत्न केला. पंधरावीस मंडळी होतो आम्ही सगळी. सर्वांना काकासाहेबांनी फक्कडशी कॉफी करून पाजली. चांगले बारा साडेबारा वाजेपर्यंत आम्ही बोलत बसलो होतो. कोणा कोणासंबंधी आणि किती किती विषयांबद्दल तरी आम्ही बोललो असू. मनातला विषाद, दुःख आणि संताप कोणीकडच्या कोणीकडे नाहीसा झाला, आणि थोड्या वेळातच त्या रात्री जणू विशेष असे काहीच घडले नाही अशा भावनेने आम्ही एकमेकांच्या हातावर टाळ्या मारून मनमोकळेपणाने हसावयाला आणि खिदळावयाला सुरुवात केली. एक जसा वाजला तसा मी उठलो अन् म्हणालो, "काकासाहेब, आता मी दीडच्या गाडीने परत मुंबईला जातो." काकासाहेब नेहमीप्रमाणे अंगणाच्या फाटकापर्यंत मला पोहोचवायला आले. काकासाहेबांचा निरोप घेताना हसत्या, बोलत्या, लिहित्या आणि चालत्या काकासाहेबांच्या त्या आनंदी मूर्तीचे ते शेवटचे दर्शन मी घेतो आहे अशी चुकूनदेखील माझ्या मनात कल्पना आली नसेल. सोळा-सतरा वर्षांच्या स्नेहमधुर जीवनातली एकमेकांच्या सहवासात घालविलेली ती शेवटची सुखाची रात्र होती. अंधारातच आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. त्या वेळी काळोखामध्ये तोंड लपवून उभ्या असलेल्या काळपुरुषाने मनातल्या मनात भेसुर हास्य केले असेल! निरामय जीवनातल्या काकासाहेबांची या जगातली ती माझी शेवटची भेट ठरली!

त्यानंतर अवघ्या आठ दिवसांनी काकासाहेबांवर पक्षघाताने झडप घातली, आणि त्यांच्या जिभेतली वाणी अन् हातातली लेखणी हिरावून नेली. दुसऱ्या दिवशीच मला पुण्याहून माझ्या एका मित्राने ती अशुभ वार्ता पत्र लिहून कळविली. मला ती मुळी खरीच वाटेना. लगेच मी सकाळच्या गाडीने पुण्यास गेलो, आणि शिवाजीनगर स्टेशनवरून तडक त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या पत्नीची आणि माझी दृष्टादृष्ट होताच मला भडभडून आले. मी मटकन खुर्चीवरच बसलो आणि तोंड झाकून रडू लागलो. मला माझे अश्रू आवरेनात.

दहा-पंधरा मिनिटांनी मी भानावर आलो आणि हळूच काकासाहेबांच्या खोलीत गेलो. त्यांच्या मुद्रेत आणि आकृतीत एकदम केवढातरी फरक झाला होता. चेहऱ्यात मूर्तिमंत व्याकुळता प्रतिबिंबित झाली होती. नेत्रात नुसते कारुण्य साचून राहिले होते. त्यांनी आपला निर्जीव हात माझ्यापुढे करण्याचा निष्फळ प्रयत्न केला. मला ते दृश्य पाहवेना. त्यांच्या त्या असाहाय्य आणि व्यथित दृष्टीला दृष्टी भिडवून त्यांना बरे वाटावे म्हणून तोंडावर ओढून ताणून हास्य आणताना माझ्या हृदयाला किती यातना झाल्या असतील त्या माझ्या मलाच ठाऊक. ज्या काकासाहेबांनी अनेक आपत्तींत हसून मला धीर दिला, आणि माझ्या पाठीवरून हात फिरविला त्यांच्याच आयुष्यातील एका अत्यंत भीषण आपत्तीत त्यांच्या अंगावरून हात फिरवून त्यांना धीर देण्याची शेवटी मला पाळी आली या विचाराने मी मनःतल्या मनात अगदी हतबुद्ध होऊन गेलो. 'काही काळजी करू नका, तुम्ही लवकरच बरे व्हाल, आपल्याला काही कमी नाही. आपण इलाजांची पराकाष्ठा करू' असे त्यांना पुन्हा पुन्हा आश्वासून दहा मिनिटांच्या आतच मी त्यांचा निरोप घेतला.

त्यानंतर गेले अठ्ठावीस महिने सतत त्या दुर्धर रोगाने काकासाहेबांचा अनन्वित छळ करून त्यांना आपले जीवन अगदी नको नकोसे करून टाकले. पहिल्या वर्षात त्यांची स्थिती थोडीशी काही तरी बरी होती. अधूनमधून ते हिंडायला घराबाहेर पडू शकत. मित्रमंडळी त्यांना भेटत. तेही पूर्वीच्या उत्साहाने हसून त्यांचे स्वागत करीत आणि खुणांनी किंवा एखाद्या दुसऱ्या शब्दाने आपले मनोगत त्यांना कळवीत. या वर्षात मी दोन-तीन वेळा तरी त्यांना भेटलो असेन. दिवाळीच्या दिवशीच मी त्यांच्याकडे गेलो होतो. त्यांनी फराळाचे जिन्नस आपल्या पत्नीकडून आग्रह करकरून मला खावयाला घातले. त्या दिवशीचा त्यांचा तो उत्साह आणि तजेलदारपणा बघून मला त्यांची प्रकृती सुधारेल अशी आशा वाटू लागली. पण कसचे काय अन् कसचे काय! एका महिन्याच्या आतच पुन्हा त्यांना जबरदस्त झटका आला आणि त्याने त्यांना पूर्वीपेक्षाही लुळेपांगळे करून टाकले. गेले सबंध वर्ष तर एखाद्या अर्भकाप्रमाणे ते अंथरुणावर पडून होते. त्यांचे दुःख आणि यातना वर्णन करावयाला मजजवळ मुळी शब्दच नाहीत. या काळात त्यांना नुसते भेटणेही अशक्य होते. ओळखीचा चेहरा दिसला की, त्यांना एकदम रडू येई आणि भावना अनावर होई. या वर्षात एकदाही त्यांना भेटण्याचे मला धैर्य झाले नाही.

कधी पुण्याला आलो आणि काकासाहेबांना न भेटता परस्पर बाहेरून आंब-राईच्या रस्त्याने जाऊ लागलो की, काळजात कोणी तरी कट्यार खुपसते आहे असे वाटे. क्षणभर ते दुःख असह्य होई. 'जयहिंद'चा पहिला अंक मी त्याना अर्पण केला होता. त्यातला त्यांच्याबद्दलचा मजकूर ते पुन्हा पुन्हा कोणाकडून तरी वाचून घेत, आणि अश्रुपूर्ण नेत्रांनी ते तो ऐकत पडत. त्याची आठवण झाली की काळीज गलबलल्यासारखे वाटे. काकासाहेबांवर प्रेम करणारी एवढी आग्रही मंडळी त्यांच्याभोवती असूनही त्यांना बरे करण्याचे एवढेसुद्धा सामर्थ्य आमच्या हाती असू नये याचे सर्वांत मला जास्त दुःख होई. काकासाहेबांपेक्षा आपणच जास्त असहाय झालेले आहोत असेच मला वाटे.

खरोखर काकासाहेब हे अत्यंत दुर्दैवी प्राणी होते असेच म्हणावयाला पाहिजे. काही कारण नसताना सहा-सात वर्षांपूर्वी 'ज्ञानप्रकाश'चे संपादकत्व त्यांच्या हातून हिरावून घेऊन दुर्दैवाने त्यांचा छळवाद करावयाला सुरवात केली, आणि गेली सव्वादोन वर्षे अनन्वित हालअपेष्टांचे हलाहल त्यांना पाजून शेवटी दुर्दैवाने अत्यंत क्रूरपणाने आयुष्याच्या ऐन मध्यकाळी त्यांची हत्या करून टाकली. रोग जगामधे कोणाला का होत नाहीत? आणि त्यामधून बचावून सुरक्षितपणे कोणी का बाहेर पडत नाही? पण काकासाहेबांच्या वाट्याला आलेल्या व्याधीची तऱ्हाच काही न्यारी. असे का व्हावे? ज्याने स्वप्नात देखील कधी कोणाचे अहित चिंतले नाही त्याच्या कपाळी दुःखाचा एवढा डोंगर येऊन का कोसळावा? कोणत्याही गोष्टीला काही तरी कारण असायला पाहिजे की नाही? मग, इतक्या चांगल्या माणसाला एवढी दुर्धर व्याधी होण्याचे काय कारण? ही आपत्ती अंगावर ओढवून घेण्यासारखे त्यांच्या हातून काही तरी घडले होते का? लोकसेवेच्या पवित्र कार्यात इतक्या निष्ठेने आणि निःस्वार्थीपणाने एक सज्जन माणूस चांगला गुंतलेला असता एखाद्या दरोडेखोराप्रमाणे दुर्दैवाने अचानकपणे यावे आणि त्याला आपल्या कामावरून फरफटत बाहेर ओढून काढावे अन् त्याचे हातपाय बांधून शेवटी त्याच्या डोक्यात आकसाने भला मोठा धोंडा घालावा तसे हे सर्व झाले. या जगात न्याय आणि नियम म्हणून काही आहे असे म्हणतात ते खरे आहे का? जीवनात वाटेल ती गोष्ट वाटेल तेथे आणि वाटेल तेव्हा घडू लागली तर त्या जीवनाला काही अर्थ आहे काय? एका सुंदर जीवनाचा इतका शोचनीय शेवट होऊ शकतो हे काकासाहेबांच्या उदाहरणा-वरून पाहिले म्हणजे आयुष्यावरचा माणसाचा विश्वास उडून जातो आणि



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमान
अनुक्रम.......................... दि. ..................

भविष्याबद्दल औदासीन्य वाटू लागते.

शांत मनाने विचार केला म्हणजे मग काकासाहेबांच्या दुर्दैवाचें कारण लक्षात येते. काकासाहेब अतिशय चांगले होते म्हणूनच ते अतिशय दुर्दैवी झाले. चांगुलपणाची शालेय पुस्तकांत, साहित्यात आणि समारंभात स्तुती होते खरी. पण फार चांगुलपणा आणि फार चांगली माणसे लोकांना मनातून आवडत नाहीत हेच खरे. चांगल्या माणसांचा लोक मनातून द्वेष करू लागतात. तिरस्कार करू लागतात. मत्सर करू लागतात. चांगल्या माणसांना वाईट दिवस यावेत, त्यांचा छळ व्हावा, त्यांची विटंबना व्हावी, त्यांची परवड व्हावी, दीनवाण्या स्थितीमध्ये रस्त्यातून आणि आयुष्यामधून ती भटकताना दिसावीत, असेच समाजाला मनामधून वाटते. मनुष्यप्राणी हा बुद्धीने थोर असेल पण तो मनाने अजून हलकाच राहिलेला आहे. बुद्धीबरोबर मनुष्याच्या हृदयाची उत्क्रांती जशी व्हावी तशी ती झालेली नाही. नाहीतर ज्ञानाचे एवढे हिमालय माणसाच्या बुद्धीने जगामध्ये रचून ठेवले असताना त्याने आपल्या अमानुष क्रूरपणाचे मोठमोठे भीषण नरक या पृथ्वीतलावर त्याच वेळी निर्माण करून का ठेवले असते ? साधू पुरुषांचा आणि सज्जन माणसांचा प्रत्येक देशात आणि प्रत्येक समाजात नेहमी छळच होत गेलेला आहे. अगदी सुशिक्षित देश आणि सुसंस्कृत समाजही या दुष्ट नियमाला अपवाद ठरलेले नाहीत ! विद्येचे आणि संस्कृतीचे माहेरघर म्हणून ज्या शहराचा साऱ्या देशामध्ये लौकिक पसरलेला आहे त्या पुण्यासारख्या शहरामध्ये काकासाहेबांसारख्या एका साधुपुरुषाचा दुष्ट माणसांनी अत्यंत निर्दयपणे तेजोभंग केला. अपमानाचा खंबीर बुद्धिपुरःसरपणे काळजात खुपसून त्यांचे कोमल अंतःकरण त्यांनी रक्तबंबाळ केले, आणि त्यांच्या थोर गुणांना मातीमोल ठरवून तुच्छतेने अन् उपेक्षेने त्यांच्या मानधन मनोवृत्तीची अक्षम्य विटंबना केली. क्षुद्र आणि मत्सरी माणसांच्या छळाला आणि कारस्थानाला बळी पडल्यामुळे काकासाहेबांच्या महान जीवनाचा असा हृदयद्रावक रीतीने अंत झाला. पुण्यामध्ये पक्षघाताने आणि संग्रहणीने रोज पुष्कळशी पेन्शनरे मरत असतात. तसले मामुली काही काकासाहेबांचे मरण नाही. काकासाहेबांचे मरण हे एक बलिदान आहे. तें सात वर्षांच्या अमानुष छळाचे भीषण पर्यवसान आहे. तें हुतात्म्याचेच मरण आहे. अघोरी छळाच्या या अग्निदिव्यामधून काकासाहेबांना का जावे लागले बरे ? असा काय भयंकर अपराध त्यांच्या हातून घडला होता ? हो, आमच्या माहितीप्रमाणे एकच गुन्हा

त्यांच्या हातून घडला होता, आणि तो गुन्हा एकसारखा जन्मभर त्यांच्या हातून घडत होता. तो हाच की, त्यांनी कधी कोणाचे वाईट केले नाही. त्यांनी सर्वांचे चांगले केले. दुष्ट लोकांना अतिशय चांगुलपणा दाखविण्याचा फार मोठा अपराध त्यांच्या हातून घडला. त्याचीच त्यांना ही अद्दल घडली !

गेली सात वर्षे जी गोष्ट रात्रंदिवस माझ्या मनात जळत होती ती आज हृदय मोकळे करून मला नाइलाजाने महाराष्ट्राला सांगावी लागत आहे. काकासाहेबांच्या हयातीत मला ती बोलता आली नाही. अनेकवार ती माझ्या ओठापर्यंत येई. अगदी लेखणीच्या टोकावर येऊन बसे. पण काकासाहेबांच्या इच्छेला आणि भावनेला मान देऊन तो मोह मला मोठ्या कष्टाने आवरून धरावा लागे. मी जर त्या वेळी काही कमीजास्त बोललो असतो किंवा लिहिले असते तर त्यामुळे सर्वांत काकासाहेबांना जास्त दुःख झाले असते. त्यांच्या दुःखी मनाला अधिक दुःख देण्याची माझी इच्छा नव्हती. आपल्या दावेदारांचा दुष्टपणा आणि निंदकांचा नीचपणा जगाला दिसू नये म्हणून त्यांजवर काकासाहेबांनी आपल्या चांगुलपणाचे शेवटपर्यंत पांघरूण घातले. स्वतः ते उघडे पडले पण त्यांनी दुसऱ्यांची अब्रू उघडी पडू दिली नाही. जिव्हारी झालेल्या जखमांमधून आत रक्त ठिपकत असताना बाहेरचे ओठावरले आपले मधुर हास्य त्यांनी कधी मावळू दिले नाही. सतत सात वर्षे अपमानाचे हलाहल ते मुकाट्याने मनातल्या मनात गिळीत होते, पण त्यांनी आपले ते दुःख अगदी निकटच्या मित्रांनादेखील कधी सांगितले नाही. कधी कोणाकडे त्यांनी तक्रार केली नाही, तोंडावर दैन्य कधी दाखविले नाही, आणि स्वभावाची शांती अन् समतोलपणा एवढासासुद्धा कधी ढळू दिला नाही. आपला सूळ ( Cross ) खांद्यावर घेऊन ते धैर्याने आणि धीमेपणाने आपली जीवनयात्रा कंठीत होते. त्यांचे हाल बघून माणसांना काही दया आली नाही, पण मृत्यूला मात्र आली. त्यानेच त्यांची शेवटी सुटका केली. आता ते या जगामधून गेल्यानंतर त्यांच्या बलिदानाची कहाणी जगाला कळली पाहिजे. त्यांच्या मरणाचे सत्य जगाला समजलेच पाहिजे. नाहीतर जग असेच समजेल की, जशी चार माणसे मरतात तसेच हे पाचवे मेले. जग त्यांना विसरून जाईल. ज्यांनी त्यांना जिवंतपणी छळले त्यांना तेच पाहिजे आहे. तसे होता कामा नये. काकासाहेबांना तो सर्वांत मोठा अन्याय होईल. त्यांच्या जीवनाप्रमाणेच त्यांच्या मरणापासून जगाला फार मोठा शहाणपणा शिकता येण्यासारखा आहे.

सात वर्षांपूर्वी 'ज्ञानप्रकाश'च्या संपादकीय स्थानावरून काकासाहेब निवृत्त झाले. त्यामुळे सबंध महाराष्ट्राने त्यांचा गौरव केला. त्यांच्या गळ्यात फुलांचे हार घातले. स्तुतीची सुमने त्यांच्यावर उधळली. त्यांच्या कामगिरीची प्रशंसा सगळ्या पत्रांमध्ये छापून आली. महिना दोन महिने त्यांच्या नावाचा चांगला गलगा झाला, आणि पुढे सगळे शांत झाले. विस्मृतीच्या डोहात काकासाहेब एकदम बुडून गेले. ते परवा त्यांच्या मृत्यूची बातमी जेव्हा वर्तमानपत्रात छापून आली, तेव्हा लोकांना त्यांची आठवण झाली आणि ते म्हणाले की, "अरे, काकासाहेब लिमये नावाचे एक संपादक होते ज्ञानप्रकाशचे. ते वारले बरे का!" हजारो मुडद्यांना काकासाहेबांनी जिवंत करून चालते केले पण त्यांच्या स्मशानयात्रेला चार-पाचशे माणसांपेक्षा जास्त माणसे काही जमली नाहीत. जगाचे असेच असते. त्याने एखाद्याचा उदो उदो करायचा ठरविले की, ते त्याच्याच मागे लागते, आणि त्याने एखाद्याला विसरायचे ठरविले की तो होता की नव्हता इतकीदेखील त्याला आठवण राहात नाही. 'ज्ञानप्रकाश'चे संपादक काकासाहेब लिमये हे का निवृत्त झाले हे जर जगाला त्याच वेळी नीटपणे कळाले असते तर आज लोक त्यांना इतके विसरून गेले नसते. लोकांना तेव्हा आपले असेच वाटले की, सार्वजनिक संस्थेतले कार्यकर्ते काही वर्षांनंतर जसे निवृत्त होतात त्याच नियमाने काकासाहेब सेवानिवृत्त झाले असले पाहिजेत. त्यात विशेष निराळे असे काही घडले नाही. कोणी एकानेही त्या वेळी असा विचार केला नाही की, सतत पंधरा वर्षे एका पत्राचे उत्कृष्ट संपादन करून त्याला महाराष्ट्राच्या जीवनात अद्वितीय स्थान मिळवून देणारा हा बुद्धिमान आणि कर्तबगार संपादक वयाला पन्नास वर्षे पुरी होण्याच्या आत एका भल्या सकाळी सेवानिवृत्त का होतो? एवढा म्हातारा हा माणूस झाला की काय? काम करून करून हा इतका थकून गेला काय! एकाएकी हा आपली लेखणी खाली ठेवून एकदम घरी जाऊन का बसला?

काकासाहेबांनी 'ज्ञानप्रकाश'चे संपादकत्व आपण होऊन सोडले नाही. त्या स्थानावरून ते स्वखुषीने निवृत्त झाले नाहीत. भारत-सेवक-समाजाने त्यांना त्या जागेवरून काढले. त्यांना त्या स्थानावरून खाली ओढले. त्यांच्या हातातून लेखणी हिसकावून घेऊन समाजाने त्यांना जबरदस्तीने घरी बसावयाला लावले. काकासाहेब सेवानिवृत्त झाले नाहीत. काकासाहेब बडतर्फ झाले. काकासाहेब 'डिसमिस' झाले. ज्ञानप्रकाशच्या कार्यालयातून समाजाने त्यांना धक्के मारून

हाकलून दिले, हे उघडेनागडे सत्य आहे; आणि ते त्याच शब्दांत बोलून दाखविले पाहिजे. भारत-सेवक-समाजाने काकासाहेबांना आपल्या कामावरून का बरे बडतर्फ केले? त्याचे कारण असे की, ते एक अद्वितीय संपादक होते. ते एक नामांकित संपादक होते. त्यांनी 'ज्ञानप्रकाश' पत्राला अपूर्व यश, कीर्ती आणि लोकप्रियता प्राप्त करून दिली. जे पत्र एका काळी पुण्यामधले एक कुत्रेदेखील हुंगावयाला तयार नव्हते ते पत्र रोज सकाळी शेकडो पुणेकर हातात धरून मोठ्या आवडीने वाचू लागले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून त्या पत्राला मागण्या येऊ लागल्या. मवाळ पक्षाच्या या मुखपत्राला जहाल पक्षाच्या जळजळीत वृत्तपत्रा-पेक्षाही जास्त लोकप्रियता मिळाली. भारत-सेवक-समाजाचे नाव महाराष्ट्रात घरोघर जाऊन पोहोचले. ज्या 'ज्ञानप्रकाश' कचेरीत एखादा दुसरा पेन्शनर किंवा रावबहादूर मान डगडग हलवीत प्रवेश करायचा तेथे महाराष्ट्रातल्या मोठमोठ्या कार्यकर्त्यांची रीघ लागून राहिली. 'ज्ञानप्रकाश' कार्यालय हे राजकीय कार्यकर्त्यांचे एक अनौपचारिक केंद्रच होऊन बसले. भारत-सेवक-समाजाला ही परिस्थिती असह्य झाली. मवाळ पक्षाच्या मनोवृत्तीला एवढी प्रसिद्धी सोसण्यासारखी नव्हती. पावलोपावली लोकांशी संबंध ठेवणारा एवढा लोकप्रिय माणूस त्यांना पचण्यासारखा नव्हता. जनतेमध्ये मवाळ पक्षाला हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेही अनुयायी नव्हते, आणि त्याच्या मराठी मुख-पत्रावरमात्र हजारोंनी ग्राहकांच्या उड्या पडत होत्या. राजकारणातून पेन्शनीत निघालेल्या पक्षाला आपल्या घरात जनतेची एवढी वर्दळ सहन होण्यासारखी नव्हती. आजारी माणसाला जसा झालेला कसलाही आवाज सहन होत नाही तसा आसन्नमरण झालेल्या प्रागतिक पक्षाला आपल्या 'ज्ञानप्रकाश'चा आवाज महाराष्ट्रात वाढत चाललेला सहन झाला नाही. त्याने एक दिवशी ठरविले की, लोकप्रियतेच्या शिखरावर 'ज्ञानप्रकाश'ला नेऊन बसविणाऱ्या या उपद्व्यापी काकासाहेबाला त्याच्या खुर्चीवरून खाली ओढले पाहिजे! आपल्या पक्षाकडे लोकांचे लक्ष वेधून हा माणूस निष्कारण आपल्या पक्षावरची जबाबदारी वाढवतो आणि नामदार गोखल्यांच्या नावावर आरामशीरपणे जगणाऱ्या समातल्या सभासदांना संकटात घालतो. असला माणूस काय कामाचा? काढून टाका त्याला. असा विचार करून भारत-सेवक-समाजाने काकासाहेबांना एक दिवशी 'ज्ञान-प्रकाश'चे संपादकत्व सोडावयाला लावले.

सार्वजनिक संस्था मूर्खपणाचे निर्णय पुष्कळदा करतात. पण काकासाहेब



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम.................. वि: ..........
क्रमांक .................. नों दि: ..........

लिमयांना ‘ ज्ञानप्रकाश ’च्या संपादकीय स्थानावरून काढून टाकण्याइतका बेवकूफपणाचा निर्णय कोणत्याही जबाबदार संस्थेने कधी केला नसेल. का म्हणून त्यांना आपल्या जागेवरून खाली उतरायला सांगितले ? का त्यांच्या हातून काही गुन्हा घडला, का त्यांनी आपल्या कामात चुकारपणा केला, का त्यांनी हिशेबामध्ये काही घोटाळा ठेवला, का भारत-सेवक-समाजाच्या नियमाविरुद्ध त्यांनी काही वर्तन केले, काय त्यांनी केले तरी काय असे, की ज्याबद्दल समाजाने त्यांना ही देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा दिली ? समाजाच्या प्रत्येक सभासदाने आळीपाळीने पाच पाच दहा दहा वर्षे ‘ ज्ञानप्रकाश ’ची संपादकी करावी असाही काही नियम नव्हता. किंवा ‘ ज्ञानप्रकाश ’चा संपादक होण्यास काकासाहेबांपेक्षा अनेक पटींनी हुशार आणि लायक असा कोणी दुसरा माणूस भारत-सेवक-समाजाच्या संग्रही होता असेही काही नव्हते. काकासाहेबांना आपल्या स्थानावरून दूर करण्याचे समाजाला काहीही आणि कसलेही कारण नव्हते. केवळ त्यांना त्या जागेवरून काढावयाचे असे बुद्धिपुरस्सर ठरवून समाजाने त्यांना काढले. त्यांच्या जाण्याने ‘ ज्ञानप्रकाश ’चे वाटोळे होईल किंवा त्यापासून भारत-सेवक-समाजाचे आर्थिक नुकसान होईल हे उघडपणे दिसत असतानासुद्धा त्याच्याकडे समाजाने जाणूनबुजून डोळेझाक केली. इंग्रजी म्हणीप्रमाणे कुत्र्याला फाशी देण्यापूर्वी त्याला शिवी देतात. तसा कसला तरी ठपकासुद्धा काकासाहेबांवर समाजाने ठेवला नाही. ‘ बस, तुम्हांला तुमच्या जागेवरून कमी करावयाचे आहे याहून जास्ती आम्हांला काही माहीत नाही. ’ एवढेच समाजाने त्यांना सांगितले.

पुण्यात पुष्कळ मोठमोठ्या सार्वजनिक संस्था आहेत. त्यांची कीर्ती ऐकून त्यांच्यात काम करण्याची आपल्याला संधी मिळावी अशा हेतूने बुद्धिमान आणि कर्तबगार माणसे त्या त्या संस्थांमध्ये येऊन मिळतात. पण त्या सर्वांची स्थिती शेवटी काकासाहेबांसारखी होते. त्या संस्थांचे आद्य संस्थापक आणि कार्यकर्ते खरोखरच फार मोठे होऊन गेले यात शंका नाही. पण मूळच्या मोठ्या नावाखेरीज आता या संस्थांचे काहीही मोठे उरले नाही. कालांतराने ऐतखाऊ आणि सामान्य वकूबाची मतलबी माणसे या सर्व संस्थांमध्ये गर्दी करून बसली; आणि त्यांनी त्या काबीज करून घेतल्या. स्वतःची गुजराण करण्यासाठी संस्थेच्या मोठ्या नावाचा उपयोग करणे एवढाच ह्या लोकांचा धंदा होऊन बसला आहे. चुकून कोणी चांगली माणसे या संस्थेमध्ये आली आणि स्वतःचे तेज प्रकट करून संस्थेच्या कीर्तीत भर घालू लागली तर लागलेच त्यांची संस्थे-

मधून हकालपट्टी होते. तो जर बऱ्या बोलाने संस्था सोडून गेला नाही आणि तसाच धैर्याने संस्थेत तग धरून राहिला तर हातपाय बांधून त्याची गठडी वळण्यात येते; आणि तशा स्थितीतही जर तो काही हालचाल करू लागला तर काकासाहेबांप्रमाणे त्याचा अनन्वित छळ करण्यात येतो आणि त्याला ठेचून ठार मारण्यात येते. याच त्रासाला आणि छळाला कंटाळून मोठी मोठी माणसे पुण्याहून परागंदा झालेली आहेत आणि त्यामुळे महाराष्ट्राचे अतोनात नुकसान झालेले आहे. स्वतंत्र बुद्धीची आणि अलौकिक पराक्रमाची माणसे महाराष्ट्राच्या सार्वजनिक संस्थांमध्ये टिकूच शकत नाहीत. कारण त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वामुळे त्या संस्थांमध्ये गर्दी करून राहिलेली इतर सामान्य माणसे तुलनेने तोकडी पडतात आणि त्यांचा क्षुद्रपणा जगाच्या दृष्टीसमोर उघडा पडतो. संस्थेमधले सर्व कार्यकर्ते बुद्धीने आणि कर्तृत्वाने सामान्य असले म्हणजे त्यांच्यात समता प्रस्थापित होते. बंधुभाव निर्माण होतो. हा लहान तो मोठा असा भेदभाव वाटत नाही. सारख्या आकाराचे सगळेच मणी एका माळेत ओवता येतात. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात दिवसेंदिवस असलाच 'समतावाद' प्रस्थापित होणार आहे किंवा काय कोणास ठाऊक ?

नामदार गोखले यांच्या थोर नावामुळे काकासाहेब लिमये भारत-सेवक-समाजाकडे आकर्षित झाले. हिंदी राजकारणामध्ये गोखल्यांचे स्थान अद्वितीय आहे यात शंका नाही. महात्मा गांधींवरदेखील ज्यांनी मोहिनी घातली त्यांचे सामर्थ्य आणखी काय वर्णन करावयाचे ? पण लोकसंग्रह करण्याच्या बाबतीत लोकमान्य टिळकांची जी स्थिती झाली तीच नामदार गोखल्यांचीही झाली. काही थोडे अपवाद वजा केले तर उत्तम माणसे जमविण्याच्या बाबतीत दोघेही अयशस्वीच ठरले. दोघांच्याही आजूबाजूला संधिसाधू नि स्वार्थसाधू माणसेच जमली आणि त्यांनी दोघांच्याही संस्थांमध्ये लवकरच आपली मिरासदारी स्थापन केली. त्यामुळे चांगली माणसे त्यांच्या कार्याला मिळाली नाहीत आणि म्हणून त्यांच्या परंपरांचे थोड्या वर्षांच्या आत वाटोळे झाले. भारत-सेवक-समाजाचे सभासद होण्यासाठी खिशात अर्ज घालून महात्मा गांधी स्वतः पुण्याला आले होते, पण समाजातल्या काही नतद्रष्ट लोकांनी त्यांना समाजात घेण्याचे नाकारले. तेव्हा विन्मुख होऊन गांधीजींना परत जावे लागले. आपण होऊन दरवाजात कामधेनू आली, पण समाजातल्या दळभद्री लोकांनी तिला मागल्यामागे पिटाळून लावली. समाजाच्या असल्या अधू आणि आकुंचित धोरणामुळे बुद्धिमान

कार्यकर्त्यांचे सहकार्य त्याला फारसे मिळाले नाही; आणि त्यामुळे गेल्या पंचवीस वर्षांत समाजाच्या कार्याची यत्किंचितही वाढ होऊ शकली नाही. नामदार गोखल्यांचे कोणते कार्य भारत-सेवक-समाज आज चालवीत आहे हे परमेश्वरालाच माहीत ! ज्यांना बाहेर आपली उपजीविका करणे कठीण पडले असते अशी काही मंडळी गोखल्यांच्या नावावर त्या ठिकाणी दोन वेळ स्वस्थपणे भोजन करून झोपा काढीत आहेत, असे अगदी एखाद्या अन्नछत्राचे स्वरूप या संस्थेला आज प्राप्त झाले आहे असे म्हटले तर त्यात मुळीच अतिशयोक्ती होऊ नये. या संस्थेच्या गेल्या पंचवीस वर्षांतल्या महाराष्ट्रीय सभासदांमध्ये काकासाहेब लिमये हे एकटे एकच तेजस्वी अपवाद होऊन गेले. त्यांनी वृत्तपत्रीय क्षेत्रात समाजाला अलौकिक यश मिळवून दिले, पण समाजाने त्यांना सुखाने जगू दिले नाही !

'ज्ञानप्रकाश'चे संपादन काकासाहेबांच्या हातून काढून घेण्याच्या पूर्वी बऱ्याच वर्षांपासून त्यांना बदनाम करण्याचे एक गुप्त कारस्थान त्यांच्या भोवती शिजत होते. काकासाहेबांकडे रोज अनेक माणसे यावयाची. काही 'ज्ञानप्रकाश'च्या कामासाठी यावयाची तर काही निव्वळ काकासाहेबांना भेटावयाला यावयाची. त्यांच्या चहापाण्याप्रीत्यर्थ वर्षाचा सातआठशे रुपये तरी खर्च व्हावयाचाच. 'ज्ञानप्रकाश'ला काकासाहेबांनी जे महत्त्व मिळवून दिले होते त्या मानाने एवढा खर्च 'ज्ञानप्रकाश' संस्थेला काही जास्त नव्हता. 'ज्ञानप्रकाश'चे उत्पन्न किती तरी पटींनी काकासाहेबांनी वाढवून दाखविले होते. असे असूनही काकासाहेबांचे आजूबाजूचे हितशत्रू उगाच कुजबुजावयाचे की, काकासाहेब फार खर्च करतात, ते उधळे आहेत, गैरहिशेबी आहेत, संस्थेचे त्यांच्यामुळे नुकसान होते ! अर्थात उघडपणे त्यांना असे बोलणे शक्यच नव्हते. 'ज्ञानप्रकाश'मध्ये नाटक आणि चित्रपट या विषयांना भरपूर वाव द्यावयाचे काकासाहेबांनी ठरविले होते. त्यामुळे नाटक मंडळ्यांतील आणि चित्रपट कंपन्यांमधील मालकांची, मॅनेजरांची आणि नटनटींची काकासाहेबांच्या दाराशी नेहमी रीघ लागलेली असे. नवीन नाटकांच्या पहिल्या प्रयोगाला किंवा नवीन चित्रपटाच्या उद्घाटनाला काकासाहेब हजर नाहीत असे कधीही होत नसे. त्यांच्या कुटुंबातल्या मंडळींनाही त्यांच्याबरोबर आमंत्रण असे. अनेक नटनटी काकासाहेबांना आपल्या मोटारीमधून फिरावयाला नेत किंवा आपल्या घरी त्यांना मुद्दाम जेवावयाला बोलावीत. अशा तऱ्हेने नाट्यसृष्टीत किंवा चित्रपटक्षेत्रात काका-साहेबांना जी लोकप्रियता प्राप्त झाली होती ती त्यांच्या विरोधकांना पाहावत

नसे. फुकट नाटक सिनेमा पाहावयाला सापडतो आणि नटनटींबरोबर मोटारी-मधून हिंडायला मिळते म्हणून काकासाहेब आपल्या पत्रामधून त्यांची तोंड फाटेपर्यंत स्तुती करतात अशी त्यांनी काकासाहेबांची कित्येक दिवस टवाळी करून पाहिली. काकासाहेबांच्या विरोधकांना गावातल्या काही संस्थांमधल्या कित्येक स्वयंमन्य शिष्टांचेही साहाय्य होते. त्यांपैकी एखाद्याने उठायचे आणि काकासाहेबांच्या सहकाऱ्यांकडे जाऊन मोठ्या संभावितपणे विचारायचे की, "काय हो, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीने 'ज्ञानप्रकाश' हे पत्र सिनेमाचे किंवा नाटकाचे पत्र करायचे ठरविले आहे काय?" माझ्या व्याख्यानाची सविस्तर वर्णने पुष्कळ वेळा 'ज्ञानप्रकाश'मध्ये काकासाहेब छापीत असत. त्यामुळे काकासाहेबांचा काही कमी छळ झाला नाही. त्यांचे निंदक म्हणायचे "आता या ज्ञानप्रकाशचे नाव बदलून त्याला अत्रेप्रकाश तरी नाव द्या." एकदा मी काकासाहेबांच्या शेजारी बसलो असताना असेच एक शिष्ट प्रोफेसर तेथे आले, आणि त्यांनी खवचटपणे काकासाहेबांना विचारले, "काय हो, काही काही लोकांना प्रसिद्धी देण्याचे 'ज्ञानप्रकाश'ने ठरवूनच ठेवले आहे काय?" काकासाहेब शांतपणे म्हणाले, "अहो, जी माणसे सार्वजनिक आयुष्यात जास्त भाग घेतात त्यांची नावे दैनिक वृत्तपत्रात जास्त वेळा येणारच. त्याबद्दल तुम्हांला वाईट वाटण्याचे काय कारण आहे? त्यांची नावे छापायची नाहीत तर काय तुमचे नाव छापायचे?" तेव्हा श्रीमुखात बसल्याप्रमाणे प्रोफेसर-मजकुरांनी चेहरा करून बोलण्याचा विषय बदलला. अशा एक ना दोन अनेक संस्थांमधील हितशत्रूंनी काकासाहेबांना छळण्याचा आणि सतावण्याचा पुष्कळ वर्षे प्रयत्न केला. पण काकासाहेबांनी त्यांना दाद दिली नाही. उलट त्यांची लोकप्रियता एकसारखी वाढतच गेली. म्हणून चिडून जाऊन शेवटी त्यांना बडतर्फ करण्याचे शस्त्र त्यांच्या विरोधकांना अखेर उगारावे लागले.

सतत पंधरा वर्षे रात्रंदिवस 'ज्ञानप्रकाश'खेरीज काकासाहेबांच्या डोक्यात दुसरा काही विषय नव्हता. दुखणाईत अर्भकाला 'डोळियाचा दिवा आणि तळहाताचा पाळणा' करून आई अशी सांभाळते आणि दुखण्यातून निभावून नेते अन् रात्रंदिवस त्याची काळजी वाहून नि त्याचे पालनपोषण करून त्याला जसे बाळसेदार बनविते तसे 'ज्ञानप्रकाश'सारख्या रुग्णाईत पत्राचे पंधरा वर्षे आपल्या पुत्राप्रमाणे संवर्धन करून प्रत्येकाला ते कडेवर घेण्याचा मोह उत्पन्न करण्याइतके काकासाहेबांनी त्याला गुटगुटित बनविले होते. 'ज्ञानप्रकाश'साठी

काकासाहेबांनी रात्रीचे दिवस करून आपल्या रक्ताचे पाणी केले. ह्या पंधरा वर्षांत एक रात्रही काकासाहेब बारा वाजायच्या आत कधी झोपी गेले नसतील. चोवीस तास 'ज्ञानप्रकाश' खेरीज काकासाहेबांच्या डोक्यात दुसरा विषय नसे. 'ज्ञानप्रकाश' हे काकासाहेबांचे व्यसन होतें. 'ज्ञानप्रकाश' हे काकासाहेबांचे वेड होते. काकासाहेबांना बडतर्फ करून पंधरा वर्षांचे त्यांचे एक मनोहर स्वप्न त्यांच्या विघ्नसंतोषी विरोधकांनी धसमुसळेपणाने भंगून टाकले. ज्या सिंहासनावर बसून सतत पंधरा वर्षे काकासाहेबांनी आपल्या लहानशा जगात राज्य केले ते त्यांचे सिंहासन मत्सरी माथेफिरूंनी दुष्टपणाने त्यांच्यापासून हिरावून घेऊन त्यांना निराधार केले. वास्तविक ते सिंहासन काही सोन्याचे नव्हते. लाकडाचे होते. त्यागाचे नि श्रमाचे अनेक काटे पसरले होते त्याच्यावर. पण समाधानी वृत्तीच्या काकासाहेबांनी त्या काट्यांची बोचणी हसतमुखाने सहन केली आणि त्या आसनाला सोन्याच्या सिंहासनाचे वैभव मिळवून दिले. खरोखरच, 'ज्ञानप्रकाश'च्या लहानशा कार्यालयामध्ये काकासाहेबांचा दरबार भरला म्हणजे राजानेदेखील हेवा करावा असा त्यांचा तो थाट होता. अशी सोन्यासारखी माणसे काकासाहेबांनी आपल्याजवळ जमवून ठेविली होती म्हणता. देवाप्रमाणे ती काकासाहेबांना मानीत, आणि आपल्या पाठच्या भावाप्रमाणे काकासाहेब त्यांच्यावर प्रेम करीत. कधी कोणाची खळखळ नाही की कुरकुर नाही. एवढ्या आपुलकीने आणि प्रेमाने काकासाहेबांनी थाटलेल्या त्या सुखी संसारातून त्यांच्या हितशत्रूंनी त्यांना निर्दयपणे ओढून बाहेर काढले. आयुष्याच्या ऐन मेजवानीतून अगदी भरल्या ताटावरून काकासाहेबांना त्यांनी मध्येच उठविले. दुसरा कोणी त्यांच्या जागी असता तर त्या अपमानामुळे खचित त्याला वेडच लागले असते!

एकसारखी पंधरा वर्षे एका कामात गुंतलेल्या माणसाला त्याची मानखंडना न करता घरी एकदम स्वस्थ बसायला सांगितले तरी त्याला वेड लागल्यावाचून राहावयाचे नाही. मग सेवेच्या आणि सन्मानाच्या थोर आसनावरून कारण नसताना बडतर्फ झाल्यावर काकासाहेबांसारख्या स्वाभिमानी माणसाची मनःस्थिती काय झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी! रणांगणावर तळपणारी तलवार एकदम खुंटीवर टांगून ठेवल्यानंतर तिची काय स्थिती होईल? बरे, ज्ञानप्रकाशचे संपादन त्यांच्याकडून काढून घेऊन भारत-सेवक-समाजाने त्यांच्याकडे दुसरे काही महत्वाचे काम सोपविले म्हणता की काय?

छे ! तेही नाही. समाजाने त्यांना अक्षरशः बेकार बनविले. पगार त्यांना वेळच्या वेळी मिळत होता. पण पगाराची काय किंमत ? काम न करता फुकटचा पगार खाऊन घरी झोपा काढणे ही मुळी काकासाहेबांची वृत्तीच नव्हती. त्यांना काम पाहिजे होते. अहर्निश काम पाहिजे होते. दिवसाचा प्रत्यक क्षण न् क्षण कामात घालविण्याची त्यांना कित्येक वर्षाची सवय जडून राहिली होती. काकासाहेब हे कट्टर कर्मयोगी होते. लेखन हे त्यांचे योगसाधन होते. अशा माणसाचे जीवित-कार्य जबरीने त्याच्याकडून हिरावून घेणे म्हणजे त्याचे प्राण त्याच्यापासून हिरावून घेण्यासारखे होते. मोठी मोठी माणसे अशा परिस्थितीत मोडून आणि पिचून गेली असती. काकासाहेबांचेही तसेच झाले. पण बाहेरून त्यांनी तसे दाखविले नाही. त्यांना तसे दाखविता येत नव्हते. कारण आपली सेवानिवृत्ती ही बडतर्फी नसून ती एक क्रमप्राप्त गोष्ट आहे असे जगाला भासवून समाजाने केलेल्या घोर अन्यायावर पांघरूण घालण्याचीही जबाबदारी जणू काही समाजाने त्यांच्यावर टाकली होती. अरेरे ! काय विलक्षण यातना काकासाहेबांना मनातल्या मनात सहन कराव्या लागल्या असतील ! पोटामध्ये वडवाग्नी जळत असताही समुद्र बाहेरून शांत दिसावा तसा सारा अपमान, सारी मानखंडना, साऱ्या अवहेलना, सारी कुचेष्टा, आणि सारी दुःखे मनातल्या मनात सहन करून काकासाहेबांनी आपल्या मुद्रेवरची शांती कधी ढळू दिली नाही.

जबरदस्तीने काकासाहेबांवर लादली गेलेली ही कार्यनिवृत्ती म्हणजे त्यांच्या आयुष्यातली सर्वांत मोठी आपत्ती होती. या काळामध्ये त्यांची स्थिती एखाद्या निर्वासितासारखी झाली होती. त्यांना काम नव्हते, धाम म्हणजे कार्यालय नव्हते आणि नामही पण नव्हते. झोपेत माणूस हिंडावा ना तसे काकासाहेब निर्जीवपणे जीवनामधून वावरत होते. त्यांच्या मानखंडनेत थोडासा कमीपणा उरला होता म्हणूनच की काय ' ज्ञानप्रकाश ' मधे अधूनमधून लेखन करण्याचीही त्यांना आज्ञा होत असे. पण ती ते कधीही अमान्य करीत नसत. जिथे फुले वेचली तिथे गवऱ्या वेचण्याचेही काम त्यांनी मोठ्या आनंदाने केले. त्यामध्ये कसल्याही प्रकारचा कंटाळा किंवा तिरस्कार दाखविला नाही. निरनिराळ्या व्यवसायांमधील आपल्या मित्रमंडळींबरोबर काकासाहेब पूर्वीप्रमाणे मोकळेपणाने फिरत, हसत, बोलत, गप्पा मारीत, पण ते केवळ स्वतःचे दुःख विसरण्यासाठी. त्यात त्यांचे मन नव्हते. आतून ते अहोरात्र धुमसत होते. कढत होते. जळत होते. त्यांच्या मनाला एका क्षणाचीही शांती नव्हती. जिव्हारीच्या या जळत्या ज्वालामुखीवर



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ................ दि: ................

हास्याचे किंवा मौनाचे आवरण घालण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालू असे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिवसेंदिवस एक प्रकारचे कारुण्य निर्माण होऊ लागले. भविष्यकाळाविषयी त्यांना निराशा वाटू लागली. पुष्कळदा मी त्यांना म्हणे, "काकासाहेब, तुम्ही संस्थेतून राजीनामा देऊन बाहेर का पडत नाही? तुम्हीं मुंबईला या. आपण एक फक्कडसे दैनिक काढू. तुमच्यासारखा माणूस असताना आपण काय करू शकणार नाही?" पण असल्या माझ्या बोलण्याला काकासाहेब कधीही उत्तेजन देत नसत. ते एकदम मला थांबवून म्हणत, "बाबूराव, आमचे आता झाले, आम्ही संपलो, अगदी खलास झालो म्हणानात. यापुढे आमच्या हातून काही होणार नाही. आमच्यापासून तुम्हीही कसली आशा करू नका. आमच्या अंगात काही लायकी आहे असे तुम्हांला वाटते, पण तसे काही नाही. तो तुमचा निव्वळ भ्रम आहे." काकासाहेबांचे हे उद्गार ऐकले म्हणजे मला अतिशय दुःख होई. एकदा त्यांच्यावर थोडासा रागावूनच मी म्हणालो, "काय हो काकासाहेब, आम्ही नेहमी नेहमी तुम्हांला विचारतो अन् तुम्ही आम्हांला तसेच धुडकावून लावता याचा अर्थ काय? तुमच्या उत्तराने आम्हांला किती यातना होतात याची तुम्हांला कल्पना आहे काय?" तेव्हा काकासाहेब एकदम शांत झाले अन् रुद्ध स्वरात म्हणाले, "खरे सांगू? इतकी वर्षे 'ज्ञानप्रकाश'चे संपादन केल्यानंतर पुन्हा दुसऱ्या पत्राचे संपादक होण्याची मला इच्छा राहिली नाही. कसे विचारता तुम्ही मला!" माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. काकासाहेबांचे अंतःकरण मला दिसले. पुन्हा या विषयावर मी त्यांच्याशी कधीच बोललो नाही.

एके दिवशी माझ्याकडे एक म्हैसूरचा ज्योतिषी आणि सामुद्रिक आला होता. काकासाहेबांचा मुक्कामही या दिवशी मजकडेच होता. मी म्हणालो, "काकासाहेब, तुमचा हात दाखवा पाहू या ज्योतिष्याला." काकासाहेब हसून म्हणाले, "आता माझे काय भविष्य पाहावयाचे राहिले आहे?" मी म्हणालो, "असे काय करता? दाखवा की हात. तेवढीच गंमत." काकासाहेबांनी ज्योतिष्यापुढे हात केला. ज्योतिषी फार हुषार होता. त्याने हातावरच्या रेषा पाहून चटकन कागदावर काकासाहेबांची कुंडली मांडली, आणि काकासाहेबांच्या एकेक गोष्टी सांगायला सुरुवात केली. तो म्हणाला, "तुमचा जन्म क्षेत्राच्या ठिकाणी आणि नदीच्या काठी झाला आहे." काकासाहेब म्हणाले, "बरोबर आहे. माझा जन्म पंढरपूरचा. नदीकाठीच आमचे घर आहे." ज्योतिषी

म्हणाला, " तुम्हांला दोन मुलगे आणि दोन मुली असल्या पाहिजेत." तेही बरोबरच होते. पुढे तो म्हणाला, " तुम्हांला साडेसाती आहे. तुमची मातोश्री काही दिवसांपूर्वी वारली आहे. आणि तुम्ही स्थानभ्रष्ट झालेले आहात." ते ऐकून आम्ही चकितच झालो. कारण त्याने सांगितलेले अक्षर अन् अक्षर बरोबर होते. तेव्हा मी त्याला म्हणालो, " ते मागले राहू द्या हो. पुन्हा हे स्थानारूढ कधी होतील ते अगोदर आम्हांला सांगा!" ज्योतिषी थोडा विचार करून म्हणाला, " या वर्षाअखेर तसा योग आहे. अगदी नक्की. आणि त्यानंतर मात्र त्यांच्या आयुष्याचा काळ अत्यंत भाग्याचा अन् भरभराटीचा आहे." काकासाहेब विषण्णपणे हसून म्हणाले, " ह्याने मागल्या गोष्टी बरोबर सांगितल्या, पण ह्यांनी पुढले जे भविष्य सांगितले ते सपशेल खोटे आहे. माझे भविष्य काय आहे हे मी ह्यांच्यापेक्षा फार उत्तम जाणतो. हा काय मला सांगतोय?" काकासाहेबांचे ते निराशेचे उद्गार मी त्या वेळी हसण्यावारी नेले. पण त्यांना आपल्या भविष्याचे आकलन पुष्कळ दिवसांपासून झालेले होते. हे जे त्यांचे म्हणणे होते ते दुर्दैवाने खरे ठरले. माणसाच्या सहनशीलतेला तरी काही मर्यादा आहे की नाही? आत एकसारखी धुसमत असलेली आग ते किती वेळ कोंडून ठेवणार? त्यांचे मन आणि शरीर आतमधून प्रतिदिनी पोखरले जात होते. पाच वर्षे कसा तरी त्यांनी दम काढला! पुढे त्यांना ते अशक्य झाले. एक दिवस तो ज्वालामुखी आतमधून त्वेषाने उफाळून बाहेर पडला अन् त्याने त्यांच्या शरीराच्या नि जीवनाच्या ठिकऱ्याठिकऱ्या करून त्यांना सर्वस्वी लुळेपांगळे करून टाकले. त्यातच सव्वादोन वर्षांनी पुढे त्यांचा अंत झाला. काकासाहेबांच्या पक्षघाताचा आणि मरणाचा हा असा हृदयद्रावक इतिहास आहे. अर्धांगवायूचा झटका आल्यानंतर पाच-सहा महिन्यांनी मी त्यांना एकदा भेटावयाला गेलो. ते अंथरुणावर शांतपणे पडले होते. मी त्यांना म्हणालो, " काकासाहेब, खरे सांगू! ' ज्ञानप्रकाश 'च्या संपादकीय सेवानिवृत्तीचा तुमच्या मनाला काही उपसर्ग झाला नाही हे इतके वर्षे दाखविण्याचा जो तुम्ही प्रयत्न केलात आणि मनातली आग जगापासून लपवून ठेवण्याची जी पराकाष्ठा केलीत त्याचा हा सारा परिणाम आहे." त्याबरोबर काकासाहेबांनी आपला डावा हात ओठावर ठेवून आणि नकारार्थी तो जोराने हालवून मला खुणेने सांगितले की, " नका, नका. हे बोलू नका!"

फत्तरालादेखील पाझर फोडील असा करुणरसाने ओथंबलेला हा काका-

साहेबांच्या जीवनसमाप्तीचा इतिहास मी तरी का सांगतो आहे? ज्या फत्तरांनी काकासाहेबांना जिवंतपणी ठेचण्याची पराकाष्ठा केली त्यांना ही कहाणी वाचून पाझर फुटेल काय? कोणास ठाऊक? आणि आता त्यांना पाझर फुटून काय उपयोग? आमचे काकासाहेब तर गेले! आमचे गाईपेक्षा गरीब काकासाहेब, आमचे चांदण्यापेक्षा शीतल काकासाहेब, आमचे नवनीतापेक्षा कोमल हृदयाचे काकासाहेब, जाईच्या मांडवापेक्षाही सुवासिक सावली देणारे आमचे प्रेमळ काकासाहेब तर आता गेले. ज्ञानप्रकाशच्या खुर्चीवरून ज्यांनी त्यांना खाली ओढले त्यांनीच त्यांना या जगामधून धक्के मारून बाहेर काढले. आता कितीही आक्रोश केला म्हणून ते थोडेच परत येणार आहेत? मग असे जर आहे, तर काकासाहेबांच्या मरणाची ही हृदयद्रावक कथा आम्ही हृदय फाडून इतक्या विस्ताराने का सांगितली? एवढ्याचसाठी की, दुष्ट आणि मत्सरी लोकांनी एका बुद्धिमान आणि सज्जन संपादकाचा बळी घेऊन महाराष्ट्राचे केवढे मोठे नुकसान केले हे जनतेला एकदा कळावे. काकासाहेबांच्या प्रतिभेची पौर्णिमा अजून उगवायचीच होती. त्यांच्या पत्रपांडित्याचे कितीतरी नवनवोन्मेष महाराष्ट्राला अद्यापि पाहावयाला मिळावयाचेच होते. पण तसे होण्याआधीच राहूकेतूंनी त्यांसा ग्रासून गिळून देखील टाकले. काकासाहेबांच्या साऱ्या मनीषा आणि आकांक्षा तशाच अर्ध्या नि अपुऱ्या राहिल्या. त्यांच्या आत्म्याला शांती मिळो अशी कितीही उत्कटतेने आपण इच्छा केली तरी ती कशी पूर्ण होणार? छे, छे, काकासाहेबांच्या आत्म्याला शांती मिळणे कठीण आहे. त्यांचा आत्मा 'ज्ञानप्रकाश' कार्यालया-भोवती पुष्कळ काळ घुटमळत राहील. मरण्यापूर्वी कित्येक दिवस आधी त्यांची स्मृती नष्ट झाली होती. फक्त 'ज्ञानप्रकाश' हा एकच शब्द त्यांना आठवत होता. 'ज्ञानप्रकाश' हाच त्यांचा आयुष्यातला शेवटचा विचार होता. 'ज्ञानप्रकाश'चे कसे चालेल एवढा एकच ध्यास अखेर त्यांना लागून राहिला होता. 'ज्ञानप्रकाश'चे संपादक म्हणून जर त्यांना मरण लाभले असते तर त्यांना केवढे समाधान वाटले असते! पण दुष्ट हितशत्रूंनी त्यांना तेवढेदेखील समाधान लाभू दिले नाही. 'ज्ञानप्रकाश'चे माजी संपादक म्हणून एखाद्या निपुत्रिकाप्रमाणे त्यांना आपल्या पत्राच्या नावानें हाय खाऊन मरावे लागले. छे, छे, महाराष्ट्रात फार मोठा अन्याय झाला. महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान झाले. महान संपादक! थोर सत्पुरुष! (नवयुग : ९-५-१९४८)

२५

## महाराष्ट्राचा ‘ ज्ञानप्रकाश ’ गेला !

गेल्या रविवारी जुने वर्ष संपले, आणि त्याच दिवशी गेली एकशे तीन वर्षे महाराष्ट्राला उजेड देणारा ‘ ज्ञानप्रकाश ’ मालवला. विसाव्या शतकाचा पूर्वार्ध मावळत असताना त्याच क्षणी महाराष्ट्राच्या शंभर वर्षांच्या इतिहासाचा एक महान साक्षीदार अस्तंगत व्हावा ही एक विलक्षण शोककारक घटना म्हटली पाहिजे. ‘ ज्ञानप्रकाश ’च्या समाप्तीबरोबर गेल्या रविवारी महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातले एक प्रचंड पर्व समाप्त झाले. गेल्या शतकाशी महाराष्ट्राला आतापर्यंत जोडून ठेवणारा एक सामर्थ्यशाली दुवा त्या दिवशी निखळून खाली पडला. महाराष्ट्राच्या पाच पिढ्यांचा एक तपोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध प्रतिनिधी नाहीसा झाला. महाराष्ट्राच्या गेल्या शंभर वर्षांतील जीवनाची आणि घटनांची दैनंदिन नोंद ठेवणारी एक जाग्रत संस्था बंद झाली. सहस्रावधी जनतेच्या जीवनाशी नाना तऱ्हेने निगडित झालेली महाराष्ट्रातील एक शंभर वर्षांची थोर परंपरा नष्ट झाली. कोणाच्या आदराचे, अभिमानाचे आणि कौतुकाचे स्थान नाहीसे झाले, तर कोणाच्या आधाराची, आसऱ्याची आणि विसाव्याची एकमेव जागाच मुळी गेली ! अशा तऱ्हेने महाराष्ट्रातील शेकडो लोकांच्या भावनांना आणि आतड्यांना पीळ पाडणारी आणि त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे करणारी एक अतिशय अमंगळ आणि दुःखकारक गोष्ट गेल्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी पुण्यामध्ये घडली. नवीन वर्षारंभाच्या दिवसाचा सूर्य जेव्हा महाराष्ट्रावर प्रथम उगवला असेल तेव्हा ‘ ज्ञानप्रकाश ’च्या अभावाने तेथील जनतेच्या जीवनात

पडलेली उजाड आणि भकास पोकळी त्याला जाणवल्याखेरीज खचित राहिली नसेल. ‘ ज्ञानप्रकाश ’ बंद पडणे ही महाराष्ट्राच्या जीवनातली एक अत्यंत विपरीत घटना आहे ह्यात मुळीच शंका नाही. ‘ ज्ञानप्रकाश ’चा विरह अनेकांना असह्य झाल्यावाचून राहणार नाही, आणि पुष्कळांच्या मनातली ‘ ज्ञानप्रकाश ’-ची आठवण बरीच वर्षेपर्यंत तरी बुजली जाणे कठीण आहे. ‘ ज्ञानप्रकाश ’च्या निर्याणाने तर पुणे शहराचे एक वैशिष्ट्य आणि वैभवच नाहीसे झाले आहे. उद्या पुण्यातील पर्वतीच्या आणि चतुःशृंगीच्या टेकड्या आणि देवळे नाहीशी झाली तर कसे दिसेल आणि कसे वाटेल बरे ? किंवा शनिवारवाड्याच्या दगडी भिंती, बुरुज आणि दिल्ली दरवाजा एकदम कोसळून खाली पडला तर कसे भासेल बरे ? अथवा तुळशीबाग आणि बेलबाग एकाएकी नाहीसे झाले तर कसे होईल बरे ? ‘ ज्ञानप्रकाश ’ बंद झाल्याने पुणे शहराचे तसे नुकसान झालेले आहे. अनेक वर्षांपासून ‘ ज्ञानप्रकाश ’ हे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक भावनेचे आणि दर्शनाचे पुण्यामधले एक पवित्र स्थान होऊन बसले होते. आम्हाला तर उद्या पुण्याला गेल्यावर ‘ ज्ञानप्रकाश ’ नसलेल्या पुण्यात अगदी ओके ओके वाटेल ! आणि ‘ आंबराई ’च्या रस्त्यावरून जाताना ‘ ज्ञानप्रकाश ’च्या कचेरीकडे बघताना तर आमच्या पोटामध्ये कालवाकालव झाल्यावाचून राहणार नाही !

महाराष्ट्र म्हणजे पुणे आणि पुणे म्हणजे ‘ ज्ञानप्रकाश ’ असे अनेक वर्षांपासून एक समीकरण होऊन बसले होते. महाराष्ट्रात आणि पुण्यात अनेक दैनिके आणि साप्ताहिके आहेत, पण पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या जीवनाचे प्रतिबिंब ‘ ज्ञानप्रकाशा ’त उमटल्याचा जसा प्रत्यय येत असे तसा दुसऱ्या वृत्तपत्रात क्वचितच येई. हे असे का असावे ह्याचे कारण सांगता येणार नाही. पण ते तसे होते ह्यात मुळीच शंका नाही. ‘ ज्ञानप्रकाश ’ वाचला म्हणजे मराठी माणसाला पुण्याचे आणि महाराष्ट्राचे दर्शन झाल्याचा आनंद होई ! म्हणून महाराष्ट्र सोडून परप्रांती किंवा परदेशी गेलेल्या मराठी माणसांना तर ‘ ज्ञानप्रकाश ’ केव्हा हाती पडतो असे होऊन जाई. ‘ ज्ञानप्रकाश ’ त्यांना वाचावयाला मिळाला म्हणजे अगदी आपल्या ओळखीच्या किंवा नात्याच्या माणसाकडून सगळी घरची बातमी कळल्याचे त्यांना समाधान होत असे. एका इंग्रज कवीने म्हटले आहे की, जेथे जेथे इंग्रज माणूस जातो तेथे तेथे तो इंग्लंडचा लहानसा तुकडाच बरोबर घेऊन जातो. ‘ ज्ञानप्रकाश ’च्या बाबतीत असेच म्हणता येत

असे. जेथे जेथे 'ज्ञानप्रकाश' जाई तेथे तेथे तो आपल्याबरोबर पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या वातावरणाचा चांगला घवघवीत तुकडाच घेऊन जात असे. आता पुण्यात आणि मुंबईत अंतर ते काय? एकशेबारा ते तेरा मैलांचे, आणि तीन-चार तासांच्या प्रवासाचे. पुण्याहून मुंबईस येणारी रोज किती तरी माणसे भेटतात. पण मुंबईत येऊन स्थायिक झालेल्या आमच्यासारख्या जातिवंत पुणेकरांना रोजचा 'ज्ञानप्रकाश' वाचावयाला मिळाला नाही तर त्या दिवशी काही तरी चुकल्या चुकल्यासारखे वाटे. अशा तऱ्हेने सर्व महाराष्ट्राच्या आणि पुणेकरांच्या जीवनात 'ज्ञानप्रकाश'ने एक विलक्षण ओढ आणि गरज निर्माण करून ठेवली होती म्हणून 'ज्ञानप्रकाश' बंद पडल्याने त्या सर्वांना आपल्या घरातले नि कुटुंबातले एक अतिशय प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे वडिलधारे माणूस गेल्यासारखे दुःख झाल्यावाचून राहणार नाही.

'ज्ञानप्रकाश'च्या शंभर वर्षांवरील आयुष्याचा ह्या प्रसंगी आढावा घेणे जरूर आहे. पण तो आज तरी घेता येणे कठीण आहे. फार श्रमाचे आणि संशोधनाचे काम आहे ते. म्हणजे शंभर वर्षांच्या महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासाचाच आढावा घ्यावयाला हवा. इतक्या गडबडीने कसे ते काम होऊ शकणार? १८४९ साली 'ज्ञानप्रकाश' प्रथम सुरू झाला, त्या वेळी इंग्रज सरकारच्या राज्यकारभारावर टीका करण्यासाठी आपण अवतार घेत आहोत असे 'ज्ञानप्रकाश'ने आपले धोरण जाहीर केले होते. "जो सरकारची चाकरी करतो त्याचे वर्तणुकेविषयी छापणारे ह्यांनी जे संभवेल ते लिहिण्यास अधिकार आहे. कारण जो सरकारचा नोकर तो लोकांचा चाकर आणि छापणार लोकांचे डोळे आहेत." असे 'ज्ञानप्रकाश'ने आरंभीच्या अंकात सरकारला स्पष्टपणे बजावून सांगितले होते. ज्ञानप्रकाशचे आरंभीचे हे जहाल राजकीय धोरण १८५७ सालच्या बंडापर्यंत तसेच कायम होते. सत्तावन्न साली छापखान्यांची आणि वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्याचे धोरण जेव्हा ब्रिटिश सरकारने स्वीकारले, तेव्हा 'ज्ञानप्रकाश'ला आपला आवाज साहजिकच सौम्य करावा लागला. तथापि, 'निबंधमाला' आणि 'केसरी' अवतीर्ण होण्यापूर्वी राजकीय बाबतीत तत्कालिन मराठी वृत्तपत्रे सरकारवर कडक टीका करीत नसत अशी जर कोणाची समजत असेल तर ती चुकीची आहे. पुढे पुढे 'ज्ञानप्रकाश' पत्र सामाजिक आणि शैक्षणिक चळवळींकडे अधिक लक्ष देऊ लागले, ही गोष्ट जरी खरी असली, तरी वेळप्रसंगी सरकारवर खरमरीत टीका करावयाला 'ज्ञानप्रकाश'ने

कधीही मागेपुढे पाहिले नाही. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात 'ज्ञानप्रकाश' हे 'भारत-सेवक-समाजा'च्या ताब्यात गेले, आणि तेथून पुढे त्या समाजाच्या राजकीय चळवळीचे ते मुखपत्र बनले. लोकमान्य टिळकांच्या जहाल आणि क्रांतिकारक राजकारणाचा प्रक्षोभक काळ होता तो. ह्या राजकारणाचा जयजयकार करणारी आणि त्याच्या आघाडीवर त्वेषाने लढणारी वृत्तपत्रे अतिशय लोकप्रिय व्हावीत आणि त्या राजकारणाचा विरोध करणारी किंवा त्याच्या यशस्वितेबद्दल संशय व्यक्त करणारी पत्रे लोकांच्या क्रोधाचा किंवा उपहासाचा विषय व्हावीत हे साहजिकच होते शिवरामपंत परांजप्यांच्या 'काळा'-वर आणि लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' वर त्या वेळी लोक बेहद्द खूष असत. आणि मवाळांच्या सरकारजमा राजकारणाचे कैवारी म्हणून त्या वेळची पोरे-सोरेही 'ज्ञानप्रकाश' म्हणजे 'अज्ञानप्रकाश' अशी त्याची थट्टा करीत. येथपासून आम्हांला स्वतःला 'ज्ञानप्रकाश'ची आठवण आहे.

त्या वेळी नटेश आप्पाजी द्रवीड आणि गोपाळ कृष्ण देवधर हे आलटून पालटून 'ज्ञानप्रकाश'चे संपादक होत असलेले मला आठवते. देवधर संपादक असले म्हणजे 'ज्ञानप्रकाश'चे अग्रलेख हटकून सहकारी पतपेढीच्या चळवळीवर असावयाचे. हे अग्रलेख कोण वाचणार ? राम गणेश गडकरी ह्यांनी 'ठकीच्या लग्ना'मधील खटल्यात एका आरोपीला हे अग्रलेख वाचण्याची शिक्षाच मुळी फर्मावली होती. ह्यावरून त्या अग्रलेखांबद्दल त्या वेळचे लोकमत काय होते ते कळून येण्यासारखे आहे. तथापि, जहाल राजकारणाचा पुरस्कार करणारी पुण्यातील जी लोकप्रिय वृत्तपत्रे होती त्यांच्या अंगी जे काही दोष होते ते 'ज्ञानप्रकाश'मधे मुळीच नव्हते. त्या वेळची जहाल वृत्तपत्रे ही संपूर्णतया राजकीय पत्रे होती, आणि सामाजिक दृष्ट्या ती प्रतिगामी होती. 'ज्ञानप्रकाश' हा राजकारणात मवाळ असला तरी त्याने स्वतःला केवळ राजकारणालाच वाहून घेतले नव्हते. राजकारणाखेरीज समाजाच्या जिव्हाळ्याचे जे इतर अनेक विषय होते त्यांना 'ज्ञानप्रकाश'मधे विशेष स्थान मिळे आणि सामाजिक बाबतीत तर 'ज्ञानप्रकाश' हे पुरोगामी विचारांचे पुरस्कर्ते पत्र होते. शिवाय 'ज्ञानप्रकाश' हे त्या वेळी पुण्यातले आणि महाराष्ट्रातले एकमेव दैनिक होते. 'काळ-केसरी' ही बोलून चालून साप्ताहिके होती. त्यामुळे 'ज्ञानप्रकाश'ची टवाळी करणाऱ्यांनाही तो रोज वाचणेच भाग पडे, आणि त्यातील विविधतेचा आणि आधुनिकतेचा पगडा वाचकांच्या मनावर पडल्यावाचून राहात नसे. महाराष्ट्रातील

स्थिर, सुबुद्ध आणि प्रागतिक वाचकांचा एक विशिष्ट आणि निश्चित वर्ग 'ज्ञान-प्रकाश'ने पहिल्यापासून बांधीत आणला होता. त्याच्या आश्रयामुळे प्रतिकूल राजकीय वावटळीचा 'ज्ञानप्रकाश'ला कधीही उपसर्ग झाला नाही. 'काळ-केसरी'चे अग्रलेख हे त्या पत्रांचे त्या वेळी मुख्य आकर्षण होते, तर अग्रलेखा-खेरीज बाकीचा सारा मजकूर हे 'ज्ञानप्रकाश'चे आकर्षण होते. समाजातील सामाजिक, वाङ्मयात्मक किंवा कलात्मक वादांची दखलगिरी 'ज्ञानप्रकाश' जितक्या तत्परतेने घेई तितकी बाकीची वृत्तपत्रे घेत नसत. निर्यमक कवितेचा वाद 'ज्ञानप्रकाश'मधे त्या वेळी किती तरी गाजल्याचे मला आठवते आहे. पुण्यात प्रसिद्ध नाटककाराचे कोणतेही नवे नाटक लागले की त्याजवर 'ज्ञानप्रकाश'मधे अनुकूल किंवा प्रतिकूल टीकेचा असा काही वर्षाव होत असे की विचारू नका. 'ज्ञानप्रकाश'च्या संपादकीय वर्गात त्या वेळी असलेल्या माधव दामोदर आळते-करांनी खाडिलकरांच्या 'विद्याहरण' नाटकाची जी भंबेरी उडविली ती अद्यापि आमच्या स्मरणात आहे. पुण्यात त्या वेळी, 'आरोग्य मंडळ' नावाची संस्था असे. त्या संस्थचे सभासद दर आठवड्याला पुण्याच्या बोळाबोळामधे आणि गल्लीगल्लीमधे हिंडून आरोग्याची तपासणी करीत आणि ह्या तपासणीचे अति-शय रसाळ आणि आकर्षक वृत्तांत त्या संस्थेचे चिटणीस दत्तात्रय हरि भट हे 'ज्ञानप्रकाश'मधे छापून प्रसिद्ध करीत. आरोग्यविषयावर इतके जातिवंत व मनोरंजक वाङ्मय मराठी भाषेत अद्यापपर्यंत प्रसिद्ध झालेले नाही असे आमचे मत आहे. ह्या लिखाणामुळे 'ज्ञानप्रकाश'च्या लोकप्रियतेमधे त्या वेळी फारच भर पडलेली होती. 'ज्ञानप्रकाश'चे संपादन पुढे बापूजी मार्तंड आंबेकर हे करू लागले. बापूराव आंबेकर हे एक अत्यंत रसिक आणि बहुश्रुत गृहस्थ होते. त्यांच्या लिखाणाची धार आणि झपाटा विलक्षण होता. त्यांनी 'ज्ञान-प्रकाशा'त काव्यशास्त्रविनोद सुरू करून त्याच्या वाचनीयतेचे क्षेत्र अधिक व्यापक केले. तथापि, लोकमान्य टिळक आणि नामदार गोखले ह्यांच्या शेव-टच्या वादात पक्षाभिनिवेशाच्या आवेशात संयम न राहून बापूराव आंबेकरांनी टिळकांवर 'ज्ञानप्रकाशा'त एक अतिशय निर्दय लेखमाला लिहिली तिचे कडवट स्मरण अद्यापही पुष्कळांना असेल.

आज पुण्याला 'प्रभात चित्रपटगृह' जेथे आहे तेथे पूर्वी इंदूरच्या सरदार किब्यांचा जुना ऐतिहासिक वाडा होता. ह्या तीन मजली प्रचंड वाड्यात १९२६ सालापर्यंत 'ज्ञानप्रकाश'ची कचेरी व 'आर्यभूषण' छापखाना ह्या

दोन संस्था आम्हाला आठवते तेव्हापासून होत्या. मुंबई विश्वविद्यालयाच्या सर्व परीक्षांचा निकाल ज्या ज्या दिवशी लागे त्या त्या दिवशी तो मुंबईहून मागवून वाड्याच्या दाराशी चिकटवण्याची ' ज्ञानप्रकाश 'ने व्यवस्था केली होती. दुसरे दिवशी तो सर्व निकाल ' ज्ञानप्रकाश 'मधे प्रसिद्ध होत असे. त्यामुळे निकालाच्या मोसमात ' किबे वाड्या 'च्या दाराशी पुण्यातील शेकडो विद्यार्थ्यांची झुंबड उडे. ' ज्ञानप्रकाश 'च्या लोकप्रियतेत ह्या परिपाठामुळे फार मोठी भर पडली होती. सव्वीस साली ' ज्ञानप्रकाश—आर्यभूषण ' संस्थेवर फार मोठी आपत्ती आली. किबेवाड्याला एक दिवशी दुपारी अचानक आग लागली. आगीचे कारण कळले नाही. कुणी तरी विडी ओढून कागदात टाकली म्हणतात. ही आग पाहण्यासाठी सारे पुणे शहर जमा झाले होते. समोरच्या मोरोबादादांच्या वाड्यात उभे राहून अग्नीच्या भयानक ज्वालांमध्ये भस्मसात होणाऱ्या किबे-वाड्याचे ते भयानक दृश्य आम्ही आमच्या डोळ्यांनी स्वतः पाहिलेले आहे. ह्या आगीत ' ज्ञानप्रकाश ' जळून भस्मसात झाला. त्याच्या अनेक वर्षांच्या मौल्यवान फायलींची जळून राख झाली. ' आर्यभूषण 'च्या सर्व यंत्रांचा नाश झाला. सारा महाराष्ट्र ह्यामुळे हळहळला. ' ज्ञानप्रकाश 'बद्दल बहुजनसमाजाची केवढी सहानुभूती होती हे ह्या प्रसंगी दिसून आले. ह्या आपत्तीने ' भारत-सेवक-समाजा 'चे त्या वेळचे कार्यकर्ते डगमगले नाहीत. गोपाळ कृष्ण देवधर आणि अनंत विनायक पटवर्धन हे कंबरा बांधून उठले आणि थोड्या अवधीत त्यांनी साऱ्या महाराष्ट्रातून दीड दोन लाख रुपये जमा केले. फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील आंबराईत ' ज्ञानप्रकाश 'साठी नवी प्रशस्त दगडी इमारत बांधून तयार व्हावयाला मग फारसा वेळ लागला नाही. अशा रीतीने एका महान ' अग्निदिव्या 'मधून कायाकल्प होऊन ' ज्ञानप्रकाश ' सुरक्षितपणे त्या वेळी बाहेर पडला. बाह्य स्वरूपाबरोबरच ' ज्ञानप्रकाश 'च्या अंतःस्वरूपातही झपाट्याने बदल होत असल्याची चिन्हे दिसू लागली. देशातील राष्ट्रीय झगड्याशी ' ज्ञान-प्रकाश ' जास्त समरस होऊ लागला आहे हे पाहून पुष्कळांना त्या वेळी आश्चर्यसुद्धा वाटले. ' ज्ञानप्रकाश 'ची लोकप्रियता त्यामुळे अधिकच वाढू लागली. लोक सकाळी उठून ' ज्ञानप्रकाश ' आला की नाही ह्याची चौकशी करू लागले. ' ज्ञानप्रकाश 'च्या स्वरूपात त्या वेळी हा जो क्रांतिकारक बदल होत गेला त्याला जबाबदार कोण, ह्याचा पुष्कळ दिवस कोणाला बोधही पण झाला नाही. ' ज्ञानप्रकाश 'च्या संपादकाच्या नावाच्या जागी एके दिवशी सकाळी

कृष्णाजी गणेश लिमये ' हे नाव हळूच छापण्यात आले. पण त्याच्याकडे कोणाचे लक्षदेखील गेले नाही, कारण ' कृष्णाजी गणेश लिमये ' ही व्यक्ती ' ज्ञानप्रकाश ' कचेरीबाहेर पुण्यामधल्या दहा लोकांनाही ठाऊक नव्हती. 'ज्ञानप्रकाश'च्या वाढत्या लोकप्रियतेबरोबर कृष्णाजी गणेशांची अप्रसिद्धी जिज्ञासू लोकांना विशेषच त्रासदायक होऊ लागली. भालाकार भोपटकरांनी तर एकदा चिडून लिहिले की, ' ज्ञानप्रकाशा 'त ह्या कृष्णाजी गणेशांचा एकदा फोटो तरी छापा म्हणजे हे गृहस्थ कोण आहेत ते आम्हांला कळतील तरी !

कृष्णाजी गणेश ऊर्फ काकासाहेब लिमये हे तत्पूर्वी पाच-सहा वर्षांपासून ' ज्ञानप्रकाश 'च्या संपादकीय वर्गात काम करीत होते. तथापि त्यांच्या अबोल आणि प्रसिद्धिपराङ्मुख स्वभावामुळे त्यांच्या अंगातील असामान्य गुणांचा कोणालाही परिचय झाला नव्हता. ' ज्ञानप्रकाश 'च्या संपादकाच्या जागी त्यांची नेमणूक झाल्याबरोबर ' ज्ञानप्रकाश 'च्या स्वरूपात जशी जशी क्रांती होत गेली आणि त्याची लोकप्रियता पराकाष्ठेने वाढू लागली तसतसे ' काकासाहेब लिमये ' हे नाव आणि ते धारण करणारी प्रसन्नमुख आणि सावळी मूर्ती साऱ्या महाराष्ट्राच्या परिचयाची झाली, आणि थोड्या वर्षांच्या आतच महाराष्ट्राच्या विविध जीवनात आपले अस्तित्व विशेष प्रकट न करताना ती उत्साहाने वावरताना दिसू लागली. काकासाहेबांच्या व्यक्तिगत सौजन्यामुळे आणि चांगुलपणामुळे ' ज्ञानप्रकाश 'च्या लोकप्रियतेचे वर्तुळ अधिकाधिक वाढतच गेले. ' ज्ञानप्रकाश 'बद्दलच्या लोकांच्या मनातल्या जुन्या आढ्या आणि पूर्वग्रह पार वितळून गेले आणि त्याच्या मैत्रीत आणि ऋणानुबंधात नवीन नवीन भर पडत गेली. ' भारत-सेवक-समाजा 'च्या घटनावादी आणि विधायक राजकारणाची मूळ बैठक न सोडता देशातील क्रांतिकारक आणि राष्ट्रीय राजकारणाबद्दल सहानुभूतीचे धोरण काकासाहेबांनी पत्करले. त्यामुळे ' ज्ञानप्रकाश 'चा खप कमालीचा वाढला. १९३० ते १९३२ सालच्या कायदेभंगाच्या मोहिमेच्या काळात कॉंग्रेसच्या राजकारणाची इत्थंभूत बातमी देण्याच्या कामी ' ज्ञानप्रकाश 'ने महाराष्ट्रातील बाकीच्या सर्व पत्रांना मागे टाकले आणि लोकप्रियतेचा उच्चांक मोडला. जनतेच्या प्रगमनशील आकांक्षांचे प्रतिबिंब दैनिक वृत्तपत्रात उमटावयाला पाहिजे, आणि जनतेच्या विविध नि व्यापक जीवनाशी ते समरस व्हावयाला पाहिजे, ही काकासाहेबांच्या संपादकीय यशाची खरी गुरुकिल्ली होती. काकासाहेबांची संपादकीय कारकीर्द तेरा-चौदा वर्षे टिकली. ' ज्ञानप्रकाश 'च्या शंभर

वर्षांच्या इतिहासात हा कालखंड पराकाष्ठेच्या लोकप्रियतेचा आणि वैभवाचा म्हणून गणावा लागेल. ' ज्ञानप्रकाश ' हे एका विशिष्ट राजकीय पक्षाचे मुखपत्र आहे ही लोकांची भावना ह्या काळात समूळ नाहीशी झाली. सर्व पक्षांच्या, पंथांच्या आणि मतांच्या लोकांना ' ज्ञानप्रकाश ' हे एक आपले पत्र आहे असे वाटू लागले. निःपक्षपाती, समतोल आणि व्यापक अशा व्यासपीठाचे स्वरूप त्या काळात ' ज्ञानप्रकाश 'ला प्राप्त झाले. ते ' ज्ञानप्रकाश 'चे यश अद्यापपर्यंत तरी कोणत्याही पत्राला हिरावून घेता आले नाही. महाराष्ट्राच्या दूरदूरच्या जिल्ह्यांत आणि गावांत आपले बातमीदार नेमून तेथील सर्व घडामोडी तपशीलवार प्रसिद्ध करण्याचा उपक्रम ' ज्ञानप्रकाश 'नेच प्रथम सुरू केला. त्यामुळे अज्ञातवासात वावरणाऱ्या अनेक स्थानिक कार्यकर्त्यांना आणि पत्रपंडितांना उत्तेजन मिळून लोकसेवेचे कार्य त्यांच्या हातून जास्त उत्साहाने आणि धडाडीने होऊ लागले. सार्वजनिक कार्याच्या विविध क्षेत्रांत वावरणाऱ्या अनेक गुणी आणि विद्वान व्यक्तींना, उपयुक्त संस्थांना अन् हितकारक प्रवृत्तींना ' ज्ञानप्रकाश 'ने उजेडात आणून महाराष्ट्राची फार मोठी सेवा केली. त्या काळात ज्या अनेक व्यक्तींचे सार्वजनिक जीवन ' ज्ञानप्रकाश 'ने घडविले त्यांमध्ये आम्हीही एक होतो ही गोष्ट या ठिकाणी कृतज्ञताबुद्धीने आणि सद्गदित अंतःकरणाने आम्ही नमूद करून ठेवतो. वाङ्मयीन वाद, चळवळी, संमेलने आणि ग्रंथपरीक्षणे ह्यांना ' ज्ञानप्रकाश 'ने भरपूर स्थान देऊन महाराष्ट्र साहित्याची जी अभूतपूर्व सेवा केली आहे तिला तर तुलनाच नाही. ' ज्ञानप्रकाश 'च्या निर्वाणाने आज महाराष्ट्र साहित्याचे सर्वांत जास्त नुकसान झाले आहे असे आम्ही म्हटले तर त्यात एवढीशीसुद्धा अतिशयोक्ती होणार नाही.

काकासाहेब लिमये ' ज्ञानप्रकाश 'च्या संपादकीय स्थानावरून का दूर झाले तो अप्रिय भाग आम्ही आमच्या वाचकांना त्या वेळी विस्तृतपणे सांगितलेला आहे. त्याची पुनरावृत्ती करण्याचे आज कारण नाही. पण ' भारत-सेवक-समाजा 'चा तो क्रूर निर्णय त्यांच्या व महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी होता ह्यात मुळीच संशय नाही. ' ज्ञानप्रकाश 'च्या लोकप्रियतेला तेथूनच उतरती कळा लागली. काकासाहेबांच्या नंतर श्री. श्री. ग. वझे हे काही काळ संपादक होते. त्यांच्या हातून संपादकीय सूत्रे नामदार गोखले ह्यांचे पुतणे शंकर गोविंद गोखले ह्यांच्याकडे आली. गेली पाच-सहा वर्षे शंकरराव गोखले हेच ' ज्ञानप्रकाश 'चे संपादक होते. शंकरराव हे काकासाहेब लिमयांच्या तालमीत तयार झालेले होते.

त्यामुळे त्यांच्या अंगातले अनेक संपादकीय गुण आणि विशेषतः स्वभावाचे सौजन्य अन् लोकसंग्राहक वृत्ती शंकररावांच्या अंगात पुरेपूर उतरलेली आहे. शंकररावांनी काकासाहेबांच्या सर्व परंपरा तितक्याच जोमाने आणि उत्साहाने पुढे चालू ठेवल्या आणि 'ज्ञानप्रकाश'चा जुना लौकिक नि प्रतिष्ठा यशस्वितेने आतापर्यंत सांभाळून ठेवली. 'ज्ञानप्रकाश'च्या संपादकीय स्थानावर शंकरराव गोखले नसते तर सदर वृत्तपत्र कदाचित यापूर्वीच बंद करण्याची पाळी 'भारत-सेवक-समाजा'वर आली असती ह्यात मुळीच संशय नाही. गेली काही वर्षे 'ज्ञानप्रकाश' हे तोट्यात चालले होते ही गोष्ट खरी आहे. लोकाश्रयावर चालणाऱ्या कोणत्याही स्वाभिमानी आणि निःपक्षपाती पत्राला आजच्या बिकट आर्थिक परिस्थितीत जगणे अत्यंत कठीण झाले आहे, हे उघडे रहस्य आहे. वृत्तपत्राच्या गळ्याभोवती भांडवलशाहीचे पाश पडलेले असून त्यांचे विळखे दिवसेंदिवस आवळत चाललेले आहेत. गेल्या दोन महिन्यांत तर कागदाच्या व्यापाऱ्यांनी कागदाचे भाव भरमसाटपणे वाढवून गरीब वृत्तपत्रांना यापुढे आपली जीवनयात्रा कंठणे सर्वस्वी अशक्यच करून सोडले आहे. शतायुषी 'ज्ञानप्रकाश'चा बळी घेण्यास देशातील ही प्रतिकूल आर्थिक परिस्थिती कारण झाली ही जरी खरी गोष्ट असली तरी हा दुर्दैवी आणि आत्यंतिक निर्णय घेताना 'भारत-सेवक-समाजा'ने फार घाई केली असेच नाइलाजाने म्हणणे भाग आहे. 'ज्ञानप्रकाश' हे काही सामान्य पत्र नव्हे की वाटेल तेव्हा ते सहज बंद करता येईल. 'ज्ञानप्रकाश' ही एक शंभर वर्षांची महान संस्था आहे. अनेकांच्या अभिमानाची आणि भावनांची सूत्रे त्या संस्थेत अडकलेली आहेत. महाराष्ट्राच्या ज्या जनतेने 'ज्ञानप्रकाश'वर प्रेम करून त्याचे आजपर्यंत जतन केले, तिला एका शब्दानेही न कळविता अकस्मात 'ज्ञानप्रकाश' बंद करून टाकण्यात 'भारत-सेवक-समाजा'ने तिच्यावर फार मोठा अन्याय केलेला आहे असेच आम्ही म्हणतो. अग्निप्रलयाच्या आपत्तीमधून ज्यांनी पंचवीस वर्षांपूर्वी 'ज्ञानप्रकाश'ला वाचविले, त्यांनी 'ज्ञानप्रकाश'च्या ह्या प्राणांतिक संकटात त्याच्या हाकेला 'ओ' दिली नसती अशी का 'भारत-सेवक-समाजा'ची समजूत आहे? ज्या 'ज्ञानप्रकाश' पत्रासाठी 'आर्यभूषण छापखाना' मूळ काढण्यात आला, त्या छापखान्याचे जीवित सुरक्षित राहावे म्हणून 'ज्ञानप्रकाश' बंद करण्याचे 'भारत-सेवक-समाजा'ने आता ठरवावे हा त्या समाजाच्या महान ध्येयाचा खरोखर शोचनीय विपर्यासच होय! असो. झाले ते आता होऊन गेल्यानंतर आम्ही तरी अधिक

काय बोलावे ? पण एवढे मात्र म्हणतो की, शंभर वर्षांची पुण्यामधली एक ऐतिहासिक संस्था बंद करून 'भारत-सेवक-समाजा'ने महाराष्ट्रातील असंख्य लोकांच्या भावना अतिशय दुखावल्या आहेत, आणि भारताला आदर्शभूत झालेले मराठी भाषेतले एक थोर वृत्तपत्र अशा रीतीने बंद पडणे ही गोष्ट महाराष्ट्राला तरी कमी लांछनास्पद आहे काय ? अरेरे, अखेर गेला. पुण्याचा 'ज्ञानप्रकाश' गेला. महाराष्ट्राचा आवडता 'ज्ञानप्रकाश' मालवला ! वाईट गोष्ट झाली. फार वाईट गोष्ट झाली. दुःखाने आणि लाजेने मान खाली घालून आम्ही या प्रसंगी स्वस्थ बसतो. आम्ही तरी दुसरे काय करणार ?

( नवयुग : ७-१-१९५१ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत
अनुक्रम ७७०५९ वि: निबंध
क्रमांक २९८३ नों: दि: ३१।१२।७९

# २६

## बाबूराव गोखले

'केसरी' आणि 'मराठा' पत्राचे माजी संपादक श्री. दामोदर विश्वनाथ ऊर्फ बाबूराव गोखले ह्यांना गेल्या शनिवारी वयाच्या सत्याहत्तराव्या वर्षी मधुमेहाच्या विकाराने देवाज्ञा झाली ही बातमी जेव्हा आमच्या कानांवर पडली, तेव्हा आम्हांला अतिशय दुःख झाले. आम्हांलाच काय पण बाबूरावांच्याशी गेल्या चाळीस वर्षांत ह्या ना त्या नात्याने ज्याचा ज्याचा म्हणून संबंध आला असेल, त्या त्या सर्वांना बाबूरावांच्या निधनामुळे हळहळ वाटल्याखेरीज राहिली नसेल. बाबूरावांच्या व्यक्तिमत्त्वाची घडणच अशी काही विलक्षण आकर्षक होती, की जो जो म्हणून त्यांच्या सान्निध्यात वा परिचयात येई त्याला त्याला त्यांच्याबद्दल निव्वळ प्रेमच वाटावे. बाबूरावांचा द्वेष करणारा माणूस उभ्या आयुष्यात आम्हांला तरी कधी भेटला नाही. पुणे शहरामध्ये आणि विशेषतः गायकवाड्यातल्या राजकारणाच्या ऐन मध्य प्रवाहामध्ये उभे राहण्यात ज्यांनी सारी हयात घालविली त्यांनी आपल्या आयुष्यात कोणाचे फट् म्हणून घेतले नाही हा चमत्कार नव्हे काय? बाबूराव हे खरोखरच अजातशत्रू होते. हे त्यांच्या चारित्र्याचे एक अत्यंत अविस्मरणीय वैशिष्ट्य म्हणून समजले पाहिजे. आम्ही त्यांना आमच्या लहानपणापासून ओळखतो आहोत. लो. टिळकांच्या काळी गायकवाडवाड्यात काम करणारे बहुतेक सर्व लोक डोक्यावर पगड्या धारण करणारे मध्यमवयीन प्रौढ होते. अशा त्या पगडबंद वातावरणात डोक्यावर रुबाबदार रेशमी कोशा ऐटीने बांधून कोल्हापुरी पहिलवानाच्या पवित्र्यात

वावरताना जेव्हा गौरवर्ण आणि हसतमुख बाबूरावांना आम्ही पहिल्याने पाहिले तेव्हा त्या बुरसलेल्या मंडळीमध्ये इतका आधुनिक आणि नवजवान माणूस कसा ह्याचे आश्चर्य आम्हांला वाटल्यावाचून राहिले नाही. बाबूराव गोखले हे कोल्हापूरचे असले पाहिजेत हे त्या वेळी त्यांना न विचारता नुसते पाहूनसुद्धा समजण्यासारखे होते. कोल्हापूरच्या प्रतिगामी संस्थानी वातावरणात वाढलेला हा माणूस लोकमान्य टिळकांच्या जहाल राष्ट्रवादी राजकारणाकडे कसा आकर्षित झाला असावा हे एक त्या वेळी सर्वांना कोडे वाटत होते. पण असा एक त्या वेळी प्रवाद होता की, बाबूराव आपल्या विशी-एकविशीच्या सुमारास सशस्त्र क्रांतिकारकांच्या चळवळीत काम करीत होते. तो शिक्का त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर स्पष्ट उमटलेला दिसे. त्यांची ऐट, त्यांचा कुर्रा, त्यांचा रुबाब, त्यांची चालण्याची नि बोलण्याची ढब ही अगदी उघड उघड एखाद्या ज्वलज्जहाल क्रांतिकारकाला शोभण्यासारखी होती.

लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगातून सुटल्यानंतर गंगाधरराव देशपांड्यांचे शिफारसपत्र घेऊन ते गायकवाडवाड्यात प्रविष्ट झाले. लोकमान्यांनी त्यांना प्रथम ' स्वराज्य संघा'च्या चिटणिसाचे काम दिले. पण लोकमान्यांच्या मृत्यूनंतर ' केसरी–मराठा ' पत्राच्या संपादकवर्गात ते समाविष्ट झाले. त्याच वेळी महात्मा गांधींची असहकारितेची चळवळ सुरू झाली. असहकारितेच्या चळवळीत तात्यासाहेब केळकर प्रारंभी प्रारंभी संपूर्णपणे समरस झाले, पण नंतर कौन्सिल-प्रवेश अन् कोर्ट-शाळा–कॉलेजांवरील बहिष्कार ह्या बाबतीत केळकरांचा महात्माजींशी तीव्र मतभेद झाला. नंतर केळकरांनी दास–सप्रू–जयकर ह्यांच्या सहकार्याने ' स्वराज्य पक्ष ' काढला आणि पुढे एकतीस साली केळकर काँग्रेस पक्षातून बाहेर पडून हिंदुमहासभेचे प्रतिनिधी म्हणून 'राऊंड टेबल कॉन्फरन्सला' गेले. तेव्हापासून गायकवाडवाड्याचा नि काँग्रेसचा संबंध तुटला. महात्माजींच्या राजकारणात बाबूराव जरी केळकरांप्रमाणे पुढारी म्हणून फारसे चमकले नसले तरी, १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत मिठाचा सत्याग्रह करून बाबूरावांनी तुरुंगवास पत्करला होता. केळकरांनी काँग्रेस सोडल्यानंतर गायकवाडवाड्यात साहजिकच काँग्रेसविरोधी वातावरण निर्माण झाले. केळकरांच्याभोवती कट्टर गांधीविरोधकांचा गराडा पडला. तथापि, असे असूनही त्या गराड्यात बाबूराव गोखल्यांचे मन कधीही रमले नाही. बाबूराव हे गांधीवादी कधीच नव्हते. ते ज्वलज्जहाल राष्ट्रवादी होते. म्हणून गांधींच्या तत्त्वज्ञानाशी ते कधीच

समरस झाले नाहीत. असे असूनही गांधीजींच्या नेतृत्वाखेरीज देशाला स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे अशी त्यांची मनोमन श्रद्धा होती. ह्यामुळे केळकरांशी त्यांचे अनेकदा मतभेद निर्माण झाले. तथापि, असे असले तरी 'केसरी' संस्थेशी त्यांची असलेली निष्ठा तिळमात्र कधी ढळली नाही. ह्यातच बाबूरावांचे खरे मोठेपण होते.

राजकारणात कितीही मतभेद निर्माण झाले तरी त्याचे पर्यवसान एकमेकांची जन्मभर तोंडे न पाहण्यातच झाले पाहिजे ही जी महाराष्ट्रातल्या राजकीय पुढाऱ्यांमध्ये सर्वसाधारण प्रवृत्ती आढळून येते, तिला बाबूराव हे एक ओजस्वी अपवाद होते असे म्हटले पाहिजे. 'केसरी-मराठा' संस्थेची त्यांनी आमरण एकनिष्ठपणाने सेवा केली. 'केसरी' नि 'मराठा' पत्राचे ते कित्येक वर्षे संपादकही पण होते. पण केसरी-मराठा संस्थेच्या चालकांच्या राजकीय धोरणाशी ते संपूर्णतया कधीही समरस न होऊ शकल्यामुळे संस्थेच्या संचालन-मंडळात त्यांचा शेवटपर्यंत कधीही समावेश होऊ शकला नाही. बाबूरावांचे संपादकीय लेखन तसे प्रभावीपणे कधीच चमकले नाही. तथापि, संपादकाच्या अंगी लागणारे इतर सर्व गुण प्रकर्षाने त्यांच्या अंगी वास्तव्य करून होते. बाबूरावांचे सर्व सामर्थ्य त्यांच्या वक्तृत्वात होते. पीळदार शरीर, भरदार आवाज, आवेशयुक्त शैली आणि सर्वसामान्यतः जहाल विचारसरणी ह्या गुणांमुळे बाबूराव आपल्या पहिल्या वाक्यापासून तो शेवटपर्यंत श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असत. त्यांच्या ऐन जवानीतील अनेक तेजस्वी व्याख्याने आम्ही कानांनी ऐकलेली असल्याने आमच्या मनावर त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाची जी छाप पडलेली आहे ती अविस्मरणीय आहे.

राजकारणाखेरीज पुण्याच्या सार्वजनिक जीवनाच्या अनेक क्षेत्रांत ते पुष्कळ वर्षेपर्यंत प्रामुख्याने वावरलेले आहेत. एवढे असून कोणत्याही वादाच्या वावटळीत कधीही ते सापडल्याचे आम्हांला आठवत नाही. उभय पक्षांचे म्हणणे शांतपणे ऐकून त्यांशी तडजोड घडवून आणण्याच्या बाबतीत बाबूरावांचा विलक्षण हातखंडा होता. १९४४ साली सोलापूरच्या मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष-स्थान त्यांनी भूषविले होते. त्या प्रसंगी त्यांनी केलेले मार्मिक आणि मुद्देसूद भाषण अद्याप आमच्या स्मरणात आहे. महाराष्ट्रातल्या श्रमिक पत्रकारांची संघटना बांधण्याच्या कामी त्यांनी फार मोठा पुढाकार घेतला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बाबूरावांनी स्वतः जरी प्रत्यक्ष असा भाग घेतला नसला



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ....................

तरी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला अगदी प्रारंभापासून त्यांचा पाठिंबा होता. बेळगावच्या साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राचा ठराव आम्ही मांडला नि त्या ठरावानुसार जेव्हा शंकरराव देवांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाली तेव्हा त्या परिषदेच्या कार्यकारिणीचे बाबूराव हे पहिल्यापासून सदस्य होते.

अलीकडे कित्येक वर्षे वार्धक्यामुळे सार्वजनिक जीवनातील बाबूरावांची भूमिका ही रसिक प्रेक्षकाची होती. आपल्याला ज्या गोष्टी आवडतील त्या पाहून आनंद मानावा आणि ज्या आवडत नाहीत त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे अशी त्यांची वृत्ती असे. राजकारणात वा सार्वजनिक जीवनात तसा त्यांचा नि आमचा संबंध फारसा आला नसला, तरी जेव्हा जेव्हा आम्ही भेटत असू तेव्हा तेव्हा ते आम्हांला आमच्या कार्यात अगदी मनमोकळेपणाने उत्तेजन दिल्यावाचून कधीही राहात नसत. त्यांच्याजवळ आडपडदा म्हणून तो कसा नसे. मनाला वाटेल ते अगदी सरळ शब्दांत पण दुसऱ्याला न दुखवता, हसत खेळत सांगण्याची त्यांच्याजवळ विलक्षण हातोटी असे. गंभीर किंवा रडक्या चेहऱ्याच्या बाबूरावांना पाहिल्याचे कधीच कोणाला आठवत नसेल. पहिलवानासारखे खांदे डुलवत बाबूराव हसतमुखाने समोरून आले की त्यांच्या दर्शनाने मनाला अगदी समाधान वाटे. खळखळून त्यांच्याशी बोलावे नि पोटभर गप्पा मारून घ्याव्यात असा मनाला मोह झाल्यावाचून राहात नसे. पुण्याच्या राजकीय आणि सार्वजनिक जीवनात इतका निकोप आणि निर्लेप स्वभावाचा, इतका खणखणीत आणि खेळाडू वृत्तीचा आणि एवढ्या स्थिर चारित्र्याचा नि प्रखर निष्ठेचा पुढारी आजपर्यंत क्वचितच होऊन गेला असेल. म्हणून बाबूराव गोखल्यांच्या परिचयात येण्याचे भाग्य ज्यांना लाभले असेल त्यांना त्यांच्या मृत्यूचे दुःख जाणवल्याखेरीज राहणार नाही.

( मराठा : ११–४–१९६२ )

२७

# न्यायमूर्ती तेंडोलकर

मुंबई हायकोर्टाचे एक ज्येष्ठ आणि लोकप्रिय न्यायाधीश शामराव रघुनाथ तेंडोलकर ह्यांचे काल रोजी अकाल अवसान झाले हे कळविताना आम्हांस अत्यंत दुःख होत आहे. प्रभावी जीवनकार्य पूर्ण होण्याआधीच ज्यांच्या तेजस्वी आयुष्याची दोरी मधेच आकस्मिक तुटली, असे अलीकडच्या काळात पुरुषोत्तम मंगेश लाड ह्यांच्यानंतर न्या. तेंडोलकर हेच महाराष्ट्राचे दुसरे कर्तबगार सुपुत्र होत. न्या. तेंडोलकर ह्यांची आणि आमची अनेक वर्षांची मैत्री होती. बारा वर्षांपूर्वी न्यायासनावर त्यांची प्रतिष्ठापना होण्यापूर्वी एक अत्यंत यशस्वी आणि बुद्धिमान बॅरिस्टर म्हणून त्यांनी फार मोठा लौकिक मिळविला होता. त्याच नात्याने त्यांचा आणि आमचा प्रथम परिचय झाला. इंग्रजी भाषेवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. त्यांच्या वक्तृत्वाची धार आणि झपाटा डोळे दिपवून टाकील अशा तऱ्हेचा होता. आपल्या प्रतिपक्षाची दाणादाण करून टाकण्यात ते फार कुशल होते. मुंबई हायकोर्टात काम करणाऱ्या बॅरिस्टरांत त्यांच्या गुणाची आणि दर्जाची फारच थोडी माणसे होती, त्यामुळे ते कोर्टात उभे राहिले की, सर्वांच्या आकर्षणाचा आणि कौतुकाचा एकदम विषय होऊन जात. म्हणून मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश होण्याचा मान जेव्हा त्यांना प्रथम लाभला तेव्हा त्यांच्या नेमणुकीबद्दल सर्वांना अगदी मनापासून हर्ष झाला. योग्य जागेवर योग्य माणूस निवडला गेला असेच सर्वांच्या तोंडून त्या वेळी उद्गार निघाले.

गेल्या बारा वर्षांत मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती म्हणून त्यांनी अपरंपार लोकप्रियता मिळविली. आम्ही कधी जेव्हा हायकोर्टात जात असू तेव्हा न्या. तेंडोलकरांच्या कोर्टात काही वेळ तरी जाऊन बसल्याखेरीज आम्हाला बरेच वाटत नसे. त्यांच्या कोर्टात बसून त्यांचे कामकाज पाहण्यात आम्हाला अतिशय आनंद वाटत असे. विलक्षण तरुण आणि तजेलदार चेहरा, प्रभावी नि पाणीदार डोळे, आणि त्यांच्या मस्तकावर शोभिवंत दिसणारी महाराष्ट्रीय पगडी ह्यामुळे न्या. तेंडोलकरांचे व्यक्तिमत्त्व पाहणारांच्या मनावर एकदम छाप पाडीत असे. त्यांचा बांगडीसारखा खणखणीत आवाज आणि त्यांच्या मुखातून अखंड वाहणारी रसवंती कानी पडताच मनाला अतिशय समाधान आणि आनंद वाटत असे. एखाद्या खटल्याचा निकाल जेव्हा ते कोर्टामधे तोंडाने सांगत असत तेव्हा त्यांचे ते प्रकटन तल्लीनतेने ऐकत बसावे असे वाटे. त्यांच्यापुढे काम करणाऱ्या वकिलांची त्यांच्या प्रश्नांच्या माऱ्यापुढे कशी त्रेधा आणि तिरपीट उडे हे अनेक वेळीं आम्ही डोळ्यांनी पाहिले आहे.

एवढेही असून त्यांचा स्वभाव अत्यंत गोड, प्रेमळ आणि आनंदी असे. सदैव हसतमुख असलेली त्यांची मुद्रा अविस्मरणीय होती. कायद्याचे त्यांचे ज्ञान जितके गाढ तितकीच न्यायावरील त्यांची निष्ठा अढळ, त्यामुळे न्या. तेंडोलकरांच्या हातून चुकूनसुद्धा अन्याय होणार नाही, असा लोकांना विश्वास वाटे. स्वातंत्र्य आल्यानंतर काँग्रेसने आपल्या सत्तेच्या जोरावर वाटेल तसे कायदे केले. ह्या कायद्यात नाना तऱ्हेचे दोष राहून गेले. अशा कायद्यांचा प्रश्न न्या. तेंडोलकरांच्या कोर्टामधे जेव्हा जेव्हा उत्पन्न होई, तेव्हा काँग्रेस सरकारच्या रागालोभाची परवा न करता त्यांच्या कायद्याचे वाभाडे उडविण्यात न्या. तेंडोलकरांचा कोणीही हात धरणारा नव्हता. काही वर्षांपूर्वी दारुबंदीच्या कायद्याविरुद्ध काही आक्षेप उपस्थित करण्यात आले होते. त्या वेळी सरकारी वकिलांची न्या. तेंडोलकरांनी अशी काही भंबेरी उडवली होती की, काही विचारू नका. त्या वेळी त्यांनी जो निर्णय दिला, त्याने काँग्रेस सरकारच्या डोक्यावरची पगडी शाबूत राहिली, पण त्याचे धोतर मात्र हिसकावून घेतले. दारुबंदीच्या कायद्यांची इतकी फजिती कोणी केली नसेल!

गरिबांविषयी आणि कामगारांविषयी त्यांना विलक्षण अनुकंपा वाटे. त्यामुळे मालक विरुद्ध नोकर अशा स्वरूपाचा खटला त्यांच्यापुढे आला म्हणजे त्यांचा निकाल हमखास मालकांच्या विरुद्ध लागावयाचा हे ठरून गेल्यासारखे असे. ह्या

त्यांच्या निःपक्षपाती, बाणेदार आणि सडेतोड वर्तनामुळे ते जनतेचे जेवढे आवडते होते, तेवढेच सरकारच्या डोळ्यांत सलत असत. सरकारच्या रागा-लोभाची पर्वा न करता न्यायमंदिराचे पावित्र्य आणि स्वातंत्र्य अकलंकित ठेवण्याची जी महान परंपरा मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती छगला ह्यांनी मुंबई राज्यात निर्माण केली आहे, तिच्यात न्या. तेंडोलकरांचा फार मोठा वाटा आहे. लोकशाही जर ह्या देशात यशस्वी व्हावयाची असेल तर न्यायदेवता सरकारची मिंधी होता कामा नये, ह्या गोष्टीवर न्या. छगलांप्रमाणेच न्या. तेंडोलकर ह्यांचा विश्वास होता. त्यामुळेच मुंबई राज्यात लोकशाहीची काही तरी वूज आणि प्रतिष्ठा राहिली. नाही तर पक्षपाती काँग्रेस सरकारने सत्तेच्या सामर्थ्यावर लोकशाहीचा स्वाहाकार करून टाकला असता. न्या. तेंडोलकर ह्यांच्या न्यायप्रियतेइतकीच त्यांची खेळाडू वृत्तीही सुप्रसिद्ध होती. निरनिराळ्या खेळांची त्यांना विलक्षण आवड असे. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे, इतिहासाचे आणि परंपरेचे ते कट्टर अभिमानी होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याबद्दल त्यांना फार मोठी सहानुभूती वाटे. अधूनमधून आमच्या कार्याचे कौतुक करावयाला ते कधी चुकत नसत. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे न्यायमूर्ती रानडे किंवा न्यायमूर्ती तेलंग ह्यांच्या परंपरेतला महाराष्ट्रामधला एक थोर न्यायमूर्ती नाहीसा झालेला आहे. असा बाणेदार, आनंदी आणि देखणा पुरुष तर पुन्हा क्वचितच दृष्टीस पडेल. आमच्या असंख्य वाचकांच्या वतीने त्यांच्या चरणी अश्रुपूर्ण नेत्रांनी आम्ही ही श्रद्धांजली अर्पण करतो.

(मराठा : २८-३-१९५८)

२८

## न्यायमूर्ती बावडेकर

फार वाईट झाले. बावडेकर गेले. कोणाला कल्पना तरी होती का, की ते अशा रीतीने जातील? कविकुलगुरूंनी म्हटले आहे की, "मरणं प्रकृतिः शरीरिणाम्। विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः" मरण ही मनुष्याची प्रकृती आहे. जीवन हीच मुळी विकृती आहे. हे अशा प्रसंगी अगदी खरे वाटू लागते.

बावडेकर हे आमचे समकालीन. आम्ही त्यांना अनेक वर्षांपासून ओळखतो. कोल्हापूरचे राहणारे. घरची अत्यंत गरिबी. अशा परिस्थितीत लोकांकडून आर्थिक साहाय्य घेऊन ते विलायतेला गेले, आणि आपल्या तेजस्वी बुद्धि-सामर्थ्यावर आय. सी. एस. होऊन आले. सेवानिवृत्त होण्यापूर्वी शेवटची अकरा वर्षे ते हायकोर्टाचे न्यायाधीश होते. निःपक्षपाती न्यायदान करण्याबद्दल त्यांचा लौकिक मोठा होता. एखादी बाजू त्यांना पटली म्हणजे मग तिच्या बाजूने ते निर्भयपणे निर्णय देत असत, असे त्यांना जाणणारे त्यांचे अनेक मित्र सांगतात.

पानशेत-खडकवासला धरण स्फोटाची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने २४ ऑगस्टला त्यांची नेमणूक केली, तेव्हापासून एकदम त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. पानशेत धरणाची पहिल्या प्रथम पाहणी करण्यासाठी प्रत्यक्ष जागेवर जेव्हा ते गेले, तेव्हा तेथेच त्यांची आणि आमची पहिली नि शेवटची गाठ पडली. त्या वेळी त्यांचे अन् आमचे जे थोडेसे संभाषण झाले त्यावरून त्यांची अवलोकनाची आणि अनुमाने काढण्याची पद्धती आम्हांस विशेष कौतुकास्पद वाटली. तथापि, त्यांच्या कमिशनच्या कामाला जेव्हा मुंबईमध्ये प्रारंभ झाला

तेव्हा त्यांच्यापुढे पुण्याच्या पूरग्रस्तांची बाजू मांडण्याला त्यांनी समितीला वा पुण्याच्या वकीलमंडळाला परवानगी दिली नाही हे योग्य झाले नाही असे आम्हांला वाटले. त्यानंतर ६ ऑक्टोबरला पुण्याच्या अडीचशे पूरग्रस्तांतर्फे कमिशनपुढे वकिलातर्फे बाजू मांडण्याची परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. मध्यंतरी महाराष्ट्र सरकारच्या पाटबंधारे खात्याच्या आणि पुण्याच्या चार स्थानिक अधिकाऱ्यांच्या संरक्षणार्थ वकिलांची सरकारतर्फे नेमणूक करण्यात आली. ज्याअर्थी सरकारच्या संबंधित खात्याला किंवा अधिकाऱ्यांना आपापले वकील कमिशनपुढे देण्याची परवानगी देण्यात आली होती, त्याअर्थी पूरग्रस्त जनतेलाही आपली बाजू वकिलांमार्फत मांडावयाला परवानगी मिळणे हे सर्वस्वी न्यायास धरून होते. पण त्या बाबतीत कमिशन काय बाजू घेणार हे कळणे दुरापास्त होते. पण जर का बावडेकर कमिशनने जनतेची ती मागणी अमान्य केली असती तर मग ह्या कमिशनवर बहिष्कार टाकण्यावाचून समितीला दुसरा मार्गच राहिला नसता.

बावडेकरांना हे माहीत नव्हते असे कसे म्हणता येईल ? धरणस्फोटाबद्दल आपण मुळीच जबाबदार नसून स्थानिक अधिकाऱ्यांनी जनतेला धरणस्फोटाचा आगाऊ इशारा वेळीच देऊन ठेवलेला होता—अशी धादांत खोटी भूमिका महाराष्ट्र सरकारने घेतलेली होती, आणि तत्संबंधी बनावट पुरावा जमविण्याचे कामही पुण्यातल्या पोलीस अधिकाऱ्यांनी सुरू केले होते. त्याबाबत चहूकडे झालेला गवगवाही बावडेकरांच्या कानावर गेला असला पाहिजे! पानशेताबाबत महाराष्ट्र सरकारची भूमिका आणि पुण्यातील पूरग्रस्त जनतेची भूमिका ह्यात जमीनअस्मानाचे अंतर आहे ही गोष्ट जगजाहीर आहे. उभयतांमधला हा विरोध दिवसेंदिवस अधिकच विकोपाला जाण्याचा रंग दिसत होता. अशा परिस्थितीत निःपक्षपाती दृष्टी ठेवून चौकशी करणे आणि न्यायाचा काटा समतोल राखणे ही गोष्ट किती कठीण आहे याची कल्पना कोणालाही करता येण्यासारखी आहे. जे कार्य आपण हाती घेतले आहे त्याची जबाबदारी केवढी भयंकर आहे ह्याची पूर्ण जाणीव बावडेकरांना होती आणि ही जबाबदारी मध्येच अर्धवट सोडून माघार घेण्याचा भ्याडपणा त्यांच्यासारखा कर्तव्यनिष्ठ आणि न्यायप्रिय माणूस कधीही करणार नाही.

असे असता दि. १३ आक्टोबरला ( म्हणजे मरणापूर्वी बरोबर सात दिवस ) त्यांनी आपल्या कमिशनच्या अध्यक्षपदाचा राजीनामा महाराष्ट्र सरकारचे मुख्य

सचीव श्री. एन. टी. मोने ह्यांना सादर केला होता. मात्र प्रकृतीचे अस्वास्थ्य हे त्यांच्या राजीनाम्याचे कारण मुळीच नव्हते असे अत्यंत खळबळजनक निवेदन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी काल पत्रकारांपुढे केले आहे, ते पाहता ह्या सर्व प्रकरणाच्या मागे सकृद्दर्शनी वाटते त्यापेक्षा फारच गहन आणि विलक्षण राजकारण शिजत असले पाहिजे हे उघडच आहे. आज सारे महाराष्ट्र बावडे-करांच्या पानशेत चौकशी कमिशनकडे डोळे लावून बसले असताना, त्यांनी आपल्या चौकशीचे काम सुरू होण्यापूर्वी एकाएकी आपल्या जागेचा राजीनामा सरकारकडे द्यावा याचे कारण काय? ह्याचे कारण काही तरी अत्यंत गंभीर स्वरूपाचे असले पाहिजे? ते महाराष्ट्र सरकारने जनतेपुढे मोकळेपणे मांडले पाहिजे. ते जाणून घेण्याचा जनतेला हक्क आहे. यशवंतराव चव्हाण म्हणतात की, ते कारण बावडेकरांच्या हाताखाली काम करणाऱ्या त्यांच्या ऑफिसशी निगडित आहे, आणि त्या कामाची ते स्वतः जातीने चौकशी करणार होते. यावरून पानशेत-खडकवासला धरणस्फोट चौकशी कमिशनच्या ऑफिसात बावडेकरांच्या मागे काही तरी भानगडी शिजत असल्या पाहिजेत आणि त्यांचा उबग येऊन त्यांनी आपल्या जागेचा राजीनामा सादर केला असला पाहिजे, हे उघड आहे. यांपैकी काही गोष्टी आम्हांला समजल्या आहेत; पण त्या आम्ही उघड करीत नाही.

पण राजीनामा दिल्यानंतर दि. १४ रोजी म्हणजे शनिवारी जवळजवळ बारा ते चौदा तास सतत त्यांची चर्चा मुख्य सचीव एन. टी. मोने ह्यांच्या बरोबर चालली होती असे आम्हांला समजते. त्यावरून ऑफिसमध्ये जे काही प्रकार घडले ते गंभीर स्वरूपाचे असले पाहिजेत हे उघडच आहे. स्वतःच्या ऑफिसात चाललेले प्रकार असह्य होऊन त्यांनी राजीनामा दिला, तो राजीनामा महाराष्ट्र सरकारने परवापर्यंत मान्य केला नाही. त्याचा बावडेकरांच्या मनावर विलक्षण ताण पडून त्याचे पर्यवसान तर त्यांच्या मृत्यूत झाले नसेल ना, असा साहजिकच मनात विचार आल्यावाचून राहात नाही.

बावडेकर डोक्यावर न पडता पायावर पडले, ज्या गॅलरीतून किंवा खिडकी-तून ते पडले असे म्हणतात त्याचा कठडा उंच आहे, ह्या सर्व गोष्टी लक्षात घेतल्यानंतर गैरशुद्धीत ते वरून पडले ही गोष्ट सहसा कोणालाही पटण्यासारखी नाही. त्यातून मृत्यूपूर्वी आपल्या ऑफिसातील प्रकार असह्य झाल्यामुळे त्यांनी आपल्या थोर पदाचा राजीनामा दिला होता. तथापि, तो महाराष्ट्र सरकारने

स्वीकारावा किंवा न स्वीकारावा याबद्दल उभयतांत वाद चालू होता ही पार्श्व-भूमी लक्षात घेतली म्हणजे तर त्यांचा मृत्यू अपघाती असावा या तर्काचा पायाच मुळीं डळमळीत होतो. म्हणून महाराष्ट्र सरकारने याबाबत लोकांना विश्वासात घेऊन सर्व गोष्टी स्पष्टपणे सांगितल्या पाहिजेत आणि बावडेकरांसारखा बुद्धिमान, तेजस्वी आणि न्यायनिपुण मनुष्य ज्या चमत्कारिक परिस्थितीत मरण पावला तिजवर प्रकाश टाकून लोकांच्या मनातील संशयाचे ताबडतोब निराकरण केले पाहिजे.

( मराठा : २१–१०–१९६१ )

२९

# कै. प्रिं. एम्. टी. व्यास

भारतातील एक महान शिक्षणतज्ज्ञ, मुंबईतल्या सुविख्यात 'न्यू इरा स्कूल'चे संस्थापक नि संचालक आणि आमचे चाळीस वर्षांचे परममित्र प्रिं. मगनलाल त्रिभुवनदास व्यास, एम्. ए. (लंडन) हे दीर्घ आजारानंतर वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी दि. १३ डिसेंबर रोजी मुंबई येथे आपल्या ह्यूजीस रोडवरील निवासस्थानी निधन पावले, हे कळविताना आम्हांला अत्यंत दुःख होते.

प्रिं. व्यास ह्यांचा जन्म भरोज जिल्ह्यातल्या अविधा ह्या गावी झाला. लंडनहून शिक्षणशास्त्रातले एम्. ए., टी. डी. होऊन परत आल्यानंतर १९२५ साली त्यांनी 'फेलोशिप स्कूल'ची स्थापना केली. ते स्वतः 'थिऑसॉफिस्ट' असल्याने, त्या शाळेत त्यांनी संपूर्ण ध्येयवादी वातावरण निर्माण केले. 'नवीन शिक्षणा'चे अनेक प्रयोग त्यांनी त्या शाळेत सुरू केले. त्यामुळे बाजारी आणि वकाली शाळांनी बुजबुजलेल्या मुंबईसारख्या शहरात त्यांच्या त्या शाळेला एक प्रकारचे वेगळे वैशिष्ट्य प्राप्त झाले आणि प्रिं. व्यास ह्यांनी मुंबईतल्या शिक्षणतज्ज्ञांचे लक्ष आपल्याकडे तात्काळ खेचून घेतले. ह्याच सुमारास आमची नि प्रिं. व्यास ह्यांची ओळख झाली, आणि त्यांचाच आदर्श पुढे ठेवून आम्ही शिक्षणशास्त्राचा अभ्यास करावयाला १९२७ साली इंग्लंडला गेलो. त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांनी गोवालिया मैदानाच्या बाजूला 'न्यू इरा स्कूल'ची स्थापना केली. पोर्वात्य आणि पाश्चात्य सांस्कृतिक मूल्यांचे आंतरराष्ट्रीय

आकलन व्हावे म्हणून 'यूनेस्को'ने जो महान शैक्षणिक संकल्प अंगिकारलेला आहे, त्याच्या प्रयोगासाठी भारतामधल्या ज्या तेरा शाळांना मान्यता मिळालेली आहे त्यांत प्रिं. व्यास ह्यांच्या 'न्यू इरा स्कूल'चा समावेश करण्यात आलेला आहे, ह्यावरून त्या शाळेला केवढे आंतरराष्ट्रीय महत्त्व प्रिं. व्यासांनी थोड्या अवकाशात प्राप्त करून दिलेले आहे, हे लक्षात येईल. ह्यूजीस रोडवर ह्या शाळेची स्वतःच्या मालकीची टोलेजंग इमारत आहे. शिक्षणामध्ये संस्कृती आणि ध्येयवाद ह्यांचा सुंदर समन्वय झाला पाहिजे हे प्रिं. व्यास ह्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे ब्रीदवाक्य होते.

१९३१–३२ साली आम्ही स्वतः 'न्यू इरा स्कूल'मध्ये तीन महिने राहात होतो. त्या वेळी आम्ही, प्रिं. व्यास आणि सध्यांचे गुजरात विश्वविद्यालयाचे उपकुलगुरू लालभाई देसाई अशा तिघांनी मिसळून 'नवयुग वाचनमाला' लिहून तयार केली. आम्ही मराठीत लिहिली. व्यास–देसाईंनी गुजरातीत लिहिली. मराठीप्रमाणे गुजराती 'नवयुग वाचनमाला' गुजरातमध्ये जवळ जवळ तीस वर्षे अतिशय लोकप्रिय होती.

प्रिं. व्यास ह्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय आकर्षक होते. नम्रता, प्रसन्नता आणि सौम्यता ह्यांचे अत्यंत आकर्षक तेज त्यांच्या गौर मुखावर पौर्णिमेच्या चांदण्यासारखे पसरलेले असे. त्यामुळे त्यांच्या परिचयात आणि परिसरात आलेला कोणताही माणूस एखाद्या लोहचुंबकाप्रमाणे त्यांच्याकडे आकर्षित होत असे. चौवीस तास अन् वर्षोनुवर्षे शिक्षणाखेरीज दुसऱ्या कोणल्याही गोष्टीचा त्यांनी विचार केला नाही आणि दुसऱ्या कोणत्याही कार्याकडे लक्ष वळविले नाही. शिक्षणाखेरीज त्यांना दुसऱ्या कोणत्याही विषयात रस नव्हता. शिक्षण हाच त्यांचा श्वास आणि शिक्षण हाच त्यांचा निःश्वास होता. शैक्षणिक क्षेत्रात अनेक सृजनात्मक आणि पुरोगामी प्रयोग करून त्यांनी 'नवशिक्षणा'चा सारा ध्येयवाद भारतीय शिक्षणात आणून सोडला. त्यांची ही मौलिक स्वरूपाची शैक्षणिक कामगिरी लक्षात घेऊन केंद्र सरकारने 'पद्मश्री' हा किताब त्यांना दिला.

प्रिं. व्यास ह्यांना कंटाळा हा शब्द आयुष्यात माहीत नव्हता. कामाचे डोंगरच्या डोंगर त्यांनी आयुष्यात उपसले. स्वतःच्या शाळेखेरीज अठ्ठावीस शैक्षणिक संस्थांत किंवा समितींत ते अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य आहेत. त्या सर्वांची नावेसुद्धा येथे सांगता येणे शक्य नाही. १९५२ मध्ये भारत सरकारने जे सेकंडरी एज्युकेशन कमिशन नेमले त्याचे ते सदस्य होते. मुंबई



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथक्रम
अनुक्रम........................ दि: ......................

राज्याच्या सेकंडरी एज्युकेशन बोर्डाचे व मुंबईच्या हेडमास्तर संघटनेचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाइडस्चे ते कित्येक वर्षे प्रमुख होते. अशी केवढी तरी त्यांच्या कार्याची यादी देता येईल. मुंबई, पुणे आणि बडोदा येथील विश्वविद्यालयांतील एम. एड.साठी लिहिलेल्या निबंधांचे ते अनेक वर्षे परीक्षक होते. प्रिं. व्यास ह्यांनी शैक्षणिक कार्याच्या निमित्ताने अमेरिका, इंग्लंड, रशिया, जपान आणि चीन ह्या देशांतून प्रवास केलेला होता. चीनला त्यांच्याच नेतृत्वाखाली भारतामधून एक सांस्कृतिक मंडळ पाठविण्यात आलेले होते. रशियामधल्या दुय्यम शिक्षणाचा अभ्यास करण्यासाठी जे एक शैक्षणिक मंडळ पाठविण्यात आले होते, त्याचे तेच नेते होते. १९६४ मध्ये न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीने भारतीय शिक्षणतज्ज्ञांचे जे शिष्टमंडळ बोलावलेले होते त्याचे प्रमुख प्रिं. व्यासच होते. अशा रीतीने शैक्षणिक भूमिकेवर भारताचा संबंध जगातल्या मोठमोठ्या देशांशी यावा यासाठी भारताने जे आंतरराष्ट्रीय प्रयत्न केले त्याचे अनेकदा नेतृत्व प्रिं. व्यास ह्यांनाच देण्यात आले होते.

त्यांच्या पत्नी सरोजबेन व्यास ह्या बालशिक्षणाच्या तज्ज्ञ आहेत. त्यांनी बालमानसशास्त्राचा अभ्यास डॉ. मारी मॉन्टेसोरी ह्यांच्या हाताखाली केला. त्याही एका शैक्षणिक शिष्टमंडळाबरोबर रशियाला गेलेल्या होत्या. आपल्या पतीच्या जीवनाशी नि कार्याशी त्या इतक्या समरस झालेल्या होत्या की, शिक्षणक्षेत्रात असे आदर्श दांपत्य सहसा पाहावयाला मिळणार नाही. त्यांची ज्येष्ठ कन्या डॉ. उषा ही एम. डी. आहे आणि धाकटी इला ही एम. ए. असून चित्रकार आहे. प्रिं. व्यास ह्यांनी आपल्या हयातीत आपल्या 'न्यू इरा स्कूल'ची सूत्रे आपले पुतणे डॉ. कांतिलाल व्यास, एम. ए., पीच. डी. यांच्याकडे सोपविली होती. त्यांनीही अमेरिकेला जाऊन शिक्षणशास्त्राची पदवी संपादन केलेली आहे. प्रिं. व्यास ह्यांच्या कुटुंबाशी, त्यांच्या सहकाऱ्यांशी आणि त्यांच्या परिवारातील अनेकांशी आमचा स्वतःचा अनेक वर्षांपासून इतका घनिष्ठ संबंध होता, की त्यांच्या मृत्यूने जणू काही आमच्या कुटुंबातलाच एखादा वडिलधारा पुरुष जावा असे दुःख आम्हांला होत आहे. प्रभावी व्यक्तिमत्त्व, आदर्श चारित्र्य, महान ध्येयनिष्ठा आणि प्रखर तपश्चर्या ह्यांचा विरळा समन्वय प्रिं. व्यास ह्यांच्या ठिकाणी झाल्याने, त्यांच्या मृत्यूने भारतातील एक अलौकिक शिक्षणतज्ज्ञ गेला असेच अत्यंत जड अंतःकरणाने म्हणावे लागेल!

(मराठा : १६-१२-१९६५)

३०

## वृत्तपत्रांचे इतिहासकर्ते

महाराष्ट्रातले एक अत्यंत विद्वान नि व्यासंगी इतिहासज्ञ आणि आमचे प्रिय मित्र श्री. वि. कृ. जोशी यांचे गेल्या शनिवारी रात्री निधन झाल्याची वार्ता ऐकून आम्हांला मनस्वी दुःख झाले. श्री. जोशी यांचे वय पासष्ट वर्षांचे जरी होते तरी प्रकृतीने ते तरतरीत होते. अजूनही तासन् तास कामाचा व्याप उरकण्याचे सामर्थ्य नि उत्साह त्यांच्या अंगी होता. म्हणून गेले काही दिवस ते कल्याणजवळील शहाद येथे आपल्या चिरंजिवांच्या घरी दम्याच्या विकाराने आजारी असल्याचे आम्हांला जरी कळले होते, तरी तो आजार अखेरचाच असेल याची आम्हांला पुसटशी कल्पनाही नव्हती. यामुळे ते हे जग सोडून गेल्याची वार्ता अकस्मात आमच्या कानांवर आदळताच आम्हांला धक्काच बसला.

श्री. जोशी यांच्या निधनाला अधिकच शोचनीय स्वरूप प्राप्त करून देणारी एक वस्तुस्थिती ही आहे की, त्यांच्या मृत्यूमुळे महाराष्ट्रातील विद्वज्जनांच्या मालिकेतले केवढे तेजस्वी रत्न हरपले आहे याची कल्पनाही फार थोड्यांना असेल. संपत्ती, मानपान अथवा प्रसिद्धी यांसारख्या स्वार्थी हेतूंची हाव न बाळगता, केवळ ज्ञान मिळविण्याच्या आणि देण्याच्या निर्भेळ ब्रह्मानंदात निमग्न होणारी जी काही विद्यासंपन्न, बहुश्रुत नि अभ्यासू, पण त्यांच्या थोर पात्रतेच्या मानाने उपेक्षित, अशी माणसे या महाराष्ट्रात आहेत अथवा होऊन गेली, त्यांच्यामधे श्री. वि. कृ. जोशी यांची गणना प्रामुख्याने करावयाला हवी. श्री. जोशी

यांच्या आयुष्याचा बहुतेक भाग पूर्वीच्या मुंबई राज्य सरकारच्या आणि आताच्या महाराष्ट्र राज्य सरकारच्या दप्तरखान्यात नोकरी करण्यामधे खर्च झाला. ब्रिटिश राजवटीत मुंबई इलाखा स्थापन झाल्या काळापासूनची सरकारी कागदपत्रे दप्तरात व्यवस्थित सांभाळून ठेवणे, त्यांची तपशीलवार नोंद ठेवणे आणि कुणाला त्यातील काही कागदपत्रे लागल्यास ती काढून देणे नि काम संपल्यावर परत ठेवणे, असे वर वर अत्यंत किचकट नि यांत्रिक काम त्यांच्याकडे होते. पण या कागदपत्रांमधे, गेल्या जवळ जवळ एका शतकाच्या काळात महाराष्ट्रामधे आणि राष्ट्रामधे झालेल्या विराट उलथापालथींचा जो रोमहर्षक इतिहास दडलेला आहे, तो कुणाही खऱ्याखुऱ्या ज्ञानपिपासू नि जिज्ञासू वृत्तीच्या माणसाला संशोधनाचे आव्हान देणाराच आहे. श्री. जोशी यांनी केवळ पोटभरू पेशा म्हणून यांत्रिकपणे फाईलींची हालवाहलव न करता, हे आव्हान स्वीकारले. या संशोधनासाठी त्यांनी ' वृत्तपत्रांचा इतिहास ' हा नेहमीच्या चाकोरीबाहेरचा विषय निवडला.

हा विषय त्यांना कसा सुचला याची हकीगत मोठी मनोरंजक आहे. एके दिवशी मार्गारिटा बार्न नावाची ब्रिटिश लेखिका त्यांच्या दप्तरखान्यात आली. तिला ' भारतातील वृत्तपत्रे ' हा ग्रंथ लिहिण्यासाठी काही माहिती हवी होती. तिला त्या विषयासंबंधीची कागदपत्रे दाखविताना श्री. जोशी यांच्या डोक्यात विचार चमकला की, एक परदेशी स्त्री भारतामधल्या वृत्तपत्रांची माहिती मिळविण्यासाठी एवढा आटापीटा करते आणि ती ज्या ज्ञानसागरातले कण हस्तगत करण्यासाठी येथपर्यंत येते, त्या ज्ञानसागरात आपण सतत डुंबत असूनही कोरडेच राहतो, हे काही बरे नव्हे. कल्पना मनात येण्याचा अवकाश, श्री. जोशी लगेच या देशातील वृत्तपत्रांचा इतिहास लिहिण्याच्या कामाला कंबर कसून लागले. यासाठी केवळ दप्तरखान्यातील कागदपत्रांवरच ते विसंबून राहिले नाहीत, तर अमर्याद प्रयास करून, मिळेल तेथून त्यांनी याविषयीची साधन-सामग्री हस्तगत केली. जुनी दुर्मिळ वृत्तपत्रे अनेक खटपटी करून त्यांनी मिळविली. देशाच्या प्रांतोप्रांतातील आणि भिन्नभिन्न भाषांतील वृत्तपत्रव्यवसायाचा इतिहास आणि एकेका वृत्तपत्राची माहिती त्यांनी भगीरथ प्रयत्नांनी संकलित केली. ज्यासाठी वस्तुतः इतिहाससंशोधकांचा एक सर्वप्रांतीय संच आवश्यक भासावा, एवढे अजस्र कार्य या एका गृहस्थाने केवळ मूठभर व्यक्तींच्या साहाय्याने आणि सहकार्याने पार पाडले. एखाद्या दगडचुन्याच्या अस्ताव्यस्त ढिगाऱ्यातून कुणा कुशल शिल्पज्ञाने सुंदर मंदिर उभारावे त्याचप्रमाणे वरील

विस्कळीत माहितीच्या डोंगरातून त्यांनी 'वृत्तपत्रांचा इतिहास' या अजोड ग्रंथाची रचना केली.

हा ग्रंथ महाराष्ट्रातील इतिहास-संशोधन-कार्याचे एक भूषण आहे. त्यात १७८० पासून आजपर्यंतच्या वृत्तपत्रांची केवळ नामावळी आणि वृत्तपत्र-व्यवसायाच्या इतिहासातील महत्त्वाच्या घटनांची केवळ जंत्रीच नाही तर देशाच्या राजकारणात नि समाजकारणात या देशातील वृत्तपत्रांनी पार पाडलेल्या महान कामगिरीचे दर्शन करून देणारे माहितीपूर्ण नि विचारपूर्ण विवेचनही आहे. तसेच या देशात छापखाने सुरू झाल्यानंतर प्रकाशित होऊ लागलेल्या प्रचलित पद्धतीच्या वृत्तपत्रांचा इतिहास देऊनच श्री. जोशी थांबले नाहीत तर भारतामधे पुराणकालापासून वार्ता पोहोचवण्याच्या पद्धती काय होत्या, मोगल साम्राज्यात ठिकठिकाणच्या बातम्या सरकारला मिळण्याची काय व्यवस्था होती, पेशवाईतील राजकारणात वार्तापत्रांना काय स्थान होते, याचीही पार्श्वभूमी त्यांनी या ग्रंथात दिली आहे; आणि हे सर्व एवढ्या सुरेख भाषाशैलीने आणि राष्ट्राभिमानी बाण्याने त्यांनी वर्णन केले आहे की, हा ग्रंथ एकदा हाती घेतल्यावर तो पुरा वाचल्याशिवाय समाधान होत नाही. भारतातील लोकशाहीचा अभ्यास, त्या लोकशाहीचे एक अमोघ अस्त्र असलेल्या वृत्तपत्रांच्या परंपरेचा अभ्यास केल्याशिवाय पूर्ण होणे शक्य नाही आणि वृत्तपत्रांच्या परंपरेचा हा अभ्यास श्री. वि. कृ. जोशी यांचा ग्रंथ वाचल्याशिवाय पूर्ण होणे शक्य नाही, असे म्हणणे मुळीच अतिशयोक्तीचे नाही.

केवळ एवढा ग्रंथ लिहूनच श्री. जोशी थांबले असते तरी महाराष्ट्रातील इतिहाससंशोधनाच्या कार्यात महत्त्वाची भर घातल्याचे श्रेय त्यांना लाभले असते. पण या ग्रंथनिर्मितीच्या निमित्ताने त्यांना इतिहाससंशोधनाची एवढी 'चटक' लागली की, त्यांनी 'मराठी नाट्याचे मूळ' हे आणखी एक संशोधनात्मक पुस्तक मराठी रंगभूमीच्या अभ्यासकांना सादर केले. लावणी वाङ्मयातील प्रख्यात शाहीर हैबतीचे चरित्रही लिहून त्यांनी हातावेगळे केले. याशिवाय अनेक इतिहासग्रंथांना पुरेल एवढी माहिती त्यांच्या जिव्हाग्रावर नेहमी खेळत असे. ते जर अधिक जगते वाचते, तर महाराष्ट्रातील इतिहासविषयक वाङ्मयात त्यांनी तोलामोलाची अशी कितीतरी अधिक भर घातली असती यात शंका नाही. पण त्या आधी मृत्यूने त्यांचा जीवनग्रंथच मिटून टाकल्यामुळे ते कार्य अपुरेच राहिले. श्री. वि. कृ. जोशी यांच्या निधनामुळे आम्ही आणि त्यांचे इतर परिचित

एका मनमोकळ्या, निगर्वी, रसिक नि बहुश्रुत मित्राला मुकलो आहोत नि महाराष्ट्र एका थोर विद्वानाला मुकला आहे. मात्र जगातून जाण्यापूर्वी त्यांनी ज्या अमोल ग्रंथांची भेट आपली आठवण म्हणून मागे ठेवली आहे, ती हाती घेऊन आम्ही त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

( मराठा : ३१-७-१९६२ )

## ३१

# प्रा. ना. ग. नारळकर

पुण्याचे प्रख्यात शिक्षणशास्त्रज्ञ आणि प्राध्यापक ना. ग. ऊर्फ नानासाहेब नारळकर हे गेल्या रविवारी दुपारी पुणे येथे वयाच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी निधन पावले, हे ऐकून आम्हांस अतिशय दुःख वाटले. गेली आठ वर्षे नारळकर हे पक्षघाताने अंथरुणाला खिळूनच होते. पानशेत जलप्रलयाच्या वेळी त्यांच्या बंगल्याला पाण्याचा वेढा पडला असता, त्यातून त्यांना तशा अपंग परिस्थितीत पाठीवर घेऊन दुसरीकडे वेळेवर हालविण्यात आले, त्यामुळे त्या प्राणसंकटातून ते वाचले. त्यांच्या निधनाची वार्ता ऐकून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरलेले त्यांचे हजारो विद्यार्थी आणि त्यांच्याशी प्रत्यक्ष परिचित असलेले त्यांचे शेकडो मित्र हळहळल्याखेरीज राहणार नाहीत.

नारळकरांच्या व्यक्तिमत्त्वात आणि स्वभावात असे काही आकर्षण आणि असा काही गोडवा भरलेला होता, की त्यांच्या सान्निध्यात जो जो कोणी येई, त्याच्या मनात त्यांच्याविषयी अत्यंत आदराची भावना निर्माण झाल्याखेरीज कधीही राहात नसे. त्यांचा चेहरा सदैव हसतमुख असे. कठोर शब्द चुकून त्यांच्या तोंडून कधी निघालेला कोणी ऐकला नसेल. नम्रता आणि सभ्यता हे गुण त्यांच्या रोमरोमात जणू काही भिनलेले असत. त्यामुळे त्यांचे विद्यार्थी तर त्यांच्यावर बेहद्द आषक असतच, पण त्यांच्या हाताखाली काम करणारे शिक्षक आणि त्यांना भेटावयाला येणारे पालक नेहमी प्रसन्न आणि संतुष्ट असत. आम्ही पुण्यात इतकी वर्षे काढली, मोठमोठ्या लोकांविषयी जसे बरे ऐकले तसे वाईटही ऐकले.

पण नारळकर हे एकच प्राध्यापक असे होते, की त्यांच्याविषयी प्रतिकूल शब्द चुकून कधी कोणाच्या तोंडून बाहेर पडलेला आम्ही ऐकलेला नाही. पुण्याच्या सार्वजनिक जीवनात कधी त्यांच्यावर कोणत्याही निमित्ताने टीका झाल्याचे आम्हांला माहीत नाही. अध्ययन आणि अध्यापन ह्या दोन क्षेत्रांच्या बाहेर चुकून त्यांनी कधी पाऊल टाकले नाही, किंवा कोणत्याही अप्रिय वा राजकीय वादविवादात ह्या किंवा त्या बाजूने त्यांनी मतप्रदर्शन केले नाही.

वस्तुतः अलाहाबाद विद्यापीठाचे ते प्रथम श्रेणीतले एम. ए. आणि एल. टी. होते; आणि त्यानंतर मध्यप्रांत सरकारच्या शिक्षणखात्यात चांगल्या पगारावर नोकर होते. असे असता सारा जन्म शिक्षणाला त्यागपूर्वक वाहून घेण्याचा निर्धार करून ते पुण्याला आले आणि 'शिक्षण प्रसारक मंडळी'चे आजन्म सेवक झाले. ध्येयवादाने प्रेरित झालेली म. म. प्रा. पोतदार किंवा रा. प. सबनीस ह्यांच्यासारखी अनेक निष्ठावंत आणि बुद्धिमान माणसे 'शिक्षण प्रसारक मंडळी'त काम करीत होती. त्यांच्या त्या रत्नमालिकेत गुणांनी आणि कर्तृत्वाने सर्वथैव शोभून दिसणारीच तेजस्विता नारळकरांच्या अंगी होती. थोड्याच दिवसांच्या आत तर्कशास्त्राचे आणि मानसशास्त्राचे प्रभावी प्राध्यापक म्हणून पुण्यात सर्वत्र त्यांचा नावलौकिक पसरू लागला. इंग्रजी भाषेमधले त्यांचे अस्खलित आणि मिठास वक्तृत्व आणि मानसशास्त्रासारखा अवघड विषय अनेक उदाहरणे देऊन सोपा करून दाखविण्याची त्यांची विलक्षण हातोटी, ह्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनावर जी एकदा छाप टाकली ती पुढे वाढतच गेली.

प्राध्यापक म्हणून अशा रीतीने ते आपल्या विद्वत्तेच्या आणि अध्यापन-कौशल्याच्या जोरावर पराकाष्ठेचे लोकप्रिय झाले, तरी त्यांचा पिंड होता खरा शिक्षकाचा. कारण, शिक्षणशास्त्राचा त्यांचा व्यासंग फार दांडगा होता. म्हणून महाविद्यालयापेक्षा त्यांना विद्यालयाचीच जास्त ओढ होती. आम्ही १९२८ साली शिक्षणशास्त्राची पदवी घेऊन विलायतेहून जेव्हा परत आलो, तेव्हा आम्हा उभयतांचे समान मित्र कै. प्रि. ना. म. पटवर्धन ह्यांच्यामुळे त्यांचा नि आमचा परिचय झाला, आणि त्यानंतर पुणे शहरात शिक्षकांच्या अध्यापनासंबंधीच्या ज्या काही चळवळी चालू होत्या, त्यांत आम्ही हळूहळू एकत्र येऊ लागलो. कै. प्रा. म. रा. परांजपे ह्यांच्या उत्साही प्रेरणेने अशी अनेक कामे पुण्यात त्या वेळी चालू होती. त्यात म. म. पोतदार, प्रि. तावडे, नी. वा. किंकर आणि

स्वतः आम्ही धडाडीने कामे करीत होतो. त्यात नारळकरांचे आम्हांला सहकार्य लाभले. शिक्षणशास्त्राला नि शिक्षकांच्या हिताला वाहिलेल्या ‘ Progress of Education ’ ह्या मासिकाचे प्रा. परांजपे ह्यांच्याबरोबर ते सहसंपादक होते. ‘ शिक्षाविचार मंडळा ’तही त्यांची आमची भेट होत असे.

पुढे सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये पंधरा वर्षे प्राध्यापकाचे काम केल्यानंतर, ‘ नूतन मराठी विद्यालया ’त मुख्याध्यापकाच्या जागेवर जेव्हा त्यांची नेमणूक झाली, तेव्हा त्यांना आणि आम्हा त्यांच्या मित्रांना हायसे वाटले. आम्हीही त्या वेळी कॅंप एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलचे मुख्याध्यापक होतो. त्यामुळे मग त्यांचा नि आमचा रोजच्या रोज संबंध येऊ लागला. नंतर ‘ नूतन मराठी विद्यालया ’त त्यांनी ‘ टीचर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट ’ काढली. त्यात प्राध्यापक म्हणून माझ्याकडेही त्यांनी अध्यापनाचे काही काम सोपविले. कित्येक शैक्षणिक परिषदांत त्यांनी आणि आम्ही नमुन्याचे पाठ दिलेले आहेत. ते इंग्रजीचे पाठ देत आणि आम्ही भूगोलाचे पाठ देत असू. ह्या ‘ टीचर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट ’चे रूपांतर ‘ टीचर्स ट्रेनिंग कॉलेजा ’त करण्याचा त्यांनी नि प्रा. परांजपे ह्यांनी मध्यंतरी प्रयत्न केला. आमचेही नाव अध्यापकवर्गात होते. पण ते त्यांचे स्वप्न त्यांच्या संस्थेच्या अंतर्गत भानगडीमुळे काही फलद्रूप होऊ शकले नाही.

नू. म. विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदावर ते सहा वर्षे होते, पण ह्या सहा वर्षांत त्यांनी त्या शाळेत आमूलाग्र क्रांती करून सोडली. साधू लोक ज्याप्रमाणे ‘ आपणासारखे करिती तात्काळ ’, त्याप्रमाणे आपल्या असमान्य व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्यांनी सबंध शाळेच्या शिस्तीवर, व्यवस्थेवर आणि विद्यार्थ्यांच्या वर्तनावर उमटवून दाखविला. टापटीप आणि नीटनेटकेपणा हे गुण नारळकरांच्या हाडी-मासी खिळलेले होते. कपडे स्वच्छ पाहिजेत, अक्षर चांगले पाहिजे, शुद्धलेखन बिनचूक पाहिजे, वागणे नम्र पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असे; आणि ह्या गोष्टी विद्यार्थ्यांना धाक किंवा दरारा न दाखवता केवळ प्रेमाच्या सामर्थ्यावर त्यांच्या-कडून ते करून घेत असत. त्यांची ती उंच नि भव्य मूर्ती शाळेच्या आवारातून फिरू लागली किंवा एखाद्या वर्गात शिरली, की विद्यार्थी एकदम विरघळूनच जात. म्हणून त्यांच्या कारकीर्दीत शिस्तीसंबंधीच्या समस्या कधीही निर्माण झाल्या नाहीत. विद्यार्थ्यांशी समरस होणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. वर्गात एखादा धडा ते शिकवू लागले म्हणजे ते इतके तल्लीन होत, की काही विचारू नका. विद्यार्थ्यांचे केवळ मनोरंजन करण्यापेक्षा त्यांना विचार करावयास लावणे



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

ह्यावर त्यांचा विशेष कटाक्ष होता. त्यामुळे त्यांनी शिकविलेल्या धड्याचा ठसा विद्यार्थ्यांच्या स्मरणातून वर्षानुवर्षे पुसला जात नसे.

विद्यार्थ्यांना स्वावलंबी कसे बनवावे आणि त्यांच्या गुणांचे कसे चीज करावे ह्याविषयी त्यांचे नाना तऱ्हेचे प्रयोग अहर्निश चालू असत. त्या दृष्टीने नू. म. वि. मधे त्यांनी स्थापन केलेले ' विद्यार्थी–भांडार ' हे त्यांच्या कल्पकतेचे एक जिवंत स्मारक आहे. केवळ एक रुपया किंमतीचे भाग विद्यार्थ्यांकडून जमवून त्या भांडवलावर त्यांनी हे स्वदेशी वस्तूंचे भांडार शाळेच्या आवारात उघडले. तेथे फक्त, स्वदेशी वस्तूच विकल्या जात, आणि विक्रेत्याचे काम विनावेतन विद्यार्थी करीत. स्वतः नारळकरही कित्येकदा विक्रेते म्हणून जातीने उभे राहात. ह्या भांडारात केवळ विद्यार्थ्यांचेच गिऱ्हाईक नसे, तर त्यांच्या पालकांची रोज संध्याकाळी एवढी गर्दी उडे की, आतमधे शिरावयाला जागा मिळत नसे. ह्या भांडारात सालिना हजारो रुपयांची विक्री होई. त्यात हिशेबाचे नि विक्रेत्याचे काम करणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी पुढे आयुष्यात व्यापाराच्या क्षेत्रात चांगले नाव कमावले. महात्मा गांधींना हे ' विद्यार्थी भांडार ' एवढे आवडले की, त्यांनी त्याला ' स्वदेशी मंदिर ' असे नाव दिले. राजकारणात जरी नारळकरांनी प्रत्यक्ष असा भाग घेतला नसला, तरी ' स्वदेशी-स्वभाषा-स्वराज्य ' ह्या लोकमान्यांच्या त्रिसूत्रीवर त्यांचा आढळ विश्वास होता, आणि त्याप्रमाणेच त्यांनी आजन्म आचरण केले.

रोजच्या रोज माहितीचा ' सूचनाफलक ' शाळेत लावण्याची कल्पना त्यांची स्वतःचीच होय. शारीरिक शिक्षण त्यांनी आपल्या शाळेपुरते तरी सक्तीचे केले होते. लष्करी शिक्षणाची त्यांना फार आवड असे. यू. टी. सी. मधे स्वतः ते अधिकारी होते. ' रायफल ' क्लब स्थापण्यात त्यांनी पुढाकार घेतला. अवघ्या सहा वर्षांत पुण्याच्या शालेय क्षेत्रात अमर कामगिरी करणाऱ्या ह्या महान शिक्षकाला ' शिक्षण प्रसारक मंडळी ' च्या अंतर्गत हेव्यादाव्याला बळी पडून पुणे सोडावे लागले. एक वर्षभर मुंबईच्या पोद्दार व्यापारी कॉलेजचे प्राचार्यपद भूषवून ते वयाच्या एकावन्नाव्या वर्षी शिक्षण प्रसारक मंडळीतून निवृत्त झाले. त्यानंतर पुढे तेरा वर्षे ते ' वेस्टर्न इंडिया विमा कंपनी 'चे मुंबई शाखेचे प्रमुख होते. त्यांच्या गुणांचा नि सेवेचा शिक्षण प्रसारक मंडळीने जेवढा उपयोग करून घ्यावयाला पाहिजे होता, तेवढा घेतला नाही, म्हणून ह्या नामांकित शिक्षणशास्त्रज्ञाला आपल्या आयुष्याची अखेरची वर्षे विमाक्षेत्रात कंठावी लागली, ही

खरोखरच खेदाची गोष्ट आहे.

१९५३ साली महर्षी कर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांची एकसष्टी त्यांच्या विद्यार्थ्यांनी साजरी केली. त्या वेळी त्यांना दहा हजार रुपयांची थैली देण्यात आली. तिच्यात स्वतःच्या पाचशेएक रुपयांची भर घालून ती सर्व रक्कम शिक्षण-शास्त्रावर मराठीत ग्रंथ लिहिण्याच्या कार्यासाठी त्यांनी देऊन टाकली. नारळकर हे जेवढे कर्तबगार, तेवढेच दुर्दैवी होते. आयुष्याच्या मध्यान्हीत आपल्या आवडत्या शिक्षणक्षेत्रातून बाहेर पडावयाची त्यांच्यावर पाळी यावी आणि शेवटची तेरा वर्षे विमाक्षेत्रात नि आठ वर्षे असाध्य आजारात त्यांना घालवावी लागावी यापेक्षा अधिक दुर्दैव ते कोणते? त्यामुळे त्यांची कितीतरी शैक्षणिक स्वप्ने तशीच अर्धवट वाऱ्यावर विरून गेली. प्रसिद्धिपराङ्मुख आणि अनाग्रही स्वभावामुळे ते प्रतिकूल परिस्थितीवर मात करू शकले नाहीत. पण काहीही असले, तरी एक महान ध्येयवादी आणि निष्ठावंत शिक्षक म्हणून त्यांच्या असंख्य विद्यार्थ्यांच्या नि मित्रांच्या ते सदैव स्मरणात राहतील यात काय शंका?

( मराठा : २१–१०–१९६६ )

# ३२

## मरहूम महमदअल्ली जिना

आठ दिवसांपूर्वी पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल महमदअल्ली जिना हे कराची येथे अकस्मात मरण पावले. त्यांची प्रकृती बरी नसल्याचे गेल्या सहा महिन्यांत पुष्कळ वेळा कानावर आले होते. तथापि त्यांच्या आयुष्याचा अंतकाळ इतका जवळ आला असेल अशी मात्र कुणाचीही कल्पना नव्हती. पण अघटित घटना घडून येण्याचा सध्याचा हा काळच आहे असे वाटते. आमचा पुण्याचा गोडसे दिल्लीला जाऊन महात्मा गांधींची हत्या करील असे कुणाला वाटले होते? गांधीजींचे मरण जितके अकल्पित तितकाच जिनांचा मृत्यूही अनपेक्षित. गेल्या रविवारी अगदी सकाळच्या प्रहरी ही बातमी आम्ही वाचली तेव्हा आम्हाला अतिशय आश्चर्य वाटले. क्षणभर आमची विचारशक्ती स्थगित झाली आणि मेंदू उजाड पडल्यासारखा वाटला. जिना मरण पावले ही गोष्ट वाईट झाली की चांगली झाली हा त्या क्षणी मुळी प्रश्नच उद्‌भवला नाही. ऐतिहासिक व्यक्तीच्या मरणाकडे वैयक्तिक किंवा घरगुती दृष्टीने पाहावयाचे नसते. जिनांच्या मृत्यूचा पाकिस्तानच्या आणि हिंदुस्थानच्या भविष्यकालीन राजकारणावर काय परिणाम होईल यांचा एक लांबलचक विचार चटकन आमच्या अंतश्चक्षूंपुढून चमकून गेला. गांधीजींच्या मृत्यूमुळे हिंदी जनतेच्या जीवनात विकोपाला गेलेली जातीय तीव्रता एकदम नष्ट झाली आणि भारतीय राजकारणामध्ये जसा एक प्रकरचा क्रांतिकारक बदल घडून आला, तसा मूलगामी परिणाम जिनांच्या आकस्मिक मरणामुळे पाकिस्तानच्या जीवनात किंवा राजकारणात घडून येईल किंवा काय

असा प्रश्न साहजिकच आमच्या डोळ्यांपुढे उभा राहिला. फार तपशिलात न जाता एकदम असे म्हणता येईल की, जिनांच्या मृत्यूमुळे पाकिस्तानची फारच मोठी हानी झालेली आहे. जिना हे केवळ पाकिस्तानचा पायाच नव्हते तर ते पाकिस्तानच्या भिंती होते, घुमट आणि कळसही पण होते. जिनांच्या मृत्यूमुळे पाकिस्तानचा जीवनाधार तुटल्यासारखे झाले आहे. जिनांच्या मरणामुळे पाकिस्तानच्या डोक्यावरचे आभाळच जणू काही फाटले आहे. जिनांच्या निधनामुळे पाकिस्तान आज सर्वस्वी उघडे पडले आहे. कोणी आम्हाला निराशावादी म्हणेल किंवा फारच आशावादी म्हणेल, पण जिनांच्या मृत्यूनंतर पाकिस्तानचा हा इमला फार दिवस अलगपणे टिकू शकेल असे आम्हाला वाटत नाही. जिनांच्या मृत्यूने पाकिस्तानच्या शाश्वतीबद्दल आमच्या मनात तरी जबरदस्त संशय निर्माण झाला आहे.

जिनांच्या मरणामुळे आम्हाला हर्ष झालेला नाही. या देशात कोणालाही तसा तो झाला असेल असे आम्हाला वाटत नाही. जिनांच्या मृत्यूची वार्ता ऐकून कोणी पेढे किंवा बर्फी वाटल्याचे आम्ही ऐकलेले नाही. खरोखर हिंदुस्थानात राहणारे आम्ही हिंदू लोक तसे अंतःकरणाने फार चांगले आहोत. दुःखाने किंवा यातनांनी आनंदाच्या उकळ्या फुटण्याइतकी आमची अन्तःकरणे क्षुद्र नाहीत. 'जिनांच्या मृत्यूमुळे तुम्हाला हर्ष झाला नसेल, पण वाईट वाटले का ?' असा जर कोणी आम्हाला सवाल करील तर त्याला आम्ही प्रांजलपणे सांगू की, जिनांच्या मृत्यूमुळे आम्हांला वाईट वाटण्याचा प्रश्नच मुळी उत्पन्न होत नाही. ज्यांच्याबद्दल आपणाला प्रेम वाटते, आपलेपणा वाटतो, आस्था वाटते किंवा ज्यांचे आणि आपले संबंध काहीतरी लोभाचे किंवा जिव्हाळ्याचे आहेत त्यांच्या मृत्यूबद्दल आपणास दुःख होणे साहजिक असते. अशा तऱ्हेचे जिनांचे आणि आपले संबंध आहेत असे कोणाला तरी म्हणता येईल काय ? आपल्याला जिनांबद्दल प्रेम वाटावे असे गेली कित्येक वर्षे त्यांचे आणि आपले नाते राहिलेले नव्हते. पूर्वी असा एक काळ होता की, ज्या वेळी जिनांच्या बुद्धिमत्ते-बद्दल आणि कर्तृत्वाबद्दल आपणाला अतिशय आदर वाटत होता. त्या वेळी जनतेची जिनांबद्दल जी भावना होती तिचे मूर्त स्मारक मुंबईत 'जिना हॉल' बांधून जनतेने करून ठेवलेले आहे. 'मी शंभर टक्के हिंदी माणूस आहे.' अशी सार्वजनिक व्यासपीठावरून त्या वेळी जिना गर्जना करीत असत. 'मी तुमच्या देशाचा, तुमच्या राष्ट्राचा आणि तुमच्या संस्कृतीचा माणूस नाही'

असे ज्या क्षणी जिना बोलू लागले, त्या क्षणी त्यांची आणि आमची फारकत झाली. 'आमच्यामधून चालते व्हा' असे आपण जिनांना कधी सांगितले नव्हते. स्वतःच्या बुद्धीने आणि खुषीने ते आमच्यामधून उठून गेले आणि त्यांनी निराळा प्रपंच स्थापन केला. फाळणीची आणि फारकतीची जबाबदारी सर्वस्वी जिनांवर आहे. जो माणूस आमच्या राष्ट्राचा नाही, जो माणूस आमच्या देशाचा नाही, त्याच्या मृत्यूबद्दल आम्हाला वाईट वाटण्याचे काय हो कारण ? मुसोलिनी आणि हिटलर यांच्या मृत्यूबद्दल आम्हाला जितके वाईट वाटले, तितकेच दुःख जिनांच्या मृत्यूबद्दल आम्हाला झाले असे म्हणायला हरकत नाही. देशाची फाळणी न करता देश स्वतंत्र करण्याच्या कामी जर जिनांनी आपल्या बुद्धिमत्तेचा आणि कर्तृत्वाचा उपयोग केला असता, तर जिनांच्या मृत्यूमुळे चाळीस कोटी लोकांच्या डोळ्यांतून आज टपटपा अश्रू गळाले असते.

मनुष्य मेल्यानंतर त्याजबद्दल वाईट लिहू नये अशी एक सभ्य रीत आहे. ती जरी आम्हाला मान्य असली तरी मनुष्य मेल्यानंतर त्याजबद्दल खोटे लिहिणे हेही पण काही फारसे सभ्यपणाचे होणार नाही अशी आमची समजूत आहे. जिनांची अद्वातद्वा निंदा करून घेण्याचा मात्र हा प्रसंग उचित नव्हे. तथापि जिनांबद्दल आपणाला प्रामाणिकपणे काय वाटते हे योग्य तो संयम राखून बोलायला मुळीच हरकत नसावी. आपल्या एकट्याच्या इच्छाशक्तीच्या जोरावर आपण पाकिस्तान निर्माण करू शकलो अशी जिवंतपणी जिनांना खूप घमेंड वाटली असेल आणि ती त्यांच्या दृष्टीने कदाचित समर्थनीय पण असेल. पाकिस्तान निर्माण करून या देशातील मुसलमानांचे जिनांनी फार मोठे कल्याण केले असेही मानणारे जिनांचे लक्षावधी अनुयायी या भूमीमध्ये असतील—तथापि देशाची फाळणी घडवून आणून या देशाचे आणि या देशातील हिंदू नि मुसलमान जनतेचे जिनांनी भयंकर नुकसान केले आहे असाच निर्वाळा निःपक्षपाती इतिहासकाराला द्यावा लागेल यात मुळीच संशय नाही. सहस्रावधी हिंदूंच्या आणि मुसलमानांच्या गेल्या वर्षी ज्या राक्षसी कत्तली या देशात घडून आल्या, कोट्यवधी रुपये किंमतीच्या घरादारांचा नि मालमत्तेचा जो विध्वंस झाला आणि लक्षावधी हिंदू आणि मुसलमान प्रजा जी निर्वासित होऊन देशोधडीला लागली, त्या सर्व आपत्तींना अन् संकटांना जर कोणी एक व्यक्ती जबाबदार असेल तर ती महमदअल्ली जिना ही होय. तैमूरलंग, नादिरशहा, गिझनीचा महमंद किंवा

औरंगजेब याप्रमाणे जिना हे काही अशिक्षित, अडाणी नि असंस्कृत नव्हते. आधुनिक काळातले अत्यंत उदार आणि पुरोगामी शिक्षण त्यांना मिळालेले होते. न्याय आणि कायदा या दोन्ही शास्त्रांत ते पारंगत होते. अशा माणसाने माथेफिरू महमदाप्रमाणे किंवा धर्मवेड्या औरंगजेबाप्रमाणे धर्मद्वेष्ट्याची आणि मूर्तिभंजकाची अत्याचारी भूमिका पत्करावी याचे आम्हा सर्वांस अत्यंत आश्चर्य वाटते. गिझनीच्या महमदाने ज्याप्रमाणे सोमनाथाचे मंदिर फोडले त्याप्रमाणे हजारो वर्षे जनतेने उभारून ठेवलेले भारताचे हे महन्मंगल मंदिर या कराचीच्या महमदाने भंगून कोट्यवधी जनतेची अंतःकरणे रक्तबंबाळ करून टाकली यात मुळीच संशय नाही.

जिना हे आरंभी जितके ज्वलंत राष्ट्रवादी होते तितकेच ते पुढे कट्टर जातीयवादी झाले. मोठमोठ्या माणसांच्या मतात आणि विचारसरणीत बदल होतो; नाही असे नाही. गांधीजींच्या जीवनात तर आमरण एकसारखी क्रांती घडत होती. पण गांधीजी हे लहानाचे मोठे झाले आणि याच्या उलट जिना हे मोठ्याचे लहान होत गेले. बॅरिस्टर गांधींची उत्क्रांती होत होत शेवटी ते महात्मा गांधी बनले, तर बॅरिस्टर जिनांची अपक्रांती होत होत शेवटी ते कायदे आझम जिना झाले. जातिधर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा त्याग करून जिना हे धर्मनिष्ठ राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते झाले. ह्याचे कारण इस्लामी धर्मग्रंथांचे परिशीलन करता करता त्या धर्मावर त्यांची अचानक भक्ती जडली हे नव्हे. वस्तुतः जिनांच्या वैयक्तिक जीवनात धर्माला काडीमात्र स्थान नव्हते. त्यांना धडपणे उर्दूदेखील बोलता येत नव्हते, तर अरबी भाषा कुठून येणार ? वर्षानुवर्षे त्यांनी कधी कुराणला हात लावला असेल किंवा मशिदीत पाऊल टाकले असेल तर शपथ ! लोकमान्य टिळकांचा किंवा महात्मा गांधींचा भगवद्गीतेवर जसा व्यासंग होता किंवा मौलाना अबुल कलम आझाद यांचा कुराणावर जसा आहे, तशा दृष्टीने जिनांनी धर्मग्रंथांचा अभ्यास केला होता काय याचा आपण विचार करू लागलो तर आपल्याला हसूच येईल.

आजपर्यंत हिंदुस्थानात जे मोठमोठे नामवंत राजकीय पुढरी होऊन गेले, त्यांचा कोठल्या ना कोठल्या विषयाचा प्रचंड व्यासंग असे. त्या दृष्टीने पाहता जिना हे सर्वांत हिणकस ठरतील. ते बुद्धिमान होते, हुषार होते; पण कोणत्याही एखाद्या शास्त्राचा किंवा विषयाचा त्यांनी सखोल अभ्यास केला नव्हता. एकही पुस्तक किंवा ग्रंथ लिहिण्याचे त्यांनी कधी धाडस केले नाही. 'पाकिस्तान 'वर



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

डॉ. आंबेडकर आणि डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी पाचपाचशे पानाचे जगड्व्याळ ग्रंथ लिहिले, पण जिनासाहेबांना त्या विषयावर शंभर पानांचा ग्रंथ लिहिण्याची काही बुद्धी झाली नाही. अर्थात जिनांनी पाकिस्तानवर ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केला असता तर पाकिस्तानचा ग्रंथ कधीच आटोपला असता. पाकिस्तानवर काहीही स्पष्टपणे न बोलणे किंवा न लिहिणे हेच मुळी त्यांचे राजकारण होते. खुद्द पाकिस्तानची कल्पना त्यांची स्वतःची म्हणावी तर तसेसुद्धा नव्हते. मूळची ही कल्पना सर महमद इक्बाल यांची. 'पाकिस्तान हे एक मूर्खांचे स्वप्न आहे' हे जिनासाहेबांचे त्याविषयीचे मूळचे मत होते. असे असतानाही हे स्वप्न त्यांनी सत्यसृष्टीत आणून दाखविले, आणि ते स्वतः पाकिस्तानचे निर्माते बनले. यावरून ते एक अद्भुत सामर्थ्याचे आणि लोकोत्तर कर्तृत्वाचे थोर पुरुष होते असे जर कोणी म्हणू लागेल, तर त्यालाही दुसरी मोठी बाजू आहे. देशाची फाळणी घडवून आणून पाकिस्तान निर्माण करण्यात तसा जिनांचा फारच थोडा भाग आहे असे म्हणता येईल. जिनांनी पाकिस्तानसाठी काय हो केले? पाकिस्तान मिळविण्यासाठी त्यांनी कोणत्या हालअपेष्टा सहन केल्या? का ते तुरुंगात गेले, का त्यांनी आपल्या घरादाराची आणि मालमत्तेची होळी करून घेतली, का त्यांनी अंगावर पोलिसांच्या लाठ्यांचे तडाखे सोसले, का छातीवर बंदुकीच्या गोळ्या झेलल्या? काय त्यांनी पाकिस्तानसाठी केले तरी काय? भारताचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी अग्निकाष्ठ भक्षण करून जी अघोर तपश्चर्या केली त्या मानाने जनाब जिनांनी किंवा त्यांच्या सहकाऱ्यांनी पाकिस्तान मिळविण्यासाठी काही तरी केले का? खुर्चीवर बसल्या बसल्या, गादीवर पडल्या पडल्या, अंगावरच्या कपड्यांच्या कडक इस्त्रीची घडी मोडू न देता जिनांनी पाकिस्तान मिळविले. पाकिस्तान मिळविण्यासाठी जिनांनी डोळ्यांत भरण्यासारखा असा एकही पराक्रम केला नाही असेच इतिहासाला नमूद करावे लागेल. एखादा वकील चारदोन तास कोर्टात भाषण करून ज्याप्रमाणे एखादा खटला जिंकतो त्याप्रमाणे जिनांनी नुसते वकिली डावपेच लढवून आणि विरुद्ध पक्षाला शिवीगाळ करून पाकिस्तान मिळविले; दुसरे काय! त्यांतही जिनांचे मोठे वकिली कौशल्य होते म्हणावे तर तेही नाही. 'पाकिस्तान म्हणजे काय' या साध्या प्रश्नाला उत्तर देण्याचीदेखील त्यांची तयारी नव्हती. जिनांनी खटला जिंकला याचे कारण न्याय देणारे ब्रिटिश सरकार त्यांना आतून सामील होते, आणि वादी पक्ष देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायला उत्सुक झालेला होता. ब्रिटिश

सरकार जर कपटी नसते आणि आमचे काँग्रेसचे पुढारी जर साधुपुरुष नसते तर या जन्मात जिनांना पाकिस्तान मिळवून दाखविता आले नसते. आम्ही जिनांना पाकिस्तान दिले. ब्रिटिशांनी जिनांना पाकिस्तान मिळवून दिले. जिनांनी पाकिस्तान मिळविले नाही !

जिनांचे राजकारण स्वच्छ होते असे त्यांचे चाहते म्हणतात. आम्हाला ही गोष्ट मंजूर नाही. प्रतिपक्षाशी शक्य तितक्या अनुदार पद्धतीने वागून त्याची अवहेलना करणे आणि त्याजवर वाटेल तसे खोटेनाटे आरोप करणे या असभ्य राजकीय तंत्राचे जिना हे जनक होते. चर्चा, वाटाघाटी आणि तडजोड यांना सुसंस्कृत आणि शांतताप्रिय माणसांच्या जीवनात आज महत्त्वाचे स्थान आहे. जिनांशी चर्चा आणि वाटाघाटी करणे अशक्य होते. एखाद्या अडाणी किंवा गावंढळ माणसाप्रमाणे प्रत्येक गोष्टीला नकार देण्याचे धोरण पत्करून त्यांनी तडजोडीच्या तत्त्वाचे हसू करून टाकले. गांधींचे राजकारण जितके सत्य'वर आधारलेले होते तितकेच जिनांचे राजकारण असत्यावर उभारलेले होते. प्रतिक्षणी खोटे बोलणारे आणि धादांत थापा मारणारे पाकिस्तानसारखे राष्ट्र या पृथ्वीतलावर दुसरे असेल असे आम्हांला वाटत नाही. अशा पाकिस्तानचे जिना हे जनक होते. जगाच्या इतिहासात तर जिनांच्या नावाने एक ओळही लिहिली जाणार नाही. पण या देशाच्या इतिहासातही जिनांचे नाव फार दिवस राहील असे आम्हास वाटत नाही. कोणी काही म्हणो, या भूमीमध्ये पाकिस्तान मुसलमानांचे स्वतंत्र राष्ट्र म्हणून फार दिवस राहू शकेल असा आमचा विश्वास नाही. उभय राष्ट्रांतील जनतेच्या प्रगतिप्रियतेवर आणि उत्क्रांतिप्रवणतेवर आमची श्रद्धा आहे. ज्या जनतेच्या एकजुटीला, हजारो वर्षांच्या इतिहासाचा, रूढीचा आणि भावनांचा आधार आहे त्यात काही आगंतुक परिस्थितीमुळे सध्या खिंड पडली असली तरी ती दीर्घकाळपर्यंत टिकून राहील असे म्हणणे इतिहासाच्या ओघाला धरून होणार नाही. या देशात आजपर्यंत जे थोर पुरुष होऊन गेले त्यांच्या रांगेतही जिना कुठे बसू शकणार नाहीत. त्यांच्या चांगुलपणाची एकही गोष्ट आम्ही ऐकली नाही. कोणाला ठाऊक असेल तर त्यांनी ती आम्हाला अवश्य ऐकवावी. एखाद्या गरीब मुसलमानाला जिनांनी आपल्या घरी नेल्याची आणि आपल्या टेबलावर जेवू घातल्याची गोष्ट पाकिस्तानच्या शालेय पुस्तकात छापून आल्याचेही आमच्या ऐकिवात नाही. जिना उत्तम वक्ते होते. पण ते काय बोलत ? अमक्या न्यायाधीशाचा त्यांनी पाणउतारा केला आणि तमक्या

माणसाला त्यांनी निरुत्तर केले, यापेक्षा त्यांच्या वक्तृत्वाचे अधिक तोलामोलाचे पराक्रम आम्ही ऐकले नाहीत. मानवतेच्या सुखात आणि समाधानात भर घालणारे असे एकही सुभाषित त्यांच्या तोंडून निघाल्याचे आम्हाला माहीत नाही. आंतरराष्ट्रीय दृष्ट्या पंडित जवाहरलाल नेहरूंना आज जगात जे स्थान आहे, त्याचा एक शतांशदेखील जिनांना कधी लाभला नाही. जगाचे ज्याकडे लक्ष वेधावे असे जीवनविषयक काहीही तत्त्वज्ञान जिनांजवळ नव्हते. जवाहरलाल नेहरूंप्रमाणे जनमनावर मोहिनी घालणारे असे मधुर, मुलायम आणि उदात्त व्यक्तिमत्त्व तर जिनांजवळ नव्हतेच नव्हते. कोर्टात आपला खटला कसा जिंकावा या कलेत वाकबगार असलेले जिना हे एक अत्यंत हुषार बॅरिस्टर होते, एवढेच फक्त त्यांच्याविषयी म्हणता येईल. देशातल्या विचित्र राजकीय घटनेमुळे त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली आणि ते पाकिस्तानचे निर्माते बनले, इतकेच काय ते! मुसलमान समाजाला या देशात स्वतंत्र राष्ट्र मिळवून देणारा हा हुषार बॅरिस्टर आज निधन पावल्यामुळे त्या ‘ राष्ट्राचे ’ अतिशय नुकसान झालेले आहे हे अगदी निर्विवाद आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
वतुक्रम 47045. दि: 6/9/65
क्रमांक 2703 नों. दि: 31/12/65

# ३३

## राज्य न करणारा इंग्लंडचा राजा

लंडनपासून एकशेतीन मैलांच्या अंतरावर असलेल्या सॅण्ड्रिंगहॅम राजवाड्यात गेल्याच्या मागील बुधवारी रात्री झोपेत असतानाच इंग्लंडचे राजे सहावे जॉर्ज ह्यांना वयाच्या छपन्नाव्या वर्षी मृत्यू आला. आपण ‘एक सामान्य माणूस’ आहोत असे सहावे जॉर्ज स्वत:बद्दल म्हणत असत. ते जरी एका अर्थी खरे असले तरी त्यांच्या आयुष्यातले काही योग तरी असामान्यच होत असे म्हटले पाहिजे. पंधरा वर्षांपूर्वी त्यांचे थोरले बंधू आठवे एडवर्ड ह्यांनी वॉलिस सिंपसन ह्या घटस्फोटित अमेरिकन स्त्रीशी लग्न करावयाचे ठरविल्यामुळे राष्ट्राने त्यांना राज्याचा त्याग करावयाला लावले. त्यामुळे सहावे जॉर्ज यांना इंग्लंडचे राज्यपद अनपेक्षितपणे प्राप्त झाले. तितक्याच अनपेक्षितपणे दहा दिवसांपूर्वी त्यांच्या आयुष्याचा शेवट झाला. लहानपणापासून तशी त्यांची प्रकृती विशेष चांगली नव्हती. काही वर्षांपूर्वी त्यांच्या एका पायाचे रक्ताभिसरण नीट होत नव्हते. म्हणून त्यावर पुष्कळ उपचार करण्यात आले. पुढे त्यांना फुफ्फुसाचा रोग जडला. हा रोग कॅन्सर होता असे मागाहून कळले. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून त्यांचे एक फुफ्फुस अजिबात काढून टाकले. त्या वेळी त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक झालेली होती. तथापि ह्या सर्व आजारातून ते व्यवस्थितपणे बाहेर पडले. लौकरच साम्राज्यामध्ये दौऱ्यावर जाण्याचाही त्यांचा बेत होता म्हणतात.

सांगायची गोष्ट ही की, त्यांना इतक्यात मरण येईल अशी कोणालाही कल्पना नव्हती. त्यांच्या आकस्मिक नि अनपेक्षित मरणाने ब्रिटिश जनतेला फारच मोठा

धक्का बसला. इतका की प्रथम जेव्हा लंडनमध्ये ही बातमी बाहेर पडली, तेव्हा कोणाचाही तिजवर विश्वास बसेना. सहावे जॉर्ज यांना झोपेमध्ये मृत्यू यावा हीही त्यातल्या त्यात एक विलक्षण घटना होय. ह्या गोष्टीचा पंतप्रधान चर्चिल ह्यांनी आपल्या नभोवाणीवरील भाषणात मोठ्या हृदयस्पर्शी शब्दात उल्लेख केला. ते म्हणाले, "राजे जॉर्ज ह्यांना मृत्यूचे भय कधीच वाटले नाही. युद्धकाळात लंडनवर जेव्हा बॉम्बवर्षाव होत होता आणि मृत्यू उघडपणे शहरामधून वावरत होता, तेव्हा त्या मृत्यूबरोबर एखाद्या परिचित मित्राप्रमाणे ते निर्भयपणे इतस्ततः संचार करीत होते. अखेरीस मृत्यू त्यांच्या भेटीस आला; पण मित्र म्हणूनच आला. सुखाचा नि सूर्यप्रकाशाचा दिवस मावळल्यानंतर आणि आपल्या प्रियजनांचा नेहमीप्रमाणे निरोप घेतल्यानंतर आजच्या दिवसाचे काम संपले अशा कृतार्थतेच्या भावनेने ईश्वराचे चिंतन करीत झोपी जाणाऱ्या एखाद्या माणसाप्रमाणे ते शेवटी निद्राधीन झाले." चर्चिलचे हे वक्तव्य म्हणजे त्यांच्या भाषाप्रभुत्वाचा एक ओजस्वी नमुना आहे. राजे सहावे जॉर्ज ह्यांचे निर्गमन आणि दुसऱ्या एलिझाबेथ राणीचे आगमन ह्या क्रमप्राप्त घटनेवर तर त्यांच्या मुखातून काव्यच उचंबळून बाहेर पडले आहे. ते म्हणाले, "दुसऱ्या एलिझाबेथच्या आगमनाने आमची अंतःकरणे चारशे वर्षांपूर्वीच्या काळात उडत जातात व त्यांना त्या वैभवशाली आणि ज्वलंत युगाच्या अधिष्ठात्री देवतेची धीरोदत्त मूर्ती दिसू लागते. माझे तारुण्य व्हिक्टोरिया राणीचे शांत गंभीर वैभव पाहण्यात गेले. म्हणून इतक्या वर्षांनंतर 'देव राणीचे रक्षण करो!' हे राष्ट्रीय प्रार्थनागीत पुन्हा म्हणताना माझ्या अंगावर रोमांच उठावे हे साहजिकच आहे!" ब्रिटनमधील जनता-राज्याच्या प्रमुख नेत्याने मावळत्या नि उगवत्या राजा राणीवर निष्ठेची आणि अभिमानाची अशी भावनिर्भर स्तोत्रे मुक्त कंठाने उधळावीत, ह्यातच त्या राष्ट्राच्या अपूर्वतेचे रोमहर्षक रहस्य साठविलेले आहे.

सहावे जॉर्ज मृत्यू पावले त्या क्षणापासून तो परवाचे दिवशी त्यांचे दफन होईपर्यंत गेले दहा दिवस लंडन शहरातील जनतेच्या शोकाकुल मनःस्थितीची, शवाच्या अंत्यसंस्काराची आणि नवीन राणीच्या द्वाहीची जी तपशीलवार वर्णने व दृश्ये प्रसिद्ध झालेली आहेत, ती वाचल्यानंतर अंतःकरणात अनेक भावनांचा कल्लोळ उठतो आणि ब्रिटिश लोकांबद्दल आदराची नि कौतुकाची भावना दुणावल्याखेरीज राहात नाही. आपण एखादे मध्ययुगीन ऐतिहासिक नाटक किंवा चित्रपट पाहतो आहोत अशी ह्या काळात निदान आमची तरी भावना

झाली. ह्या प्रचंड नाट्यपूर्ण घटनेमधील लहानसहान अशा प्रत्येक व्यक्तीचे आणि जनसमूहाचे वर्तन आणि संचलन इतके रेखीव आणि बिनचूक घडलेले आढळून येते की, मन आश्चर्याने थक्क होते आणि या थोर राष्ट्रातील जनतेच्या अंगात किती शतकांची शिस्त आणि संघटना मुरून राहिलेली आहे याची कल्पना येते. कुठे धांदल नाही, गडबड नाही, ओरडा नाही, दंगल नाही, दुःखाचे नाटकी प्रदर्शन नाही. राजपुरुषाच्या मृत्यूने निर्माण केलेल्या शोकाच्या वातावरणाला गालबोट लागेल असे एकही कृत्य ह्या काळात कुणाच्या हातून घडले नाही, वा एक सुस्कारासुद्धा कोणाच्या मुखातून निघाला नाही.

मध्यरात्रीच्या सुमारास राजाच्या मृत्यूची बातमी ऐकताच राणीने तेथे येणे आणि मनातल्या भावना प्रकट न होऊ देता मृत पतीच्या कपाळाचे चुंबन घेऊन 'एलिझाबेथला—नव्हे, राणीला—आता हे कळवले पाहिजे' असे म्हणणे, येथून ह्या गंभीर नाट्याला सुरुवात होते. त्यानंतर लंडनमधील राजनिवासाबाहेर हजारो स्त्रीपुरुष जमा होऊन तासन् तास शोकाश्रू गाळीत उभे राहतात. राजकन्या एलिझाबेथला पित्याच्या निधनाची वार्ता आफ्रिकेत मोंबासा येथे कळते. शोकविव्हळ अंतःकरणाने तेथून ती पतीसमवेत विमानातून माघारी येते. विमानतळावर पंतप्रधान चर्चिल आणि विरोधी पक्षाचे नेते ॲटली व्यथित मुद्रेने माना खाली घालून सामोरे जातात. कोणी कोणाशी बोलत नाही. नंतर राजसिंहासनाच्या ऐतिहासिक दालनात प्रिव्ही कौन्सिलसमक्ष नवी राणी आपल्या राज्ञीपदाच्या स्वीकाराची घोषणा करते. ह्या घोषणेचा पुकारा रक्त आणि सुवर्ण रंगाचे गणवेष घातलेले अधिकारी लंडन शहरातील चार प्रमुख चव्हाट्यांवर प्रचंड जनसमुदायापुढे करतात. हा एक मोठा विधी असतो, आणि तो तर अगदी मध्ययुगीन वैभवाने आणि थाटामाटाने उरकण्यात येतो. द्वाही पुकारणाऱ्या ह्या अधिकाऱ्यांची घोड्याच्या गाड्यांमधून आधी मिरवणूक निघते. वाटेत शहरकोतवाल तिला अडवतात नि विचारतात, "कुठे चाललात?" त्याला मिरवणुकीचा पुढारी उत्तर देतो, "दुसऱ्या एलिझाबेथ राणीची लंडन शहरात द्वाही पुकारण्यासाठी तिचे हे सशस्त्र अधिकारी जात आहेत." नंतर ह्या मिरवणुकीत नगराध्यक्ष सामील होतात व मग अखेरीस द्वाही पुकारण्यात येते. हा सर्व विधी ह्या वेळीही यथासांग पार पडला. लाल मखमलीने झाकलेल्या राजवाड्याच्या सज्जावरून जेव्हा नव्या राणीची घोषणा मुख्य अधिकाऱ्याने वाचली तेव्हा राजघराण्यातील सर्व मंडळी आजूबाजूच्या दालनातून ते दृश्य

पाहात होती, आणि खाली प्रांगणात सर्व राष्ट्रांचे वकील जमलेले होते. नंतर राजाचे शव अंत्यविधीसाठी लंडन शहरात कृष्णवस्त्राच्छादित आगगाडीमधून आणण्यात येते. शवपेटीवर तीन हजार हिऱ्यांनी, माणकांनी, पाचूंनी, नील-मण्यांनी आणि मोत्यांनी मढवलेला राजमुकुट ठेवण्यात येतो. राजाचा मृत्यू आणि राणीचे आरोहण असे दोन अत्यंत परस्परविरोधी भावनेचे प्रसंग. एक शोकाचा नि एक आनंदाचा. पण ह्या दोन्हीही भावना ब्रिटिश लोक इतक्या संयमाने प्रकट करतात की, एका भावनेचा दुसरीला संपर्कसुद्धा लागत नाही. फार अवघड गोष्ट आहे ही. राजाच्या मृत्यूची कृष्णछाया आणखी कित्येक आठवडे तरी ह्या राष्ट्रावर पडलेली आढळून येईल. महत्त्वाचे लग्नसमारंभ किंवा मेजवान्या तहकूब करण्यात येतील. वरिष्ठ लष्करी किंवा मुलकी अधिकाऱ्यांना नाटकांना किंवा सिनेमालादेखील जाता येणार नाही. अशा तऱ्हेने ठराविक कालमर्यादेपर्यंत सारे राष्ट्र आपल्या राजाचे सुतक मोठ्या भावनेने आणि काटेकोरपणे पाळील.

सातशे वर्षांपूर्वी सायमन डी. मॉंटफर्डने इंग्लंडमध्ये लोकसभेची स्थापना केली. म्हणूनच त्याला ‘ लोकसभेचा जनक ’ म्हटले जाते. या गेल्या सातशे वर्षांत ह्या राष्ट्रामध्ये लोकशाहीची एकसारखी क्रांती आणि वाढ होत आलेली आहे, अन् राजशाही मर्यादित होत गेलेली आहे. ब्रिटनच्या लोकशाही राज्याची घटना अद्यापही अलिखितच आहे. सात शतके तिची घडण होते आहे. ती जितकी स्थिर, तितकीच लवचिक आहे. एखाद्या महान वटवृक्षा-प्रमाणे ती वर्षानुवर्ष एकसारखी वाढते आहे आणि विस्तार पावते आहे. म्हणूनच ब्रिटिश लोकशाहीला आज एक प्रकारचे भव्य नि दिव्य स्वरूप प्राप्त झालेले आहे. आपल्या राजालासुद्धा ज्या लोकशाहीने पचवले आहे, त्या लोक-शाहीचे सामर्थ्य काय वर्णन करावे ? ब्रिटिश राजा हा त्या लोकशाहीचाच मुळी एक भाग होऊन बसलेला आहे. ‘ राजा हा जगाचा उपभोगशून्य स्वामी आहे ’ ही व्याख्या केवळ ब्रिटिश राजालाच लागू पडण्यासारखी आहे. म्हणूनच ‘ राज्य न करणारा राजा ’ असे त्याला संबोधण्यात येते. He reigns but does not rule. राजा हा तेथे घटनात्मक सत्तेचा उगम मानण्यात येतो. सर्व राज्यकारभार त्याच्या नावाने चालतो. मंत्र्यांच्या नेमणुकी तोच करतो. न्यायाधीश राजाचा न्याय देतात. पोस्टमन राजाची डाक वाटतात. लोक राजाची भाषा बोलतात. सैन्यातले आणि मुलकी अधिकारी हे राजाचे सेवक होत. लोकसभेच्या प्रत्येक

अधिवेशनाचे उद्‌घाटन राजा करतो आणि तिची समाप्तीही पण तोच करतो. इतिहासातील कालखंडसुद्धा त्या त्या राजाच्या नावाने ओळखला जातो.

अशा रीतीने देशाच्या घटनात्मक राज्यकारभारात राजाचा महत्त्वाचा भाग असून, पुन्हा व्यक्तिशः त्याचा कोठेही उपसर्ग नाही. परमेश्वराप्रमाणे तो चोहीकडे आहे नि कोठेही नाही. राजा आणि जनता ह्यांचा कित्येक शतके जो संघर्ष चालू होता त्यातून राजसत्तेचे हे विशुद्ध स्वरूप उत्क्रांत झाले आहे. ब्रिटिश राष्ट्राने जुलमी आणि अन्यायी राजसत्तेवर लोकशाहीची इतकी पुटे चढविलेली आहेत की आता त्या विषाचे जणू अमृतच झाले आहे. संघराष्ट्रांच्या ऐक्याचा आणि सहकार्याचाही राजा हाच आता दुवा झालेला आहे. भारतासारख्या प्रजासत्ताक राज्याचीही त्याला मान्यता आहे. अशा तऱ्हेने इंग्लंडचा राजा हा त्या राष्ट्राच्या जीवनातील ऐक्याचे आणि गतिमानतेचे प्रतीक होऊन बसलेला आहे, तर आनुवंशिकतेमुळे तो राष्ट्राच्या प्राचीन इतिहासाचा एक जिवंत प्रतिनिधी झालेला आहे. राजकारणाच्या आणि पक्षोपपक्षांच्या संघर्षाबाहेर त्याचे स्थान आहे. कोणत्याही गटाचा किंवा वर्गाचा तो पुढारी नाही. तो साऱ्या राष्ट्राचा अधिपती आहे. लॉर्ड बाल्फर यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास तो 'सर्वांचा राजा आहे'. इंग्लंडमध्ये एवढे निरनिराळे राजकीय पक्ष आहेत. कम्युनिस्टदेखील थोडेसे आहेत. पण राजाच्याविरुद्ध 'ब्र' उच्चारण्याची कोणाची छाती नाही. ब्रिटिश जनतेला आपल्या राजाबद्दल आणि राजघराण्याबद्दल विलक्षण प्रेम वाटते. त्याचे प्रत्यंतर गेल्या पंधरवड्यातच जगाला प्रत्यक्ष पाहावयाला मिळाले. राजाच्या मृत्यूबद्दल ज्याने अश्रू गाळले नाहीत किंवा ज्याला दुःख झाले नसेल असा एकही माणूस त्या देशात आढळून आला नसता. देशाशी द्रोह केला तर राजाला फासावर चढवायला ज्या लोकांनी कमी केले नाही ( सन १६४९ ) किंवा परंपरेविरुद्ध वागणाऱ्या आवडत्या राजाला राजपदावरून ज्यांनी खाली ओढले ( सन १९३६ ) त्या कट्टर लोकशाहीवादी ब्रिटिश जनतेची गाढ राजनिष्ठा ही मानवतेच्या सद्‌गुणांची खरोखरच परिसीमा होय. अर्थात देशाच्या राजकीय जीवनापासून एखाद्या संन्याशाप्रमाणे अलिप्त आणि पराङ्मुख राहणारे ब्रिटिश राजघराणेही मोठे नमुनेदार आणि आदर्श आहे असेच म्हणायला हवे. कोणत्याही अनुचित आचाराने वा दुर्वर्तनाने लोकनिंदेचा यत्किंचितही विषय न होण्याच्या बाबतीत आजपर्यंत त्याने पराकाष्ठेची सावधगिरी बाळगली आहे. वेश्या, मदिरा आणि जुगार ह्यांच्या खातेऱ्यात लोळणाऱ्या

भारतातील आमच्या राजेमहाराजांची तर ब्रिटिश राजपुरुषांच्या पायाशेजारीही बसण्याची पात्रता नाही.

इंग्लंड हा खरोखरच अद्‌भुत देश आहे ह्यात काही शंका नाही. ह्या देशात दीड वर्ष राहण्याचे भाग्य आम्हाला लाभले. तेथील सर्व महान परंपरा आणि प्राचीन इतिहासाचे ओजस्वी अवशेष आम्ही स्वतः डोळ्यांनी पाहिलेले आहेत. तेव्हा आम्हाला ह्यात ऐकीव असे काहीच नाही. विंडसर व लंडन येथील राजाच्या राजवाड्यात आम्ही हिंडून आलो आहोत. सबंध राजघराणे आम्ही एका हाताच्या अंतरावरून न्याहाळून पाहिलेले आहे. पार्लमेंटच्या बैठका आम्ही ऐकलेल्या आहेत. इतिहासकाळात अनेकांना ज्या ठिकाणाहून यमसदनी पाठविण्यात येत असे त्या ' टॉवर ऑफ लंडन 'मधील कोपरान् कोपरा आम्ही पाहिलेला आहे. इंग्रजांचे राष्ट्रीय आणि सामाजिक जीवन जितक्या जवळून पाहता येईल तितक्या जवळून आम्ही पाहिलेले आहे. म्हणून ह्या राष्ट्राबद्दल आमच्या अंतःकरणात निरतिशय आदर आहे.

संयम आणि समतोलपणा ही ब्रिटिश स्वभावाची प्रमुख लक्षणे होत. म्हणूनच राजनिष्ठा आणि स्वातंत्र्यप्रेम ह्यांचा सुवर्णमध्य त्यांना काढता आला. लोकशाहीच्या मार्गावरून जातानाही समाजवादावर टाकलेले पाऊल प्रसंग पडताच मागे घेण्याचे मनोधैर्य ज्या जनतेने दाखविले तिच्या राष्ट्रीय चरित्र्याचे गोडवे किती गावेत? नवे आणि जुने ह्यांचा नयनमनोहर समन्वय घडवून आणणारे असे दुसरे राष्ट्र ह्या पृथ्वीतलावर काही आढळणार नाही. आपण भारतामधील लोक आपल्या प्राचीन इतिहासाच्या, संस्कृतीच्या आणि परंपरेच्या मारे एवढ्या फुशारक्या मारतो आणि वल्गना करतो. पण त्या प्राचीन इतिहासातील आणि परंपरेतील कोणत्या आदर्श गोष्टी इंग्रजांप्रमाणे विशुद्ध आणि ओजस्वी स्वरूपात आम्ही आज राखून ठेवल्या आहेत बरे? आमच्या प्राचीन परंपरांना आधुनिक जीवनात इतके विकृत आणि ओंगळ रूप प्राप्त झालेले आहे की, त्या जितक्या लौकर नष्ट होतील तेवढ्या बऱ्या असेच पुष्कळदा वाटू लागते. ' राजा हा विष्णूचा अवतार ' मानणारे आम्ही. पण आमच्या राजनिष्ठेने आमच्या माणुसकीला काळिमा फासण्याइतका आमचा अधःपात घडवून आणला. ह्याची उदाहरणे कशी आणि किती सांगावीत? म्हणूनच स्वातंत्र्य आल्यानंतर पहिल्याप्रथम राजसत्तेचे हे सगळे मध्ययुगीन आणि गलिच्छ अवशेष आपणाला नष्ट करावे लागले. तरीसुद्धा आपल्या जीवनातील दास्यनिष्ठा अद्यापि नष्ट झाली नाही. तिचे

रूपांतर स्वतंत्र भारतात पुढाऱ्यांच्या विभूतिपूजेत आज झालेले दिसून येते. शिस्त आणि संघटना ही इंग्रजांच्या हाडीमाशी मुरलेली आहे, तर स्वातंत्र्य मिळाल्यापासून पूर्वी होती तेवढी शिस्त आणि संघटनासुद्धा आता ह्या देशात राहिलेली नाही. लाखो लोकांनी पुढाऱ्यांच्या दर्शनासाठी जमावयाचे, त्यांच्या नावाचा घसा फुटेपर्यंत जयजयकार करावयाचा, रेटारेटी करून व्यासपीठ मोडावयाचे अन् गर्दीत माणसांना चेंगरून मारावयाचे हे आमच्या पुढारी-पूजेचे नित्य स्वरूप होऊन बसले आहे. लोकशाहीचा उच्च रवाने पुरस्कार करणारे आमचे थोर पुढारीही आपल्या पूजेचा बाजार जनतेकडून भरवून घेतात नि तिच्या अधःपाताला प्रत्यही उत्तेजन देतात. अशा परिस्थितीत आदर, प्रेम, निष्ठा, दुःख, सहानुभूती ह्या भावनांचे सामाजिक वा सार्वजनिक प्रदर्शन समुचितपणे करण्याचे सामान्य ज्ञानसुद्धा येथील जनतेला कसे व्हावे ? राष्ट्रीय आनंदाची एखादी जत्रा असो वा राष्ट्रीय पुढाऱ्याची एखादी प्रेतयात्रा असो, दोन्ही ठिकाणी आमच्या जनतेची वागणूक सारखीच हुच्चपणाची असते. सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या स्मशानयात्रेला मुंबईच्या जनतेने जे धुळवडीचे स्वरूप दिले त्याची आठवण झाली म्हणजे लाजेने मान खाली घालावीशी वाटते. महापुरुषाबद्दल प्रेम दाखविण्याच्या किंवा शोक व्यक्त करण्याच्या आपल्या ह्या देशातील बहुजनांच्या पद्धती खरोखर अद्‌भुतच म्हणावयाला हव्यात ! दीडशे वर्षे इंग्रजांनी ह्या देशावर राज्य केले, पण टोप्या, विजारी नि मोडकीतोडकी इंग्रजी भाषा ह्यांच्याखेरीज आपण त्यांच्यापासून काहीही घेतले नाही असेच वाटू लागते; आणखी जे थोडेसे काही घेतले त्याचाही गेल्या साडेचार वर्षांत आपण निकाल लावून टाकला आहे. राजाला अधिकारशून्य बनवून फिरून त्याजवर अमर्याद प्रेम करणारी इंग्लंडमधील डोळस लोकशाही कुणीकडे आणि प्रजासत्ताक राज्याची घोषणा करूनही सर्व राजसत्ता एकाच व्यक्तीच्या हाती सोपविणारी भारतातील आंधळी लोकशाही कुणीकडे ? सहावे जॉर्ज ह्यांच्या मृत्युसमयी ब्रिटिश राष्ट्रातील लोकशाहीच्या ओजस्वी स्वरूपाचे जे जगाला दर्शन झाले, त्याने तर आमचे डोळे दिपले आहेत. पण त्याजबरोबर निवडणुकीनंतर आता या देशातील लोकशाहीचे भवितव्य काय होणार आहे ह्या विचाराने त्या आमच्या डोळ्यांना अंधारी येते आहे.

## ३४

# देशभक्त जयकर

डॉ. बाबासाहेब जयकरांच्या मृत्यूने भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक अलौकिक प्रतिभेची आणि पराक्रमाची विभूती अस्तंगत झालेली आहे. जयकर हे शिक्षणतज्ज्ञ होते, कायदेपंडित होते, न्यायनिपुण होते. पुणे विद्यापीठाचे ते संस्थापक होते. हे त्यांच्या बुद्धिमत्तेचे आणि कर्तृत्वाचे विविध चमत्कार कोणालाही चकित करून टाकणारे आहेत हे खरे. पण तेवढ्याने काही जयकरांच्या माहात्म्याचे यथार्थ आकलन होऊ शकणार नाही. जयकर हे महान देशभक्त होते आणि भारताच्या स्वातंत्र्याचा त्यांना आयुष्यभर निदिध्यास लागून राहिला होता. पारतंत्र्यातून स्वदेशाची मुक्तता व्हावी ह्या एकाच ध्येयाच्या सिद्धीसाठी त्यांनी आपले जीवनसर्वस्व वेचिले. तथापि, देशसेवेला आणि राजकीय जीवनाला काँग्रेसच्या राजवटीत जे सवंग आणि दिखाऊ स्वरूप आजकाल प्राप्त झाले आहे, त्याच्या तराजूत जयकरांचे देशप्रेम आणि स्वातंत्र्याचे राजकारण जोखता येणार नाही. किंबहुना, आजचे राज्यकर्ते जयकरांना ' देशभक्त ' हे विशेषण लावण्याला किंवा भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात त्यांना काही स्थान आहे हे मान्य करण्याससुद्धा तयार होणार नाहीत.

जयकरांच्या ज्वलंत स्वातंत्र्यप्रेमाचा ज्यांना निर्वाळाच हवा असेल त्यांनी त्यांच्या ' जीवन-कथे 'च्या प्रस्तावनेच्या पहिल्या नऊ ओळीच वाचून पाहाव्यात. त्यात ते म्हणतात, " माझी जीवन-कथा म्हणजे माझ्या काळात झालेल्या ' स्वातंत्र्याच्या चळवळी 'च्या इतिहासातील घटनांचे वर्णन होय. ' स्वातंत्र्याची

चळवळ ' हे अभिधान सध्या सत्तारूढ असलेल्या पक्षातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकावरून मी घेतलेले असले, तरी खरी ' स्वातंत्र्याची चळवळ ' ज्या तारखेपासून सुरू झाली असे त्या मंडळींचे म्हणणे आहे, त्यापेक्षा ती पुष्कळच आधीपासून सुरू झालेली होती एवढे मी नम्रतापूर्वक सांगतो. १८५७ साली स्वातंत्र्यप्राप्तीचा पहिला प्रयत्न झाला ही गोष्ट हिंदी आणि इंग्रज लेखकांच्या अधिकृत पुराव्याने सिद्ध झालेली आहे." ह्या थोड्याशाच ओळींमध्ये जयकरांचा जीवनहेतू आणि भारतीय स्वातंत्र्याकडे बघण्याचा यांचा दृष्टिकोण प्रकट झालेला आहे. शिवछत्रपतींचे चरित्र, सत्तावनी स्वातंत्र्यसंग्राम, वासुदेव बळवंताचा उठाव ह्या भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील विविध घटनांचा बालवयात आपल्यावर फार परिणाम झाला, असे जयकरांनी आपल्या आत्मचरित्रात नमूद केले आहे.

ज्या पाठारे प्रभू समाजात जयकर जन्माला आले, त्या समाजाचे लोक मुंबई बेटातले पहिले रहिवासी होत, आणि मुंबई शहराच्या व्यापारी आणि सार्वजनिक जीवनाचा विकास त्या लोकांनी केला, ह्या गोष्टीची जयकरांना तीव्र जाणीव असल्याने मुंबईच्या महाराष्ट्रीयत्वाचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. महाराष्ट्राबद्दल त्यांना केवढे प्रेम वाटत असे हे त्यांच्याच शब्दात सांगितलेले बरे. " महाराष्ट्र हा महान देश आहे. ती वीरांची भूमी आहे. महाराष्ट्राचे नेते हे निःस्वार्थी, आदरणीय आणि धारिष्ट्यवान असतात. सत्तावनी स्वातंत्र्य प्रयत्नानंतर परकीयांचे असह्य जोखड झुगारून देण्याचा पहिला उघड प्रयत्न त्यांनीच केला. त्यांची स्वातंत्र्याची कल्पना विशाल आणि उदार होती. सामान्य माणसाच्या मुक्ततेचा त्यात समावेश होता. माझ्या बालवयात महाराष्ट्राबद्दल ह्या ज्या भावना माझ्या मनात निर्माण झाल्या, त्या देशाच्या राजकारणात महाराष्ट्राला वेळोवेळी अन्याय होतो आहे, अगदी ह्या घटकेपर्यंत होतो आहे, हे पाहून अधिकच प्रबळ झाल्या आहेत. माझ्या महाराष्ट्रप्रेमाचा प्रौढ वयात विकास होत होत एवढा झाला की, त्यात भारताचाही समावेश झाला, ह्याच भावनेने प्रेरित होऊन मी ' होम-रूल ' चळवळीत पडलो. काही काळ असहकारितेच्या आंदोलनात नि राष्ट्रीय सभेत शिरलो आणि त्यानंतर पुढे काँग्रेस आणि ब्रिटिश सरकार ह्यांच्यामध्ये ' समझोता ' घडवून आणण्याचा मी प्रयत्न केला. स्वदेशप्रेम आणि महापुरुषांबद्दल आदर ह्यांचे तरुणांच्या अंतःकरणात बीजारोपण झाल्याशिवाय कोणताही देश स्वतंत्र झालेला नाही असा जगाच्या इतिहासाचा दाखला आहे. " जयकरांच्या जीवनाचे सारसर्वस्व ह्या उताऱ्यात दिसते.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम.................... दि: ..................
[illegible]

मुंबईसह महाराष्ट्राचा अभिमान हा जयकरांच्या भारतप्रेमाचा पाया होता हे सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे. पाठारे प्रभू समाजाची अभिजात संस्कृती, अजोबांची निःस्पृहता आणि बाणेदारपणा, आईची जाज्वल्य महाराष्ट्रभक्ती आणि ब्रिटिशांची उदारमतवादी आणि घटनावादी लोकशाहीनिष्ठा ह्या सर्व गुणांचा अद्‌भुत वारसा जयकरांना मिळाला असल्यामुळे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रखरता आणि शीतलता ह्यांचा मनोज्ञ आणि आल्हादकारक संगम झालेला होता. ज्या काळात जयकरांनी आपले महत्त्वाचे कर्तृत्व केले, तो काळ टिळकांच्या आणि गांधीजींच्या जहाल आणि स्फोटक राजकारणाचा होता. भारताच्या वातावरणात त्या वेळी एकसारखी वादळे उठत होती. मेघांचा गडगडाट वाजत होता; आणि विद्युल्लतांचा कडकडाट होत होता. पण तशाही परिस्थितीत जयकर एखाद्या पूर्ण चंद्राप्रमाणे शांत, निवांत आणि निश्चल तेजाने वावरून मार्गदर्शन करीत होते. गांधीजी किंवा त्यांच्या प्रभावळीतील लहानमोठ्या ग्रहांचा प्रकाश त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व केव्हाही दिपवू शकला नाही.

सौजन्य, सुज्ञता, सभ्यता आणि रसिकता ह्यांचा अतीव सुवासिक समन्वय जयकरांच्या ठायी झाला असल्याने, स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांच्या व्यक्तित्वाभोवती एक विलक्षण वलय निर्माण झाले होते, आणि त्याच सामर्थ्यामुळे तेजबहादूर सप्रूंच्या सहकार्याने त्यांनी राजसत्ता नि जनता ह्यांच्या संग्रामात 'सुवर्णमध्य' साधण्याचा भगीरथ प्रयत्न केला. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले तेव्हा पाऊणशेच्या घरात ते येऊन ठेपले असल्याने प्रत्यक्ष राजकारणातून ते निवृत्त झाले असले, तरी राज्यकर्ते आणि जनता ह्यांचा 'सुवर्णमध्य' साधण्याची आपली भूमिका त्यांनी कधीही सोडली नाही.

भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्या जीवनावर ठसा उमटल्यामुळे ते 'अनासक्त कर्मयोगी' झाले होते. राज्यकर्त्यांच्या रागालोभाची त्यांना जशी परवा नव्हती, त्याप्रमाणे नुसती लोकप्रियता मिळविण्याचीही लालसा त्यांनी मनात कधी बाळगली नाही. म्हणून भर्तृहरी या संस्कृत कवीने नीतिशतकात म्हटल्याप्रमाणे आधुनिक भारतवर्षात त्यांच्यासारखा 'नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता' पाहावयास मिळणे दुर्मिळ आहे. त्यांच्या मृत्यूने भारताचा एक थोर पुत्र गेला; महाराष्ट्राचा महान आधार कोसळला. भारतीय राजकारणात तर असा रसिक, उमदा आणि रुबाबदार मुत्सद्दी पुन्हा लौकर निर्माण होईल असे वाटत नाही !

(मराठा : १२-३-१९५९)

३५

## केशवराव जेधे

फारच वाईट झाले. केशवराव जेधे गेले. अकस्मात गेले. सगळे कसे स्वप्नासारखे घडले. मंगळवारी संध्याकाळी शनिवारवाड्यासमोर होणाऱ्या माझ्या व्याख्यानाचे अध्यक्ष होते ते. प्रारंभीच त्यांनी भाषण केले. चीनच्या प्रश्नावर एकदम प्रक्षुब्ध होऊन त्यांनी सूर चढविला. त्यामुळे त्यांच्या स्वरात एकदम कंप निर्माण झाला, आणि शब्दोच्चार अस्पष्ट होऊ लागला. तथापि, त्यांच्या व्याख्यानाशी परिचित असणाराला त्यात काही नवीन नव्हते. नंतर त्यांचा आवाज एकदम मंद झाला, आणि त्यांचे भाषण संपले. पण त्यांना बसता काही आले नाही. जवळ जवळ ते मागे कोसळलेच. त्यानंतर जयंतराव टिळकांचे भाषण सुरू झाले. मी केशवरावांच्या चेहऱ्याकडे बघू लागलो. काही तरी चमत्कारिक भावना त्यांना होत असावी असे मला वाटले. मी त्यांना विचारले. पण ते बोलले नाहीत. त्यांना धाप लागली होती. तेव्हा मी त्यांना पाणी मागवून दिले. त्यांनी हातांनी ग्लास घेतला नि ते नीटपणे पाणी प्याले. मी बोलावयाला उठलो, तेव्हा त्यांची अस्वस्थता जास्तच वाढल्याचे मला आढळले. तेव्हा माझी मोटर व्यासपीठाच्या मागे मी बोलावून घेतली नि त्यांची रवानगी ताबडतोब इस्पितळात करवली. मोटरीत त्यांना बसवताना फारच कष्ट पडले. शिवछत्रपतींच्या कृपेने त्यांना आराम वाटो अशी इच्छा व्यक्त करून मी व्याख्यानास सुरुवात केली. व्याख्यान संपल्यानंतर मी सरळ त्यांना भेटण्यास इस्पितळात गेलो. बाहेर पावसाची विलक्षण झड सुरू झाली

होती. केशवरावांना पक्षघाताचा झटका आल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

बिछान्यावर पडलेले केशवराव निर्जीव नेत्रांनी आमच्याकडे बघत होते. त्यांचा उजवा पाय थरथरत होता. मुद्रेत विकृती आली होती. नाकपुड्या विषम दिसत होत्या. जीभ लुळी पडली होती. त्यांचा डावा हात थोडा वेळ मी हातात धरला नि ‘सर्व काही ठीक होईल’ असा दिलासा देऊन मी व्यथित मनाने त्यांचा निरोप घेतला. आता तो शेवटचाच ठरला. व्याख्यानाच्या एका सामान्य प्रसंगातूनच एवढी दुर्घटना निर्माण होईल अशी कल्पनाही नव्हती कोणाला.

गेली काही वर्षे केशवराव व्याधिग्रस्तच होते. पण त्यातून सुखरूपपणे ते निभावले होते. त्यांच्या आयुष्याची दोरी इतक्या अचानकपणे तुटेल असे स्वप्नातदेखील कोणाला वाटले नाही. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या नंतर इतक्या लौकर महाराष्ट्रातील बहुजनसमाजाचा दुसरा महान लोकप्रिय पुढारी जावा, ही खरोखरच मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय.

फर्ग्युसन कॉलेजात ते माझ्यापुढे एखादे वर्ष असतील. पदवीच्या परीक्षेला बसण्यापूर्वीच त्यांनी कॉलेज सोडले. त्यांचे इंग्रजी नि मराठी अक्षर मोठे वळणदार होते, एवढी मला त्या काळातली त्यांची आठवण आहे. तरुणपणापासून त्यांना सार्वजनिक कार्याची आणि लोकसेवेची विलक्षण तळमळ आणि आवड. प्रारंभी ‘सत्यशोधक’ चळवळीत त्यांनी उडी घेतली. त्या वेळी त्यांचे सहकारी दिनकरराव जवळकर होते. थोड्याच दिवसांत ‘जेधे-जवळकर’ हे जोडनाव साऱ्या पुण्यात प्रसिद्ध झाले आणि ‘जेधे मॅन्शन’ हे ब्राह्मणेतर चळवळीचे महत्त्वाचे केंद्र बनले. चाळीस वर्षांपूर्वी पुण्याच्या सार्वजनिक जीवनामधल्या ब्राह्मणी वर्चस्वाच्या नि मक्तेदारीच्या विरुद्ध ‘जेधे मॅन्शन’ने वृत्तपत्रांच्या नि ‘छत्रपति’ मेळ्याच्या द्वारे जी आघाडी उघडली, तिचे नेतृत्व तरुण केशवरावांनी घेतले. तथापि, ब्राह्मणवर्गावरील त्यांची टीका जवळकर किंवा बागडे ह्यांच्याएवढी भयंकर नसे.

पुणे नगरपालिकेत निवडून आल्यानंतर महात्मा फुले ह्यांचा पुतळा उभारण्यासाठी त्यांनी जी प्रचंड चळवळ केली आणि अस्पृश्यांच्या पर्वती सत्याग्रहात त्यांनी जो पुढाकार घेतला, त्यामुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व इतर ब्राह्मणेतर पुढाऱ्यांपेक्षा वेगळे असल्याचे दिसून आले. अठ्ठावीस-एकोणतीस सालच्या सुमारास तात्यासाहेब केळकर आणि

टिळकपंथीय मंडळी काँग्रेसमधून बाहेर पडली. आणि त्यानंतर काँग्रेसच्या नेतृत्वात आणि संघटनेत आमूलाग्र क्रांती घडून आली. पुण्यातला पांढरपेशा वर्ग पुष्कळ प्रमाणात काँग्रेसमधून बाहेर पडला. त्याबरोबर काँग्रेसकडे पाहण्याची बहुजनसमाजाची दृष्टीच बदलली. केशवरावांसारख्या ध्येयवादी आणि धडाडीच्या लोकसेवकाला ब्राह्मणेतर चळवळीचे क्षेत्र असमाधानकारक वाटू लागले. ते तडक काँग्रेसच्या झेंड्याखाली येऊन दाखल झाले नि तीस सालच्या कायदेभंगाच्या कुंडात त्यांनी एकदम उडी मारली.

केशवरावांच्या सार्वजनिक जीवनाला येथून खरा प्रारंभ झाला. महाराष्ट्रातल्या जातीयवादी चळवळीला राष्ट्रीय आंदोलनाच्या विशाल प्रवाहात आणून सोडण्याचे आणि काँग्रेसचे लोण महाराष्ट्रातल्या बहुजनसमाजापर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केशवरावांनी केले. हे त्यांचे महाराष्ट्रावर फार मोठे उपकार होत. पस्तीस साली ते काका गाडगिळांच्याबरोबर मध्यवर्ती कायदेमंडळात प्रचंड बहुमतांनी निवडून आले. त्यानंतर पुढे ते महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यांच्याइतकी अमाप लोकप्रियता महाराष्ट्रातल्या कोणत्याच काँग्रेसपुढाऱ्याला लाभली नाही. ते काँग्रेसमधे गेले तरी पण गांधीवाद्यांच्या कधी वाऱ्याला उभे राहिले नाहीत. त्यांच्या ढोंगीपणाचा त्यांना मनस्वी तिटकारा असे. केशवरावांचा बाणा अगदी शुद्ध मराठी होता. आत बाहेर असे त्यांच्याजवळ काही नसे. प्रामाणिकपणे त्यांना जे वाटेल ते कोणाची भाडभीड न धरता छातीठोकपणे ते सांगून टाकीत. त्यांच्या ह्या निर्भीडपणाला निर्मत्सरी स्वभावाची आणि निर्मळ अन् निरपवाद चारित्र्याची विलक्षण जोड मिळाली असल्यामुळे, महाराष्ट्र काँग्रेसमधली मतलबी आणि ढोंगी माणसे त्यांना चळचळा कापत. वृत्तीने ते अत्यंत निगर्वी आणि अनासक्त होते. कोणतीही वैयक्तिक महत्त्वाकांक्षा त्यांनी कधी बाळगली नाही. स्वतःचे महत्त्व वाढावे, स्वतःचा मानसन्मान व्हावा, स्वतःच्या हाती सत्ता किंवा अधिकार यावा असा विचार चुकूनसुद्धा त्यांच्या चित्ताला कधी शिवला नसेल. त्या दृष्टीने ते 'संन्याशी'च होते. सत्तेच्या राजकारणात जर का ते पडले असते तर आज यशवंतराव चव्हाण किंवा भाऊसाहेब हिरे ह्यांची नावेसुद्धा कोणाला ऐकू आली नसती. निदानपक्षी आज ते 'राज्यपाल' तरी असते. सबंध आयुष्यभर फळाची आशा न धरता निष्काम बुद्धीने केशवरावांनी लोकसेवा केली, हे त्यांच्या चारित्र्याचे सर्वांत मोठे बळ होते.

वस्तुतः काका गाडगीळ आणि केशवराव ह्यांच्यामध्ये कसलेही साम्य

नसताना महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात अनेक वर्षे जेधे-गाडगीळ रामलक्ष्मणाप्रमाणे वावरले, हा फार मोठा चमत्कार आहे. गाडगिळांच्या अंगातले अनेक दोष केशवरावांना माहीत असूनही त्यांचे काकांवर विलक्षण प्रेम होते. पण गाडगिळांच्या संगतीचा राजकीय जीवनात केशवरावांना जेवढा फायदा व्हावयाला पाहिजे होता तेवढा झाला नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस जेव्हा सत्ताधारी झाली तेव्हा केशवरावांना तिचा उबग आला. काँग्रेस म्हणजे स्वार्थी आणि संधिसाधू लोकांचा बाजार आहे ही गोष्ट त्यांना प्रत्यक्षच दिसून आली. तेव्हा ताडकन काँग्रेस सोडून ते बाहेर पडले आणि त्यांनी 'शेतकरी कामगार पक्षा'ची स्थापना केली. पण तेथे त्यांना शंकरराव मोरे भेटले. काकांच्या कचाट्यातून ते निसटले अन् शंकररावांच्या सपाट्यात सापडले! त्यामुळे जितक्या त्वेषाने ते काँग्रेसमधून बाहेर पडले, तितक्याच आवेगाने ते शेतकरी कामगार पक्षातून बाहेर पडून पुन्हा काँग्रेसमध्ये परतले! आणि अशा वेळी की जेव्हा सारा महाराष्ट्र दंड थोपटून काँग्रेसशी लढायला उभा होता!

गाडगिळांनी केशवरावांचे जेवढे नुकसान केले, त्यापेक्षाही मोऱ्यांनी त्यांचे अधिक नुकसान केले. नाहीतर आज केशवराव हे समितीचे अग्रगण्य पुढारी असते! केशवराव काँग्रेसमधे परत गेले खरे, पण त्यानंतर त्यांचे मन काही तेथे रमले नाही. केवळ शरीराने ते काँग्रेसमधे होते इतकेच. त्यांचे चित्त संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात गुंतले होते. विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा क्षण इतका समीप येऊन ठेपला असता तो डोळ्यांनी बघण्याचे भाग्य त्यांना लाभू नये, ह्याचे सर्वांत दुःख वाटते. व्यक्तिशः त्यांचा आणि आमचा तीस वर्षांचा ऋणानुबंध होता. त्याचा तपशील सांगण्याचे हे स्थळ नव्हे. एकच सांगतो. 'महात्मा फुले' हा चित्रपट जेव्हा आम्ही काढला, तेव्हा त्याबाबत आर्थिक मदत त्यांनी आम्हांला केली. एवढेच नव्हे तर त्या चित्रपटात एक लहानशी भूमिकासुद्धा केली.

केशवरावांच्या अकाल मृत्यूने महाराष्ट्रातील बहुजनसमाजाचे अपरंपार नुकसान झाले आहे, ह्यात काही शंका नाही. मराठी जनतेचा असा सच्चा, त्यागी, दिलदार आणि झुंजार कैवारी पुन्हा महाराष्ट्रात लौकर होणार नाही! एका शूर शिवकालीन घराण्यात जन्माला आलेल्या महाराष्ट्राच्या ह्या महान पुत्राला शिवछत्रपतींच्या महाराष्ट्राचे अभिवादन! (मराठा : १४-११-१९५९)

## ३६

# उपेक्षित देशभक्ताचे निधन !

भारताच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपला देह वर्षानुवर्षे चंदनासारखा झिजविला अन् मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा म्हणून ज्यांनी आपली तीन तपांची पक्षनिष्ठासुद्धा पणाला लावली, ते मुंबई शहरातले एक वयोवृद्ध नि जाज्वल्य देशभक्त आणि अजातशत्रू अन् आबालवृद्ध प्रिय नेते प्रा. दत्तात्रय रामचंद्र ऊर्फ तात्यासाहेब घारपुरे हे कॅन्सरच्या अकस्मात उद्रेकाने काल पहाटे कालवश झाले, हे आमच्या वाचकांना सांगताना आम्हांला अतीव दुःख होते. तात्यासाहेबांचा नि आमचा गुरुशिष्याचा संबंध होता. तेरा साली पुण्याच्या 'भावे स्कूल' मध्ये आम्ही इंग्रजी सहावीत असताना एम्. ए., बी. एससी. ह्या अत्युच्च विश्वविद्यालयीन पदव्या वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी संपादित केलेला एक तेजस्वी, हसतमुख आणि तरणाबांड शिक्षक एक दिवस आमच्या वर्गात प्रविष्ट झाला, आणि नुसत्या दृष्टिपाताने त्याने आमच्यासारख्या चाळीस वात्रट आणि अवखळ पोरांची मने जिंकली. त्यांच्या सौम्यमनोहर व्यक्तिमत्त्वाचा त्या क्षणी आम्हांला जो हृदयंगम साक्षात्कार झाला, त्याचा संस्कार गेली सत्तेचाळीस वर्षे क्षणमात्र आमच्या मनावरून कधी क्षीण झाला नाही.

एकोणीसशे सोळा साली पुण्यामध्ये 'न्यू पूना कॉलेज' निघाले. प्राध्यापक म्हणून तात्यांची त्या कॉलेजात नेमणूक झाली. वीस साली महात्मा गांधींनी 'असहकारा'चे रणशिंग फुंकले. त्या वेळी आपल्या अंगावरचा प्राध्यापकीय काळा झगा भिरकावून देऊन स्वातंत्र्यलढ्याच्या आघाडीवर तात्या स्वयंस्फूर्तीने

दाखल झाले. तात्यांच्याबरोबर नारोपंत फडके ह्यांनीही आपल्या प्राध्यापकीचा राजीनामा देऊन गांधीजींच्या राजकारणात उडी मारली. पण तात्यांची काँग्रेस-निष्ठा आमरणान्त अढळ राहिली, तर नारोपंतांनी अवघ्या सहा महिन्यांच्या आत काँग्रेसच्या राजकारणामधून पोबारा केला. त्यानंतर काही काळ 'राष्ट्रीय शिक्षणा'च्या कार्याला तात्यांनी स्वतःला वाहून घेतले. पुढे मग ते मुंबईला येऊन स्थायिक झाले. सदोबा पाटील ज्या वेळी कोणीच नव्हते, त्या वेळी मुंबई काँग्रेसची सारी सूत्रे तात्यांच्या हाती होती. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात अनेकवार कारागृहवास त्यांना भोगावा लागला. तात्यांचा स्वभाव पहिल्यापासून प्रसिद्धि-पराङ्‌मुख आणि निरभिलाषी असल्यामुळे, काँग्रेसची सारी सत्ता त्यांच्या मुठीत असूनही त्यांनी स्वतःची जाहिरात जशी केली नाही, त्याप्रमाणे इतर काँग्रेस-नेत्यांप्रमाणे त्यांनी स्वतःचेही खिसे कधी गरम केले नाहीत. इतका नम्र आणि निर्मळ माणूस मुंबई काँग्रेसच्या संघटनेत कधी वावरलाच नसेल.

सदोबा पाटलांची असुरी राजवट मुंबई शहरात सुरू झाल्यानंतर आणि त्यांच्या ग्रहमालिकेत मुंबईचे भांडवलदार किंवा त्यांचे बगलबच्चे फिरू लागल्या-नंतर, तात्यांसारख्या सात्त्विक सज्जनाला काँग्रेस-संघटनेत काही स्थानच राहिले नाही. गेल्या चाळीस वर्षांत तात्यांसारखा विद्वान, कर्तृत्ववान, चारित्र्यसंपन्न आणि कर्मयोगी पुरुष काँग्रेसमध्ये कोणीही झालेला नाही, यात अक्षराचीही अतिशयोक्ती नाही. दहा दहा वर्षे त्यांच्या मागून काँग्रेसमध्ये शिरून बाळासाहेब खेर, मोरारजी देसाई किंवा सदोबा पाटील ह्यांच्यासारखी फडतूस, हिणकस अन् संधिसाधू माणसे मुंबई राज्याच्या आणि भारत सरकारच्या मंत्रिपदावर चढून बसली. त्याखेरीज, कोणी घटना समितीत गेले, कोणी राज्यपाल झाले, कोणी मोठमोठ्या परराष्ट्राचे वकील झाले. कोणाची मोठमोठ्या कमिशनांवर अन् कमिट्यांवर वर्णी लागली. कोणी पद्मश्री झाले, कोणी पद्मविभूषण झाले, कोणी भारतरत्न झाले, पण सतत चाळीस वर्षे काँग्रेसची एवढी त्यागपूर्वक सेवाचाकरी करून तात्यांना काँग्रेसकडून काय मिळाले? सांगा, काय मिळाले? काही नाही! काही हो नाही! मालक कितीही दुष्ट असला तरी तो बैलाच्या पुढे वैरणीची चारदोन ताटे तरी फेकतो. पण काँग्रेसने तात्यांच्याकडून चाळीस वर्षे वाटेल तशी हमाली करून घेतली, पण सत्तेची किंवा सन्मानाची खैरात करताना काँग्रेसश्रेष्ठींना तात्यांची चुकूनसुद्धा कधी आठवण झाली नाही. पंडित नेहरू तात्यांना ओळखत तरी असतील की नाही ह्याची शंका आहे. एवढे असून,

तात्यांच्या तोंडावरचे ते मनमोहक स्मित, सार्वजनिक कार्याबद्दलचा त्यांचा तो दुर्दम्य उत्साह आणि काँग्रेसबद्दलची त्यांची ती अव्यभिचारी निष्ठा तिळमात्र कधी कमी झाली नाही.

संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन जेव्हा सुरू झाले तेव्हा तात्यांचे घर त्या आंदोलनाचे केंद्रस्थान झाले. संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा नि त्यामध्ये मुंबईचा राजधानी म्हणून समावेश व्हावा ह्यासाठी तात्यांना जी अंतःकरणापासून तळमळ वाटत होती, तिचे शब्दांनी वर्णन करता येत नाही. तेवढ्यासाठी त्यांनी आपल्या अढळ काँग्रेसनिष्ठेलासुद्धा काही काळ मुरड घातली. द्विभाषिक राज्याचे विभाजन होऊन मुंबई राजधानी असलेले महाराष्ट्र राज्य निर्माण होत असल्याचे जेव्हा त्यांनी ऐकले, तेव्हा हर्षोत्फुल्ल अंतःकरणाने ते पुन्हा काँग्रेसमध्ये प्रविष्टले. गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नाटकातील दारुबाज नवऱ्यावरील सिंधूचे अनिर्वचनीय प्रेम बघून प्रेक्षकांना जसे रडू येते, त्याप्रमाणे सतत चाळीस वर्षे ज्या कृतघ्न नि उलट्या काळजाच्या काँग्रेसने तात्यांसारख्या निष्ठावंत भक्ताची पद्धतशीर रीतीने उपेक्षा केली, ती पाहिली की आतड्यांना पीळ पडतो. काँग्रेसच्या व्यसनामुळे तात्यांच्या जीवनाची जी शोककथा झाली, ती पाहिली म्हणजे कोणीही स्वाभिमानी मराठी माणूस प्राण गेला तरी काँग्रेसमध्ये शिरणार नाही. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हेच तात्यांच्या जीवनाचे खरे साफल्य! तो आनंद आयुष्याच्या शेवटच्या क्षणी तरी तात्यांना लाभला याचेच सर्वांना समाधान वाटेल. सतत चाळीस वर्षे काँग्रेसने ज्यांची अक्षम्य उपेक्षा केली, अशा या थोर मराठी देशभक्ताचे स्मरण कृतज्ञताबुद्धीने महाराष्ट्राने आपल्या अंतःकरणात जागृत ठेवले, तर परलोकी तात्यांच्या आत्म्याला तेवढीच धन्यता वाटेल अशी आमची श्रद्धा आहे.

(मराठा : १४-४-१९६०)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७१०५१ दि. ५१९५
क्रमांक 2903 नों. दि. 3

## ३७

# देशभक्त भोपटकर

अण्णासाहेब काल दुपारी गेले. पुण्याहून फोन आला. फार वाईट वाटले. गेल्या चाळीस-पन्नास वर्षांचे पुण्याचे सार्वजनिक जीवन डोळ्यांसमोरून चित्रपटासारखे सरकले. गेली कित्येक वर्षे अण्णासाहेब अंथरुणाला खिळून होते. ह्या अपंग अवस्थेत 'मराठा' वाचून घेणे हाच त्यांचा एकमेव आनंदाचा विषय होता. ते कट्टर 'संयुक्त महाराष्ट्र'वादी होते, आणि आम्हांला अधूनमधून घरी बोलावून मुक्तकंठाने ते आमचे अभिनंदन करीत. अण्णासाहेबांशी गप्पा मारणे हा एक आमच्या आयुष्यातला अविस्मरणीय अनुभव होता.

उभ्या आयुष्यात ते मोकळेपणाने आणि बेधडकपणे वावरले होते. त्यांच्या शब्दकोशात भय हा शब्दच नव्हता. त्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात खेळाडूपणा आणि आशावाद तुडुंब भरला होता. मराठ्याचा रंगेलपणा आणि कुर्रेबाजपणा त्यांच्या वृत्तीमध्ये ठासून भरला होता. त्यामुळे अण्णासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एक विलक्षण आकर्षण निर्माण झाले होते. गेल्या तीन तपांमध्ये पुण्याच्या सार्वजनिक जीवनामध्ये वावरणाऱ्या पुष्कळ मोठमोठ्या माणसांशी आमचा संबंध आला. पण अण्णासाहेबांचे प्रकरण काही वेगळेच होते. तात्यासाहेब केळकर एवढे मोठे पण शेवटी शेवटी त्यांची थट्टा झाली, पण अण्णासाहेबांनी उभ्या आयुष्यात कधी आपले हसे करून घेतले नाही. सार्वजनिक जीवनात मोठ्या रुबाबाने ते वावरले. त्यांचे थोरले बंधू 'भाला'कार भोपटकर म्हणजे काही सामान्य 'वल्ली' नव्हे. एक काळ पुणे त्यांनी गाजविले.

पण त्यांच्या विक्षिप्तपणाचा उपसर्ग अण्णासाहेबांनी कधीही स्वतःला लावून घेतला नाही.

लोकमान्य टिळकांची स्वराज्याची चळवळ जेव्हा सुरू झाली, तेव्हा अण्णासाहेबांची जाहीर भाषणे ऐकण्याचा पहिल्याने आम्हांला योग आला. लोकमान्यांच्या खालोखाल त्या वेळी आम्हांला अण्णासाहेबांची भाषणे आवडत. कारण अण्णासाहेबांची बोलण्याची पद्धती पहिल्यापासून सडेतोड आणि छातीठोक. एखाद्या पहिलवानाप्रमाणे दंड थोपटून ते सरकारला आव्हाने देत. त्या काळात इतक्या उग्रपणे आणि बेडरपणे बोलणे फारच धोक्याचे असे. शिवरामपंत परांजपे रूपकात बोलत तर तात्यासाहेब केळकरांचे 'नरो वा कुंजरो वा' तंत्र असे. पण अण्णासाहेबांचा सगळा कारभार उघडा. आडपडदा काही नाही. 'हा अण्णा भोपटकर उद्या मुंबईचा गव्हर्नर झाला; किंवा हिंदुस्थानचा व्हाईसरॉय झाला अथवा इंग्लंडच्या सिंहासनावर बसला, तर मी आपल्याला असे निश्चितपणे सांगतो' असे आपल्या व्याख्यानात चार दोन वेळा तरी बोलल्यावाचून ते राहात नसत. त्यांच्या तालीमबाजीचा त्यांच्या राजकारणावर फार मोठा ठसा पडला होता. त्यामुळे त्यांचे व्याख्यान नेहमी गुर्मीत व्हावयाचे. लोकमान्यांनंतर महाराष्ट्राचे पुढारी अण्णासाहेब होणार असे त्या वेळच्या आम्हा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना वाटे.

काँग्रेसच्या राजकारणात केळकरांप्रमाणे भोपटकरांचे मन कधीच रमले नाही. कौन्सिल-बहिष्काराच्या प्रश्नावर काँग्रेसमध्ये 'फेरवाले' आणि 'नाफेरवाले' ह्यांची रणधुमाळी माजली. त्यातून 'स्वराज्य पक्ष' जन्माला आला. तेथून पुढे गांधीजींच्या राजकारणाची आणि त्यांची हळूहळू फारकतच होत गेली. चौतीस-पस्तीस सालानंतर ते काँग्रेसमधून बाहेरच पडले. गांधीजींचे राजकारण मराठी पिंडाच्या आणि बाण्याच्या माणसाला कधी मानवणारे नव्हते. कारण त्यात राजकारणापेक्षा ढोंग आणि धत्तुरेच फार. केळकर, जयकर, सावरकर, आंबेडकर, भोपटकर, मुंजे, खरे ह्या मराठी हाडाच्या सर्व मोठमोठ्या माणसांनी महाराष्ट्रात गांधीजींच्या राजकारणाला निकराचा विरोध केला. त्यामध्ये त्यांचे फार नुकसान झाले, पण त्याची त्यांनी कधीच पर्वा केली नाही.

काँग्रेस सोडल्यानंतर अण्णासाहेब हिंदू महासभेच्या राजकारणात शिरले, पण टिळकांच्या राजकारणात असताना त्यांचे जे तेज आणि जो दिमाख प्रकट झाला, तसा पुन्हा कधीच दिसला नाही. ह्याचे कारण हिंदू महासभेच्या राजकारणात

अण्णासाहेबांच्या जाज्वल्य देशाभिमानाला निर्भेळपणे प्रकट व्हावयाला कधीच वाव मिळाला नाही. काँग्रेसशी जमेना आणि हिंदू महासभेत चमकेना, अशी अण्णासाहेबांची बिकट परिस्थिती झाल्याने त्यांचे राजकीय जीवन संपुष्टात आले. त्यामुळे महाराष्ट्र एका महान नेत्याला निष्कारण मुकला.

'धर्मवीर' अण्णासाहेब किंवा 'हिंदुसभेचे पुढारी' अण्णासाहेब ह्या संबोधनामुळे पुष्कळांना असे वाटे की, ते कट्टर सनातनी असावेत. पण त्यांचा पिंड अस्सल सुधारकाचा होता. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला ऐन तरुणपणापासून त्यांनी स्वतःला वाहून घेतले होते. पुण्यातील सार्वजनिक पाणवठे अस्पृश्यांना खुले करण्यासाठी त्यांनी चळवळ केली होती. जातीजातीमधील मिश्रविवाहांना त्यांचा पाठिंबा होता. पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात अण्णासाहेबांनी इतकी कामे केली की, त्याचा एक ग्रंथच होईल.

त्यांच्या कर्तृत्वाचे आणि बुद्धिमत्तेचे अनेक पैलू होते. सार्वजनिक जीवनाच्या आणि व्यवसायाच्या डोंगराएवढ्या व्यापामधेही त्यांचा विद्याव्यासंग आणि लेखन अहर्निश चालू असे. त्यांनी कायद्याची पुस्तकें लिहिली. राजकारण व व्यायामशास्त्रावर लेखन केले. कथाकादंबरी वाङ्मयही निर्माण केले. शिवाय काही काळ ते 'लोकसंग्रह' आणि 'लोकमान्य' ह्या दैनिकाचे संपादकही होते.

मराठ्याचा झुंजार आणि बंडखोर बाणा अण्णासाहेबांनी उभ्या आयुष्यात कधी सोडला नाही. त्यांच्या धैर्याची आणि धाडसाची अनेक उदाहरणे जगजाहीर आहेत. सोन्यामारुतीच्या दंगलीत त्यांनी स्वतःच्या प्राणाची कधी पर्वा केली नाही. येरवडा तुरुंगाच्या कोठडीत त्यांनी नागाशी झुंज दिली. पुणे महापालिकेत महात्मा गांधींच्या आगमनाच्या वेळी झालेल्या बॉंबस्फोटात लहानमोठ्या ब्याहत्तर जखमा त्यांच्या अंगावर झाल्या, पण त्यांनी हूं का चूं केले नाही. गांधीहत्येनंतर पुण्यातल्या गुंडांनी त्यांच्या घराला गराडा घालून त्याला आग लावण्याचा प्रयत्न केला, पण त्याची पर्वा त्यांनी केली नाही. त्यांच्या कर्तृत्वाच्या नि बुद्धिमत्तेच्या मानाने त्यांना महाराष्ट्रात जे महापद प्राप्त व्हावयाला पाहिजे होते ते न लाभले, तरी जीवनातले साफल्य आणि समाधान त्यांना लाभले होते हे निश्चित. अण्णासाहेबांच्या मृत्यूने महाराष्ट्राच्या राजकारणातला लोकमान्य टिळकांचा शेवटचा सेनापती गेला! 'दैनिक मराठा'च्या हजारो वाचकांच्या तर्फे आम्ही ह्या झुंजार नरवीराला अखेरचा मुजरा करतो.

(मराठा : १५-४-१९६०)

## ३८

# भाऊसाहेब हिरे

भाऊसाहेब हिरे गेले. अकस्मात गेले. ऐन दिवाळीच्या तोंडाला नि सार्वत्रिक निवडणुका इतक्या जवळ आल्या असताना गेले. फार वाईट झाले. महाराष्ट्र काँग्रेसचा एक आधारस्तंभ गेला. आमची नि भाऊसाहेबांची गेल्या पंधरा वर्षांची ओळख होती. ह्या काळात त्यांचे नि आमचे अनेकदा बरेवाईट संबंध आले. तथापि, असे असूनही जेव्हा जेव्हा आमची गाठ पडे तेव्हा तेव्हा ते आमच्याशी अत्यंत सौजन्याने आणि अगत्याने बोलत असत. भाऊसाहेबांच्या स्वभावाचे ते एक विलोभनीय वैशिष्ट्य असे. राग म्हणून त्यांना कसा तो माहीत नव्हता. कोणी कितीही त्यांच्यावर टीका केली तरी त्यांची शांतता नि संयम ढळत नसे. अर्थात स्पष्ट बोलायला ते कधी भीत नसत. पण ते बोलतानासुद्धा त्यांची कळकळ आणि प्रांजलपणा ऐकणाराला जाणवल्याखेरीज राहात नसे.

आमचा नि त्यांचा पहिला संबंध अत्यंत चमत्कारिक परिस्थितीत आला. पंचेचाळीस साली ते आणि काका गाडगीळ हे जेव्हा मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून आले, तेव्हा त्या उभयतांचा सत्कार पुण्याच्या मंडईत आमच्या अध्यक्षतेखाली होणार होता. त्या समारंभाला पाऊण लाख लोक जमले होते. पण आमच्याबद्दल वाटणाऱ्या व्यक्तिगत मत्सरामुळे काका गाडगिळांनी त्या सोन्यासारख्या सभेचे वाटोळे करून टाकले. काका आम्हांला म्हणाले, "या सभेत एक तुमचे तरी भाषण होईल, नाही तर माझे तरी भाषण होईल!" तेव्हा आम्ही ताडकन् त्यांना सांगितले की, "गर्दी माझ्यासाठी जमली असली

तरी सत्कार तुमचा आहे. होऊन द्या तुमच्याच मनासारखे" असे म्हणून आम्ही ताडकन् त्या सभेतून चालते झालो. बिचाऱ्या भाऊसाहेबांना त्या वेळी फार वाईट वाटले. ते मान खाली घालून स्तब्ध उभे होते. तीच त्यांची नि आमची पहिली भेट.

सत्तेचाळीस साली देशाची फाळणी झाली, आणि आम्ही काँग्रेसमधून बाहेर पडलो. त्यानंतर राजकीय दृष्ट्या आम्ही एकमेकापासून दुरावलो. पण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रारंभीच्या चळवळीची धुरा भाऊसाहेबांनी आपल्या खांद्यावर घेतली आणि ठिकठिकाणी परिषदा भरवून त्या प्रश्नावर लोकजागृती केली. ते पाहून साहजिकच त्यांच्याबद्दलचा आमचा आदर दुणावला. ह्या काळात महाराष्ट्र काँग्रेसचे जुने पुढारीपण मागे पडून ते भाऊसाहेबांकडे आपोआप चालत आले. त्यामुळे महाराष्ट्रातल्या बहुजनसमाजाच्या गळ्यातले ते ताईत होऊन बसले. 'हिरे बोले आणि काँग्रेस हाले' अशी महाराष्ट्रात त्या वेळी स्थिती होती.

आम्हांला त्यांचा पहिल्याने राग जर केव्हा आला असेल तर बलसाडच्या निवडणुकीत नरराक्षस मोरारजी हा पडला असताना, मुंबई राज्याचा मुख्यमंत्री होण्याची संधी आपोआप त्यांच्याकडे चालत आली असता त्यांनी ती दवडली तेव्हा. नेहरूंनी त्यांना तसे विचारलेसुद्धा असे म्हणतात. पण भाऊसाहेबांनी हातपाय गाळले आणि मोरारजीवाचून मुंबई राज्याचा कारभार चालणे अशक्य आहे असे त्यांना सांगितले. अशा रीतीने औषधावाचून मोरारजीचा 'खोकला' चांगला जात असता, भाऊसाहेबांनी तो आमंत्रण देऊन परत आणला आणि आमच्या बोकांडी बसविला. तेव्हापासून आम्ही भाऊसाहेबांवर अत्यंत कडक टीका करू लागलो.

एकदा शिवाजी पार्कवर सदोबा पाटलांच्या अध्यक्षतेखाली भाऊसाहेबांचा सत्कार होता. त्या वेळी सदोबा म्हणाले, "लोकमान्यांनंतर महाराष्ट्राला जर कोणी लोकप्रिय पुढारी मिळाला असेल तर तो म्हणजे हिरे!" त्यावर आम्ही 'नवयुग'मधे संतापून लिहिले की 'कोठे तो सिंह, अन् कोठे हा ग्रामसिंह?' ती आमची टीका भाऊसाहेबांच्या वर्मी लागली. कोयनेच्या पायाभरणीच्या समारंभात त्यांची आमची गाठ पडली, तेव्हा जाहीर सभेत अगदी सद्गदित होऊन भाऊसाहेब म्हणाले, "आम्ही आमच्या शक्तीप्रमाणे अत्यंत निष्ठापूर्वक महाराष्ट्राची सेवा करीत असताना काहींनी आम्हांला ग्रामसिंह म्हणावे ह्याचे आम्हांला दुःख होते." समारंभ संपताच भाऊसाहेबांचे हात आम्ही आपल्या

हातात धरून म्हणाले, " भाऊसाहेब, जोपर्यंत तुम्ही महाराष्ट्राची सेवा करीत आहात, तोपर्यंत पुन्हा मी तुमच्यावर टीका करणार नाही ! "

कोल्हापूरच्या पत्रकार संमेलनाचे ते उद्घाटक होते. त्या वेळी आम्ही जास्त जवळ आलो. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात एक दैनिक काढले पाहिजे असे त्यांना उत्कटतेने वाटत असे. ते काम त्यांनी आमच्याकडे सोपविले. 'महात्मा फुले' चित्रपटाला आर्थिक मदत मिळवून देण्याचे त्यांनी आम्हांला आश्वासन दिले; पण योगायोग असा होता की, ह्या दोन्ही कामांत भाऊसाहेब आम्हांला मदत करू शकले नाहीत. चांगल्या कामात दुसऱ्यांना मदत करावी असे त्यांना मनापासून वाटे, पण त्यांचा कारभार एकंदर सैल असल्याने त्याचा प्रत्यक्ष असा फायदा दुसऱ्यांना क्वचितच मिळे. पण काहीही असले तरी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ प्रत्यक्ष सुरू होईपर्यंतच्या चार पाच वर्षांच्या काळामधे भाऊसाहेबांचे नि आमचे संबंध प्रेमाचे होते. संयुक्त महाराष्ट्राची मागणी जेव्हा फाजलअल्ली समितीने नाकारली, तेव्हा संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर राजीनामे देऊन काँग्रेसमधून बाहेर पडण्याचे भाऊसाहेबांनी ठरविले होते. तो त्यांचा निर्धार जर त्यांनी अमलात आणला असता तर साऱ्या महाराष्ट्राने त्यांना डोक्यावर घेतले असते, आणि संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे ते एकमेव नेते झाले असते.

पण—पण—ह्या पणने सगळी घाण केली ! काँग्रेसमध्ये राहावे का राहू नये या विचाराच्या दोन टोकांत भाऊसाहेब हेलकावे खाऊ लागले आणि शेवटी त्यांचा अक्षरशः 'हॅम्लेट' झाला ! काँग्रेसमधून बाहेर पडतो असे हा माणूस नुसता तोंडाने बोलतो आहे, पण 'काँग्रेसमधून प्रत्यक्ष बाहेर पडण्याची त्याची हिंमत नाही' ही गोष्ट जेव्हा मोरारजींच्या लक्षात आली तेव्हा चव्हाणांना हाती धरून त्यांनी भाऊसाहेबांचा काटा काढला आणि महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातून त्यांना सपशेल उठवले ! तथापि, आपले बलिदान होणार हे डोळ्यांना दिसत असतानाही भाऊसाहेबांनी जाता जाता शेवटी मोरारजींचा काटा काढून महाराष्ट्रावर जे उपकार केले त्याबद्दल मराठी जनतेने सदैव त्यांचे ऋणी राहिले पाहिजे. एखाद्या फुटबॉलप्रमाणे भाऊसाहेबांनी मोरारजीला लाथ मारून मुंबई राज्यातून उडवला आणि संयुक्त महाराष्ट्राची वाट मोकळी करून दिली. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर यशवंतराव जे स्थानापन्न झाले त्याचेही श्रेय भाऊसाहेबांकडेच जाते. यशवंतरावांच्या सिंहासनाखाली भाऊसाहेब हिऱ्यांच्या

राजकीय जीवनाच्या अस्थी सापडतील.

गेल्या चार वर्षांत महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातून भाऊसाहेब हिरे हे जवळ जवळ नामशेषच झाले होते. विधानसभेत ते मागल्या बाजूला कोठे तरी कोपऱ्यात बसलेले बघून आम्हांला वाईट वाटे. राजकारण हे असेच क्रूर असते. ते कोणाला चढवील आणि कोणाला तुडवील ह्याचा नेम नाही. ह्या चंचल आणि भीषण राजकारणाचा भाऊसाहेब हे एक दुर्दैवी बळी होत! ऐन कसोटीच्या वेळी कच खाण्याची चूक जर त्यांच्या हातून त्या वेळी घडली नसती, तर महाराष्ट्राच्या राजकारणात ते वेगळ्याच वैभवाने तळपले असते. एवढे कर्तृत्व त्यांच्या अंगी खचित होते!

( मराठा : ८-११-१९६१ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

# ३९

## पंत गेले!

अखेर पंतांचे अवसान काल सकाळी झाले. गेले चौदा दिवस अहोरात्र मृत्यूशी त्यांचा झगडा चालू होता. सामान्य प्रकृतीचा नि शक्तीचा दुसरा एखादा माणूस असता, तर इतके दिवस त्याचा निभाव लागला नसता. पण पंतांचे सगळेच काही प्रचंड. उभ्या आयुष्यात कधी कोणाला त्यांनी दाद दिली नाही, ते मृत्यूला थोडीच देणार? दोन आठवडे मृत्यूला त्यांनी अशी झुंज दिली, की त्याला चांगली आठवणच राहील! गेल्या पंधरा दिवसात पंतांखेरीज भारताला दुसरा विचार नव्हता. पंडित नेहरूंच्या मनाची काय स्थिती झाली असेल ह्याची तर काय कल्पनाच करता येणार नाही. बिचारे दिवसातून दोन दोन तीन तीन वेळा पंतांना पाहून येत. अन् सगळ्यात दुःखाची गोष्ट ही की, पूर्वरात्री पंडित नेहरू विलायतेला गेले नि उत्तर सकाळी पंतांचे प्राणोत्क्रमण झाले. पंतांच्या अंतकाळी नि और्ध्वदेहिकाला आपण हजर नाही, या विचाराने नेहरूंना मनस्वी दुःख झाल्यावाचून राहणार नाही. मौलाना आझाद गेल्यानंतर पंत हाच नेहरूंचा एकमेव आधार होता.

नेहरूंचा नि पंतांचा संबंध काय थोडाथोडका होता? चांगला चाळीस वर्षांचा. पंत नेहरूंपेक्षा अवघे तीनच वर्षांनी वडील. तसे दोघांच्या वयामध्ये काही फारसे अंतर नव्हते. स्वातंत्र्याच्या लढ्यात उडी मारताना ह्या दोघांनी एकमेकांच्या हातात जे एकदा हात घातले, ते मृत्यूने पंतांना काल ओढून नेईपर्यंत त्यांनी काढले नाहीत. दोघांच्या प्रेमाचा जिव्हाळा काही निराळाच होता. सत्तावीस

साली ‘ सायमन कमिशन ’ भारतात आले तेव्हा लखनौ शहरात एक प्रचंड सायमनविरोधी मोर्चा पंत आणि नेहरू ह्यांनी काढला. पंत त्या वेळी एकेचाळीस वर्षांचे होते. सहा फूट उंचीची त्यांची ती धीरगंभीर धिप्पाड मूर्ती मोर्चाच्या अग्रभागी चालली होती. त्यांच्याबरोबर नेहरू होते. एवढ्यात घोड्यावर बसलेले हिंदी आणि ब्रिटिश शिपाई समोरून चालून आले. त्यांच्या हातात दंडुके होते. त्यांचा सारा रोख नेहरूंवर होता. पण पंतांनी आपल्या देहाची प्रचंड ढाल करून त्या दंडुक्यांचा वर्षाव आपल्या अंगावर झेलला आणि नेहरूंना वाचविले. त्या हल्ल्यात पंतांच्या शरीरावर ज्या इजा झाल्या, त्यामुळे त्यांच्या देहातल्या काही नसा नि स्नायू पंगू झाले, आणि म्हणून त्यांच्या शरीरात कायमचा कंप निर्माण होऊन बसला. ह्या प्रसंगाची नेहरूंना जेव्हा जेव्हा आठवण होई, तेव्हा तेव्हा त्यांचे डोळे कृतज्ञतेने भरून येत. पंत हे आपले एक वडीलधारे कुटुंबीयच आहेत अशी नेहरूंची भावना असे. कोणत्याही महत्त्वाच्या किंवा संकटाच्या प्रसंगी ज्या तीन-चार माणसांचा सल्ला नेहरू सदोदित घेत, त्यांपैकी पंत एक होते. त्यामुळे पंतांच्या मृत्यूमुळे जर सर्वांत जास्त कोणाचा तोटा झाला असेल तर तो पंडितजींचा. तो त्यांना आता जाणवल्यावाचून राहणार नाही.

ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखाली एकोणीसशे पाच साली बनारस येथे काँग्रेसचे जे अधिवेशन भरले होते, त्या वेळीं अठरा वर्षांच्या पंतांनी स्वयंसेवक म्हणून त्या अधिवेशनात प्रथम भाग घेतला. त्यानंतर एकोणीसशे सोळा साली अखिल भारतीय काँग्रेस कमिटीवर ते जे सदस्य झाले ते कालपर्यंत. स्वातंत्र्याच्या लढ्यात अनेकदा ते तुरुंगात गेले. संयुक्त प्रांतातील जनतेवर त्यांचे प्रचंड वजन होते. अनेक वर्षेपर्यंत त्या प्रांताचे मुख्य मंत्री म्हणून त्यांनी काम केले. सात वर्षांपूर्वी पंडित नेहरूंनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात मुद्दाम बोलावून घेऊन भारताचे गृहमंत्री म्हणून त्यांची योजना केली. म्हणून त्यांना उत्तर प्रदेश सोडावा लागला, आणि ते गेल्यानंतर त्या प्रांताच्या राजकारणात अनंत घोटाळे निर्माण झाले.

महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित नेहरू, आणि मौलाना आझाद ह्यांच्याप्रमाणेच स्वतंत्र भारताचे एक अग्रगण्य निर्माते म्हणून देशाच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्णाक्षरांमधे नमूद करावे लागेल. काँग्रेसच्या अध्यक्ष-पदाचा मान जरी त्यांना कधी मिळाला नसला, तरी गेल्या तीस वर्षांत काँग्रेसने ह्या देशात जे ‘ महाभारत ’ निर्माण केले, त्याच्या प्रत्येक पर्वात एखाद्या

द्रोणाचार्यांप्रमाणे ते वावरत होते. गांधीजींची मोहिनी त्यांच्याजवळ नव्हती, नेहरूंचे सौंदर्य त्यांना लाभले नव्हते, सरदार पटेलांचे 'पोलाद' ही त्याच्या चेहऱ्यात नव्हते. सर्वसामान्य जनतेला आकर्षित करणारे तसे कोणतेही गुण त्यांच्याजवळ नव्हते. पण एवढे असून गांधी-नेहरू-पटेलांच्या मागे हा धिप्पाड बांध्याचा, ओबडधोबड आकृतीचा आणि कंपायमान शरीराचा माणूस एखाद्या डोंगराप्रमाणे उभा असे.

पंतांचे व्यक्तिमत्त्व बाहेरून जितके सौम्य व साधे वाटे, तितके ते अंतर्यामी कठोर आणि खंबीर होते. राजकारणामधली अत्यंत अवघडातली अवघड समस्या तुम्ही त्यांच्यापुढे टाकली, तरी शांत आणि थंड चित्ताने ते ती सोडवल्याखेरीज राहात नसत. आणि एकदा त्यांनी एखादा निर्णय घेतला म्हणजे आकाश कोसळून पडले तरी ते तो बदलत नसत. आज भारतात त्यांच्या योग्यतेचा मुत्सद्दी दुसरा कोणीही नव्हता, असेच म्हणावे लागेल. गांधी, नेहरू, पटेल हे नुसते पुढारी. पंत हे खरे मुत्सद्दी. डॉक्टर राधाकृष्णन म्हणाले त्याप्रमाणे व्यवहारज्ञान, पारदर्शकता, समतोल विचार आणि देशभक्ती ह्यांचा महान समन्वय पंतजींच्या ठिकाणी झाला होता. महात्मा गांधींना आव्हान देऊन त्रिपुरी काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवडून आलेल्या सुभाषचंद्र बोसांचा पराभव त्यांच्या व्यासपीठावर जाऊन करणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. पण गोविंद-वल्लभ पंत काठी टेकीत टेकीत व्यासपीठावर चढले आणि 'महात्माजींच्या नेतृत्वावाचून या देशाचे कसे चालेल ?' अशी जेव्हा त्यांनी गर्जना केली तेव्हा त्यांचा सुभाषविरोधी ठराव प्रचंड बहुमताने मान्य झाला.

पंत हे काही गांधीवादी नव्हते. पण गांधी आणि नेहरू ह्यांच्याबद्दलची त्यांची निष्ठा मेरुमांदाराप्रमाणे अचल होती ह्यात काही शंका नाही. पंतांच्या शरीरात जरी कंप भरलेला दिसे तरी लोकसभेत ते बोलायला उभे राहिले की, त्यांच्या मुखातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द स्थिर, निश्चल आणि मोजका असे. संसदीय वादात कोणीही त्यांचा हात धरू शकत नसे. एखाद्या निष्णात आणि वस्ताद पहिलवानाप्रमाणे ते विरोधकांना सहज लीलेने चीत करीत असत. केंद्रीय मंत्रिमंडळाचे आकर्षण जरी नेहरू असले, तरी त्यांचे खरे सामर्थ्य पंत हेच होते. द्रोणागिरी पर्वत हातावर उचलून जसा हनुमानाने नेला, त्याप्रमाणे लोकसभेतील अनेक वादळे आतापर्यंत आपल्या खांद्यावर उचलून पंतांनी नेलेली आहेत.

राज्य पुनर्रचनेची सर्वांत कठीण असलेली समस्या फार मोठ्या धैर्याने आणि हिमतीने सोडविण्याचा पंतांनी प्रयत्न केला खरा; पण संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न काही त्यांना चांगुलपणाने आणि यशस्वीपणे सोडविता आला नाही. आमच्या मते त्यांच्या मुत्सद्देगिरीला लागलेला तेवढाच एक डाग आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल महाराष्ट्राच्या मनात एक फार मोठी अढी राहून गेली आहे. विशेषतः, दोनशे वर्षांपूर्वी उत्तरेत स्थायिक झालेल्या एका ऐतिहासिक महाराष्ट्रीय कुटुंबात जन्माला आलेल्या महापुरुषाने महाराष्ट्राच्या उत्कर्षाला अशा तऱ्हेने विरोध करावा ह्याचे शल्य सर्वांना जास्त खुपले. तथापि, काही असले तरी पंडित नेहरू मागे एका प्रसंगी म्हणाले त्याप्रमाणे, हिमालयात जन्माला आलेला हा पुरुष हिमालयाएवढा मोठा होता यात काही संशय नाही. म्हणून भारताच्या आणीबाणीच्या वेळी असा महान देशभक्त नि थोर मुत्सद्दी आपल्यामधून अचानक जावा ह्याचे आम्हांस राहून राहून दुःख होते.

( मराठा : ८–३–१९६१ )

## ४०

# अरेरे! बर्वे गेले!

मृत्यूचे मार्ग किती चमत्कारिक आहेत! कोणाला तो केव्हा आणि कोणत्या क्षणी घेऊन जाईल, ह्याची कल्पनासुद्धा करता येणार नाही. निवडणुकीत बर्वे ह्यांनी एवढा मोठा विजय मिळविला. त्रिखंडात त्यांचे नाव झाले. आभाळाला जणू त्यांचे हात पोहोचले. भाग्यशाली भवितव्याची सोनेरी दालने त्यांना मोकळी झाली. केंद्रीय मंत्रिमंडळात कोणत्या तरी महत्त्वाच्या मंत्रिपदावर ते स्थानापन्न होणार ह्याबद्दल कोणाच्याही मनात शंका राहिली नाही. केवळ थोड्या दिवसांचा प्रश्न होता तो! सकाळी मुंबईहून दिल्लीला ते विमानाने गेले, आणि त्याच संध्याकाळी मृत्यूने त्यांच्यावर अचानक झडप घालून, त्यांचे कलेवर दुसऱ्याच दिवशीच्या सकाळच्या विमानाने दिल्लीहून मुंबईला परत पाठवून दिले. असे काही होईल हे कोणाच्या ध्यानी स्वप्नी तरी होते का? केवळ अर्ध्या तासात सगळा कारभार आटोपला. रात्रौ आठ वाजता बाहेरचे काम आटोपून ते आपल्या बंगल्यात आले. साडेआठ वाजेपर्यंत त्यांनी आपले चिटणीस मुथुस्वामी ह्यांना काही मजकूर टिपून घ्यावयाला सांगितला, आणि घाईघाईने कपडे काढून ते आपल्या ऑफिसातल्या कोचावर पहुडले. ते म्हणाले, 'मी दमलो आहे. मला आता झोपले पाहिजे, आणि उद्या फारच काम आहे.' एवढ्यात डाव्या दंडात काही तरी दुखत असल्याची त्यांना जाणीव झाली. त्यांना अस्वस्थ वाटू लागले आणि घेरी आल्यासारखे वाटले. म्हणून त्यांनी आपला नोकर विक्रमसिंग ह्याला सांगितले. नोकराला वाटले की दुखणे काही तरी चमत्कारिक

दिसते आहे. त्याने विलिंग्डन हॉस्पिटलचे डॉ. केशवानी ह्यांना तावडतोब फोनवरून बोलाविले. पंधरा मिनिटांत डॉक्टर आले. तोपर्यंत बर्वे शुद्धीवर होते. डॉक्टरांनी त्यांना तपासले. त्यांची नाडी आणि श्वासोच्छ्‌वास ठीक होता. म्हणून त्यांचा रक्तदाब घेण्यासाठी त्यांनी आपले यंत्र बाहेर काढले. तेवढ्यात बर्वे ह्यांनी शेवटचा श्वास टाकला, आणि त्यांचे देहयंत्र बंद पडले. त्या वेळी रात्रीचे नऊ वाजून वीस मिनिटे झाली होती. डॉक्टरांनी त्यांचे श्वसन आणि हृदयक्रिया चालू व्हावी म्हणून खूप प्रयत्न करून पाहिले. पण त्याचा काही एक उपयोग होऊ शकला नाही.

बोल बोल म्हणता वणव्यासारखी त्यांच्या मृत्यूची बातमी सर्वत्र पसरली. पंतप्रधान इंदिरा गांधी धावत आल्या. चव्हाण आले, पाटील आले, कृष्ण मेनन आले. पण ते सर्व येऊन काय उपयोग ? पिंजऱ्यातून पक्षी कधीच उडून गेला होता. बर्वे ह्यांच्या मृत्यूची बातमी तासा दीड तासाने मुंबईला येऊन धडकली, तेव्हा आम्ही काय ऐकतो आहोत, यावर आमचा विश्वासच बसेना. ताश्कंदहून लालबहादुर शास्त्री ह्यांच्या आकस्मिक मृत्यूची बातमी कानावर पडताच जशी मनःस्थिती झाली, तशीच जवळ जवळ बर्वे ह्यांच्या मृत्यूची बातमी ऐकून आमची स्थिती झाली. कारण बर्वे कधी पूर्वी आजारी असल्याचे आमच्या कानांवर आलेले नव्हते.

निवडणूक जिंकल्यानंतर पाच-सहा दिवसांनीच बर्वे आम्हांला भेटावयाला ' शिवशक्ती 'त आले होते. बरोबर त्यांनी एक भलामोठा पुष्पगुच्छ आणला होता. तो त्यांनी आम्हांला दिला. आम्ही चकित होऊन म्हणालो, " अहो, आम्हाला कशाला हा पुष्पगुच्छ देता ? तुम्ही निवडणूक जिंकली आहेत. आम्ही ती हरलो आहोत. " तेव्हा बर्वे त्यांचे ते नित्याचे सौम्य सुवासिक स्मित करीत म्हणाले, " अहो, यशापयश हे नैमित्तिक आहे. आपले नि माझे संबंध निराळे आहेत. आपल्याबद्दल माझ्या मनात निरतिशय आदर आहे. आता मी दिल्लीला निघालो आहे. आपला मला आशीर्वाद हवा आहे. " आम्ही त्यांच्या गळ्यात पुष्पहार घालून त्यांचे अभिनंदन करीत म्हणालो, " या, आता दिल्ली गाजवून या ! " त्या वेळी बर्वे ह्यांचे आपल्याला घडणारे ते शेवटचे दर्शन आहे ह्याची सुतराम कल्पना तरी होती का आम्हाला ? तशी त्यांची प्रकृती आम्हांला उत्तम वाटली. त्यांच्या तोंडावर आरोग्याचा चांगला रक्तिमा झळकत होता. दोन महिने आधी जेव्हा ईशान्य मुंबईतून निवडणुकीसाठी त्यांचे नाव जाहीर

झाले, तेव्हा असेच एका दुपारी ते आमच्या ‘ शिवशक्ती ’त आले. हसून म्हणाले, “ उद्यापासून कामाला लागतो आहे. ” आम्ही म्हणालो, “ दुर्दैवाने तुम्ही आणि आम्ही विरोधी पक्षात आहोत. पण काहीही असले तरी आपल्या मनाला ज्यायोगे दुःख होईल किंवा आपल्या कार्याला ज्याने अपाय होईल, असे आमच्या हातून काही होणार नाही, एवढी खात्री बाळगा. ”

त्या वेळी ह्या निवडणुकीत ते यशस्वी होतील किंवा नाही याबद्दल आमच्या मनात जबरदस्त शंका होती. कारण मुंबईच्या उपनगरात बर्वे ह्यांचं नाव फारसे कोणाला माहीत नव्हते. श्रोतृसमुदायाला मोहिनी घालील असे प्रभावी वक्तृत्वही त्यांच्याजवळ फारसे नव्हते. राजकारणाच्या उलटसुलट प्रवाहात आणि भोवऱ्यात त्यांच्यासारख्या सरळ आणि सात्त्विक माणसाचा कसा काय तग लागेल ह्याची आम्हांला शंका होती. पण एकापेक्षाही एका चमत्कारिक अडचणींना धैर्याने आणि खंबीरपणे तोंड देऊन त्यांनी शेवटी यशाचे शिखर गाठले आणि मित्रांचे नि विरोधकांचे डोळे दिपवले. दोन अडीच महिने त्यांनी अहोरात्र कामाचे डोंगर उपसले. क्षणाची विश्रांती घेतली नाही. ह्या काळात ते जेवले कोठे, त्यांनी खाल्ले काय, ते झोपले कुठे ह्याची परवा करणारे कोणी होते का त्यांच्यापाशी ? मायेचा, ममतेचा किंवा धीराचा हात त्यांच्या पाठीवरून फिरवणारे एखादे माणूस तरी होते म्हणता काय त्यांच्याजवळ ? कोणी नाही ! सगळा त्यांचा आपला एक खांबी कारभार ! निवडणुकीच्या या काळात त्यांनी एकट्याने जी जिवापाड धडपड केली, तिने त्यांना यश मिळवून दिले खरे. पण शेवटी तीच त्यांच्या नाशाला कारण झाली ! दोन महिने त्यांना झोप नव्हती. पण हे त्यांनी कोणाला सांगितले नाही आणि सांगणार तरी ते कोणाला ? एकटेच बिचारे धडपडले अन् अखेर एकटेच गेले—शेजारी फक्त एक तिऱ्हाईत नोकर !

बर्वे ह्यांचे जीवन म्हणजे एका बुद्धिमान, कर्तबगार पण दुर्दैवी जीवनाची शोककथा होय ! पहिल्या दर्जाची बुद्धिमत्ता आणि राजबिंडे स्वरूप त्यांना ईश्वराने दिले होते. विलायतेला जाऊन आय. सी. एस. होऊन आले, साऱ्या महाराष्ट्री त्यांचे नाव गाजले. पण वैवाहिक जीवनात ते कमालीचे अपेशी ठरले. जणू काही पूर्वजन्मीचा त्यांना तो शापच होता. १९४९ ते १९५२ साली पुणे महानगरपालिकेचे प्रशासक म्हणून त्यांनी आधुनिक पुण्याची निर्मिती केली. तत्पूर्वी दहा वर्षे आधी आम्ही पुणे नगरपालिकेच्या विकासाची जी योजना रचली होती, त्याचाच बर्वे ह्यांनी आधार घेतला होता. ही गोष्ट आमची त्यांची जेव्हा

प्रथम भेट झाली तेव्हा, त्यांनीच आम्हांला सांगितली. त्यानंतर ते भारत सरकारच्या अर्थखात्याचे दुय्यम चिटणीस आणि पुढे लँग्वेजेस कमिशनचे चिटणीस झाले. १९५७ ते १९६१ पर्यंत त्यांनी अनेक महत्त्वाच्या खात्यांत मोठमोठ्या हुद्द्यांवर कामे केली. त्यानंतर आपल्या नोकरीतून ते सेवानिवृत्त झाले आणि श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या सांगण्यावरून बासष्टच्या सार्वत्रिक निवडणुकीत पुण्याच्या शिवाजीनगर मतदारसंघातून विधानसभेसाठी काँग्रेसचे उमेदवार म्हणून उभे राहिले. त्या वेळी त्यांचा नि आमचा समोरासमोरच संबंध आला. कारण पुण्यातून आम्ही लोकसभेसाठी उभे होतो. असे असून त्यांचे नि आमचे हितसंबंध कोठेही एकमेकांच्या आड आले नाहीत. हजारो मतदारांनी 'खालचे' मत त्यांना नि 'वरचे' मत आम्हांला दिले. १९६२ ते १९६३ पर्यंत एकच वर्ष ते महाराष्ट्राचे अर्थमंत्री होते. त्या काळात त्यांचा कारभार एवढा चोख आणि निर्मळ होता, की त्यामुळे मंत्रिमंडळात त्यांच्याबद्दल विलक्षण वचक निर्माण झाला. पुढे यशवंतराव दिल्लीला गेले. बर्वे ह्यांचा त्राता गेला. तेव्हा अर्थमंत्रिपदावरून त्यांची उचलबांगडी झाली नि उद्योगमंत्रिपदावर त्यांची स्थापना झाली. त्याच वेळी मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचा विचार आपल्या डोक्यात आल्याचे त्यांनी आम्हांला बोलून दाखविले. ते त्या वेळी म्हणाले, "अर्थमंत्री असताना महाराष्ट्राचे आर्थिक भविष्य घडविण्याचे सामर्थ्य माझ्या हाती होते. ते माझ्या हातून काढून घेतल्यानंतर नुसता एका खात्याचा मंत्री राहून मी काय करू ?" पंधरा-सोळा महिने उद्योगमंत्री म्हणून काम केल्यानंतर ते मंत्रिमंडळातून बाहेर पडले आणि प्लॅनिंग कमिशनचे पूर्णसमय सदस्य झाले. त्या काळात रुपयाच्या अवमूल्यनाला त्यांनी कडाडून विरोध केला. पुढे आपल्या सदस्यत्वाचा परवाच्या निवडणुकीला उभे राहण्यासाठी त्यांनी राजीनामा देऊन टाकला.

'काँग्रेसच्या उंबरठ्यावर,' 'With Malice towards none,' 'A Critique of New Indias Plans and Aspirations' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. ज्या ज्या क्षेत्रात बर्वे ह्यांनी पाऊल टाकले तेथे तेथे त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. अर्थशास्त्राचा त्यांचा अभ्यास दांडगा होता, आणि त्यात त्यांनी विलक्षण नैपुण्य मिळविले होते. कोणत्याही विषयावर स्वतंत्रपणे विचार करण्याची त्यांची प्रवृत्ती हेच त्यांच्या राजकीय जीवनाचे वैशिष्ट्य होते. पूर्वी सरकारी नोकरीत असताना आणि नंतर काँग्रेस राज्यात मोठमोठ्या हुद्द्यांवर

कामे करताना भ्रष्टाचार नि वशिलेबाजी ह्यापासून ते अत्यंत निर्भीड आणि निःस्पृह वृत्तीने अलिप्त राहिले. काँग्रेसमधल्या जातीयवादी राजकारणाचा काय त्यांना कमी उपद्रव झाला म्हणता ? पण त्याला ते नमले नाहीत की शरण गेले नाहीत. लोकशाहीवर त्यांची अपरंपार निष्ठा होती. सार्वजनिक जीवनात विरोधी पक्षीयांशी त्यांच्याएवढा सौजन्याने आणि खेळाडूपणाने वागणारा माणूस आम्ही तरी पाहिला नाही, परवाच्या निवडणुकीत बर्वे ह्यांनी एवढी भाषणे केली, पण त्यांचा संयम क्षणमात्र सुटला नाही किंवा चुकून अनुचित अक्षर त्यांच्या तोंडून बाहेर पडले नाही. बर्वे म्हणजे सभ्यता, सौजन्य आणि मार्दव ह्यांची मूर्तिमंत हसती खेळती आकृतीच होय. त्यांना भेटताना किंवा त्यांच्याशी बोलताना मनाला जो आनंद वाटत असे त्याची आठवण आता झाली म्हणजे भडभडून येते. परवा आमचा निरोप घेताना बर्वे ह्यांनी आम्हांला आवर्जून सांगितले की, "आता दिल्लीला आला म्हणजे आमच्याकडेच उतरले पाहिजे !" आम्ही 'हो' म्हणून गेलो ! पण आता कुठले त्यांचे घर ? अन् आता कुठली त्यांची भेट ?

ऋणानुबंधाच्या तुटल्या
आता गाठी !
मग कुठल्या भेटीगाठी ?

( मराठा : ८-३-१९६७ )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 47049 वि: निबंध
क्रमांक 2903 नों: दि: 31/12/69

## ४१

# खासदार मोरे ह्यांना श्रद्धांजली

अखेर आपले सर्वांचे मित्र शंकरराव मोरे गेले. आम्ही अन् ते एका गावचे-म्हणजे पुण्याचे! बालपणी आम्ही दोघे अगदी शेजारी शेजारी राहत असू. शंकरराव माझ्यापेक्षा एकच वर्षाने लहान होते. तरुण वयात ते ब्राह्मणेतर चळवळीत असत आणि पुण्यातल्या सदाशिव अन् नारायणपेठी ब्राह्मणांना जास्तीत जास्त शिव्या देण्यात त्यांचा हातखंडा होता. 'ह्या भटांच्या बायकांना आम्ही जेव्हा मराठ्यांच्या घरात भांडी घासावयाला लावू तेव्हा आमच्या आत्म्यांना समाधान होईल!' हे त्यांचे त्या वेळचे सुप्रसिद्ध उद्गार होते. त्यांची मराठी वाणी एखाद्या चित्पावन ब्राह्मणाला लाजवील इतकी शुद्ध आणि ठसकेदार होती. पण कुत्सित आणि खवचट बोलण्यास लागणारे सारे विखार त्यांच्या जिभेच्या टोकावरून सदैव पाझरत असत.

त्यांचे लहानपणापासून सार्वजनिक जीवनाकडे लक्ष असे. त्यांची वकिली फारशी काही चाललेली नसावी अशी माझी समजूत आहे. पुण्याचे बागडे वकील, शंकरराव मोरे अन् केशवराव जेधे हे तिघेजण 'जेधे मॅन्शन'मधे वारंवार सभा भरवून ब्राह्मणांना शिव्या देत असत. अशाच एका सभेचा वृत्तांत 'ज्ञानप्रकाश'चे त्या वेळचे संपादक काकासाहेब लिमये ह्यांनी आपल्या पत्रात देऊन त्याला 'मोऱ्यांची तुंबलेली मोरी' असा टळटळीत मथळा दिला. त्या एका मथळ्याने शंकरराव मोऱ्यांचे पुण्यात फार हसू झाले. पुढे शंकरराव हे 'पुणे जिल्हा लोकल बोर्ड'चे अध्यक्ष झाले. त्यानंतर शैक्षणिक विषयावर

त्यांनी काही विनोदी अन् काही गंभीर लिखाण केले. काकासाहेब गाडगीळ ह्यांनी केशवराव जेधे ह्यांना जेव्हा काँग्रेसची दीक्षा दिली, तेव्हा त्यांच्या मागोमाग शंकरराव काँग्रेसमधे आले. पण त्यांनी गांधीटोपी आपल्या डोक्यावर चढविल्याचे मला काही आठवत नाही. त्यांच्या डोक्यावरची उंच काळी टोपी हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक अविस्मरणीय वैशिष्ट्य होते. मराठी भाषा ते जसे उत्तम बोलत, तसे इंग्रजी भाषासुद्धा ते उत्तम लिहीत अन् बोलत. सर धनजीशा कपूर ह्यांच्या मंत्रिमंडळाच्या अभिनंदनाची एक सभा पुण्याच्या गोखले हॉलमध्ये भरली असताना शंकररावांनी खरमरीत इंग्रजी भाषण करून त्यांची अशी हजेरी घेतली की काही विचारू नका.

शंकरराव स्वभावाने अत्यंत निर्भीड आणि तोंडाने तितकेच फटकळ होते. आपल्याला जे आवडत नाही, त्याचा कोणाची भीडभाड न बाळगता धिक्कार करावयाला उभ्या आयुष्यात ते कधी कोणाला घाबरले नाहीत. पण इतके असून ते मनाने निर्मळ आणि प्रेमळ असत. त्यांचे चारित्र्य अत्यंत निरपवाद होते. कोणत्याही गोष्टीचे त्यांना व्यसन नव्हते. सांसारिक आयुष्यात उत्तम सुगृहिणी त्यांना भाग्याने लाभल्याने ते अत्यंत सुखी होते. ब्राह्मणेतर समाजाने त्यांच्यापासून शिकण्यासारखी एकच गोष्ट आहे, ती ही की, ते विद्वान होते, व्यासंगी होते. राजकारणाचा त्यांचा अभ्यास अद्ययावत होता. बहुजनसमाजाला केशवराव जेधे ह्यांनी काँग्रेसची दीक्षा दिलेली असली, तरी त्या समाजाला मार्क्सिझमची म्हणजे साम्यवादाची दीक्षा शंकररावांनी दिली. रशियन आणि चिनी क्रांतीने शंकरराव इतके वेडे झाले होते की, त्याबद्दल आम्ही त्यांची वारंवार थट्टा करीत असू. एकदा आम्ही ‘ नवयुगा ’त लिहिले होते की ‘ शंकरराव महाराष्ट्राचे ‘ माओ ’ होणार का ‘ म्याऊ ’ होणार ! ’

आमचे मतभेद अनेक असत, पण परस्परांचे प्रेम अखंड होते. ही गोष्ट त्यांचे पुत्र नि मित्र देखील कबूल करतील. आमच्या ‘ नवयुगा ’त काँग्रेसवर जळजळीत टीका करणारे अनेक लेख शंकररावांनी लिहिलेले आहेत. बेचाळीसच्या चळवळीत शंकरराव स्थानबद्ध झाले; पण दुर्दैवाने माफी मागून ते तुरुंगातून बाहेर पडले. तीच त्यांच्या आयुष्यातली घोडचूक झाली. त्या ‘ माफी ’चा ‘ पराचा कावळा ’ करून सरदार वल्लभभाई पटेल नि शंकरराव देव ह्यांनी पंचेचाळीस सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांना तिकीट दिले नाही. त्या वेळी जर त्यांनी शंकरराव मोऱ्यांना तिकीट दिले असते तर महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात

भाऊसाहेब हिरे नि यशवंतराव चव्हाण ह्यांची नावेसुद्धा ऐकू आली नसती. शंकरराव मोरे हे केवळ महाराष्ट्राचे मुख्य प्रधान झाले नसते, तर ते भारताचे 'पंतप्रधान' झाले असते. पण आपल्या असंयमी तोंडाळपणाने त्यांनी आपल्या आयुष्याचे वाटोळे करून घेतले.

अठ्ठेचाळीसच्या २८ एप्रिलला केशवराव जेधे नि शंकरराव मोरे हे काँग्रेस-मधून बाहेर पडले, तेव्हा आम्ही त्यांचे अभिनंदन करून त्यांना 'शेतकरी–कामगार पक्ष' स्थापन करण्याची सूचना केली. त्यानंतर मुंबईच्या 'कोळी-वाड्या'त श्री. भाऊसाहेब राऊत ह्यांच्या बंगल्यात तो पक्ष स्थापन करण्याची पत्रके 'राजाराम राऊत, आचार्य अत्रे, शंकरराव मोरे, आणि केशवराव जेधे' ह्यांच्या नावानी निघाली. त्या सभेला यशवंतराव चव्हाण, पी. के. सावंत, सोलापूरचे छन्नूसिंग चंदेले वगैरे जी मंडळी होती, त्यांनी त्या पक्षस्थापनेला विरोध केला. पुढे शे. का. पक्षाचा जो प्रबंध 'दाभाडी'ला तयार झाला तो एकट्या शंकररावांनीच लिहिला. त्यानंतर शे. का. पक्ष आणि समाजवादी पक्ष ह्यांना एकत्र करण्याचा आत्यंतिक प्रयत्न आम्ही आमच्या खंडाळ्याच्या बंगल्यात केला. तो करार 'खंडाळा–करार' ह्या नावाने महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. त्या कराराच्या वेळी शंकरराव मोरे ह्यांनी जी आत्यंतिक मार्क्सवादी भूमिका घेतली होती, तशी भूमिका स्वतः लेनिन आणि स्टॅलिन ह्या दोघांनासुद्धा घेता आली असती की काय ह्याचा आम्हांला अद्यापपर्यंत संशय आहे. या परिषदेतल्या त्यांच्या जुन्या भाषणाचा रिपोर्ट अजून आमच्याजवळ आहे. तो वाचून आम्ही पोटभर हसतो. पुढे शंकररावांचा मार्क्सवाद जितक्या झपाट्याने आला, तित-क्याच झपाट्याने ओसरला. ते सोलापुरातून शे. का. पक्षातर्फे लोकसभेत निवडून गेले. तेथे गेल्यानंतर नेहरूंचे वैभव पाहून ते विरघळले आणि नंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्याच वेळी त्यांना सौम्य असा पक्षघाताचा झटका आला होता. त्या काळात त्यांनी 'पार्लमेंटरी प्रॅक्टिस' ( संसदीय आचार ) ह्या नावाचा एक प्रचंड नि अमर ग्रंथ लिहिला. शंकररावांच्या आजन्म व्यासंगाचा तो महान परिपाक आहे.

गांधीजींचा वध झाल्यानंतर शंकरराव मोरे आणि नारायणराव गोरे ह्यांनी एक जे पत्रक काढले, त्यात गांधीवधानंतर दक्षिण महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांना जे शासन झाले ते योग्यच होते, असा अभिप्राय त्या दोघांनी व्यक्त केला होता. त्यावर आम्ही अत्यंत खरमरीत टीका केली. बासष्ट साली काँग्रेसतर्फे ते पुण्यातून

लोकसभेला उभे राहिले. त्यांना गोरे नि आम्ही विरोध केला. पण आम्ही दोघेही पडलो नि शंकरराव यशस्वी झाले. तेव्हा पहिला अभिनंदनाचा फोन त्यांना आम्ही केला. असे शंकररावांचे नि आमचे विचित्र प्रेम होते. काका गाडगीळ अन् शंकरराव देव हे आम्हा दोघांच्याही थट्टेचे अत्यंत आवडते विषय होते. सर्व भारताचे राज्य आपण एकटे चालवतो अशा काका गाडगीळ नेहमी थापा मारीत असत. त्या थापेबाजीला उद्देशून शंकरराव एकदा आम्हाला खवचटपणे म्हणाले की, "कदाचित सर्व जगातील रोजच्या रोज जन्माला येणारी अपत्ये मीच निर्माण करतो, असे हे काका उद्या आपल्याला सांगावयाला कमी करणार नाहीत!" असो. शंकरराव हे जितके खवचट होते तितकेच तिखट होते. त्यांनी 'लाल निशाण' पक्षाचे 'मठाधिपती' एस. के. लिमये ह्यांच्यावर एक भयंकर पुस्तक लिहून त्यांच्या राजकीय बुवाबाजीचे अक्षरशः वाभाडे काढलेले होते. आमच्या दोघांच्या स्वभावात विरोधापेक्षा साम्यच अधिक होते. असा महाराष्ट्राच्या बहुजनसमाजाचे क्रांतिकारक मार्गदर्शन करणारा शंकररावांसारखा विद्वान, निर्भय अन् साम्यवादी नेता आज हरपला ह्याबद्दल आम्हाला अत्यंत दुःख होते आहे. शंकररावांची साम्यवादी विचारपरंपरा महाराष्ट्रात पुढे चालविण्याची सद्बुद्धी परमेश्वर बहुजनसमाजाला देवो हीच आमची प्रार्थना!

(मराठा : ८-३-१९६६)

# ४२

## कै. पुरुषोत्तम त्रिकमदास

आम्हांस कळविण्यास अत्यंत दुःख वाटते, की आमचे एक परममित्र आणि समाजवादाचे भारतामधील एक आद्य प्रवर्तक ॲ. पुरुषोत्तमदास त्रिकमदास हे सोमवारी रात्रौ दिल्ली येथे निधन पावले. निधनसमयी त्यांचे वय त्र्याहत्तर वर्षांचे होते. दोनच दिवस आधी त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. म्हणून त्यांना एका स्थानिक उपचारगृहात नेऊन ठेवण्यात आले होते. तेथच त्यांचा देहान्त झाला.

पुरुषोत्तमदासांचा नि आमचा परिचय १९४७ साली पहिल्याने झाला. त्या वेळी आम्ही काँग्रेसमधून जवळ जवळ बाहेर पडल्यासारखेच झालेलो होतो. साहजिकच आमचा कल समाजवादी पक्षाकडे होता. १९३४ साली काँग्रेसमधील पुरोगामी वृत्तीच्या ज्या मंडळींनी ' काँग्रेस समाजवादी पक्ष ' स्थापन केलेला होता, त्यात पुरुषोत्तम त्रिकम हे एक अग्रणी होते. बॅरिस्टर होऊन आल्यानंतर त्यांनी मुंबईतच आपल्या व्यवसायाला सुरुवात केलेली होती, आणि थोड्याच अवकाशात एक हुषार बॅरिस्टर म्हणून त्यांची मुंबई हायकोर्टात ख्याती झालेली होती. तथापि, वकिली व्यवसायापेक्षा त्यांचा राजकारणाकडेच विशेष ओढा होता. त्यांचा पिंडच मुळी राजकीय विचारवंताचा होता. त्याच सुमारास मुंबई कायदेमंडळातील एका सदस्याची जागा रिकामी झाली. त्या जागेच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसचे डॉ. म्हसकर आणि समाजवादी पक्षाने पुरुषोत्तम त्रिकम ह्यांना उभे केले.

त्या वेळी मुंबई शहरात प्रभावी स्वरूपाचे असे एकही मराठी दैनिक नव्हते असे म्हटले तरी चालेल. आमचे ' साप्ताहिक नवयुग ' एवढे एकच पत्र असे होते, की देशाच्या फाळणी प्रकरणात पाकिस्तानधार्जिण्या काँग्रेसवर त्याने सतत कडाडून हल्ला चढवून पराकाष्ठेची लोकप्रियता मिळविलेली होती. एके दिवशी सकाळी अशोक मेहता, अच्युत पटवर्धन आणि पुरुषोत्तम त्रिकम हे तिघे समाजवादी नेते अचानक आमच्या घरी आले. त्यांना पाहून आम्हांला आनंद तर झालाच, पण आश्चर्यच अधिक वाटले. आम्ही मनात म्हणालो, की एवढ्या थोर राजकीय नेत्यांनी आपण होऊन आमच्या घरी येण्याचे काय कारण ? अच्युतराव म्हणाले, "पुरुषोत्तम त्रिकम हे मुंबई कायदेमंडळाच्या पोट-निवडणुकीला उभे आहेत. तेव्हा त्यांच्या उमेदवारीला आपण ' नवयुग 'मधून तर पाठिंबा द्यावाच, पण त्यांच्या प्रचार-सभांतून आपण प्रामुख्याने भागही घ्यावा !" आम्ही त्यांची ती विनंती एकदम मान्य केली, पण एका अटीवर— ती अट ही की, पुरुषोत्तम त्रिकम ह्यांनी ( म्हणजे अर्थातच समाजवादी पक्षाने ) ' मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला आपला पाठिंबा आहे असे ताबडतोब जाहीर करावे. ' ती गोष्ट पुरुषोत्तम त्रिकम ह्यांनी त्याच क्षणी मान्य केली. कारण त्यांची मातृभाषा जरी गुजराती होती, तरी त्यांना महाराष्ट्राचा फार मोठा अभिमान होता. त्यानंतर आम्ही नि मधु दंडवते ह्यांनी त्या घोषणेचा आराखडा ताबडतोब लिहून काढला आणि त्यावर पुरुषोत्तम त्रिकम ह्यांची सही घेतली. सारांश, ' मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मिती 'ला समाजवादी पक्षाचा पाठिंबा मिळविण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे आम्ही स्वतःच कारणीभूत झालो. या पोटनिवडणुकीच्या प्रचारात आम्ही काँग्रेसची एवढी बंभेरी उडवली की, काँग्रेसचे वृद्ध उमेदवार डॉ. म्हसकर पराभूत झाले आणि पुरुषोत्तम त्रिकम हे निवडून आले. त्यानंतर थोड्याच दिवसांनी आम्ही समाजवादी पक्षात प्रवेश केला नि शिवडी मतदारसंघातून एका पोटनिवडणुकीत मुंबई महानगरपालिकेत निवडून आलो. त्या काळात आठवड्यातून किमान तीन-चार दिवस तरी सायंकाळी आमची नि पुरुषोत्तम त्रिकम ह्यांची बैठक झाली नाही असा एक आठवडा गेला नसेल.

पुरुषोत्तम ह्यांना वाङ्मयाचे विलक्षण वेड होते. इंग्रजी साहित्याचे त्यांचे वाचन अगदी हेवा करण्यासारखे होते. इंग्रजी भाषेवर त्यांचे चांगलेच प्रभुत्व होते. त्यांनी स्वतः दोन-तीन स्वतंत्र इंग्रजी नाटके लिहिली होती आणि ती आम्ही



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों. दि: ....

रंगभूमीवर आणावीत असा ते आम्हांला त्या वेळी नेहमी आग्रह करीत असत. त्यांची विनोदबुद्धी अतिशय ज्वलंत होती. देशाची फाळणी झाल्यानंतर काँग्रेसची राजवट सर्वत्र स्थापन झाली, आणि समाजवादी पक्ष मागे पडला त्यामुळे पुरुषोत्तम त्रिकम ह्यांचे राजकारणावरून जवळ जवळ लक्ष उडाल्यासारखेच झाले. त्यानंतर पुन्हा त्यांनी आपल्या वकिली व्यवसायाकडे लक्ष वळविले. तथापि, धंद्याच्या दृष्टीने मुंबईचे क्षेत्र त्यांना अपुरे वाटल्यामुळे त्यांनी मुंबई सोडली नि ते अखेर दिल्लीला सुप्रीम कोर्टात आपला व्यवसाय करू लागले. त्यामुळे त्यांचा नि राजकारणाचा संबंध जो सुटला तो कायमचाच. आम्ही दिल्लीला जेव्हा जेव्हा जात असू, तेव्हा तेव्हा त्यांना थोडा वेळ का होईना, पण भेटल्यावाचून आम्ही राहात नसू. मूळचेच ते श्रीमंत होते. वकिली व्यवसायावर त्यांनी लाखो रुपये मिळविले. पण पुढे पुढे त्या व्यवसायावरूनही त्यांचे लक्ष्य उडाले. एखादी चांगली ' केस ' असेल तर ती ते घेत असत. नाही तर ते स्वस्थ घरी बसून वाचनात, चिंतनात आणि लेखनात आपला वेळ घालवीत असत. त्यांनी परदेशात अनेकदा प्रवास केलेला होता. किंबहुना वर्षातले दोन-तीन महिने ते हिंदुस्थानाबाहेरच घालवीत असत.

राजकारणातून जरी त्यांनी अनेक वर्षांपासून अंग बाहेर काढून घेतलेले असले, तरी समाजवादावर त्यांची अढळ श्रद्धा होती. ती कधीही डळमळली नाही. ते आंतरराष्ट्रीय कायदेमंडळाचे सदस्य होते, आणि जेव्हा चिनी सत्ताधाऱ्यांनी तिबेटच्या जनतेचे सामुदायिक हत्याकांड सुरू केले, तेव्हा त्या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी ' आंतरराष्ट्रीय मंडळा 'ने जी समिती नेमली, त्या समितीच्या अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम त्रिकम ह्यांचीच नेमणूक करण्यात आली. किंबहुना तिबेट गिळंकृत करण्याच्या चिनी सत्ताधाऱ्यांच्या डावाची पहिली माहिती पुरुषोत्तम त्रिकम ह्यांनीच उजेडात आणली आणि ' हिंदी-चिनी भाई भाई 'च्या नेहरूनिर्मित थोतांडाचे थोबाड पुरुषोत्तम त्रिकम ह्यांनीच प्रथम फोडले.

एका काळी ते महात्मा गांधींचे खाजगी चिटणीस होते. त्यांनी केवळ राजकारणातच आपले आयुष्य वेचले असते, तर त्यांनी आज देशात कोणतेही सर्वोच्च स्थान सहज पटकावले असते, एवढी बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व त्यांच्या अंगी होते. पण जयप्रकाश नारायण, अशोक मेहता, अच्युत पटवर्धन आणि अरुणा असफअल्ली ह्यांच्याप्रमाणेच त्यांचा लोकशाही समाजवाद हळूहळू

त्यांच्या पायाखालून विरघळत गेला आणि कधी काळी तरी ते राजकारणात होते की नाही याची आठवणदेखील आज कुणाला उरली नाही. हीच भारतातल्या लोकशाही समाजवादाची शोककथा आहे.

असो. पुरुषोत्तम त्रिकम हे स्वभावाने रंगेल, खेळकर नि विनोदी होते. मित्रांचे ते फार चाहते होते. कौटुंबिक जीवनात ते दुःखी होते. तथापि, आपले व्यक्तिगत दुःख त्यांनी आपल्या चेहऱ्यावर कधी दाखविले नाही. चौपाटीसमोर जो बादशाही 'ओरिएन्ट क्लब' आहे, त्या क्लबात ते, आम्ही नि बॅ. वसंत वेलणकर ह्यांनी कित्येक रात्री पराकाष्ठेच्या आनंदात घालविल्या आहेत. त्याची आठवण अद्याप आम्ही विसरलो नाही. त्यांच्या मृत्यूने एक महान कायदेपंडित, एक निष्ठावंत समाजवादी आणि जिवाला जीव देणारा एक दिलदार दोस्त गेला आहे, असे आम्ही अश्रुपूर्ण नेत्रांनी येथे नमूद करून ठेवतो.

(मराठा : २१-५-१९६९)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि ....................

# ४३

## मा. सा. कन्नमवार

मृत्यूने सध्या भलतेच थैमान घातले आहे. आजकाल तो कोणावर केव्हा नि कसा झडप घालील, ह्याचा मुळी नेमच राहिला नाही. भलताच पिसाळलेला दिसतो आहे तो गेल्या पंधरवड्यात ! महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री मारोतराव कन्नमवार अवघ्या दीड दिवसाच्या आजारात अशा अनपेक्षित आणि आकस्मिक रीतीने मरण पावतील असे चुकून तरी कोणाच्या ध्यानीमनी आले असेल काय ? शनिवारी सकाळी त्यांना एकाएकी घेरी आल्यासारखे काय वाटायला लागले, पुन्हा दुपारी त्यांना बरे काय वाटायला लागले, तोच रविवारी दुपारी साडेचार वाजता एकाएकी त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना इस्पितळात काय नेले आणि अवघ्या साडेसहा तासांच्या आत मेंदूमधल्या रक्तस्रावामुळे त्यांचे अकस्मात निधन ते काय झाले ! सगळेच जसे काही एखाद्या स्वप्नामध्ये घडावे तसे घडले. कन्नमवारांच्या ह्या अकल्पित अवसानाची वार्ता ऐकून महाराष्ट्रातील सारी जनता हतबुद्ध होऊन गेली असेल यात काय शंका ? दुर्दैवाची विचित्र लीला तरी कशी असते बघा, की केवळ चार दिवसांपूर्वीच महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रि-पदावर स्थानापन्न होऊन कन्नमवारांना अवघे एक वर्ष पूर्ण झाले होते. आपल्या कारकीर्दीच्या दुसऱ्या वर्षात पदार्पण करताना अनेक नवे नवे बेत आणि कार्यक्रम त्यांनी आपल्या डोळ्यांसमोर रचले होते, तोच काळपुरुषाने त्यांच्यावर अचानक झडप घातली आणि पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे त्यांचे ते सारे मनोरथ उडवून लावले.

कन्नमवारांचा जन्म त्रेसष्ट वर्षांपूर्वी विदर्भात चांदा येथे झाला. एका गरीब घराण्यात ते जन्माला आले. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना फारसे शिक्षण घेण्याची संधीही लाभली नाही. त्यामुळे चरितार्थासाठी त्यांना कुठे वर्तमानपत्रे वीक तर कुठे रेल्वेत तिकीट-कलेक्टराची नोकरी कर असले सामान्य व्यवसाय पत्करावे लागले. तथापि, अगदी तरुणपणापासून त्यांना राजकारणाचे अत्यंत आकर्षण होते. म्हणून वयाच्या तेविसाव्या वर्षी त्यांनी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली देशात त्या वेळी चालू असलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्यात उडी मारली. काँग्रेसच्या राजकीय चळवळीत त्यांना अनेकदा शिक्षा भोगावी लागलेली आहे. सतत चाळीस वर्षे ते काँग्रेसचे अत्यंत निष्ठावंत सभासद होते. अखिल भारतीय काँग्रेस समितीचे ते गेली पंचवीस वर्षे सदस्य होते. मध्यप्रदेश प्रांतिक काँग्रेसचे ते कित्येक वर्षे अध्यक्ष होते. स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभेचे सदस्य होण्याचा बहुमान त्यांनी मिळविला होता.

त्यांच्या संसदीय कारकीर्दीला १९५२ साली प्रारंभ झाला. त्या वर्षी ते चांदा जिल्ह्यातून मध्यप्रदेश विधानसभेत निवडून आले आणि पहिल्याच वेळी आरोग्यमंत्री झाले. मुंबईचे द्विभाषिक राज्य निर्माण झाल्यानंतर त्या राज्याच्या विधानसभेत ते पुन्हा निवडून आले आणि आरोग्यमंत्री झाले. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर त्यांच्याकडे बांधकामखात्याचे मंत्रिपद सोपविण्यात आले. एक वर्षापूर्वी चीनने भारतावर आक्रमण केल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांना भारताचे संरक्षणमंत्री म्हणून पंडित नेहरूंनी केंद्र सरकारात बोलावले. तेव्हा त्यांच्या मोकळ्या झालेल्या मुख्यमंत्रिपदावर कन्नमवार ह्यांची निवड करण्यात आली. अखंड चाळीस वर्षे काँग्रेसची सेवा केल्याचा नि स्वातंत्र्याच्या चळवळीत अनेकदा देहदंड भोगल्याच्या कडकडीत तपश्चर्येचं फळ आयुष्याच्या अखेरीस कन्नमवारांना मिळाले. महाराष्ट्रासारख्या भारतातील एका महान राज्याचे ते मुख्यमंत्री झाले. त्यांच्या जीवनाच्या सार्थकाची ही परिसीमा होय. शिक्षणाचा किंवा ज्ञानाचा आयुष्यात फारसा लाभ मिळाला नसताना आणि पूर्ववयात एक वेळ रस्त्यावर वृत्तपत्रे विकणारा किंवा रेल्वे स्टेशनावर एक वेळ तिकीट-कलेक्टराचे काम केलेला असा एक सामान्य माणूस आयुष्याच्या अखेरीस एका विस्तीर्ण राज्याचा मुख्यमंत्री बनतो, हा मनुष्याच्या आयुष्यातील भाग्योदयाचा परमोत्कर्ष नव्हे तर काय?

हे भाग्य काही केवळ नशिबाच्या जोरावर कन्नमवारांनी प्राप्त करून घेतलेले

नाही. निःसीम सेवेच्या नि संघटनाचातुर्याच्या सामर्थ्यावर त्यांनी हे महान यश मिळविलेले आहे हे अगदी उघड आहे. कन्नमवार हे उत्कृष्ट संघटक होते, आणि लोकसंग्रह करण्याची त्यांच्याजवळ विलक्षण हतोटी होती. त्यांच्या परिचयाच्या कक्षेत एकदा एखादा माणूस आला रे आला की तो क्वचितच त्यांच्यापासून दूर जात असे. स्वतःच्या माणसांना सांभाळण्यासाठी—मग तो केवढाही लहान कार्यकर्ता असो—ते आपल्या जिवाचे रान करीत असत. त्यामुळे त्यांच्या अनुयायांचा भरणा फार मोठा असे.

केवळ राजकीय क्षेत्रातच त्यांनी कार्य केले असे नव्हे, तर शैक्षणिक, सामाजिक आणि वृत्तपत्रीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या भागात पुष्कळच काम केलेले आहे. तीस वर्षांपूर्वी त्यांनी 'नवभारत विद्यालय' (आता 'गांधी विद्यालय') स्थापन केलेले आहे. तशीच दोन-तीन साप्ताहिकेही त्यांनी काढलेली होती 'भारत सेवक समाज', 'ग्रामोद्धार संघटना' आणि 'जिजामाता स्मारक' ह्या संस्थांचे ते सूत्रधार होते. लेखनाचीही त्यांना आवड असे. गांधीजींची आणि जिजामातेची दोन लहान मराठी चरित्रे त्यांनी लिहिली आहेत. त्यांच्या अंगी वक्तृत्व फारसे नव्हते. पण कधी कधी ते रंगात आले म्हणजे त्यांचे भाषण श्रवणीय होई. हिंदी आणि मराठीमधली काही सुभाषिते आणि म्हणी ह्यांचा समर्पक वापर करण्यात त्यांचा हातखंडा असे.

त्यांची राहणी अगदी साधी असे. त्यामुळे त्यांच्याशी बोलताना, वागताना किंवा मिसळताना कोणालाही संकोचल्यासारखे वाटत नसे. पण बाहेरून ते जरी किती साधे आणि भोळे दिसत असले, तरी आतून ते चांगलेच पक्के आणि हट्टी होते. हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य ते मुख्यमंत्री झाल्यानंतरच आम्हाला तरी निदान प्रकट झाले. एऱ्हवी जरी ते हसून खेळून वागत असले, तरी आपल्या मनाविरुद्ध जर एखादी गोष्ट घडली तर त्यांच्या रागाचा पारा चांगलाच वाढत असे. त्यामुळे जनतेच्या सरकारविरोधी चळवळी सामोपचाराने मिटविण्याची हातोटी त्यांना कधीच साधली नाही. मुंबईतील महापालिकेच्या कामगारांचा संप गेल्या ऑगस्टमधे झाला. त्यांना सहानुभूती दाखविण्यासाठी 'बेस्ट' नोकरांनी नि टॅक्सीवाल्यांनी संप पुकारला. पुढे '२० ऑगस्ट'ला 'मुंबई बंद' झाली. ह्या सर्व संपकाळातले कन्नमवारांचे वर्तन अत्यंत अदूरदर्शी आणि हट्टवादीपणाचे होते. त्यामुळे मुंबईच्या कामगारांत ते अत्यंत अप्रिय होऊन बसले. विधानसभेतील आमच्या विरोधीपक्षांशी सहकार्य करण्याचा

त्यांनी एकदाही कधी प्रयत्न केला नाही. उलट आम्ही तो केला असता त्यांनी तो झिडकारून लावला. विरोध आणि टीका ह्यांचे त्यांना फार मोठे वावडे होते. काकासाहेब गाडगीळ जेव्हा काँग्रेसवर टीका करू लागले, तेव्हा त्यांना त्यांनी चक्क सांगितले की, 'काँग्रेसवर टीका करायची असेल तर काँग्रेसमधून चालते व्हा!' 'पानशेत–खडकवासला' अहवालामधे महाराष्ट्र सरकारच्या अधिकाऱ्यांवर आणि काही धोरणावर न्या. नाईक ह्यांनी जे ताशेरे झाडले, त्याने आपल्या सरकारची होणारी अप्रतिष्ठा वाचविण्यासाठी त्या अहवालाच्या निष्कर्षाचा विपर्यास करण्याचा कन्नमवारांनी आपल्या अधिकाऱ्यांकरवी जो हेतुपुरःसर प्रयत्न केला, त्यामुळे त्यांनी निष्कारण आपले हसू करून घेतले. 'कामराज योजना' महाराष्ट्र राज्याला लागू करण्याच्या बाबतीतही कन्नमवारांनी जो हटवादीपणा दाखवला नि काँग्रेस-श्रेष्ठींचे म्हणणे-सुद्धा धाब्यावर बसविले, त्यामुळे साऱ्या भारतात ते टीका विषय होऊन बसले. ह्याच संदर्भात मागे ते बोलत असताना एकदा म्हणाले होते की, "यशवंतराव चव्हाणांनी मला दिलेले हे मुख्यमंत्रिपद मी जिवंत असेतोपर्यंत सोडणार नाही!" ती त्यांची प्रतिज्ञा आज अशा भयानक रीतीने खरी ठरेल, ह्याची कोणाला कल्पना होती?

कन्नमवारांच्या स्वभावातला मुख्य दोष हा की, त्यांना आपल्या बुद्धीच्या नि शक्तीच्या मर्यादांचे कधीच आकलन होऊ शकले नाही. त्यामुळेच त्यांचे वागणे नि बोलणे कधी कधी हास्याचा विषय होऊन बसे. आम्ही त्यांच्यावर वेळोवेळी जी प्रखर टीका केली, ती ह्याच कारणामुळे. पण त्या टीकेचा योग्य तो बोध खेळाडूपणाने न घेता, ते आमच्यावर भलतेच चिडले नि आम्हाला वठणीवर आणण्यासाठी 'वाटेल तसे कायदेशीर उपाय' योजण्याची धमकी आम्हाला देऊन त्यांनी आमच्यावर एक नाही–दोन नाही–तीन फौजदारी खटले भरले. ह्या आमच्यावरील तीनही खटल्यांचा निकाल लागेपर्यंत कन्नमवार जगले वाचले असते तर आम्हांला विशेष आनंद झाला असता. आमचा नि त्यांचा काही खाजगी हेवादावा नव्हता. विरोधी पक्षाचे निर्भय आणि सत्यवक्ते पत्रकार म्हणून राज्यकर्त्यांवर टीका करणे, हा भारतीय लोकशाहीने आम्हांला प्राप्त करून दिलेला आमचा एक पवित्र हक्क आहे. तोच आम्ही राज्यकर्त्यांच्या रागालोभाची परवा न करता बजावला. दुसरे काय? पण कन्नमवारांच्या आकस्मिक मृत्यूमुळे त्या सर्व राजकीय मतभेदांना आता मूठमाती मिळाली. महाराष्ट्र राज्यासारख्या एका महान राज्याच्या जबाबदारीचा प्रचंड बोजा कन्नमवारांना

यांच्या ह्या वार्धक्यात झेपण्यासारखा नव्हता. म्हणूनच त्याच्या धकाधकीने आणि दगदगीने त्यांना आकस्मिक मृत्यू प्राप्त झाला असावा असे आमचे निदान आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाला यशवंतराव चव्हाणांनी जी थोर प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती, तीही शारीरिक आणि बौद्धिक मर्यादांमुळे कन्नमवारांना नीटशी राखता आलेली नाही. पण ते काही जरी असले, तरी कन्नमवारांच्या मृत्यूमुळे काँग्रेसचा एक ज्येष्ठ नि निष्ठावंत सेवक आणि स्वातंत्र्याच्या झगड्यात झुंजारपणे झगडलेला एक थोर देशभक्त नाहीसा झाला आहे, यात मुळीच संशय नाही!

( मराठा : २६-११-१९६३ )

# ४४

# भारताचा विनोदसम्राट

होमी मोदींच्या मृत्यूमुळे भारताच्या सार्वजनिक, राजकीय आणि औद्योगिक जीवनामधला एक विलक्षण बुद्धिमत्तेचा, स्वतंत्र कर्तृत्वाचा आणि लोकोत्तर प्रतिभेचा महापुरुष नाहीसा झालेला आहे! त्यांच्या राजकीय विचारसरणीबद्दल पुष्कळांचे मतभेद असू शकतील. त्यांची काही काही मते कित्येकांना मान्यही होण्यासारखी नसतील, पण ते एक कट्टर देशभक्त होते आणि त्यांनी आपले प्रदीर्घ आयुष्य भारतीय जनतेची विविध रीतींनी सेवा करण्यात वेचले, ह्याविषयी कोणाचाही मतभेद असणे शक्य नाही. त्यांच्याबद्दल आम्हांला पहिल्यापासून जे विलक्षण आकर्षण वाटत असे त्याचे कारण त्यांचा दिलदार नि खेळाडू स्वभाव अन् प्रखर विनोदबुद्धी!

१९२० साली आम्ही मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजमध्ये असताना ते आम्हांला ‘ Constitutional Law ’ शिकवीत असत. उत्तम पोषाख, तेजस्वी आकृती आणि फर्डे इंग्लिश ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक वैशिष्ट्ये अद्यापही आम्ही विसरलो नाही. तथापि त्यांचे विनोदी वक्तृत्व त्या काळी तेवढे विकसित झाले नव्हते, पण जसे जसे ते सार्वजनिक जीवनात मोठमोठ्या क्षेत्रांतून महत्त्वाची पदे भूषित करू लागले, तसतसे त्यांच्या विनोदी वक्तृत्वाने ते आपल्या श्रोत्यांना मंत्रमुग्ध करू लागले. कवी हा जसा जन्मावा लागतो तसा विनोदी माणूस हा देखील जन्मावाच लागतो. ती शक्ती जन्मतःच माणसाला प्राप्त व्हावी लागते. मारूनमुटकून कोणालाही ‘ विनोदी ’ होता येत नाही. भारतातील इतर जमातीं-

पेक्षा पार्शी जमात ही अधिक थट्टेखोर आहे. हास्यविनोदाची खसखस त्यांच्या समाजात वाजवीपेक्षा जास्त पिकते. तथापि, मोदी घराणे हे खानदान आणि प्रतिष्ठित असल्याने त्यांच्या घराण्यात विशेषेकरून गांभीर्याचीच परंपरा चालत आलेली होती.

बरे, पाश्चात्त्य वाङ्मयातील विनोदी लेखकांच्या लिखाणांचा, त्यांच्या कोट्यांचा, वक्रोक्तींचा किंवा त्यांच्या हास्यकथांचा पद्धतशीर अभ्यास होमी मोदी ह्यांनी केला होता असे म्हणता की काय? मुळीची नाही. त्या बाबतीत ते अत्यंत आळशी होते. विनोदबुद्धी हे एक 'ईश्वराचे देणे' आहे असे त्यांचे म्हणणे असे. इकडून तिकडून जमवलेल्या कोट्या चिवड्यात जसे खोबरे घालतात तशा त्या आपल्या भाषणात बळेच घुसडून कोणालाही विनोदी वक्ता होता येणार नाही असे त्यांचे मत होते. माणसाच्या जीवनात विनोदाला फार महत्त्वाचे स्थान आहे. तथापि भारतात विनोदबुद्धीचा फार मोठा अभाव असल्याने येथील राजकारणाला काही प्रमाणबद्धताच उरली नाही असे ते म्हणत. ह्या दृष्टीने त्यांनी विनोदाची जी व्याख्या केली आहे ती मोठी मार्मिक आहे. ते म्हणत, "विनोदाचा उद्देश केवळ लोकांना हसविणे हा नसून, मानवी व्यवहारात समतोल निर्माण करणे हा आहे!"

या देशातल्या राजकारणी लोकांच्या स्वभावाचे विश्लेषण करताना मोदी एकदा म्हणाले की, "आमचे मुत्सद्दी लोक राजकारणाकडे फारच गांभीर्याने पाहतात. एवढेच नव्हे तर आपल्याप्रमाणे आपले श्रोतेसुद्धा गंभीर आहेत असा त्यांनी ग्रह करून घेतलेला आहे. ह्या देशातल्या तत्त्वज्ञानात इहलोकापेक्षा पारलौकिक जीवनाला जास्त महत्त्व दिले जाते. ही एक गोष्ट आणि दुसरी ही की, शतकानुशतके पारतंत्र्यात राहण्याची येथील लोकांना सवय झालेली आहे. म्हणून एखादा माणूस जितका जास्त गंभीर आणि त्याचे जीवन जितके जास्त वैराग्यपूर्ण तितका तो जास्त मोठा असे या देशात मानले जाते. हास्यविनोद आणि खेळकरपणा ही ह्या देशात मोठेपणाची लक्षणे समजली जात नाहीत. त्याचा परिणाम उलटा असा झाला आहे, की हास्यविनोदाचा या देशात फार मोठा तुटवडा असल्याने सर्वसामान्य लोकांना त्याची विलक्षण भूक लागून राहिली आहे."

जीवनात प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात : एक गंभीर बाजू नि दुसरी खेळकर बाजू. आयुष्यात ज्या ज्या गोष्टीचा संबंध येतो, त्या त्या गोष्टीची

नेमकी खेळकर बाजू शोधून काढण्याची होमी मोदी ह्यांना उपजत देणगी होती. म्हणून एखाद्या डोंगरातून एखादा झरा जसा लीलेने उचंबळतो, तितक्या सहजतेने होमी मोदींचा विनोद त्यांच्या संभाषणातून झुळझुळत असे. " ज्या दोन गोष्टींत काहीच साम्य नाही, उलट सकृद्दर्शनी विरोधच आहे, अशा गोष्टीमध्ये काहीतरी मौजेचे साम्य आहे, असे अत्यंत अनपेक्षितपणे आणि चातुर्याने दर्शवून जो ऐकणाराला आनंद देतो नि चकित करतो, तो विनोद ! " अशी एका अमेरिकन शब्दकोशामध्ये 'विनोदा'ची व्याख्या दिलेली आहे. त्या व्याख्येच्या कसोटीला होमी मोदी ह्यांचा विनोद सर्वतोपरी उतरण्यासारखा आहे. विनोदाची शब्दयोजना सुखदायक असावी. त्याने दंश होता कामा नये. त्यामध्ये गुदगुल्या करणारा खेळकरपणा असावा. होमी मोदींचा विनोद अशा स्वरूपाचा होता. म्हणून त्यांच्या विरोधकांशी त्यांचे अनेक वाद होऊनही त्यांचे संबंध स्नेहाचे आणि खेळाडूपणाचे राहिले. एका विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगी मोदी अध्यक्ष होते, आणि राजगोपालाचारियर मुख्य पाहुणे होते. त्यांची ओळख करून देताना मोदी म्हणाले, " बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. राजाजींची व माझी एकदा गाठ पडली. कोठल्या तरी विषयावर आम्हांमध्ये फार मोठा वाद होता. त्याबाबत राजाजी माझ्याशी इतक्या गोड आणि परिणामकारक भाषेत बोलले, की शेवटी त्यांची बाजू संपूर्णपणे मला पटली आणि त्या प्रश्नावर मला स्वतःची काही मतेच उरली नाहीत. त्यानंतर एक दोन दिवस जेव्हा गेले, तेव्हा मी भानावर आलो आणि मग मी विसरून गेलेली माझी पहिली सर्व मते मी पुन्हा गोळा केली. "

१९४४ साली मोदी हे व्हॉइसरॉयच्या कार्यकारिणीचे सभासद होते. त्या वेळी पुण्याच्या 'आगाखान पॅलेस'मध्ये महात्मा गांधी स्थानबद्ध असताना त्यांनी उपोषण सुरू केले. तेव्हा महात्माजींची स्थानबद्धतेतून ताबडतोब मुक्तता करावी अशा मताचे होमी मोदी होते, पण व्हॉइसरॉयनी मोदींचे ते म्हणणे मान्य केले नाही. तेव्हा मोदींनी कार्यकारिणीच्या आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यानंतर पुढे पंधरा महिन्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव सरकारने गांधीजींची मुक्तता केली. त्यानंतर जुहूला गांधीजींचे काही काळ वास्तव्य होते. त्या वेळी हिंदु-मुस्लिम संबंध बिघडून अगदी विकोपाला गेले होते. मोदींना त्याबाबत चिंता वाटत होती. गांधीजींची मुद्दाम भेट घेऊन मोदी त्यांना म्हणाले, " महात्माजी, तुम्ही काही करा, पण तुमच्या आयुष्यात

देशातल्या हिंदु-मुसलमानांचा प्रश्न कायमचा मिटवून टाका ? " महात्माजी तावडतोब उत्तरले, " त्याबाबत तुम्ही मुळीच काळजी करू नका. मी एकशेवीस वर्षे जगणार आहे. " तेव्हा मोदी चटकन म्हणाले, " हे मला पूर्वीच तुम्ही का सांगून ठेवले नाहीत ? म्हणजे मी व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीचा राजीनामा कधीही दिला नसता ! " महात्माजींची हसता हसता अगदी मुरकुंडी वळली.

मुंबई राज्याचे द्विभाजन होण्यापूर्वी शांतिलाल शहा मजूरमंत्री होते. ते एकदा आपल्या भाषणात म्हणाले होते की, " सरकार हे एखाद्या सुंदर सुगृहिणीप्रमाणे आपल्या कर देणाऱ्या प्रजेसाठी निरनिराळ्या तऱ्हेची रुचकर पक्वान्ने तयार करीत असते. " ह्या शांतिलाल शहांच्या भाषणाला उद्देशून पुढे होमी मोदी अहमदाबादच्या रोटरी क्लबसमोर भाषण करताना म्हणाले, " मी मुंबई सरकारचा जेव्हा यजमान ( राज्यपाल ) होतो, तेव्हा मला आपल्या गृहिणीचा हा पूर्वीचा लौकिक माहीत नव्हता. नाही तर अलीकडच्या तिच्या त्या वर्तनात फरक पडलेला पाहून मी तिचे चांगले कान पिरगाळले असते आणि घरात जास्त कडकपणे वागलो असतो. " मोरारजी देसाई एकदा एका जाहीर समारंभाच्या प्रसंगी अध्यक्ष असताना मोदी प्रमुख वक्ते होते. त्या वेळी ते म्हणाले, " मी आणि मोरारजी अगदी जानी दोस्त आहोत त्याचे मुख्य कारण हे की, पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही गोष्टीबद्दल केव्हाही आपले मतैक्य होऊच द्यायचे नाही असा आम्ही आपापसात गुप्त करार केलेला आहे. "

ताजमहाल हॉटेलच्या सुवर्ण-महोत्सवाच्या वेळी आपल्या भाषणात ताज-महालचा गौरव करताना आमंत्रित पाहुण्यांवर होमी मोदी ह्यांनी विनोदाचा एक प्रचंड बॉंबगोळा टाकून हास्यरसाचा अक्षरशः हलकल्लोळ उडवला होता. ते म्हणाले, " ताजमहाल हॉटेलने अनेक दांपत्यांचे संभाव्य काडीमोड थांबवून समाजाची फार मोठी सेवा केली आहे. कारण आमच्या बायकांना उत्तम स्वयं-पाक करता येत नाही अशी ज्या नवऱ्यांची तक्रार होती त्यांना ' ताजमहाल 'ने उत्तमोत्तम अन्न जेवू घातले म्हणून त्या नवऱ्यांनी आपापल्या बायकांना काडी-मोड न देता त्यांनी आपल्या घरात मोठ्या प्रेमाने ' पाळीव प्राणी ' म्हणून ठेवले. " कित्येक अमेरिकन हॉटेलांमधे अन्नपत्रकावर ( MENU CARD ) पुढील वचन लिहिलेले आढळते. " If your wife cannot cook, do not divorce her, eat here and keep her for a pet. " त्याच्या आधारावर होमी मोदींनी हा विनोद केला हे उघड होते.

भारत सरकारात मोदी हे पुरवठामंत्री असताना सर फिरोजखान नून हे त्यांचे सहकारी मंत्री होते. एकदा सर फिरोजखान नूनने आपल्या बंगल्यावर दुपारच्या भोजनाला ( lunch ) काही निवडक पाहुण्यांना बोलाविले होते. त्यात काही अमेरिकन आमंत्रित होते. सर फिरोजखानच्या त्या भोजनाला एक अत्यंत सुंदर तरुण मुलगी पाहुण्यांचे स्वागत करीत होती. तेव्हा ती कोण आहे अशी पाहुण्यांनी साहजिकच विचारणा केली. तेव्हा त्यांना सांगण्यात आले की ती सर फिरोजखान नूनची पुतणी आहे म्हणून. पुढे काही दिवसांनी ती 'मिसेस' फिरोजखान नून झाली तेव्हा त्या खान्याला जे पाहुणे हजर होते त्यांना ती बातमी ऐकून आश्चर्य वाटले. ते होमी मोदींना विचारीत "But Sir Homi, that noon she was Noon's niece! ( पण सर होमी, त्या दुपारी–Noon तर ती नूनची पुतणी होती. )" त्यांना मोदी म्हणत, "But she became Lady Noon in the afternoon ( पण ती दुपार संपताच afternoon लेडी नून झाली. )" तेव्हापासून सर फिरोजखान नूनच्या पत्नीला लोक विनोदाने लेडी आफ्टरनून असे म्हणू लागले. त्या विनोदाचे जनक आपण नाहीत असे जीव तोडून होमी मोदी सांगत, पण त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवीत नसे. त्यानंतर पुढे काही दिवसांनी सर होमींनी तसाच एक खाना आपल्या बंगल्यावर दिला. त्या वेळी त्यांच्या स्वतःच्या दोन तरुण पुतण्या उपस्थित होत्या. तशी त्यांची ओळख जमलेल्या पाहुण्यांना सर होमी करून देत असताना सर नूनच्या त्यापूर्वीच्या खान्यालाही हजर असलेला एक अमेरिकन पाहुणा आपल्या तीव्र अनुनासिक स्वरात उद्गारला, "Oh, I see, they call them nieces here!" ( अस्सँ ? ह्याँ देशाँत त्याँना पुतण्याँ म्हणताँत काँय ? )

मध्यवर्ती कायदेमंडळात मोदी हे चांगले बारा वर्षे सदस्य होते. ती बारा वर्षे आपल्या उत्कृष्ट वक्तृत्वाच्या आणि विशेषतः आपल्या विलक्षण विनोदाच्या सामर्थ्यावर त्यांनी गाजवली. त्यांच्या भाषणाची प्रतिवृत्ते देता देता वार्ताहरांच्या संग्रही असलेल्या सर्व गौरवपर विशेषणांचा साठा संपला. त्यांच्या विरोधकांनी त्यांच्यावर टीका करताना त्यांच्या नावावर अनेक कोट्या केल्या. कॉंग्रेसच्या नि राष्ट्रवादी सदस्यांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी 'मोदी–लीज' नावाचा जो ऐतिहासिक करार केला त्याने भारताच्या कापूसधंद्याचा घात झाला म्हणून राष्ट्रवादी वृत्तपत्रांनी त्या कराराचे 'होमीसाईड' ( प्राणहत्या ) असे वर्णन

केले. आपल्या विरोधकांचे अर्धे म्हणणे मान्य करण्याची मोदी यांची नेहमी तयारी असे. त्या त्यांच्या वृत्तीला 'Modyfication' असे त्यांचे विरोधक म्हणत. तथापि, ज्या 'ओटावा करारा'ला मोदींनी आधी कडक विरोध केला होता, आणि म्हणून त्या कराराचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी कमिटीसुद्धा नेमली होती त्या कराराला जेव्हा अखेर मोदींनी पाठिंबा दिला तेव्हा विरोधकांनी एक स्वराने गर्जना केली : "Mody-fication again!" मोदी छाप विनोदांना नि कोट्यांना 'Modyism' असे नाव पडले.

'माझे आयुष्य पुन्हा जगण्याची जर मला संधी मिळाली तर!' या विषयावर आकाशवाणीवरून एकदा ते बोलत असताना म्हणाले, "तर या जन्मी मला प्राप्त झालेल्या अनेक गोष्टी मला बदलून पाहिजेत असा मी ईश्वराजवळ हट्ट धरेन—पण पण या जन्मी मला प्राप्त झालेली एक गोष्ट मात्र दुसऱ्या जन्मी बदलावी अशी मी कधीही इच्छा धरणार नाही—कोणती गोष्ट ती ?—माझी बायको! जन्मोजन्मी तीच पत्नी मला लाभावी असा परमेश्वराजवळ मी हट्ट धरीन!" क्षणभर थांबून होमी मोदी हलकेच म्हणाले, "आमच्या घरातली शांतता भंग होऊ नये म्हणून मी हे विधान मुद्दाम करतो आहे, हे माझ्या श्रोत्यांच्या लक्षात आलेच असेल!" मध्यवर्ती कायदेमंडळात बालविवाह प्रतिबंधक बिल जेव्हा आले तेव्हा सनातनी सदस्यांनी त्याला कडाडून विरोध केला. बैजनाथ बजोरिया नावाचा एक सनातनी सदस्य तब्बल दोन तास बोलत होता. त्याचे कंटाळवाणे भाषण ऐकून सारे सभागृह पेंगू लागले. अध्यक्षांनाही डुलक्या येऊ लागल्या. तेव्हा मोदी मध्येच ओरडून म्हणाले, "म्हणजे तुम्हांला अठरा वर्षांच्या एका मुलीपेक्षा नऊ नऊ वर्षांच्या दोन मुली चालतील!" त्याबरोबर सारे सभागृह एकदम जागे झाले आणि खो खो हसू लागले. बजोरिया आपल्या आसनावर मागल्या मागेच कोसळले.

मुंबईचे सुप्रसिद्ध मजूरनेते ना. म. जोशी ह्यांची काहीतरी खोडी काढल्यावाचून मोदी राहात नसत. एकदा जोशीबुवांनी आपल्या कायदेमंडळातील भाषणाची सुरुवात अशी केली, "अध्यक्ष महाराज, मला हे कळत नाही की" मोदी मधेच ओरडले, "तीच तर खरी तुमची अडचण आहे." सभागृहात हास्यरसाचा प्रचंड स्फोट झाला! १९३७ च्या अर्थसंकल्पात परदेशी दारूवर कर वाढला. त्याला विरोध करताना मोदी म्हणाले, "दारूवरील कर वाढण्याच्या आधीपासून मी दारू पितो आहे आणि धूम्रपान करतो आहे. पण

आता एवढा कर वाढल्यानंतर पुढे काय करायचे हे मला कळत नाही. " तेव्हा सत्यमूर्ती ओरडले, " ताडी प्या ! " मोदी शांतपणे उत्तरले, " माफ करा, कोणत्याही स्वदेशी वस्तूप्रमाणे ताडीने माझे डोके गिरगिरते ! " मद्यपानाची त्यांना फार आवड असे. ते म्हणत, " थोडीशी दारू घेतली की मी गंभीर होतो. आणखी थोडी घेतली की मी आनंदी होतो. ( When I take little, I become sober, and when I take little more I become gay.)" पण तेवढ्या मर्यादेपलिकडे ते जात नसत.

मद्यपानाप्रमाणेच स्त्रिया हा मोदींच्या विनोदाचा एक मोठा आवडता विषय होता. त्यांचा त्या बाबतीतला एक ' मोदीझम ' अमर आहे. याचे मराठी भाषांतर करता येणार नाही. ' right ' आणि ' write ' या भिन्न अर्थाच्या नि समान उच्चाराच्या शब्दावरील ती कोटी आहे. ती कोटी अशी, ' Do right and fear no man, don't write and fear no woman ! " एकदा एका व्याख्यानात ते म्हणाले, " स्त्रीने पुरुषावर जे साम्राज्य प्रस्थापित केले आहे ते जगातील इतर सर्व साम्राज्यांपेक्षा जास्त खंबीर आणि टिकाऊ आहे. पुरुष हा सृष्टीचा राजा आहे, पण स्त्री ही त्या राजाची ' सम्राट ' आहे ! "

स्वतःला खर्ची घालून वक्त्याने केलेला विनोद श्रोत्यांना फार आवडतो. ते तंत्र मोदींना चांगलेच अवगत होते. एकदा आपल्या यशस्वी वक्तृत्वाचे रहस्य मोदींनी आपल्या श्रोत्यांना समजावून सांगितले, ते म्हणाले, " माझ्या व्याख्यानाचा प्रारंभ मी काही तरी बाष्कळ आणि मूर्खपणाच्या गोष्टी सांगून करतो. त्या ऐकून श्रोते पोठ धरधरून हसू लागतात. अशा रीतीने ते एकदा माझ्या हातात आले म्हणजे मग मी त्यांना काय वाटेल ते सांगितले तरी ते मुकाट्याने ऐकून घेतात. "

सतत पन्नास-साठ वर्षे जीवनाच्या विविध क्षेत्रांतून त्यांनी सर्वश्रेष्ठ सन्मान मिळविले आहेत. ते मुंबईचे महान उद्योगपती होते. गिरणी मालकांचे वर्षानुवर्षे अध्यक्ष होते. मुंबई महापालिकेचे २९ वर्षे सदस्य नि एकदा लोकनियुक्त अध्यक्ष होते. केंद्रीय कायदेमंडळाचे १२ वर्षे सदस्य होते. टाटांचे वर्षानुवर्षे डायरेक्टर होते. पहिल्या गोलमेज परिषदेचे सदस्य होते. पुढे ते ' सर ' झाले. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीचे सदस्य होते. मुंबईचे ॲक्टिंग गव्हर्नर आणि उत्तर प्रदेशाचे गव्हर्नर होते. घटना समितीचे सभासद होते. त्याखेरीज टर्फ क्लबचे,

क्रिकेट क्लबचे नि कित्येक संगीत संस्थांचे ते अध्यक्ष होते. तथापि, इतक्या विविध क्षेत्रांत वर्षानुवर्षे वावरूनही त्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपले वर्चस्व मुख्यत्वेकरून विनोदाच्या सामर्थ्यावर कायम ठेवले होते. म्हणून या शतकातले 'भारताचे विनोदसम्राट' असे त्यांना संबोधल्यानेच त्यांचा खरा गुणगौरव होणार आहे. आता त्यांना आवडणाऱ्या एका पर्शियन गझलनेच त्यांच्या ह्या मृत्युलेखाचा शेवट करू : "मी जन्माला आलो तेव्हा मी रडत होतो, आणि तुम्ही सर्व हसत होता. जन्मभर मी हसलो नि तुम्हाला हसविले. आता हसत हसत मी या जगाचा निरोप घेत आहे आणि तुम्ही मात्र रडत आहात!"

(मराठा : १२-३-१९६९)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमस
...................... दि: ..................
.......................... नोंद दि: ..................

४५

# अर्धशतकाचा माझा मित्र गेला !

पूर्व आफ्रिकेत टँगानिका प्रदेशामध्ये गेली तीस वर्षे वास्तव्य करीत असलेले माझे जिवलग बाळमित्र डॉ. दिनकर अप्पाजी पुरंदरे ह्यांना गेल्या दहा तारखेला लंडन येथे सेंट जेम्स हॉस्पिटलमध्ये यकृताच्या विकाराने देवाज्ञा झाली हे कळविण्यास मला अतिशय दुःख होत आहे. आम्ही उभयता मूळचे कोडितचे राहणारे. कोडित हे सासवडपासून दोन-अडीच कोस लांब आहे. आमचे दोघांचे वडीलही आमच्याप्रमाणेच बाळमित्र होते. म्हणजे जवळजवळ गेल्या शंभर वर्षांचे उभयतांच्या घराण्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. माझे वडील १९०४ साली सासवड म्युनिसिपालिटीचे सेक्रेटरी होते. म्हणून आम्ही सासवड येथे राहात होतो. कोडितला शिक्षणाची सोय नसल्यामुळे दिनकर हा आमच्या घरी वयाच्या सहाव्या-सातव्या वर्षी राहावयाला आला. आमच्या वडिलांची सांपत्तिक स्थिती साधारणच होती. तथापि, आपल्या मित्रांची मुले आपल्या घरी शिक्षणासाठी ठेवण्याचा त्यांना फार नाद असे. दिनकरखेरीज आमच्या घरी आणखी चार-पाच मुले अभ्यासाला होती. आमचे मराठी शिक्षण संपते आहे तोच पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन (भावे स्कूल)ने सासवड येथे तीन इयत्तां-पर्यंतची इंग्रजी शाळा उघडली. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाची आमची तेथेच सोय झाली. सार्वजनिककाका जोशी ह्यांचे पुतण्ये श्री. रावसाहेब जोशी हे सुदैवाने आम्हाला त्या वेळी हेडमास्तर लाभले. पुण्याच्या ‘ सोशल क्लब ’चे ते सभासद होते. त्यामुळे त्यांनी आम्हाला नाटकांची गोडी लावली. ह्या वेळी आम्ही जे

समवयस्क आणि समवर्गीय मित्र होतो त्यांनी आपापल्या निरनिराळ्या गुणांनी आणि उद्योगांनी सासवडच्या सार्वजनिक जीवनात खूपच खळबळ उडवून दिली. सरदार बाळासाहेब पुरंदरे हे आमचे वर्गबंधू नि मित्र. त्यांच्या जुन्या ऐतिहासिक वाड्यामध्ये आमच्या साऱ्या खटपटी चालत. कऱ्हा नदीच्या घाटावर आंघोळी करावयाच्या, संगमेश्वरच्या देवळात आट्यापाट्या खेळावयाच्या, सरदार पुरंदऱ्यांच्या वाड्यात जादूचे खेळ, सर्कशी किंवा नाटके ह्यांचे जमतील तसे प्रयोग करावयाचे हा त्या वेळेचा आमचा कार्यक्रम असे. १९१२ साली आम्ही प्रो. काळे ह्यांचे 'विक्षिप्तराव' हे नाटक केले, त्यात मी चिकटंभटाचे काम केले आणि दिनकर पुरंदरे ह्यांनी मुख्य म्हणजे विक्षिप्तरावाची भूमिका केली. त्याखेरीज आमच्याबरोबर आमचे मित्र कृष्णराव देशमुख, सदाशिव वाळिंबे हेही होतेच. नाटकाचे पडदे मी नि दिनकर ह्यांनी रंगविले. पण पडदा वरखाली गुंडाळत जाण्याची युक्ती दिनकरनेच शोधून काढली. लहानपणापासून त्यांची यांत्रिक गोष्टींकडे जास्त प्रवृत्ती होती. हे आमचे 'विक्षिप्तराव' नाटक त्या वेळी फारच गाजले. पुढल्या वर्षी आम्ही 'तोतयाचे बंड' हे नाटक केले. त्यात दिनकर पुरंदरे ह्याने नाना फडणविसाचे काम केले आणि मी बगंभटाचे काम केले. अशा रीतीने अगदी लहानपणापासून मी आणि दिनकर ही जोडी सासवडमधल्या सर्व आबालवृद्धांना परिचयाची होऊन गेली.

अकरा-बारा साली आम्ही पुण्यास भावे स्कूलमध्ये आलो. राहात होतो आम्ही सरदार बाळासाहेब पुरंदऱ्यांच्या जुन्या कोटात. पुन्हा आम्ही सर्व सासवडचे मित्र पुण्याला जमा झालो. पुण्याला आल्यानंतर आम्हाला क्रिकेटचा फार नाद लागला. दिनकर हा उत्तम बॅट्समन होता. ज्या वेळी त्या वर्षी भावे स्कूलच्या 'सीनियर टीम'ने शील्ड मिळविले त्यामध्ये दिनकर होता. एस्. एस्. इरम हा टीमचा कॅप्टन होता. सुप्रसिद्ध भारतीय क्रिकेटर जे. जी. नवले हासुद्धा त्याच टीममध्ये होता. दिनकरचे शाळेच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष नसे. तो एक वर्ष नापास झाला. म्हणून मी मॅट्रिकच्या वर्गात गेल्यानंतर तो सहावीतच राहिला. आमच्या वडिलांचे स्नेही रा. ब. डॉ. पंढरीनाथ वामन शिखरे ह्यांनी सब्-असिस्टंट सर्जनच्या कोर्सकडे त्याला पाठवून द्या असे त्यांना सांगितले. त्या वेळी सब्-असिस्टंट सर्जन व्हावयास मॅट्रिक पास होण्याची आवश्यकता नव्हती. निवडणुकीच्या परीक्षेत दिनकर पास झाला आणि अहमदाबादच्या मेडिकल स्कूलमध्ये त्याची रवानगी झाली. येथून त्याच्या अंगभूत गुणांचा विकास होऊ लागला. तीन्ही वर्षांच्या

परीक्षांत तो पहिला आला आणि त्याला सरकारी शिष्यवृत्ती मिळत गेली. त्यामुळे त्याच्या शिक्षणाच्या खर्चाचा बोजा त्याच्या वडिलांवर पडलाच नाही. १९२० साली तो एल्. सी. पी. एस्. परीक्षा सन्मानाने उत्तीर्ण झाला आणि त्याची बैलहोंगल येथील सरकारी दवाखान्यात नेमणूक झाली.

लहानपणापासून दिनकर हा धाडसी आणि महत्वाकांक्षी होता. येथल्या सरकारी नोकरीत आपल्या गुणांना फारसा वाव मिळणार नाही आणि पैशाचीही फारशी प्राप्ती होणार नाही म्हणून त्याने आफ्रिकेत जावयाचे ठरविले. त्या काळात असा निर्णय घेणे ही असामान्य धैर्याची गोष्ट होती. त्याचे हे करणे त्या वेळी आम्हांपैकी कोणालाही आवडले नाही. पण ब्रिटिश ईस्ट आफ्रिकेत नोकरी मिळाल्यानंतरच त्याने ही गोष्ट आम्हांला सांगितली. त्यामुळे आमचे सांगणे निरर्थक होते. व्हिक्टोरिया न्यांझा सरोवरावरील बुकोबा गावी त्याची प्रथम नेमणूक झाली. दर साडेतीन वर्षांनंतर त्याला पाच महिन्यांची रजा मिळत असे. गेल्या तीस वर्षांत तो सात-आठ वेळा तरी येथे आला असेल. तो येथे आला म्हणजे रजेचे सर्व दिवस अन् सर्व रात्री आम्ही एकमेकांच्या संगतीतच घालवीत असू. त्या वेळी आमच्या गप्पागोष्टींना आणि प्रेमाला असा काही पूर येत असे की सांगता सोय नाही. टँगानिका विभागातील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणी सरकारी दवाखान्याचा प्रमुख म्हणून त्याने कामे केली. शस्त्रक्रिया-नैपुण्याबद्दल पूर्व आफ्रिकेत त्याची फार ख्याती झाली. त्याखेरीज त्याच्या मन-मिळाऊ, आनंदी आणि हौशी स्वभावामुळे तो केवळ महाराष्ट्रीय समाजातच नव्हे तर सर्व जातींच्या नि धर्मांच्या समाजात लोकप्रिय झाला. अहमदाबादेत राहिल्यामुळे त्याला गुजराती भाषा उत्तम तऱ्हेने बोलता येत होती. पूर्व आफ्रिकेत बोहरा आणि गुजराती यांचा भरणा फार. त्यामुळे त्या समाजात वावरताना दिनकरला त्याच्या गुजराती भाषेचा फारच उपयोग झाला. त्याचे खाजगी प्रॅक्टिस एकसारखे वाढत गेले आणि पूर्व आफ्रिकेतल्या नामांकित डॉक्टरांमध्ये त्याची गणना होऊ लागली. अशा रीतीने गेल्या तीस वर्षांत कीर्ती आणि संपत्ती ह्यांचा त्याला उत्कृष्ट लाभ झाला.

तीन वर्षांपूर्वी तो सेवानिवृत्त झाला आणि आपले उर्वरित आयुष्य पूर्व आफ्रिकेमध्येच घालवावयाचे त्याने ठरविले. मोशी येथे त्याने गेल्या वर्षीच 'पुरंदरे हॉस्पिटल'ची स्थापना केली. त्याचा थोरला मुलगा प्रभाकर ऊर्फ बंडू हा लखनौ विश्वविद्यालयात शेवटच्या एम्. बी. बी. एस्. च्या वर्गात शिकत आहे.

तो डॉक्टर झाल्यानंतर सदर हॉस्पिटल त्याच्या ताब्यात देऊन व्यवसायातून निवृत्त होण्याची त्याची मनीषा होती. १९२४ साली त्याचा प्रथम विवाह महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार ह्यांच्या कनिष्ठ भगिनीशी झाला. त्या विवाहापासून त्याला तीन अपत्ये झाली. बंडू हा सर्वांत मोठा मुलगा. १९२९ साली त्याची ही प्रथम पत्नी दोषी ज्वराने पुणे येथे अकस्मात वारली. त्यानंतर त्याने दुसरे लग्न केले. ह्या विवाहापासूनही त्याला तीन अपत्ये आहेत. चालू वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात त्याला कावीळ झाली. तेव्हापासून त्याची प्रकृती ढासळावयाला एकदम सुरुवात झाली. पूर्व आफ्रिकेतल्या डॉक्टरांना त्याच्या रोगाचे निदान होईना. हवापालट करूनही प्रकृतीला आराम वाटेना. मोंबासा येथे महर्षी अण्णासाहेब कर्वे ह्यांचे चिरंजीव डॉ. शंकरराव कर्वे हे ' पंड्या क्लिनिक 'चे प्रमुख डॉक्टर आहेत. त्यांच्या हॉस्पिटलमध्ये दिनकरराव राहिले. पण अंगावर सूज वाढू लागली. पोटात पाणी साचले. तेव्हा ' सिन्हासिस ऑफ द लिव्हर ' हा रोग असल्याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली. हा रोग असाध्यच आहे. शेवटचा उपाय म्हणून त्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी त्यांनी इंग्लंडला जावयाचे ठरविले. सप्टेंबरच्या अखेरीस ते आपल्या पत्नीला घेऊन इंग्लंडला गेले. डॉ. शंकरराव कर्वे ह्यांचे थोरले चिरंजीव मुंबईचे एम्. डी. आहेत. ते सध्या विलायतेला उच्च शिक्षण घेत आहेत. त्यांच्या मदतीने दिनकररावांना सेंट जेम्स हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळाला. अनेक उत्कृष्ट डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली. इंग्लंडला गेल्यावर पहिले तीन आठवडे त्यांची प्रकृती बरी होती. सुधारणेची थोडी आशा वाटू लागली. आपल्या चिंताक्रांत पत्नीलाच ते उलट धीर देत आणि विनोदाने म्हणत, " अग, मी आता इंग्लंडमध्ये आहे म्हणजे प्रत्यक्ष धन्वंतरीच्या मठातच आलो आहे. येथे यमराजाला येण्यास मज्जाव आहे आणि आपल्या लोकांचे तर इथे स्मशानच नाही ! "

एक नोव्हेंबरपासून त्यांची प्रकृती पुन्हा एकदम ढासळावयाला सुरुवात झाली. त्याच दिवशी त्यांनी मला लंडनहून अत्यंत हृदयद्रावक पत्र लिहिले. त्यात त्यांनी असे लिहिले होते, " रोगाला अजून आराम नाही. म्हातारा दिसू लागलो आहे. गळ्यावर वळ्या पडल्या आहेत. अशा परिस्थितीत पत्र लिहावे लागत आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. थोडक्यात म्हणजे, माझे पान झाडावर अकालीच पिकले ! तुझी-माझी गाठभेट पडेल की नाही मला माहीत नाही. पण माझा तुला विसर पडावयाचा नाही अशी खात्री वाटते. " त्यांना औषधोपचार

करणारे डॉक्टर वार्लिंग ह्यांनी शेवटी त्यांना त्यांच्या भवितव्याची स्पष्टच कल्पना दिली. तेव्हा उरलेले दोनतीन दिवस त्यांनी आपल्या सर्व बालमित्रांच्या आणि सासवड येथे घालविलेल्या बाळपणीच्या दिवसांच्या आठवणी अश्रुपूर्ण नेत्रांनी करण्यात घालविले. दहा नोव्हेंबर रोजी शांत चित्ताने त्यांनी इहलोकाचा निरोप घेतला. मानवी जीवनातील योगायोग काय विचित्र आहेत पाहा. कोडित-मधल्या एका गरीब कुळकर्ण्याचा मुलगा की ज्याच्याजवळ पुण्याला जाण्यासाठी भाड्यालासुद्धा पैसे नाहीत, तो डॉक्टर होऊन आफ्रिकेला जातो काय आणि तेथे तीस वर्षे कीर्ती आणि संपत्ती मिळवून शेवटी लंडनमध्ये टेम्स नदीच्या काठावर आपला देह ठेवतो काय. सर्वच काही अकल्पित आणि आश्चर्यकारक! आणि शेवटी त्याच्या अंत्यसंस्काराचे वेळी भारताचे हाय कमिशनर श्री. बाळासाहेब खेर ह्यांनी येऊन भाषण करावे हा योग तर कल्पनेच्या आटोक्या-बाहेरचा आहे. ११ नोव्हेंबर रोजी लंडन येथील 'गोल्डर्स ग्रीन क्रेमेटोरियम'-मध्ये दिनकररावांच्या शवाचे दहन वेदोक्त पद्धतीने करण्यात आले. पंचवीस-तीस महाराष्ट्रीय मंडळी हजर होती. लंडनमधील 'महाराष्ट्र मंडळा'चे अध्यक्ष श्री. द. वि. ताम्हणकर ('केसरी'चे बातमीदार) ह्यांनी त्या प्रसंगी मुख्य भाषण केले. त्यांनी मला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, "...आणि त्यानंतर हाय कमिशनर श्री. बाळासाहेब खेरांचेही फार चांगले भाषण झाले. त्यांनी श्रीमती पुरंदऱ्यांना धीर दिला व सर्व प्रकारचे पडेल ते साहाय्य करण्याचे अभिवचन दिले. भारताच्या प्रतिनिधीने वेळात वेळ काढून तेथे येण्याचे सौजन्य दाखविले हे विशेष होते. त्याखेरीज भारत भवनातील अंमलदार श्री. कुळकर्णी आणि त्यांच्या पत्नी यांनी श्रीमती पुरंदरे ह्यांच्याबद्दल फारच आपुलकी दाखविली आणि त्यांना आपल्याच घरी ठेवून घेतले. दुसरी मोठी मदत त्यांना जी झाली ती श्री. कृष्णाजी प्रल्हाद कानिटकर यांची. महाराष्ट्रीय माणसे तुसडी असतात असे समजण्यात येते. पण परदेशात श्रीमती पुरंदरे ह्यांच्या बाबतीत लंडनमधील महाराष्ट्रीयांनी दाखविलेली आत्मीयता खरोखरच अभिनंदनीय आहे."

मृत्युसमयी दिनकरराव ह्यांचे वय छप्पन्न वर्षांचे होते. माझ्यापेक्षा ते दोन वर्षांनी वडील होते. आम्हा दोघांनाही आपापल्या वडिलांकडून दुसरा कसलाही जरी वारसा मिळाला नसला तरी उंचीचा आणि उत्तम प्रकृतीचा वारसा मिळा-लेला होता. आमचे उभयतांचे वडील सहा सहा फूट उंचीचे होते. आम्ही

दोघेही त्यांच्यापेक्षा दीडदोन इंचांनी जास्तच होतो. दोघांची वजने सव्वादोनशे पौंडांच्या आजूबाजूला होती. पुण्याच्या टांग्यात आम्ही दोघे दोन्ही बाजूंनी एकदम बसू लागलो की घोडे तरी वर उचलले जायचे किंवा पोल्स तरी मोडायचे, म्हणून कित्येक टांगेवाले आम्हाला टांग्यामध्ये घ्यायला तयार नसावयाचे. आम्ही दोघे जण आणि उंचीरुंदीने आमच्याच एवढे असलेले आमचे मित्र श्री. शामराव भोळे रस्त्यातून बरोबरीने चालू लागलो की, सारा रस्ताच जवळजवळ अडावयाचा. उभ्या आयुष्यात दिनकर कधीही आजारी पडला नाही. फारच निकोप आणि सुदृढ अशी त्याची प्रकृती होती. आहारही फारच दांडगा असे. त्याचे वडील अठ्याहत्तर वर्षांचे होऊन वारले. तेव्हा तेवढे आयुष्य त्याला लाभावयाला काही अडचण नव्हती. पण आयुष्यात कोणत्याही गोष्टीची शाश्वती नसते हेच खरे.

दिनकरला वाङ्मयाचा लहानपणापासून फार नाद. शाळेत असताना तो कविताही करावयाचा. आम्ही दोघांनी त्या काळातले कोणतेही नाटक पाहावयाचे बाकी ठेवले नाही. त्याची विनोदबुद्धी फार तल्लख होती. आम्ही दोघे एकत्र आलो म्हणजे निरनिराळ्या गमती आणि गोष्टी यांची पारायणे होऊन हास्यरसाला महापूर यायचा. त्याने लेखन असे काही केलेले नाही. पण माझे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व घडविण्यात त्यांचा फार मोठा भाग होता ह्यात शंका नाही. माझे पहिले नाटक ' साष्टांग नमस्कार ' जेव्हा रंगभूमीवर आले त्या वेळेस ते यशस्वी व्हावे एवढ्यासाठी त्याने मला फार साहाय्य केले. माझे सर्व वाङ्मय मोठ्या आवडीने वाचून त्यातील रसाचा तो मोठ्या रसिकतेने आस्वाद घेई. माझ्या अनेक व्याख्यानांना आणि महत्त्वाच्या समारंभांना तो माझ्यासमवेत उपस्थित राहिलेला आहे. एकेचाळीस साली पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये मजवर जो हल्ला झाला, त्याची आगाऊ सूचना त्यानेच मला दिली. त्या वेळी तो पुण्यात होता. मी त्याला चुकवून एकटा व्याख्यानाला गेलो. तो मजबरोबर त्या वेळी असता तर मजवर हल्ला होणे मुळी अशक्यच होते. गांधीहत्येच्या वेळी पुण्यामध्ये अण्णासाहेब ढमढेरे यांच्या वाड्यात दिनकरच्या मुलांचे बिऱ्हाड होते. तोही त्या वेळी रजेवर तेथे आला होता. दंगेखोरांनी त्या वाड्याला आग लावली अन् सामान बाहेर काढण्याचा सपाटा लावला. दिनकरने न घाबरता शांतपणे दंगेखोरांची समजूत घातली आणि आपल्या बिऱ्हाडामधून त्यांना मागे परतवले. असो.

गेल्या पन्नास वर्षांमध्ये हर्षांचे, आनंदाचे, विषादाचे, निराशेचे आणि सुखदुःखाचे अनेक क्षण आम्ही हातांत हात घालून आणि गळ्यात गळा घालून घालविले. जीवनातील सर्व रहस्ये एकमेकांना उलगडून दाखविली. भवितव्याची अनेक स्वप्ने रचिली, आणि मनोरे उभारले. श्वासात श्वास मिसळले, अश्रूत अश्रू ओतले, आणि हास्यावर हास्याचे मजले उभारले. जगाकडे आणि जीवनाकडे दोनच डोळ्यांनी आम्ही पाहिले आणि संसारांतील विविध भावनांचा आस्वाद एकाच हृदयाने घेतला. " येहरीत दोन मोटा, दोन्हीमधी पानी एक " असे आमचे आजपर्यंतचे सारे आयुष्य गेले. आयुष्याचा प्रारंभ ज्या ठिकाणी झाला त्याच कऱ्हा नदीच्या काठी आयुष्याच्या उत्तरार्धांत येऊन एकत्र राहावयाचे आणि एकमेकांनी एकमेकांना आपापल्या आयुष्यामधल्या जमाखर्चाचा हिशेब द्यावयाचा असा उभयतांचा मनोमय करार झाला होता. पण काळाने विपरीत योजना केली. अर्धशतकाच्या माझ्या बालमित्राच्या अस्थि हातात घेऊन आज मलाच कऱ्हा नदीच्या काठी जावे लागत आहे. आयुष्यातल्या आनंदाचे एक निधान नाहीसे झाले. किती शोक करावा ? अन् दुःख करून उपयोग तरी काय ? म्हणूनच महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदारांनी मला पत्र लिहून जे कळविले की, " नाभिनन्देत मरणम् नाभिनन्देत जीवितम् ! " तेच खरे आहे. संसारात ह्याच तत्वज्ञानाचा अंगीकार अखेर करावा लागतो !

## ४६

# ज्योतिषाचार्य वसंत लाडोबा म्हापणकर

माझे तीस-पस्तीस वर्षांचे मालवणचे मित्र होराभूषण वसंत लाडोबा म्हापणकर हे मंगळवार १८ मार्च रोजी कालवश झाले हे आता सर्व महाराष्ट्राला कळून चुकले आहे. त्यांच्या मृत्यूने सर्वांत जास्त दुःख त्यांच्या कुटुंबियांना नि त्यांच्या आप्तमित्रांना होईल ही तर अगदी उघडच गोष्ट आहे. तथापि, त्यांच्या मृत्यूने माझ्या मनाची जी कालवाकालव झाली त्याची कल्पना फारच थोड्यांना असेल.

वस्तुतः त्यांचा नि माझा तसा काही संबंध नव्हता. किंबहुना, त्यांची थट्टामस्करी करीत करीतच मी मराठी नाट्यसृष्टीत प्रवेश केला. १९३३ साली माझे पहिले नाटक 'साष्टांग नमस्कार' हे पुण्याच्या रंगभूमीवर प्रकट झाले. त्या नाटकात मी राशिभविष्याची थट्टा केली आहे. कारण त्याच सुमारास पुण्याच्या 'सकाळ'-मध्ये नाशिकचे 'होराभूषण' दीक्षित आणि 'मौजेत' मालवणचे म्हापणकर ह्यांचे राशिभविष्य प्रसिद्ध होऊ लागले होते. आणि सर्वसामान्य जनतेची मने त्या राशिभविष्याने आकर्षित होऊ लागली होती. मी काही ज्योतिषाचा अभ्यास केला नव्हता, किंबहुना त्या विषयाची थट्टा करण्याच्याच वयात नि वृत्तीत मी होतो.

कारण, एकंदर राशी बारा. तर जगातली एकंदर लोकसंख्या (त्या वेळी) दोनशे चाळीस कोट. म्हणजे जगात एका राशीचे वीस कोट लोक होते. ह्या वीस कोटी लोकांचे एका दिवसाचे भविष्य सर्रास एकच कसे असू शकेल ? हा माझा

सरळ युक्तिवाद. बरे, एका दैनिकात एका राशीचे जे भविष्य ज्या दिवशी दिले जाते, त्याच्या नेमके उलटे भविष्य त्याच दिवशी दुसऱ्या वृत्तपत्राने सांगितलेले असते. त्यामुळे भविष्याबद्दल श्रद्धा असणाऱ्या वाचकांचा गोंधळ उडतो आणि श्रद्धा नसणाऱ्या वाचकांची करमणूक होते. एक राशिभविष्य म्हणते, 'आज प्रवासाचा योग आहे.' दुसरे भविष्य म्हणते, 'आज गृहसौख्य चांगले मिळेल!' अशा वेळी एखादा चहाटळ माणूस विनोदाने म्हणेल 'शक्य आहे, प्रवासात देखील गृहसौख्य मिळण्याची शक्यता आहे!' एक भविष्य म्हणते, 'आज सट्टा–लॉटरीपासून सावध रहा!' दुसरे भविष्य सांगते, 'आज लॉटरीत तुम्हाला फायदा मिळण्याचा संभव आहे.'

राशिभविष्याची थट्टा करण्याचा मोह म्हणूनच मला 'साष्टांग नमस्कारा'त झाला. त्यामुळे मालवणच्या म्हापणकरांचे राशिभविष्य महाराष्ट्रात सर्वत्र गाजले. आणि परिणाम उलटा झाला की, त्यांच्या राशिभविष्याचे गिऱ्हाईक वाढले. वसंत लाडोबाही वृत्तीने खेळाडू असल्याने माझ्या थट्टेने त्यांनी आपले मन दुखावून न घेता, उलट ते माझेच भक्त बनले आणि मला 'गुरुवर्य' म्हणून संबोधू लागले. 'गुरू आहात झाले!' स्वरामध्ये नव्हे, तर खरोखरच निष्ठेने आणि श्रद्धेने! त्यांचा माझा स्नेहभाव अधिक दृढ होण्याचे दुसरे एक अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे इंग्रजी तारखेप्रमाणे त्यांचा नि माझा जन्म एकाच तारखेला म्हणजे '१३ ऑगस्ट' रोजी झाला. सनात ९ वर्षांचे अंतर होते. माझा जन्म '१३ ऑगस्ट १८९८'चा तर त्यांचा जन्म '१३ ऑगस्ट १९०७'चा. आमचे दोघांचे वाढदिवस एकाच वेळी यावयाचे त्या वेळी आपल्याला आशीर्वाद पाठवावा म्हणून मला ते आग्रहाने पत्र पाठवीत. हनुमान जयंतीच्या दिवशी त्यांच्याकडून माझ्या दीर्घायुष्याबद्दल मारुतीरायाच्या चरणी त्यांनी केलेली प्रार्थना अंगाऱ्यासह मजकडे पाठविण्यास ते कधीही चुकत नसत.

गेल्या तीस वर्षांत शेकडो पत्रे त्यांनी मला पाठविलेली असतील. त्यांपैकी पुष्कळशा पत्रांचा संग्रह माझ्याजवळ अजून आहे. त्यांचे अक्षर अत्यंत ठसठशीत, वळणदार, सुवाच्य, सरळ ओळींमध्ये लिहिलेली असे. त्यामुळे त्यांचे पत्र अगदी लांबून पाहूनही ओळखता येत असे. माझ्याबद्दलचा त्यांचा आदर एवढा मोठा की, त्यांनी आपल्या एका मुलाचे नाव 'प्रल्हाद' असे ठेवले होते, आणि एकदा तर आपला एखादा मुलगा मी दत्तक घ्यावा अशी त्यांनी मला विनंती केली होती. मी त्या वेळी आर्थिक संकटात होतो. म्हणून मी त्यांना लिहिले,

" मुलगा दत्तक घेण्यासारखी माझी परिस्थिती नाही. कारण, माझ्याकडून त्याला फक्त कर्जाचाच वारसा मिळेल ! "

पत्रद्वारा त्यांचा नि माझा संबंध एवढा घनिष्ठ असला तरी त्यांच्या नि माझ्या प्रत्यक्ष भेटीचे प्रसंग असे फारच तुरळक आले. मुंबईला ते क्वचितच येत. तरी गेल्या तीस वर्षांत मुंबईला त्यांची नि माझी भेट चार-पाच वेळा झाली असेल, आणि मालवण साहित्य संमेलनाला गेलो असताना मी मुद्दाम त्यांना जाऊन भेटलो, आणि ज्या कागदपत्राच्या डोंगरात बसून ते आपले भविष्यलेखन वर्षानुवर्षे दर आठवड्याच्या आठवडे करीत त्या वास्तूचे प्रत्यक्ष अवलोकन करून मी आलो.

त्यांनी आपल्या भविष्यलेखनाला प्रारंभ जरी ' मौजे 'त केलेला असला तरी पुढे 'धनुर्धारी'चे प्रवर्तक श्री. बाबूराव सापळे ह्यांच्या चरणी त्यांनी आपली निष्ठा जन्मभर वाहिली. त्यांना अधिक पगाराची अनेक वृत्तपत्रांकडून अनेकदा बोलावणी आली, पण त्यांनी ती झिडकारून लावली. त्यांच्या आर्थिक अडचणी अनंत होत्या, संसार वाढता. त्यामुळे पुढे पुढे तर उत्पन्न नि खर्च ह्यांची तोंडे जुळविता जुळविता त्यांचा जीव अगदी मेटाकुटीला येई. पण इतके जरी असले तरी ' धनुर्धारी'शी त्यांची निष्ठा शेवटपर्यंत अव्यभिचारी राहिली.

१९४० साली मी जेव्हा साप्ताहिक ' नवयुग ' काढले, तेव्हा आपल्या पत्रात राशिभविष्य छापावयाचे नाही असा मी निश्चय केला होता. पण पुढे ते पत्र मुंबईला आणल्यानंतर साप्ताहिकाचा खप वाढविण्याच्या दृष्टीने ' राशिभविष्य ' दिलेच पाहिजे असा विक्रेत्यांकडून जोराचा दबाव आला. तेव्हा त्याबाबत वसंत लाडोबांना विचारून पाहावे असा माझ्या मनात विचार आल्यावाचून राहिला नाही. पण मी माझ्या मनाला आवरले नि त्यांना त्या बाबतीत लिहिण्याच्या भानगडीत पडलो नाही. कारण वसंत लाडोबाप्रमाणे बाबूराव सापळे हे देखील माझे मित्र होते. म्हणून त्या ऋणानुबंधात व्यत्यय नको.

एवढ्यासाठी ' नवयुग 'मध्ये एका सामान्य ज्योतिष्याला ' सवाई म्हापणकर ' बनवून राशिभविष्य मी छापू लागलो. पण आमच्या ' सवाई म्हापणकरा 'ने एका वर्षाच्या आतच हात टेकले. तेव्हा दोन आठवडे मी स्वतःच ते भविष्य जुन्या भविष्यातील राशींची उलटापालट करून छापत होतो, आणि पुष्कळदा ते भविष्य अचूक बरोबर येत असे. तथापि, माझ्यासारखा एक अडाणी माणूस ते राशिभविष्य लिहीत आहे ही गोष्टमात्र कोणाच्याही लक्षात आली नाही.

तेव्हा त्या गोष्टीचे 'तात्पर्य' लक्षात घेऊन, मी 'साप्ताहिक नवयुग' मधले राशिभविष्य कायमचे बंद करून टाकले.

वसंत लाडोबांच्या 'राशिभविष्या'ने जवळ जवळ तीन तपे महाराष्ट्रातील हजारो लोकांच्या दैनंदिन जीवनावर अप्रतिहतपणे राज्य केले ही गोष्ट कोणालाही नाकबूल करता येणार नाही—मग राशिभविष्यावर त्याचा विश्वास असो वा नसो! एवढे जबरदस्त आकर्षण त्यांच्या भविष्यात काय होते? काय, त्यांच्या भविष्यातले अक्षर न् अक्षर खरे ठरत असे? तसेही म्हणता येणार नाही! कित्येकदाच काय, पण पुष्कळदा—अनेकदा त्यांनी वर्तविलेल्या भविष्याचा वाचकांना अर्थबोधही होत नसे. मग ते खरे ठरते का खोटे ठरते हे बघण्याचा प्रश्नही उद्‌भवत नसे. असे असूनही त्यांचे भविष्य वाचण्यासाठी हजारो वाचकांच्या उड्या पडत, त्यात मुळीच शंका नाही. एवढे त्यांच्या राशिभविष्याचे आकर्षण काय होते?

त्याचे आकर्षण हे होते की, मोठमोठ्या साहित्यिकांशी किंवा भाषाप्रभूंशी स्पर्धा करील अशा शैलीदार भाषेत ते आपले भविष्य सांगत असत. त्यांचे भविष्यकथन हा मराठी वाङ्मयाचा एक स्वतंत्र प्रकारच मुळी त्यांनी निर्माण करून ठेविला. प्राचीन आणि आधुनिक मराठी वाङ्मयाचा त्यांचा व्यासंग जबरदस्त होता. आपल्या भविष्यकथनामधून संत-वाङ्मयामधले शेकडो अमर शब्द नि आधुनिक साहित्यातली शेकडो सुभाषिते ते उद्‌धृत करीत असत. त्यामुळे त्यांच्या भविष्यापेक्षा त्यांच्या भाषालालित्याने आणि निरूपणशैलीनेच वाचक मोहित होत असे. प्रत्येक वेळी नवनवीन संत किंवा लेखक निवडीत, आणि मग भविष्य सांगताना त्यांचे सद्विचार, सुवचने ह्यांची ते मुक्त हस्ताने खैरात करीत. खरोखर, त्यांचा खरा पिंड भविष्यवेत्त्याचा नसून साहित्यिकाचा होता. भविष्य हे नुसते निमित्त होते. त्यांनी आपल्या भविष्यकथनातून जुन्यानव्या मराठी वाङ्मयाचा जेवढा प्रभावी प्रचार केला असेल, तेवढा स्वतःला साहित्यिक म्हणवून घेणाऱ्या लेखकांनीही केला नसेल.

मी तर असे म्हणतो की, गेल्या तीस वर्षांत त्यांनी जे भविष्य कथन केले आहे, त्यातला भविष्याचा भाग तेवढा वजा करून बाकीचे त्यांचे लेखन जर एकत्रित केले, तर ते सर्वसामान्य मराठी माणसाचे मार्गदर्शन, उद्‌बोधन नि मनोरंजन करणारे एक प्रचंड महाभारतच होईल. म्हणून वसंत लाडोबांच्या निधनाने एक भविष्यवेत्ता गेला म्हणून मला वाईट वाटत नाही, तर मराठी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम.......................... दि: ..............
क्रमांक ........................ नों. दि. ..............

साहित्याच्या एका निस्सीम उपासकाला नि शैलीदार लेखकाला आपण मुकलो ह्याचे मला विशेष दुःख होते. आपल्या भविष्य लेखनातून त्यांनी मराठी-मधल्या महत्त्वाच्या लेखकाकडे किंवा त्याच्या लेखनाकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचा जो अगदी योजनाबद्ध प्रयत्न केला, ती त्यांची वाङ्मयीन कामगिरी तर अविस्मरणीय आहे.

उदाहरणार्थ, माझे एखादे नाटक घेतले की, त्यातले अनेक महत्त्वाचे उतारे ते निरनिराळ्या राशिभविष्यात असे बेमालूमपणे विखरून टाकावयाचे की, ते भविष्य सांगताहेत का माझ्या नाटकाची जाहिरात करताहेत हे वाचकांच्या लक्षातही येत नसे. अशा तऱ्हेने किती तरी कादंबरीकारांच्या, निबंधकारांच्या नि कवींच्या कलाकृतींचा त्यांनी आपल्या भविष्यकथनातून प्रचार केला आहे. दुसरे त्यांचे एक वैशिष्ट्य असे. महाराष्ट्रातल्या कित्येक व्यक्तींच्या राशी त्यांना माहीत होत्या. तेव्हा त्या त्या राशीचे भविष्य वर्तविताना ते ती ती व्यक्ती डोळ्यापुढे ठेवून असे लिहीत की, ते वाचून त्या त्या व्यक्तीला धीर यावा नि तिचे मार्गदर्शन व्हावे. माझी राशी 'मिथुन' आहे हे त्यांना माहीत होते. म्हणून त्या राशीचे भविष्य ते मलाच डोळ्यापुढे ठेवून लिहीत असत याविषयी माझ्या मनात कधीही संशय आला नाही. ते लिहीत, "बाबूराव, या वेळी जरा बेताने अं!" त्यामुळे ते भविष्य वाचताना जणू काही वसंत लाडोबा प्रत्यक्ष माझ्याशीच बोलत आहेत असे मला वाटे. वसंत लाडोबांच्या गुणाप्रमाणे, पात्रतेप्रमाणे नि तपश्चर्येप्रमाणे त्यांच्या आयुष्याचे चीज झाले नाही याचे दुःख वाटते. त्यांना कीर्ती अमाप मिळाली, पण लक्ष्मी मात्र त्यांच्याकडे सदैव पाठ फिरवूनच बसली होती. त्यालाही कारण त्यांची अनन्य निष्ठा! मालवण सोडावयाचे नाही—अन् 'धनुर्धारी'ला अंतर कदापि द्यावयाचे नाही! केवळ पैशाच्या मागे ते आयुष्यात कधीच लागले नाहीत. म्हणून पैसाही त्यांच्या मागे कधी लागला नाही. ही एकच त्यांच्या जीवनाची शोककथा होती! आताच थोड्या वेळापूर्वी मालवणचे एक गृहस्थ मला भेटावयाला आले होते. मृत्यूच्या दिवशी सकाळी वसंतराव माझी आठवण करीत होते असे त्यांनी मला सांगितले, ते ऐकून मला अगदी भडभडून आले.

(मराठा : ३०-३-१९६९)

## ४७

# माझा ‘बाबू’ गेला !

१९३३ सालापासून जो माझ्या मोटरीचा ‘ड्रायव्हर’ होता, तो माझा ‘बाबू ड्रायव्हर’ (ऊर्फ बाबूराव माणिक मारवळकर) हा काल रोजी दुपारी साडेचार वाजता मरण पावला, हे कळविण्यास मला अतिशय दुःख वाटते. सतत तीस वर्षे त्याने माझी इमानेइतबारे सेवासोबत केली. माझ्या आयुष्यातल्या निरनिराळ्या स्थित्यंतरांच्या वेळी तो माझा एकमेव साथी होता. पुण्याच्या ‘कँप एज्युकेशन सोसायटी’च्या शाळेचा जेव्हा मी प्रिन्सिपल होतो, तेव्हा तो माझ्या नोकरीत पहिल्याने आला. शाळेचा मी प्रमुख होतो खरा, पण शाळेच्या व्यवस्थेत पुष्कळसा त्याचाच हात असे. वर्गात मुले दांडगाई करू लागली, की तो तेथे जाऊन त्यांना दमदाटी द्यावयाचा. वर्गात शिक्षक नसले की ते येईपर्यंत तो वर्ग सांभाळावयाचा. शाळेच्या सर्व समारंभांमध्ये तो माझ्या मागे उभा राहून कोणती गोष्ट कमी पडते, कोणती पडत नाही, ह्याचे डोळ्यात तेल घालून बारकाईने निरीक्षण करावयाचा ! शाळेतल्या प्रत्येक ‘वांड’ पोराची त्याला खडान् खडा माहिती असायची. त्यामुळे शाळेत कोणतीही भानगड उपस्थित झाली, की तिची बित्तंबातमी तो मला पहिल्याने द्यावयाचा. माझ्या शाळेतले शिक्षक माझ्या खालोखाल त्याला वचकत असत. कारण, आपल्या विरुद्ध ‘साहेबां’ना हा काय सांगेल त्याचे त्यांना भारी भय वाटत असे. पण खरे सांगायचे म्हणजे बाबू कोणाच्याही विरुद्ध चुगल्या करीत नसे. सर्वांशी तो हसून खेळून वागत असे.

साहित्याच्या एका निस्सीम उपासकाला नि शैलीदार लेखकाला आपण मुकलो ह्याचे मला विशेष दुःख होते. आपल्या भविष्य लेखनातून त्यांनी मराठी-मधल्या महत्त्वाच्या लेखकाकडे किंवा त्याच्या लेखनाकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचा जो अगदी योजनाबद्ध प्रयत्न केला, ती त्यांची वाङ्मयीन कामगिरी तर अविस्मरणीय आहे.

उदाहरणार्थ, माझे एखादे नाटक घेतले की, त्यातले अनेक महत्त्वाचे उतारे ते निरनिराळ्या राशिभविष्यात असे बेमालूमपणे विखरून टाकावयाचे की, ते भविष्य सांगताहेत का माझ्या नाटकाची जाहिरात करताहेत हे वाचकांच्या लक्षातही येत नसे. अशा तऱ्हेने किती तरी कादंबरीकारांच्या, निबंधकारांच्या नि कवींच्या कलाकृतींचा त्यांनी आपल्या भविष्यकथनातून प्रचार केला आहे. दुसरे त्यांचे एक वैशिष्ट्य असे. महाराष्ट्रातल्या कित्येक व्यक्तींच्या राशी त्यांना माहीत होत्या. तेव्हा त्या त्या राशीचे भविष्य वर्तविताना ते ती ती व्यक्ती डोळ्यापुढे ठेवून असे लिहीत की, ते वाचून त्या त्या व्यक्तीला धीर यावा नि तिचे मार्गदर्शन व्हावे. माझी राशी 'मिथुन' आहे हे त्यांना माहीत होते. म्हणून त्या राशीचे भविष्य ते मलाच डोळ्यापुढे ठेवून लिहीत असत याविषयी माझ्या मनात कधीही संशय आला नाही. ते लिहीत, "बाबूराव, या वेळी जरा बेताने अं!" त्यामुळे ते भविष्य वाचताना जणू काही वसंत लाडोबा प्रत्यक्ष माझ्याशीच बोलत आहेत असे मला वाटे. वसंत लाडोबांच्या गुणाप्रमाणे, पात्रतेप्रमाणे नि तपश्चर्येप्रमाणे त्यांच्या आयुष्याचे चीज झाले नाही याचे दुःख वाटते. त्यांना कीर्ती अमाप मिळाली, पण लक्ष्मी मात्र त्यांच्याकडे सदैव पाठ फिरवूनच बसली होती. त्यालाही कारण त्यांची अनन्य निष्ठा! मालवण सोडावयाचे नाही--अन् 'धनुर्धारी'ला अंतर कदापि द्यावयाचे नाही! केवळ पैशाच्या मागे ते आयुष्यात कधीच लागले नाहीत. म्हणून पैसाही त्यांच्या मागे कधी लागला नाही. ही एकच त्यांच्या जीवनाची शोककथा होती! आताच थोड्या वेळापूर्वी मालवणचे एक गृहस्थ मला भेटावयाला आले होते. मृत्यूच्या दिवशी सकाळी वसंतराव माझी आठवण करीत होते असे त्यांनी मला सांगितले, ते ऐकून मला अगदी भडभडून आले.

(मराठा : ३०-३-१९६९)

संसार थाटला. चित्रपटाच्या व्यवसायात सावकार, हुंडीवाले, बँका, पेढ्या नि कोर्टकचेऱ्या ह्यांच्याशी रात्रंदिवस माझा संबंध. आज अमक्या मुलतान्याकडून हुंडी आण, तमक्याकडून 'बदला' करून घे, अमक्या बँकेत पैसे भर, तमक्या वकिलाला बोलावून आण, ही सर्व कामे बाबू एखाद्या सराईत माणसाप्रमाणे करी. त्यात कधी दिरंगाई वा चूक होत नसे. कोणतेही काम कधीही अडून द्यायचे नाही किंवा पडून द्यायचे नाही हा एकच त्याचा बाणा असे.

१९४८ मधे 'मोरूची मावशी' हा चित्रपट मी काढला. त्यात भाडे वसूल करणाऱ्या भय्याची एक भूमिका होती. ऐनवेळी कोणी माणूस मिळाला नाही. तोच भय्याचा 'मेक-अप' करून बाबू तयार झाला. त्याचे शरीर स्थूल असल्याने त्या चित्रपटात दामूअण्णा मालवणकरांचा जेव्हा तो पाठलाग करतो तेव्हा एक निराळाच विनोद निर्माण झाला. रुपेरी पडद्यावर त्याची तेवढीच एक आठवण शिल्लक उरलेली आहे. माझ्या आयुष्यात सांपत्तिक दृष्ट्या अनेक चढ-उतार झाले. त्या सर्व 'दशावतारात' बाबू माझ्याबरोबर उभा राहिला. महिनेच्या महिने, वर्षेच्या वर्षे पगार मिळो वा न मिळो, माझी नोकरी सोडून जाण्याचा विचारसुद्धा बाबूच्या डोक्याला कधी शिवला नाही. मी म्हणजे त्याचा देव! माझ्याविरुद्ध कोणी बोलला की त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जात असे. उभ्या आयुष्यात त्याने कधी माझ्याकडे काही मागितले नाही किंवा कशाचीही माझ्याकडे तक्रार केली नाही. माझे उरलेले अन्न तो खाई. माझे जुनेपाने कपडे तो अंगावर घाली. त्याला मी किती पगार देत होतो हे सुद्धा मला आता आठवत नाही. 'मला पगार वाढवा' किंवा 'मला इतके कर्ज द्या' असे माझ्यासमोर उभे राहून त्याने कधी सांगितले नाही. कधी रागावलो म्हणजे त्याला पुष्कळदा मी टाकून बोलत असे. पण कितीही मी बोललो तरी त्याच्या तोंडून उलट अक्षर म्हणून कधी निघाल्याचे मला आठवत नाही. मान वर करून त्याने कधी माझ्या तोंडाला तोंड दिले नाही. माझ्याशी त्याची जशी ही वागणूक, तसेच माझ्या सर्व मित्रांशीही पण त्याचे वागणे अत्यंत नम्रतेचे आणि अदबीचे असे. त्यामुळे माझ्या मित्रपरिवारात त्याला फार मोठा मान असे. उभ्या आयुष्यात त्याने कोणापुढे तोंड वेंगाडले नाही.

मूळचा तो चांगल्या घरंदाज मराठा कुळातला. पुण्यात त्याच्या मालकीची दोन घरे पण होती. पण तरुण वयात मोटर-दुरुस्तीचा कारखाना त्याने काढला. त्यात त्याचे होते नव्हते ते सर्व गेले. नंतर तो माझ्याकडे आला. मी त्याला



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ६२०५९ वि: निबंध
क्रमांक 2983 नों: दि: 3/12/69

दा. ९६३०६

माझ्या कुटुंबामधला समजत होतो. काही वर्षांपूर्वी एका दसऱ्याच्या आधल्या दिवशी त्याची लहान मुलगी मुंबईच्या रस्त्यावर बसच्याखाली चिरडून मरण पावली. त्या दुःखाने आम्ही अक्षरशः धाय मोकलून रडलो. तिचे आम्ही सुतक पाळले.

बाबूच्या किती आठवणी सांगाव्यात ? गेल्या तीस वर्षांमध्ये महाराष्ट्रामधल्या असंख्य लोकांशी माझा संबंध आला. त्या सर्वांना बाबू माहीत आहे. मला जे जे ओळखतात ते ते सर्व बाबूला ओळखतात. मी काढलेल्या सर्व संस्थांमधल्या सगळ्या मंडळींची बाबूशी उत्तम जानपछान होती. त्या सर्वांना बाबूच्या निधनाने वाईट वाटल्याखेरीज राहणार नाही. बाबू हा मधून मधून काही कविता करावयाचा, काही विनोद करावयाचा, असे मला कोणी तरी सांगत असे. पण माझ्यासमोर त्याबद्दल तो कधी बोलला नाही. 'दैनिक मराठा' निघाल्यानंतर भरपगारावर मी त्याला जवळ जवळ सेवानिवृत्त केलेले होते, पण त्याला घरी बसून थोडेच गोड वाटते आहे ? तो छापखान्यामधले काही ना काही तरी काम करीत बसायचाच. 'अत्रे थिएटर्स' निघाल्यानंतर पुन्हा पूर्वीचा उत्साह त्याच्या अंगात संचारून 'कंपनी'च्या मोटरवर तो स्वार झाला होता. पण एवढ्यात त्याच्या आयुष्याची मध्येच दोरी तुटली ! माझ्या आयुष्यात अशी कोणती गोष्ट होती की, जी त्याला माहीत नव्हती ! माझी अब्रू आणि माझे प्राण सतत तीस वर्षे त्याच्याच ताब्यात होते–सर्वस्वी त्याच्याच ताब्यात होते. पण ते सांभाळण्यासाठी त्याने आपल्या रक्ताचे पाणी केले–हाडाची काडे केली. उभ्या आयुष्यांत माझे प्रेम आणि माझा विश्वास दवडण्यासारखी एकही गोष्ट त्याच्या हातून घडली नाही. माझ्या सुखात तो हसला. माझ्या दुःखात तो रडला. माझ्या संकटात तो माझ्या मागे खडकासारखा उभा राहिला. माझ्या वैभवात तो मला डोक्यावर घेऊन नाचला. त्याला का मी नोकर म्हणू ? छे, छे रक्ताच्या नात्यापेक्षाही त्याचे माझे नाते अधिक दाट होते. पूर्वजन्मीचाच काहीतरी संबंध असला पाहिजे. 'बाबू' गेल्याने माझ्या जीवनात आता जी पोकळी निर्माण झाली आहे, तिची कल्पना आणि तिचे दुःख माझ्याखेरीज दुसऱ्या कोणाला जाणवणार ?

(मराठा : २०-६-१९६३)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.......................... वि: ....................
क्रमांक ४२३४....... नों: दि: ....................



हुं द के

REFBK-0017306